# शेतकरी कर्जनिवारण कायदा.

लॉ ॲकॅडेमी, पुणें.

मुंबईचा

# शेतकरी कर्जनिवारण कायदा

( मुंबईचा सन १९४७ चा २८ वा कायदा )

तयार करणार :

लॉ अॅकॅडेमी : ७२० सदाशिव, पुणे २.

प्रथमावृत्ति
नोव्हेंबर १९४७

किंमत ४ रु. साधी व
४॥ रु. कापडी बांधणी

मुद्रक—व्यं. रा. शिंगरे,
हिंदुराष्ट्र—मुद्रणालय, १४०८ कसबा, पुणें २.

## लॉ ॲकॅडेमी, पुणें.

१ श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एल्एल्. बी.
[ अध्यक्ष ] ७२० सदाशिव, पुणें.

२ व. सी. कुलकर्णी, बी. ए., एल्एल्. बी.
[ जनरल सेक्रेटरी ] १२३१ डे. जिमखाना पुणें.

३ शि. सी. अभ्यंकर, बी. एस्सी. एल्एल्. बी.
[ खजिनदार ] १०५ शुक्रवार, भाऊमहाराज बोळ, पुणें.

४ डॉ. वि. गो. जोशी, बी. ए., एल्एल्. बी.
[ कार्यकारी सभासद ] २१९ कसबा, पुणें.

५ वा. रा. होनप, एम्. ए. एल्एल्. बी.
[ कार्यकारी सभासद ] ३२३ शनवार, पुणें.

६ शं. ब. कामत, बी. ए., एल्एल्. बी.
[ कार्यकारी सभासद ]
सारस्वत कॉलनी, ४३३।१० सोमवार, पुणें.

ऑफिसचा पत्ता : ७२० सदाशिव, पुणें २.

श्री. शि. सी. अभ्यंकर यांनीं
लॉ ॲकॅडेमी करितां
७२० सदाशिव, पुणें २, येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना

**लॉ ॲकॅडेमी—पुणें** यांजतर्फे शेतकरी कर्जनिवारण कायद्यावरील हें पुस्तक वाचकवर्गास सादर करण्यास आनंद वाटतो. या पुस्तकाचें वैशिष्ठ्य म्हणजे हें पुस्तक खुद्द ॲकॅडेमीला प्रसिद्ध करण्याची संधि मुंबई सरकारच्या कृपेमुळें मिळाली हें होय. युद्धजन्य परिस्थितीत घातलेल्या निर्बंधांमुळें कांहीं विशिष्ठ प्रकाशकांनाच पुस्तकें प्रसिद्ध करतां येत असत व हौशी लेखकांना अशा प्रकाशकांमार्फत आपलीं पुस्तकें प्रसिद्ध करून घ्यावीं लागत. मुंबई सरकारच्या नवीन धोरणामुळें नवीन व हौशी लेखकांची ही कुचंबणा दूर झाली व ॲकॅडेमीला हें पुस्तक छापण्यास लागणारा कागद स्वतःच्या नांवावर खरेदून पुस्तक छापतां आलें. सरकारच्या या उदार कृत्याबद्दल ॲकॅडेमी सरकारची आभारी आहे.

**पुस्तकाची रचना**—हें पुस्तक तयार करतांना मूळ इंग्रजी, परिशिष्टा- दाखल दिलें आहे. त्यामुळें एका ठिकाणीं कायदा पहावयास मिळण्याची सोय होते व मराठी अर्थाविषयीं अगर टीपेविषयीं शंका वाटल्यास पडताळा पहावयास मिळतो. ॲकॅडेमीनें आपल्या सर्व पुस्तकांतून ही सोय प्रथम पाहिलेली आहे.

मूळ इंग्रजी बरोबरच सर्व कायद्याचें मराठींत भाषांतर दिलें आहे. सदर भाषांतर शक्य तों सरकारीच दिलें आहे. सरकारी भाषांतर ज्या ठिकाणीं फार क्लिष्ट वाटलें त्या ठिकाणीं तें बदललें आहे. भाषांतराखालीं लगेच विषयवारीनें प्रत्येक कलमाचा अर्थ स्पष्ट करून सांगितला असून त्यांतून निघणारे विविध अर्थ व विविध दृष्टीकोनांतून त्याची होणारी छाननी यांचा विचार केला आहे; पुस्तक तयार करतांना ॲकॅडेमींतल्या सर्व सभासदांमध्यें चर्चा करून व विशेषप्रसंगीं व्यवसायांतील इतर वकिलांना आलेले व येणारे अनुभव जमेस धरून मग टीका लिहिण्यास घेतलेली आहे. कल्पनेनें जेवढे मुद्दे आकलन करतां आले तेवढे केले आहेत. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत कितीतरी नवीन नवीन अडचणी, श्लेष व मुद्दे निघतात. ते अर्थातच, पुढील आवृत्त्यां- साठीं राखून ठेवावयास पाहिजेत. न्यायालयीन निर्णयांचा योग्य त्या ठिकाणीं

उपयोग केलेला आढळून येईल. एकंदरींत पुस्तक वकिलवर्गाला व सर्वसाधारण जनेतला जास्तीतजास्त उपयोगी पडावें या दृष्टीनें जेवढी दक्षता घेतां येईल तितकी घेतली आहे.

**ॲकॅडेमीची प्रगतिः**—ॲकॅडेमीच्या कामाला सुलभ पडावें म्हणून पुण्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. पे मास्टर यांनी ॲकॅडेमीला कोर्टाच्या आवारांत एक जागा दिली आहे. त्यामुळें वकील बंधूंबरोबर चर्चा करण्यास व कायद्याचा अर्थ स्पष्ट करण्यास फार मोठी मदत झाली आहे. श्री. पेमास्टर यांची ॲकॅडेमी ही फार आभारी आहे. सदर जागेंत महिन्यांतून दोन तीन वेळां कायद्यावरील तात्विक चर्चा व व्याख्यानें होतात व त्यांत सर्व वकीलबंधु भाग घेतात ही आनंदाची गोष्ट आहे.

**कायदेमंत्र्यांची ॲकॅडेमीस भेटः**—ॲकॅडेमीचा दुसरा वाढदिवस गणेश चतुर्थीला येत होता. त्या निमित्तानें ॲकॅडेमीतर्फे एक समारंभ करण्यांत आला वत्यांस मुंबई प्रांताचे कायदेमंत्रि श्री. दिनकरराव देसाई यांना मुख्य पाहुणे म्हणून बोलावण्यांत आलें होतें. त्यांच्याबरोबर ॲकॅडेमीचें सभासद, न्यायाधीश व इतर वकीलबंधूंची प्रचलित कायद्यावर मन मोकळेपणानें चर्चा झाली. ॲकॅडेमीच्या कार्याबद्दल आनंद व्यक्त करून सर्व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करण्याचें कायदेमंत्र्यांनीं आश्वासन दिलें.

**या पुढील प्रकाशनेंः**—या पुढील तातडतोबीचें प्रकाशन म्हणजे सावकारी नियंत्रण कायदा हें होय. सदर पुस्तक डिसेंबर अखेर प्रसिद्ध होईल अशी उमेद आहे. त्यानंतर भाडेनियंत्रण व तुकडे एकत्रीकरण हे कायदे तयार करावयास घ्यावयाचे आहेत. ॲकॅडेमीच्या कूळकायद्याची दुसरी आवृत्तिहि केवळ सहा महिन्यांत खलास झाली आहे व तिसऱ्या आवृत्तीची तयारी होऊं लागली आहे.

**कायद्यासंबंधीं शंकाः**—या किंवा इतर कोणत्याहि कायद्यासंबंधीं कोणास कांहीं शंका असल्यास त्यांचें निराकरण करण्याचा प्रयत्न ॲकॅडेमीकडून जरूर होईल.

७२० सदाशिव, पुणें.
२० नोव्हेंबर १९४७

लॉ ॲकॅडेमी

# मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायदा १९४७.

## ( मुंबईचा १९४७ चा २८ वा कायदा )

( ता. २७ मे १९४७ च्या मुंबई सरकारच्या गॅझेटमध्यें ना. गव्हर्नर जनरल यांची मंजुरी ता. २२-५-४७ रोजीं मिळून प्रथमतः प्रसिद्ध झाला.)

**मुंबई प्रांतांतील शेतकरी कर्जनिवारणाबाबतच्या कायद्यांत दुरुस्ती व एकत्रीकरण करण्याबाबत कायदा.**

ज्या अर्थी मुंबई प्रांतांतील शेतकरी कर्ज निवारणाबाबतच्या कायद्यांत दुरुस्ती व एकत्रीकरण करणें व इतर कित्येक कारणां-बाबत तजवीज करणें इष्ट आहे, त्याअर्थी पुढें लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे.:—

### विषयवारी


१ शेतकरी कर्जनिवारण. | २ पूर्वीचा १९३९ चा कायदा.
| ३ दुरुस्ती व एकत्रीकरण.


### १. शेतकरी कर्जनिवारण.

सावकारांच्या मगरमिठींत आपला शेतकरी वर्ग सांपडलेला आहे व त्यामुळें देशांतील शेतीची सुधारणा होऊं शकली नाहीं व शेतकरी वर्ग हा कर्जाच्या खाईतच रुतून बसलेला आढळतो. सावकारी जळवा लागून रक्तशोषण झालेला शेतकरी प्रथम सत्तर पंचाहत्तर वर्षांपूर्वी सावकाराविरुद्ध उठला; कारण वर्षभर सर्व कुटुंबासह शेतीत खपून सुद्धां त्याला पुन्हा आपल्या पोटासाठीं सावकारांच्या घराचा उंबरठा झिजवावा लागे व त्याचे मेहरबानीवर अवलंबून राहावें लागत असे. त्याला कंटाळून शेतकऱ्यांनीं लुटालूट व दंगे धोपे केले तेव्हां सरकारचें लक्ष पहिल्यांदा त्यांचे कर्जबाजारीपणाकडे ओढलें गेलें. व त्यांतून त्यांची मुक्तता

करण्याकरता काय मार्ग काढावेत या करतां शेतकी कमिशन व इंडियन सेंट्रल बँकींग कमेटी नेमण्यात आली. या दोन्ही समित्यांनी आपले अभिप्रायांत असें सुचविले कीं सरकारनें सक्तीनें शेतकऱ्याचें कर्जनिवारण होईल असे कायदे केल्याशिवाय शेतकरी कर्जमुक्त होणार नाहीं. या अभिप्रायानुसार सरकारनें कर्जनिवारणार्थ पहिली कायदेशीर उपाययोजना म्हणून 'डेक्कन अॅग्रीकल्चरिस्टस् रिलीफ अॅक्ट' १८७९ सालीं पास केला. परंतु सरकारचा कर्जनिवारणाचा हेतु त्यायोगे साध्य झाला नाहीं. १९११ सालीं या कायद्याचे काय परिणाम झाले हें पहाण्यासाठीं सरकारनें एक समिती नेमली होती. त्या समितीनें आपला अभिप्राय असा प्रगट केला कीं शेतकरी कायद्यानें शेतकऱ्यांचा खराखुरा फायदा होण्याचे ऐवजी कजाखटल्याना त्यामुळें ऊत आला. अशा प्रकारें शेतकरी कर्जनिवारणाचा प्रथम प्रयत्न अयशस्वी झाला. म्हणून कॉंग्रेस सरकारनें १९३९ सालीं शेतकरी कर्ज निवारणाचा कायदा भरीव व व्यापक स्वरूपाचा केला. असे हें दोन सरकारी कर्जनिवारणाचे प्रयत्न आपल्या प्रांतांत झालेले आहेत.

## २. पूर्वीचा १९३९ चा कायदा.

१९३९ सालीं शेतकऱ्यांचें कर्जनिवारण करण्यासंबंधींचा कायदा सरकारनें केला. या कायद्यानें जे शेतकरी स्वतः जमीन कसत होते व ज्यांचे कर्ज १९३९ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस रु. १५००० हून कमी होतें त्याना या कायद्याचा फायदा मिळणार होता. त्यासाठीं बोर्डाची स्थापना करण्यांत आली होती, व त्यांतील मूळ कल्पनेप्रमाणें गांवांतील प्रतिष्ठित गृहस्थ त्यांत घेऊन त्यांचेमार्फत शेतकऱ्यांचे सर्व कर्जाचे हिशेब घ्यावयाचे होते. आणि शेतकऱ्याच्या कर्ज फेडण्याचा ऐपतीनुसार तें कर्ज कमी करावयाचे होते. तसें तें कमी झाल्यावर तें फेडण्यासहि २०–२५ वर्षांचा दीर्घ कालावधि देण्यांत आला होता. वकिलांची मध्यस्थी आली म्हणजे कायद्याचा कीस निघून मूळ उद्देश साध्य होत नाहीं असें वाटून वकिलांना बंदी करण्यांत आली होती. ज्यांना कर्ज देण्याची अजिबात ऐपत नव्हती त्यांना नादार ठरविण्याची योजना केली होती.

### ३. दुरुस्ती व एकत्रीकरण.

दुरुस्ती व एकत्रीकरण हा जो शब्दप्रयोग येथें वापरण्यांत आला आहे तो १९३९, १९४१, १९४५ व १९४६ सालीं शेतकरी कर्ज निवारणाबाबत जे कायदे व दुरुस्त कायदे झाले त्यांस अनुलक्षून करण्यांत आलेला आहे. १९३९ सालीं प्रथमतः नामदार लठ्ठे यांनीं हा कायदा तयार केला; त्यानंतर कॉंग्रेसमंत्रीमंडळानें राजीनामा दिला व गव्हर्नराचे ९३ कलमी राज्य सुरु झालें. त्यांनी सदर कायद्याची अंमलबजावणी सर्व प्रांतांत एकदम चालू न करतां कांहीं निवडक तालुक्यांतून चालू केली. तो प्रयोग कितपत यशस्वी झाला हें पाहण्याकरतां त्यांनी ऑगस्ट १९४३ मध्यें एका समितीची स्थापना केली व तिचे शिफारसीनुसार सदर कायदा आणखी कांहीं तालुक्यांतून चालू केला व पूर्वी लवादमंडळावर जे सेवानिवृत्त मुनसफ अगर मुलकी अंमलदार यांच्या ज्या नेमणुका झाल्या होत्या त्यांचे ऐवजी वकीलवर्गांतून लायक उमेदवारांच्या नेमणुका झाल्या व मूळ १९३९ च्या कायद्यांतही बरेच फेरफार करण्यात आले. मध्यंतरी सैन्यातील लोकांचे सोयीसाठीं १९४१ सालीं कांहीं जुजबी दुरुस्या झाल्या व १९४६ सालीं तशाच कांहीं थोड्याशा दुरुस्या कायद्यात करण्यांत येउन लवादमंडळाने दिलेल्या निवाड्यातील ऋणकोने द्यावयाची रक्कम लँड मार्टगेजबँकानी आपल्याकडे घेउन परस्पर धनकोस पैसे द्यावेत व स्वतः ते पैसे जमीनीचे तारणातून ऋणकोकडून हलके हप्तेबंदीनें वसूल करावेत असें ठरविण्यात आले. या वेळोवेळीं झालेल्या दुरुस्त्यांनीं जनतेच्या मनात गोंधळ होऊं लागला व एकेठिकाणीं कायदा सुसूत्र असा वाचावयास कठीण पडूं लागले. म्हणून १९३९ पासूनच्या आतापर्यंतच्या सर्व प्रयोगांचा, दुरुस्त्यांचा व कल्पनांचा विचार करून हल्लींचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता यांनी हा नवीन कायदा दुरुस्ती व एकत्रीकरण करून अजिबात नवीन स्वरुपात मांडला आहे. म्हणून हा वरील दुरुस्ती व एकत्रीकरण हा शब्दप्रयोग वापरण्यांत आला आहे. कायद्याला सर्वच्या सर्व नवीन स्वरुप देण्यात आले असल्यामुळे कायद्याचे आकलन सुसूत्रपणे व सुलभरीतीने होण्यास मदत झाली आहे. या कायद्यांत विशेषतः पूर्वीची

ल्वादमंडळे रद्द करून त्या ऐवजी नेहमीप्रमाणें दिवाणी कोर्टाकडे हीं कामें सोपविण्यांत आलीं आहेत.

---

# प्रकरण १.

## प्रास्ताविक.

### लहान सरनामा व व्याप्ती

१ (१) या कायद्यास सन १९४७ चा मुंबई कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा कायदा असें म्हणावें.

(२) हा कायदा मुंबई शहराखेरीज इतर सर्व मुंबई प्रांतास लागूं आहे.

१. हा कायदा केव्हां लागूं झाला.

या कायद्यास ना. गव्हर्नर जनरलांची संमती मिळाली व तो प्रथम गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाला तेव्हां म्हणजे तारीख २७ मे १९४७ रोजीं हा कायदा लागूं झाला कारण या कायद्यांत सरकारनें आपल्याकडे कायदा लागूं करण्याचें जाहीर करण्याचा अधिकार स्वतःकडे राखून ठेवलेला नाहीं. मुंबईचा जनरल क्लॉजेस ॲक्ट १९०४ चें कलम ५ प्रमाणें या कायद्यास गव्हर्नर जनरलनें दिलेली संमती तारीख २७ मे १९४७ चे गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाली म्हणून हा कायदा त्या तारखेस अंमलांत आला.

### व्याख्या

२ या कायद्यांत विषयावरून किंवा संदर्भावरून कांहीं बाध येत नसेल तर—

१. व्याख्यांचें कायद्यांतील महत्त्व.

कायद्याचा अर्थ करतांना व्याख्या या अत्यंत महत्वाच्या गणल्या

जातात. प्रत्येक कायद्यांत त्या त्या विषयाच्या अनुरोधानें काही विशिष्ट शब्द व वाक्प्रचार उपयोगांत आणलेले असतात व त्यांचे अर्थ सामान्य अर्थाहून थोडे भिन्न दिलेले असतात व असे शब्द कायद्यांत ज्या ज्या वेळीं उपयोगांत आणलेले असतात त्या त्या वेळीं त्या शब्दांचे अर्थ व्याख्येत दिलेले आहेत किंवा काय हें पाहणे अत्यंत महत्वाचें असतें. पुष्कळदा त्या शब्दाचा जो सर्व साधारण रूढ अर्थ आपल्या लक्षांत येतो त्याहून व्याख्येत दिलेला अर्थ जास्त व्यापक अगर संकुचित असूं शकतो. म्हणून कोणत्याही कलमाचा अर्थ लावतांना त्या कलमांत वापरलेल्या शब्दांचा अर्थ ' व्याख्यां ' मध्यें दिला आहे किंवा नाहीं हें पाहणें अत्यंत अवश्यक आहे.

(१) " निवाडा " निवाडा या शब्दाचा अर्थ कलम ८ पोट कलम ४ किंवा कलम ९, ३२ किंवा ३३ अन्वयें केलेला निवाडा अगर अपील कोर्टानें कायम केलेला अगर फेरफार केलेला निवाडा असा समजावा.

## विषयवारी.

### १. कोर्टाचे निवाडे.

या कायद्याप्रमाणें होणारे निरनिराळ्या कलमाखालचे निकाल एवढेच निवाडे म्हणून समजावयाचे आहेत. त्या प्रमाणें कलम ८ पोटकलम ४ प्रमाणें धनको व ऋणको यांचे दरम्यान कोर्टाबाहेर तडजोड होऊन कोर्ट जो निवाडा देते तो एक प्रकारचा निवाडा. तसेंच कलम ९ प्रमाणें कोर्टात काम चालूं असतांना धनको व ऋणको यांचे दरम्यान झालेल्या तडजोडी वरुन जो निवाडा होतो तो दुसऱ्या प्रकारचा निवाडा होय. तिसरे प्रकारचा निवाडा हा कलम ३२ प्रमाणें ऋणकोचें सर्व कर्ज ध्यानांत घेऊन व त्यांत कायद्याप्रमाणें द्यावयाची सूट देऊन जो निवाडा होतो तो व चौथ्या प्रकारचा निवाडा म्हणजे कलम ३३ प्रमाणें लँड मार्टगेज बँकेमार्फत कर्ज फेडीची योजना करण्याचा जो निवाडा तो होय. अशा प्रकारे 'निवाडा' हा

शब्द प्रयोग जेव्हां उपयोगांत आणलेला आढळेल तेव्हां वरील प्रकारांपैकीं संदर्भानुसार कोणता तरी एक निवाडा समजावा लागेल.

२. अपीलांतील निवाडे.

कोर्टाच्या ज्या ज्या निवाड्यावर कलम ४३ प्रमाणें अपील होऊं शकते त्या निवाड्यांचें स्वरुप अपीलांतील निकालनुसार राहील अपीलांत जर खालील कोर्टाचे निकाल कायम झाले तर अपीलांतील निकालास निवाडा म्हणावे लागेल. व त्यांत फेरफार झाल्यास त्यासही फेरफारासह 'निवाडा' असेंच म्हणावें लागेल.

कलम ४३ प्रमाणें कलम ८ (४), ९, व ३३ या प्रमाणें दिल्या गेलेल्या निवाड्यावर अपीलाची तरतूद केलेली नाहीं. तेव्हां अपीलांत बदल अगर कायम होणारे निवाडे म्हणजे कलम ३२ प्रमाणें निवाडे हेच मुख्यतः राहतील.

३. 'रिव्हिजन' चे परिणाम.

सदरहू कायद्याचा मूळ मसुदा जेव्हां प्रसिध्द झाला, तेव्हां त्यामध्यें या कायद्याखालीं 'रिव्हिजन' हायकोर्टाकडे होणार नाहीं, असें स्पष्ट लिहिलेले होते. परंतु निवडसमितीकडून सदरहूची योजना गाळून टाकण्यांत आली त्यामुळे 'रिव्हिजन' होण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. अशी 'रिव्हिजन होऊन हायकोर्टातील निर्णयानुसार खालचे कोर्टातील निवाड्यांत फरक झाल्यास, हायकोर्टाचा तो निकाल हा या कायद्याप्रमाणें 'निवाडा' समजला जाईल किंवा नाहीं हा वादाचा प्रश्न आहे. कारण, या कलमामध्यें मूळ कोर्ट व अपील कोर्ट यांच्यात्र निकालाची 'निवाडा' म्हणून योजना केलेली आहे.

(२) 'सहकारी मंडळी' म्हणजे मुंबईच्या सहकारी मंडळीचा १९२५ च्या कायद्याप्रमाणें नोंदली गेलेली होय.

## विषयवारी.

**१. १९२५ चा मुंबई सरकारचा सहकारी मंडळ्याबाबत कायदा.**

१९२५ सालीं मुंबई प्रांतांतील शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणाची स्थिती सुधारण्यासाठीं मुंबई सहकारी मंडळीचा कायदा पास करण्यांत आला. या कायद्यानें समान आर्थिक परिस्थितीच्या लोकांची सहकारी पद्धतीनें राहणी व जीवन सुधारण्याचा जरी प्रयत्न करण्यांत आला असला तरी हा कायदा मुख्यतः शेतकऱ्यांचें जीवन व त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यांकरतांच करण्यात आला. त्या कायद्याखालीं निरनिराळ्या खेड्यांतील शेतकऱ्यांच्या सोसायट्या स्थापन करण्यांत आल्या, व त्या कायद्यांप्रमाणें रजिस्टर कराव्या लागल्या. अशा रजिस्टर झालेल्या सोसायट्या या व्याख्येत येतात.

को ऑपरेटिव्ह सोसायटीचा उल्लेख जो या कायद्यांत आली आहे त्याचें कारण म्हणजे, को ऑपरेटिव्ह सोसायटीचीं जीं कर्जे असतील तीं या कायद्याखालीं येत नाहीत, असें कलम ३ मध्यें म्हटलेलें आहे.

(३) 'कोर्ट' या शब्दाचा अर्थ,शेतकरी कर्जदार ज्या ठिकाणी साधारणतः राहतो तें ठिकाण ज्या सिव्हिल जज्ज ( सिनियर-डिव्हिजन ) यांच्या कक्षेत येईल त्यांचे कोर्ट असा समजावयाचा; व ज्या ठिकाणी असें सिव्हिल जज्ज नसतील त्या ठिकाणीं सिव्हिल जज्ज (ज्यूनियर-डिव्हिजन) यांचें कोर्ट असा समजावयाचा.

## विषयवारी.

१. कायद्यांतील फेरफार.
२. सिव्हिल जज्ज सिनियर डिव्हिजन.
३ सिव्हिल जज्ज, ज्यूनियर डिव्हिजन.
४ कर्जदार शेतकऱ्यांचें साधारणतः राहाण्याचें ठिकाण.

## १. कायद्यांतील फेरफार.

१९३९ च्या व १९४५ च्या कायद्यांत लवादमंडळाची योजना केलेली असल्यामुळें 'कोर्ट' या शब्दाची व्याख्या लवादमंडळावरील अपीलें ज्या डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे अगर फर्स्ट क्लास कोर्टाकडे जात असत तें कोर्ट एवढीच मर्यादित होती. परंतु आतां प्रथमपासूनचीं सर्व कामें लवादमंडळाऐवजी कोर्टाकडे सोपविण्यांत आलीं असल्यामुळें कोर्टाच्या व्याख्येंत त्या बदलानुसार फरक करण्यांत आलेला आहे.

## २. सिव्हिल जज्ज, सिनियर डिव्हिजन.

पूर्वी ज्या कोर्टांना फर्स्ट क्लास सबजज्ज यांचें कोर्ट म्हणत असत त्यांना आतां दोन वर्षांपासून सिव्हिलजज्ज, सिनियर डिव्हिजन, यांचे कोर्ट असें संबोधण्यात येत आहे. हीं कोर्टें बहुतेक जिल्हानिहाय एक असून त्यांच्याकडे ५००० हून अधिक किंमतीचे दावे चालतात. ज्या जिल्ह्यांच्या ठिकाणी अशीं कोर्टें आहेत तेथील रु. पांच हजारावरून खालील दावेही तें ठिकाण ज्या तालुक्यांत असेल त्या तालुक्यापुरतें याच कोर्टांत दाखल करावे लागतात. उदाहरणार्थ पुणें जिल्ह्यांत पुणें मुक्कामी, असें एक सिनियर सिव्हिल जज्जाचें कोर्ट आहे. पुणें शहर हें हवेली तालुक्यांत आहे. म्हणून हवेली तालुक्यांतील जे कांहीं अर्ज या कायद्याखाली करावयाचे असतील ते पुण्याच्या सिनियर सिव्हिल जज्ज यांचें कोर्टांत करावें लागतील.

## ३. सिव्हिल जज्ज, ज्यूनियर डिव्हिजन.

पूर्वी ज्या कोर्टांना सेकंड क्लास सबजज्ज यांचे कोर्ट म्हणत असत त्यांना आता गेले दोन वर्षांपासून सिव्हिल जज्ज, ज्यूनियर डिव्हिजन यांचें कोर्ट असें म्हणण्यांत येत आहे. या कोर्टाकडे रु. पांच हजाराहून कमी किंमतीचे दावे दाखल होतात व हीं कोर्टें साधारणतः तालुकानिहाय आहेत. या कोर्टाच्या कक्षेंत असलेल्या गांवांतील अर्ज या कोर्टाकडे आतां करावे लागतील.

## ४. कर्जदार शेतकऱ्यांचें साधारणतः रहाण्याचें ठिकाण.

कर्जदार शेतकऱ्याचे साधारणतः राहण्याचें ठिकाण ज्या कोर्टाच्या हद्दींत

असेल त्या ठिकाणानुसार त्याचे बाबतींत कोणचें कोर्ट हें ठरावयाचे आहे. म्हणजेच त्या कर्जदाराच्या कर्जाबाबत तो रहात असलेल्या हद्दीच्या कोर्टास विचार करण्याचा अधिकार प्राप्त होईल. या कायद्याच्या मसुद्यांत साधारणतः राहण्याचे ठिकाण या शब्दप्रयोगाऐवजी प्रत्यक्ष खुषीनें राहण्याचें ठिकाण असे शब्द वापरलेले होतें. परंतु सिलेक्ट कामिटीनें 'साधारणतः' हा शब्द 'प्रत्यक्ष व खुषीनें' या शब्दाऐवजी वापरलेला आहे. 'साधारणतः वास्तव्य' हा शब्दप्रयोग इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ कलम ३७१ मध्यें प्रथम वापरला गेला आहे. व त्याचा अर्थ इंग्लंडमधील कायदेपंडितांनीं असा केला आहे कीं, मनुष्य ज्या ठिकाणीं खातो पितो व झोंपतो किंवा ज्या ठिकाणीं त्याचे कुटुंब अगर नोकर चाकर खातात पितात व झोंपतात तें ठिकाण हें त्याचें सर्वसाधारण वास्तव्याचे ठिकाण असें समजावें. हाच अर्थ हिंदुस्थानांतील कायदेपंडितांनी व न्यायालयीन निर्णयांतहि ग्राह्य धरला आहे. पहा (कुमुदनाथ वि. राय जतींद्रनाथ १३ कलकत्ता लॉ जर्नल २२१ व रामशरण वि. गणपुराम ३३ इंडियन केसेस ६०३.) मूळ मसुद्यांत वापरलेले 'प्रत्यक्ष व खुषीनें हे शब्द सिव्हिल प्रोसिजर कोड मधील कलम १६ मध्यें वापरलेले आहेत.

(४)'कर्ज' या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, कर्जदाराकडून रोख अगर ऐनजिनसी जें देणें निघत असेल तें, मग या देण्यास तारण दिलेलें असो अगर नसो. तसेंच सदर देणें कोणत्याही दिवाणी कोर्टाच्या हुकूमनाम्यावरून किंवा हुकूमावरून अगर अन्यप्रकारें द्यावयाचें असो; मात्र सदर देण्यांत शेतकीच्या किंवा अंगमेहनतीच्या मजुरीच्या बाकीचा समावेश होत नाहीं.

## विषयवारी


१ कर्जदारास झालेलें देणें.
२ तारण अगर बिनतारण.
३ हुकूमनामा व कोर्टाचा हुकूम.
४ अन्य प्रकारें देणें.
५ कोणतें देणें कर्ज नाहीं.

**१. कर्जदारास झालेलें देणें.**

कर्जदार या शब्दाची व्याख्या पुढील पोटकलमांत केलेली आहे. व त्या व्याख्येनुसार जो कोणी शेतकरी कर्जदार असेल त्याला झालेले देणें असा ' कर्ज ' या शब्दाचा अर्थ केलेला आहे; व असे देणें दोन प्रकारचें या कायद्यानें ग्राह्य धरलेलें आहे. पहिला प्रकार म्हणजे उसनवार अगर कर्जाऊ नेलेली रोख रक्कम व दुसरा प्रकार म्हणजे बैलबारदान, बी बियाणे, मोटनाडा, धान्य वगैरे वस्तू मागून नेऊन परत न केल्यामुळे जें देणें होते तें.

**२. तारण अगर बिनतारण.**

सावकारलोक कर्जदारांना कर्ज देताना आपले पैसे वसूल होण्याकरता कर्जदाराकडून त्यांची जमीन, घर, दागदागीने अशा प्रकारच्या मूल्यवान वस्तू लिहून वगैरे घेऊन आपले पैसे सुरक्षित करतात. व कांहीं सावकार कर्जदाराच्या पतीवर त्यास हातउसने किंवा वचन चिठ्ठीवर पैसे देतात. अशा पैशास कर्जदाराखेरीज दुसरी कांही वस्तू अगर मिळकत तारण नसल्यामुळे बिनतारणी कर्ज असें म्हणतात. अशा प्रकारे वर वर्णिलेली तारणावरील अगर बिनतारणावरील शेतकऱ्यांची देणीं ' कर्ज ' या शब्दांत येतात.

**३. हुकूमनामा व कोर्टाचा हुकूम.**

या कायद्यांत म्हटल्याप्रमाणें जी कर्जाची यादी कर्जदारास द्यावी लागणार आहे तींत, कोर्टाचे हुकूमनाम्यावरुन देणें असलेली रक्कम, किंवा खर्चाबाबतचे हुकूम दरखास्तींत अगर अव्वल दाव्यांत केलेले असतील त्यावरुन देणें होणारी रक्कम, सामील करावी लागतील.

**४. अन्य प्रकारें देणे.**

या देण्यांत, हवाला अगर जामीनकीमुळे स्वतः कर्ज घेतलेले नसतां दुसऱ्याकरतां पत्करलेले असूनही जे देणें द्यावे लागते, त्याचा समावेश होईल. बाजारांतून उधार आणलेल्या मालाबाबत झालेली देणी वगैरे प्रकारची देणी यांचाहि समावेश होईल.

५. कोणते देणें कर्ज नाहीं.

( अ ) शेतावरील मजुरांची मजूरीची रकम,

( ब ) कावाडकष्ट केल्याबद्दल गड्यांना जी रकम द्यावी लागेल ती.

( क ) कलम ३ प्रमाणें सरकार, किंवा स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी मंडळ्या, बी बियाणे या करतां दिलेल्या रकमा, पोटगीसाठी झालेले हुकूमनामे व शेडयूल्ड बँकांना द्यावे लागणारे देणें.

या सर्व बाबींचा समावेश कर्जांचे यादीत कर्जदारास करावा लागला तरी हीं सर्व कर्जे त्यांस पूर्णपणें फेडावी लागतील.

(५) ' कर्जदार ' म्हणजे—

( अ ) व्यक्ती—

( १ ) जिला कर्ज झालें आहे;

( २ ) शेतकीच्या उपयोगी असलेली जमीन जी व्यक्ती धारण करतें किंवा गहाणस्वरूपी खरेदीखतानें अगर अन्य मार्गानें दुसऱ्याच्या ताब्यांत ज्या व्यक्तीची जमीन गेलेली आहे परंतु ३० जानेवारी १९४० च्या पूर्वी तीस वर्षाहून जास्त काल नाहीं अशा मुदतींत केव्हांतरी ती जमीन त्या व्यक्तीनें धारण केलेली असेल तर;

( ३ ) हा कायदा अंमलांत यावयाच्या तारखेच्या आधीं किंवा रद्द कायद्याखालीं स्थापन झालेल्या लवाद मंडळाच्या स्थापनेपूर्वी लगत दोन वर्षांतील शेतकीच्या हंगामांत ज्या व्यक्तीनें स्वतः जातीनें जमीन कसली असेल; आणि

( ४ ) शेतकी व शारिरीक मेहनत खेरीज करून इतर बाबींपासूनचें जिचे वार्षिक उत्पन्न एकूण वार्षिक उत्पन्नाच्या साधारणतः शेंकडा ३३ पेक्षां अगर ३०० रु. पेक्षां यापैकीं जे मोठे असेल त्यापेक्षां जास्त नाहीं अशी व्यक्ती,

(ब) अविभक्त हिंदु कुटुंब—

( १) ज्याला कर्ज आहे.

(२) शेतकीच्या उपयोगी असलेली जमीन जी व्यक्ती धारण करते किंवा गहाण स्वरुपी खरेदखितानें अगर अन्य मार्गानें दुसऱ्याच्या ताब्यांत ज्याची जमीन गेलेली आहे परंतु ३० जानेवारी १९४० च्या पूर्वी तीस वर्षांहून जास्त काळ नाहीं अशा मुदतींत केव्हांही ती जमीन त्या कुटुंबानें धारण केलेली असेल तर.

(३) हा कायदा अंमलांत यावयाच्या तारखेच्या आधीं किंवा रद्द कायद्याखालीं स्थापन झालेल्या लवाद मंडळाच्या स्थापनेपूर्वी लगत दोन वर्षांतील शेतकीच्या हंगामांत जें कुटुंब स्वतः कशीत असेल आणि

(४) शेतकी व शारिरीक मेहनत खेरीज करून इतर बाबींपासूनचें ज्या कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न एकुण वार्षिक उत्पन्नाच्या शेकडा ४० पेक्षां जास्त नाहीं आणि ज्या कुटुंबातील सभांच्या अशा उत्पन्नाची एकूण रकम १,५०० रुपयांपेक्षां जास्त नाहीं असें कुटुंब.

## खुलासा

या कलमापुरता शेतकी शब्दामध्यें बागबगीचा करणें, पिकें किंवा बागाईतीचें उत्पन्न काढणें, गुरें बाळगून दुधदुभत्याचा धंदा करणें, कोंबडी वगैरे पाळन तो धंदा चालविणें, गुरांची पैदास करणें व चराऊ रानें ठेवण यांचा समावेश होतो परंतु त्यांत जमीन खंडानें देणें अगर फक्त लाकडे तोडणें यांचा समावेश होत नाहीं.

## विषयवारी

१ कायद्यांतील फेरफार.
२ कर्जदार कोणास म्हणावें
३ जमीन धारण करणें म्हणजे काय.
४ जातीनें जमीन कसणें.
५ बिगर शेतीचें उत्पन्न.
६ शेतकीची व्याख्या.
७ अविभक्त हिंदु कुटुंब.

## १. कायद्यांतील फेरफार.

या कायद्यांत पूर्वी १९३९ व १९४५ साली व या कायद्याचा प्रथम खर्डा प्रसिद्ध झाला त्या वेळीहि जमीन धारण करणारी व्यक्ती एवढाच शब्द प्रयोग करण्यांत आला होता; परंतु सिलेक्ट कमिटींत या जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीबरोबरच १९१० सालापासूनच्या ३० वर्षांच्या काळांत केव्हांही जमीन धारण केलेल्या असलेल्या परंतु आतां ज्या व्यक्तींची जमीन तिच्या ताब्यांत अगर नांवावर नाहीं व अशी जमीन ज्या व्यक्तीकडून गहाणस्वरुपी खरेदीखतानें दुसऱ्याकडे गेलेली असेल अशा सुद्धां व्यक्तींचा समावेश केलेला आहे. या दुरुस्तीमुळें अर्जदाराच्या व्याख्येची व्यापकता वाढलेली आहे.

तसेंच पोटकलम (अ) ३ मध्यें पूर्वीच्या कायद्यांत व मूळ खर्ड्यांतहि दोन लागवडीचे हंगाम असा शब्द प्रयोग करण्यांत आला आहे. या फरकामुळें पूर्वी एक वर्षातल्या दोन हंगामांत काम करूनही एखाद्यास या व्याख्येंत बसतां येत होतें परंतु आतां कमीत कमी दोन वर्षें जमीन कसल्या शिवाय त्यास या कायद्याचा फायदा मिळणार नाहीं.

तसेंच याच पोट कलम (अ) ३ मध्यें सिलेक्ट कमिटीनें रद्द झालेल्या लवाद मंडळांच्या स्थापनेच्या आधीं दोन वर्षें जमीन कसणाऱ्या व्यक्तीसही या व्याख्येंत आणले आहे.

पोट कलम (अ) ४ यामधील बिगर शेतीच्या उत्पनाचें प्रमाण सिलेक्ट कमिटीमध्यें बदलण्यांत आलेलें आहे. व्यक्तींच्या व कुटुंबाच्या बाबतींत पूर्वी शेकडा २० असें प्रमाण होतें तें आतां व्यक्तींच्या बाबतींत सिलेक्ट कमिटींत शेकडा ३३ करण्यांत आलें आहे. व एकंदर रक्कम ३०, रु करण्यांत आली आहे. मूळ खर्ड्यांत ३०० रु. चा उल्लेख नव्हता परंतु १९३९ च्या कायद्यांत तो होता. कुटुंबाच्या बाबतींत १९३९ च्या कायद्यांत शेकडा २० टक्के असे प्रमाण होते ते आता या कायद्यांत शेकडा ४०. करण्यांत आले एकंदर रकमं पूर्वी ५०० होती ती बदलून मूळ खर्ड्यांत १००० रु. केली. परंतु सिलेक्ट कमिटींत ती रक्कम १५०० रु. करण्यांत आलेली

आहे. यामुळें जास्त कुटुंबांना या कायद्याचा फायदा घेणें शक्य झालें आहे.

खुलासा म्हणून पूर्वी दोन खुलासे दिलेले होते आतां या कायद्यांत शेतकी बाबतचा तेवढा खुलासा ठेवण्यात आला असून बाकीचे गाळले आहेत.

## २ कर्जदार कोणास म्हणावे.

या कायद्याप्रमाणें ज्यास कर्जदार म्हणवून घ्यावयाचें असेल त्याचे अंगीं खालील चारी बाबी समुच्चयानें असावयास पाहिजेत.

(१) त्यांस कर्ज असले पाहिजे.

(२) तो स्वतः शेतकीची जमीन धारण करणारा असला पाहिजे किंवा आज जरी प्रत्यक्ष तो जमीन धारण करणारा नसला तरी १९१० ते १९४० पर्यंत तो कधींतरी जमीन धारण करणारा असला पाहिजे; मग ती त्याची जमीन हल्लीं गहाणस्वरुपी खरेदीखतानें दुसऱ्याच्या नांवावर असली तरी चालेल

(३) तो स्वतः कोणती तरी जमीन करणारा असला पाहिजे

(४) त्याचे बिगर शेतीचे उत्पन्न त्याच्या शेतीच्या वार्षिक उत्पन्नाच्या शेंकडा ३३ टक्याहून ज्यास्त अगर ३०० रु.हून ज्यास्त असतां कामा नये. म्हणजे या कायद्यापासून ज्याला फायदा करून घ्यावयाचा आहे असा पुरुष अगर स्त्री हा शेतकरी असला पाहिजे, त्याच्या नांवावर हल्लीं किंवा पूर्वी शेतीची जमीन असली पाहिजे व त्याचे शेतीचें उत्पन्न हें मुख्य पाहिजे.

## ३. जमीन धारण करणें म्हणजे काय.

जमीन धारण करणारा याची व्याख्या याच कलमांतील पोटकलम ७ मध्यें दिलेली आहे. त्याप्रमाणें बॉम्बे लँड रेव्हेन्यू कोडमधील कलम ३ ( ११ ) प्रमाणें जी व्याख्या करण्यांत आलेली आहे तीच व्याख्या याहि कायद्यांत धरावयाची असें म्हटलें आहे. त्या व्याख्येप्रमाणें ज्या मनुष्याच्या ताब्यांत कायदेशीररित्या जमीन असेल तो मनुष्य जमीन धारण करणारा असे म्हटलें आहे. मग तो ताबा प्रत्यक्ष असो अगर नसो.

## ४. जातीनें जमीन कसणें.

याच कलमांतील पोटकलम १४ मध्यें या शब्दाची व्याख्या केलेली असून त्या व्याख्येप्रमाणें स्वतःच्या अंगमेहनतीनें किंवा स्वतःच्या कुटुंबांतील कोणत्याहि माणसाच्या अंगमेहनतीनें किंवा स्वतःच्या देखरेखीखालीं किंवा स्वतःच्या कुटुंबांतील माणसाच्या देखरेखीखालीं, नोकरांकरवी किंवा भाडोत्री मजुराकरवीं जमीन करणें असें आहे.

## ५. विगरशेतीचें उत्पन्न.

या कलमांतील खुलाशांत शेतीची जी व्याख्या दिलेली आहे त्यांतील बाबींखेरीज करुन इतर कोणत्याही मार्गानें जे उत्पन्न व्यक्ती किंवा कुटुंब मिळवील तें एकंदर उत्पन्नाच्या अनुक्रमें शेकडा ३३ किंवा ४० टक्याहून ज्यास्त असतां उपयोगाचे नाहीं. विगरशेतीच्या उत्पन्नात शेतकरी करीत असलेल्या इतर धंद्यापैकीं म्हणजे गाडीभाडें, मजूरी, पोटखंड, गिरणींतील काम, लाकूड तोडण्यांपासून अगर लाकडाच्या धंद्यापासून मिळणारी व अशाच इतर रोजगारांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंतर्भाव होईल.

आतां अशा रोजगारांपासून जें उत्पन्न मिळेल तें ठोक उत्पन्न धरावयाचें किंवा निव्वळ उत्पन्न धरावयाचें या प्रश्नासंबंधी शंका उत्पन्न झाली असतां ऑल इंडिया रिपोर्टर १९४५ मुंबई पान १८३ या ठिकाणीं दिलेल्या निकालात न्यायमूर्ती लोकूर व राजाध्यक्ष यांनीं असा स्पष्ट निकाल दिला आहे कीं, या कलमांतील ' उत्पन्न ' या शब्दाचा अर्थ निव्वळ उत्पन्न असाच धरावयास पाहिजे. निव्वळ उत्पन्नासंबंधांत पूर्वीच्या कायद्यांतील कलम व आतांचें हें कलम यांतील मजकूर कांहीं शाब्दिक फेरफारांखेरीज एकच आहे. सबब त्यावेळच्या कायद्यांतील मजकुराच्या अनुरोधानें जो वरील निर्णय दिलेला आहे तो आतांही लागू होईल. सदरहू निर्णयाचे वेळीं असा प्रश्न निर्माण झाला होता कीं, कैकुश्रु एदुलजी नावाच्या गृहस्थानें जिनाभाई जिवनजी यांचे पासून दरसाल ३०० रु. खंड देण्याचे बोलीनें जमीन खंडानें घेतली. सदर जमीनींपैकीं त्याने कांहीं जमीन स्वतः करावयास ठेवली आणि बाकीची खंडाने लावली व त्यापासून खंड ४६० ते ५०० रु. येऊं लागला.

तो स्वतः जी जमीन करीत होता तिचें उत्पन्न त्याला रु. २०० येत होते त्यावरुन असा प्रश्न उपस्थित झाला कीं, त्याचे शेतीचे उत्पन्न २०० रु. च असून बिगरशेतीचें उत्पन्न ( खंडानें आलेलें ) हें ३०० रु. हून ज्यास्त असल्यामुळें तो या कायद्याप्रमाणें कर्जदार होऊं शकत नाहीं असें बोर्डानें ठरविलें त्यावर अपील कोर्टांत अशी तक्रार घेण्यांत आली कीं, त्यास खंडाने मिळणाऱ्या रकमेंतून मूळ मालकाला दरसाल ३०० रु. द्यावे लागतात म्हणजे त्याच्या पदरांत प्रत्यक्ष १६० अगर १७० रु. जास्तींत जास्त पडतात व ही रक्कम ३०० रु. हून कमी असल्यामुळें तो कर्जदार ठरतो. अशाप्रकार ३०० रु. हून बिगरशेतीचे उत्पन्न कमी असेल ती व्यक्ती कोणत्याहि परिस्थितींत इतर सर्व गोष्टी अनुकूल असल्या तर कर्जदार ठरेल. तसेच कोणतेही कुटुंबाचे बिगरशेतीचें उत्पन्न ५०० रु. हून कमी असल्यास तें कर्जदार ठरेल. ३३ मुंबई ३७६ या ठिकाणीं पूर्वीच्या शेतकीच्या कायद्यांतील शेतकऱ्याची व्याख्या करतांना त्याचें बिगरशेतीचें उत्पन्न कसें मोजावे या संबंधीं विचार करतांना असे म्हटले आहे कीं, या ठिकाणीं " उत्पन्न " हा शब्द जो वापरण्यांत आलेला आहे तो अशा अर्थी की अशा उत्पन्नापासून त्याचा चरितार्थ चालू शकेल व ती मिळकत तो आपली अशी म्हणूं शकेल. असे उत्पन्न एखाद्या धंद्यापासून मिळवलें असेल तर त्याचा विचार करतांना त्यासाठी आलेला प्रत्यक्ष खर्चवेंच वजा जातां जो निव्वळ नफा राहील ते उत्पन्न विचारांत घ्यावे लागेल; परंतु जर गिरणीमध्यें काम करुन त्याला मजूरी मिळत असेल तर ती सर्व त्याची बिगरशेतीचे उत्पन्न म्हणून समजली जाईल. बिगरशेतीच्या उत्पन्नाबाबत १९४७ च्या डोमिनियन लॉ रिपोर्टर पान ५८१ वर अलाहाबाद हायकोर्टांचे निकालांत असें म्हटलें आहे कीं, आपोआप वाढणारीं शिंदी ताडीसारखी झाडें, मुंज वगैरे सारखे गवत व आंब्याची झाडे वगैरे आपण होऊन वाढणाऱ्या झाडांचे उत्पन्न हे बिगरशेतीचे उत्पन्न होय. परंतू थकलेल्या खंडाचे रकमेवर आकारलेले व्याज हे शेतीचे उत्पन्न म्हणून धराण्यात आले आहे.

६. शेतकीची व्याख्या.

शेतकी या शब्दानें जो सर्वसाधारण अर्थ अभिप्रेत होतो त्याहून या कायद्यांतील ही व्याख्या जास्त व्यापक आहे. या व्याख्येंत कोंबडया पाळणें, दुधदुभत्याचा धंदा करणें, गुरांची पैदास करणें, वगैरे जे धंदे समाविष्ट केलेले आहेत, ते सर्व शेतावरील दुय्यम धंदे म्हणून जर करण्यांत आले तरच ते शेतकी या व्याख्येंत येतील. शहरांत राहून एखाद्यानें जर निव्वळ कोंबड्या पाळल्या किंवा नुसता दुधदुभत्याचा धंदा केला, किंवा नुसत्या गुरांच्या पैदाशीचा धंदा केला तर तो धंदा शेतकी या संज्ञेत येऊ शकणार नाहीं. तसेंच एखाद्यानें स्वतः शेती न करता शेती जर खंडानें दिली तर तो शेतकी करतो असें होणार नाहीं. तसेंच निव्वळ लाकूडतोडीचा धंदा करणारा माणूस शेतकरी म्हणून समजला जाणार नाहीं.

७. अविभक्त हिंदू कुटुंब.

अविभक्त हिंदू कुटुंब यांस कायद्यांत स्वतंत्र स्थान आहे. या कुटुंबातील मिळकत ही वारसाहक्कानें संक्रामित न होता शेषाधिकारानें संक्रामित होते. अशा एकत्र हिंदु कुटुंबास या कायद्यानें व्यक्तिप्रमाणें मान्यता दिलेली आहे. हल्लीच्या मुंबई सरकारचें एकंदर धोरण हिंदु अविभक्त कुटुंबास कायद्यानें स्वतंत्र व्यक्तीचें स्थान देण्याचें दिसते; कारण कूळ कायद्यांतही व्यक्तीच्या व्याख्येंत याचा अंतर्भाव केलेला आहे.

(६) "पिकांसाठीं पैसा पुरविणें म्हणजे" रद्द केलेल्या कायद्यांत व्याख्या केल्याप्रमाणे कर्ज पुरविणें.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ रद्द कायदा | २ पैसा पुरविण्याचा तपशील |

१. रद्द कायदा.

रद्द कायदा म्हणजे १९३९ चा कर्जनिवारणाचा कायदा होय. या

कायद्यांत कलम २ [ ७ ] प्रमाणें पीकासाठीं पुरवावयाच्या पैशाची सविस्तर माहिती दिलेली आहे. तीच या कायद्यांतही लागू केली आहे.

## २. पैसा पुरवण्याचा तपशील.

नांगरणीच्या हंगामांत पिके काढण्याकरितां किंवा त्यानंतर नांगरणी पेरणी, कुळपणी, निंदणी, कापणी, बियाणें खरेदी करणें, खत घालणें किंवा ठरविण्यांत येतील अशा इतर कारणांसाठीं दिलेलीं कर्जे असा खुलासा रद्द झालेल्या कलम २ (७) मध्यें केलेला होता व त्यांत असेंही म्हटलें होतें कीं, अशीं कर्जे, तीं ज्या पिकांसाठीं दिलेली असतात तीं पिकें ज्या हंगामांत काढतात त्या हंगामांत परत करावयाचीं असतात. मुंबई सरकारनें १२–८–१९४१ रोजीं जे कानू प्रसिद्ध केले आहेत, त्यांपैकीं तिसरा कानू या संबंधीचा आहे व त्यांमध्यें पैसे पुराविण्याच्या ज्या बाबी दिलेल्या आहेत त्या खालील प्रमाणें आहेत.

१ मजूरीचा खर्च, २ वाहातूकीचा खर्च ३ वैरणखरेदी ४ अंतर्लागवड ५ मळणी ६ गुरें व शेतकी हत्यारे भाड्यानें मिळविणें किंवा खरेदी करणें ७ कर्जदाराचे व त्याच्या आश्रितांचे पालनपोषण करणें ८ गुरे संभाळणें ९ व शेतकीच्या हत्यारांची दुरुस्ती करणें १० पंप इंजिन वगैरे सारख्या शेतकीच्या यंत्रांचा चालू खर्च, यांत सदर यंत्रास लागणाऱ्या जळणाचा खर्चही येतो. तसेच सरकार विशिष्ट प्रदेशांबाबत ज्या विशिष्ट बाबी वेळोवेळीं प्रसिद्ध करेल त्या. येणें प्रमाणें बाबी-साठीं शेतकऱ्यास जो पैसा पुरविलेला असतो तो सर्व पैसा पिकें काढण्यासाठीं दिलेला पैसा असें समजावयाचें आहे.

(७) "धारण करणारा म्हणजे" सन १८७९ चा जमीन महसुलाचा कायदा याच्या (११) कलमांत व्याख्या केल्याप्रमाणेंचा धारण करणारा असें समजावें व या संज्ञेंत सरकारास किंवा गांवच्या समाजास उपयुक्त असलेलीं कामें करण्याबद्दल ( हें काम प्रत्यक्षपणें

करण्यांत येत असलें पाहिजे ) धारण करण्यांत येत असलेली जमीन धारण करणारा याचाहि समावेश होतो. परंतु या संज्ञेत धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेच्या वतीनें धारण करण्यांत येत असलेली कोणतीही जमीन धारण करणारा यांचा समावेश होत नाहीं; आणि "जमीन धारण करणे" या शब्दांचा अर्थ त्याप्रमाणें समजण्यांत यावा.

## विषयवारी


१ कायद्यांतील फेरफार.
२ लँड रेव्हिन्यू कोडमधील धारण करणाराची व्याख्या.
३ अपवाद.


### १. कायद्यांतील फेरफार.

१९३९ च्या कायद्यांत "धारण कारणारा" या व्याख्येस दोन अपवाद दिलेले होते. ते म्हणजे जी कोणतीही इतर दुमाला जमीन सरकारच्या मंजूरी वाचून दुसऱ्याचे नांवे करुन देता येत नाही अशी जमीन धारण करणारा हा पहिला व दुसरा म्हणजे धार्मीक किंवा धर्मादाय संस्थेच्या वतीनें धारण करण्यांत येत असलेली कोणतीही जमीन धारण करणारा. या दोन अपवादांपैकीं, पहिला अपवाद गाळून टाकण्यांत आला असून दुसरा अपवाद ठेवण्यांत आला आहे; त्यामुळें पहिल्या अपवादांत वर्णन केलेले लोक धारण करणारा या व्याख्येंत येतील.

### २. लँड रेव्हिन्यू कोडमधील धारण करणारांची व्याख्या.

लँड रेव्हेन्यू कोडमधील कलम ३ (११) मध्यें पुढील प्रमाणें व्याख्या दिलेली आहे "..जमीनें धारण करणें" "जमीन धारण करणारा" असणें "जमीनीचा धारण करणारा" म्हणजे ज्याच्या ताब्यांत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरीत्या कायदेशीरपणें जमीन आहे तो. या व्याख्येमुळें ज्याचा ज्याचा मालकीहक्कानें जमीनीशीं संबंध आहे व ज्यांचा त्यामुळें

जमीनीच्या ताब्यावरील हक्क नाहीसा झालेला नाही अशा इसमांना धारण करणारा असें म्हटले पाहिजे. त्यामुळें प्रत्यक्ष जमीन जरी कुळाच्या ताब्यांत असली तरी ती अप्रत्यक्ष रित्या मालकाच्या ताब्यांत असल्यामुळें मालकाचेंच नांव ७।१२ च्या उताऱ्यांत 'कबजेदार सदरीं दाखविलेलें असतें. परंतु पुष्कळ वेळां ताबेगहाणदाराचें नांव ऋणकोचें नांव काढून टाकून कबजेदार सदरीं त्याच्या प्रत्यक्ष वहिवाटीमुळें लावलें जातें. व ७।१२ च्या उताऱ्यावरील या नोंदीमुळें कबजेदार म्हणून ताबेगहाणदार धरला जातो. परंतु ती समजूत चुकीची आहे. कारण गहाण टाकणारा याचाच मालकीहक्कानें जमीनीवर अप्रत्यक्ष ताबा असतो. ताबेगहाणदाराचें नांव इतर हक्कांत पडावयास पाहिजे.

३ अपवाद.

एखादी व्यक्ती जरी कायदेशीररीत्या जमीन धारण करीत असली व जर ती एखाद्या धर्मादाय किंवा धार्मीक संस्थेच्या वतीने करीत असली तर अशी व्यक्ती 'धारण करणार' म्हणून समजली जाणार नाहीं.

(८) "ठरविलेले" या शब्दाचा अर्थ कानून्वयें ठरविलेला असा समजावा.

## विषयवारी

### १. कायदा व कानू यांचे संबंध.

कायदा हा कायदे करणारांचे मनांतील हेतू व तत्वें यांची मांडणी करतो, परंतु त्या हेतूची किंवा उद्देशाची अम्मलबजावणी तपशीलवार कशी करावी, हें अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येत असतें. साधारणतः प्रत्येक कायद्यांत कोणकोणत्या बाबतींत कोणत्या प्रकारें अंमलबजावणी व्हावी यासंबंधीं निर्देश केलेला व तसा निर्देश या कायद्यांत कलम ५५ मध्यें केलेला आहे व त्यानुसार प्रांतिक सरकारनें कानू तयार करावयाचे आहेत व त्या कानूनुसार ज्या गोष्टी करावयाच्या त्यांस ठरविलेलें असें म्हणावयाचे आहे. असे जे कानू केलेले असतात ते मूळ कायद्याच्या

अर्थाला बाध न येतां पूरक होतील अशा स्वरुपाचे, असावे लागतात. त्या मर्यादेबाहेर ते गेल्यास ते बेकायदाही ठरतात.

(९) "रद्द केलेला कायदा" म्हणजे १९३९ चा मुंबई शेतकरी कर्ज निवारण कायदा होय.

(१०) "रिसोर्स सोसायटी" या संज्ञेचा अर्थ सन १९२५ चा मुंबईचा सहकारी मंडळ्याबाबतचा कायदा यांत जो दिलेला आहे तोच असेल.

## विषयवारी

### १ मुंबईचा सन १९२५ चा सहकारी मंडळ्याबाबतचा कायदा.

सन १९२५ चा मुंबईचा सहकारी मंडळ्यांचा कायदा हा मुंबई प्रांतांतील शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणाची परिस्थिती सुधारण्याकरतां प्रामुख्यानें करण्यांत आला. या कायद्यानें समान आर्थिक परिस्थितींतील लोकांची सहकारी पद्धतीनें राहणी व जीवन सुधारण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. या कायद्यांतील कलम २ (ह) १ मध्यें 'रिसोर्स सोसायटी' या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणें करण्यांत आलेली आहे; "सभासदांना मुदतीचें कर्ज, माल किंवा उपयोग मिळवून देण्याचे हेतूनें बनवलेली सोसायटी" अशा सोसायट्यांचीं उदाहरणें म्हणून बीं, बियाणें, खतें, शेतकीचीं उपकरणें व हत्यारें वगैरे वस्तू पुरविणाऱ्या सहकारी मंडळ्या दाखवितां येतील. या संबंधीचा खुलासा करतांना या कायद्याचा विचार करणाऱ्या सिलेक्ट कमिटीनें या रिसोर्स सोसायट्यांबाबत असें म्हटलें आहे कीं, सभासदांना वैयक्तिकपणें त्यांच्या धंद्याच्या अगर पैशाच्या गरजांनुसार साधन सामुग्री पुरविणें व ती तशी पुरवितांना त्या व्यक्तीच्या मालकीच्या मिळकतीस अगर हक्कास कोठलाही धक्का न लावतां जी मदत त्यांस करतां येईल ती करणें हा अशा सोसायट्यांचा उद्देश असतो. गिरण्यांतील मजूर व पगारदार लोक यांच्या ज्या सोसायट्या होतात त्या अशा रिसोर्स

सोसायट्यांचीं उत्तम उदाहरणें आहेत.

( ११ ) ' कानू ' म्हणजे या कायद्याच्या कलम ५५ प्रमाणें केलेले काबू होत.

( १२ ) ' शेडयूल्ड–बँक ' या शब्दाचा अर्थ सन १९३४ चा हिंदुस्थानचा रिझर्व्ह बँकेबाबत कायदा याच्या दुसऱ्या परिशिष्टांत समाविष्ट केलेली बँक असा होय.

## विषयवारी

**१. शेडयूल्ड बँक म्हणजे काय.**

१९३४ चा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अॅक्ट पास करून मध्यवर्ति सरकारनें एकंदरींत देशांतील आर्थिक परिस्थिती स्थिर व्हावी या हेतूनें आणि बँक नोटस् व गंगाजळी यांचें नियमन व्हावें म्हणून रिझर्व बँक नांवाची एक बँक सर्व हिंदुस्थानकरिता स्थापन केली. तसेंच देशांत असलेल्या इतर महत्वाच्या व सुरक्षित अशा वाटलेल्या बँकाहि त्या कायद्याच्या दुसऱ्या परिशिष्टांत नमूद केल्या आहेत. त्या बँकांना 'शेडयूल्ड बँक' असे म्हटलेलें आहे. अशा शेडयूल्ड बँकांवरील जबाबदारी कोणची हें सदर कायद्याच्या कलम ४२ मध्यें स्पष्ट केलें आहे.

त्यापैकीं दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या म्हणजे दररोज बँकेतून जो पैसा काढला जातो त्याच्या कमींतकमी पांच टक्के रक्कम व मुदतीच्या ठेवीच्या कमींतकमी दोन टक्के रक्कम रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक ठेवावयास पाहिजे. तसेंच बँकेच्या हिशेबाचा आढावा घेऊन तो दर आठवड्याला गव्हर्नर जनरल इन कौन्सिल व रिझर्व बँक यांस कळविला पाहिजे. कलम ३ प्रमाणें अशा शेडयुल्ड बँकांचें जें देणें या कायद्यांतील कर्जदारास असेल त्याबाबत या कायद्यान्वयें त्यास सवलत मिळणार नाहीं.

( १३ ) " हंगामांत पुरविलेला पैसा म्हणजे ' कानूंनीं

ठरविलेल्या कारणांकरितां पुढील १५ मेच्या अगोदर अगर त्या दिवशीं परत करावयाच्या कर्जाऊ रकमा.

## विषयवारी.

### १. कानूनीं ठरविलेलीं कारणें.

कानू नंबर ३ मध्यें कारणें ठरविण्यांत आलेलीं आहेत.

( अ ) नांगरणीचे मोसमांत पीक वाढविणें अगर त्यानंतर नांगरणे, खुरपणें, निंदणें, पीक काढणें, बीं बियाणें व खतें विकत घेणें.

( ब ) मजूरीचा खर्च;

( क ) वहातुकीचा खर्च;

( ड ) वैरण खरेदी;

( इ ) अंतर लागवड;

( फ ) मळणी;

( ग ) गुरें व शेतकरी हत्यारें भाड्यानें मिळविणें अगर खरेदी करणें;

( ह ) कर्जदार व त्याचे आश्रयास असणारी मंडळी व गुरांचे पोषण व शेतीचे हत्यारांची दुरुस्ती;

( ज ) शेतकीचीं यंत्रें; उदाहरणार्थ-पंप किंवा एंजीन त्यांतील जळणाचा खर्च धरून चालू ठेवण्यांत होणारा चालू खर्च.

(१४) 'जातीनिशीं जमीन कसणें' म्हणजे स्वतःच्या अंगमेहेनतीनें किंवा स्वतःच्या कुटुंबांतील कोणत्याहि मनुष्याच्या अंगमेहेनतीनें किंवा स्वतःच्या जातीनिशीं देखरेखीखालीं किंवा स्वतःच्या कुटुंबांतील कोणत्याहि मनुष्याच्या देखरेखीखालीं नोकरांकरवीं किंवा भाडोत्री मजुरांकरवीं जमीन कसणें.

खुलासा १—जो जातीनिशीं जमीन कसत होता असा इसम जर विधवा अगर अल्पवयी (अज्ञान) मनुष्य अगर शारिरीक अगर मानसिक व्यंग असलेला मनुष्य आपला वारस म्हणून ठेवून मरण पावेल तर ती जमीन अशा वारसांतर्फे नोकरांकरवीं किंवा भाडोत्री मजुरांकरवीं किंवा कुळांकरवीं कसली जात असली तरीहि असा वारस सदरहू जमीन जातीनिशीं कसतो असें समजलें पाहिजे.

खुलासा २—हिंदु अविभक्त कुटुंबाचे बाबतींत जर जमीन अशा कुटुंबांतील कोणत्याहि मनुष्याकडून कसण्यांत येईल तर सदरहू जमीन जातीनिशीं कसण्यांत आली असें समजलें पाहिजे. जर अशा कुटुंबांत जातीनें जमीन कसण्याजोगे प्रौढ एककुटुंबी नसतील तर ती जमीन अशा कुटुंबामार्फत नोकरांकरवीं किंवा भाडोत्री मजुरांकरवीं कसली जात असली तरीहि तें कुटुंब सदरहू जमीन जातीनिशीं कसतें असें समजलें पाहिजे.

(१५) या कायद्यांत वापरलेले परंतु व्याख्या न दिलेले शब्द व संज्ञा यांचा प्रसंगाप्रमाणें, सन १९०८ चा दिवाणी काम चालविण्याच्या रीतिविषयींचा कायदा यांत किंवा सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा यांत जो अर्थ दिला आहे तोच अर्थ असेल.

## विषयवारी

| १ सन १९०८ चा दिवाणी काम चालविण्याचा कायदा | २ सन १८७९ चा जमीन महसुलाचा कायदा. |
|---|---|

**१. सन १९०८ चा दिवाणी काम चालविण्याचा कायदा.**

या कायद्यास इंग्रजीमध्यें सिव्हिल प्रोसीजर कोड ' असें म्हणतात. त्यातील कलम २ मध्यें एकूण वीस शब्दांच्या व्याख्या दिलेल्या आहेत

त्यापैकीं 'हुकूम' 'हुकूमनामा' 'वकील' 'निकालपत्र' 'वारस' इत्यादी शब्दांच्या व्याख्या या कायद्याच्या व्याख्यांमध्यें आढळत नाहींत. त्यासाठीं अर्थ लावतांना सिव्हिल प्रोसीजर कोडचा आधार घ्यावा लागेल.

**२. सन १८७९ चा जमीन महसुलाचा कायदा.**

या कायद्यास इंग्रजीमध्यें 'बॉम्बे लँड रेव्हेन्यूकोड' असें म्हणतात. सदर कायद्याचें कलम ३ मध्यें निरनिराळ्या शब्दांच्या व्याख्या त्या कायद्यापुरत्या दिलेल्या आहेत. त्या एकूण अठावीस आहेत; पैकीं 'जमीन धारण करणे' 'जमीन मालक' वगैरे शब्दांचे प्रयोग या कायद्यांत केलेले आहेत. त्या शब्दांच्या व्याख्या पहावयाच्या झाल्यास लँड रेव्हेन्यू कोडमध्यें पाहावयास पाहिजेत.

## अपवाद

३ या कायद्यांत अन्य रीतीनें स्पष्टपणें ठरविलें असेल तें खेरीज० करून खालील सदरांखालीं येणाऱ्या कर्जदाराच्या कर्जास व देण्यांस बाध येणार नाहीं.

( १ ) सरकारास द्यावयाचा कोणताही महसूल अगर कर किंवा कर्ज म्हणून किंवा इतर रीतिनें सरकारास देणें असलेली कोणतीही इतर रक्कम;

( २ ) स्थानिक स्वराज्यसंस्थांस द्यावयाचा कोणताही कर किंवा कर्ज म्हणून किंवा इतर रीतीनें अशा संस्थेस द्यावयाची इतर कोणतीही रक्कम ;

( ३ ) सहकारी पतपेढीस देणें असलेली रक्कम;

( ४ ) रद्द केलेल्या कायद्यान्वयें सांगितल्याप्रमाणें पिकांसाठीं पैसा पुरविण्याकरतां दिलेली रक्कम, किंवा या कायद्यान्वयें हंगामाकरता दिलेला पैसा;

( ५ ) योग्य अधिकाराच्या कोर्टानें पोटगी बाबतचा हुकूमनामा अगर हुकूमयान्वयें देणेत आलेली रक्कम;

( ६ ) शेडयूल्ड बँकेस देणें झालेली रक्कम.

## विषयवारी

१ या कलमाचें महत्त्व व व्याप्ती.
२ कोणत्या कर्जाबाबत सवलती मिळणार नाहींत.

### १. या कलमाचें महत्त्व व व्याप्ति.

शेतकरी कर्जदारांचें कर्ज हलके हसेबंदीनें फेडून टाकून त्यांना पूर्णपणें ऋणमुक्त करण्यांसाठीं या कायद्याची योजना झालेली आहे. कर्जदारांना अशी जी ऋणमुक्तता मिळावयाची आहे ती सावकारी कर्जातून मिळावयाची असून सरकारी किंवा तत्सम इतर संस्थांच्या देण्यांतून त्यांची मुक्तता होणार नाहीं. तसेंच कुटुंबांतील विधवांच्या किंवा अज्ञानांच्या पोटगीबाबत जी रक्कम देण्याबाबत कोर्टानें हुकूम अगर हुकूमनामे केलेले असतील, तीं कर्जें नैतिक स्वरुपाचीं असलेमुळें त्यापासूनही कर्जदारांची मुक्तता करण्यांत आलेली नाहीं. जरी असा अर्जदार या कायद्यांतील प्रकरण ३ प्रमाणें नादार ठरविला गेला तरी सुद्धां त्याची मिळकत विकून जी रक्कम हातीं येईल त्यांतून या कायद्याच्या कलम २७ मध्यें दिलेल्या क्रमानुसार सरकार, स्थानिक स्वराज्यसंस्था सहकारी मंडळया व बोजेवाले सावकार यांना अग्रहक्कानें पैसे दिले जातील व मग इतर देण्यांबाबतची व्यवस्था केली जाईल. अशा रीतीनें या कलमानें या कायद्याच्या कचाट्यांतून या कलमांतील घेणेदारांची मुक्तता करण्यांत आलेली आहे.

### २. कोणत्या कर्जाबाबत सवलती मिळणार नाहीत.

(अ) सरकारी कर व तगाई, वगैरे सारखी कर्जें

(ब) नगरपालिका, जिल्हा लोकलबोर्ड, ग्रामपंचायती वगैरे तत्सम

संस्थांस देणे असलेले कर;

(क) सहकारी मंडळ्यांची काढलेली कर्जें;

(ड) पिकांसाठीं व हंगामाकरता शेतीविषयक काढलेलीं देणीं. अशीं कर्जे कर्जदारांना देण्यांकरता सरकार कलम ५४ प्रमाणें इसमांची नेमणूक करणार आहे व अशाच इसमांनीं जीं देणीं दिलीं असतील तीं या कायद्याचे कक्षेतून वगळण्यांत आली आहेत; म्हणजे अशा सावकारांचीं अशा कारणांकरता काढलेलीं कर्जें पुरेपूर मागविलीं पाहिजेत.

(इ) पोटगीचे हुकूम अगर हुकूमनामे कर्जांचे यादीत सामील केले तरी त्यांची तडजोड होणार नाहीं.

(फ) शेडयूल्ड बँकांपासून जीं कर्जे घेतली असतील किंवा ओव्हरड्राफ्ट-वगैरेचे रुपानें जीं देणीं शेडयूल्ड बँकांस देणें असतील तीं कर्जदारास सुटणार नाहींत.

---

# प्रकरण २ रें

## कर्जाची तडजोड करण्याबाबतची पद्धत

## कर्जाची तडजोड करण्याबाबतचा अर्ज

४. (१) १ फेब्रुवारी १९४७ रोजीं अगर त्यानंतर रद्द झालेल्या कायद्याच्या कलम ४ अन्वयें ज्या हद्दींत बोर्ड स्थापन झालेले होते त्यांत सर्वसाधारणपणें राहणाऱ्या कर्जदारानें अगर त्याच्या सावकारानें एक ऑगस्ट १९४७ पूर्वी कोर्टाकडे त्याचीं (कर्जदाराची) कर्जें मिटविण्याकरितां कोर्टाकडे अर्ज करावा.

(२) पोटकलम १ प्रमाणें केलेला प्रत्येक अर्ज हा ठराविक

नमुन्याप्रमाणें लेखी असला पाहिजे व त्यावर ठरविलेल्या पद्धतीनें सही व प्रतिज्ञालेख असला पाहिजे, व तो ठरविलेल्या पद्धतीनें दाखल केला पाहिजे.

(३) कलम ३ मध्यें कांहींही सांगितलें असलें तरी या कलमाप्रमाणें केलेल्या अर्जांत त्या कलमांत निर्दिष्ट केलेली व कर्जदाराला देणें असलेलीं अशा सर्व कर्जांच्या रकमा व तपशील नमूद केला पाहिजे.

## विषयवारी

१ कोणत्या कोर्टांत अर्ज चालतील.
२ या कलमाप्रमाणें अर्ज कोणास करतां येतील.
३ अर्जांत कोणत्या गोष्टी पाहिजेत.
४ जमीन एका ठिकाणीं सर्वसाधारण वस्ती दुसरीकडे असल्यास अर्ज कोणीकडे करावा.
५ कायदेशीर अर्ज कोणता.
६ अर्जाची मुदत व अर्जास कोर्ट फी.
७ सावकारानें अर्ज कोणत्या कोर्टाकडे करावा.

### १. कोणत्या कोर्टांत अर्ज चालतील.

कर्जदार सर्व साधारणपणें ज्या कोर्टाचे हद्दींत राहतो त्या कोर्टाकडे त्यानें आपल्या कर्जाबाबत तडजोडीचा अर्ज करावा; असा अर्ज करतांना कर्जदारास आपण त्या कोर्टाचे हद्दींत राहतो एवढेंच दाखवावें लागेल. जमीनी कोठें आहेत हा प्रश्न कोर्टास विचारांत घेता येणार नाहीं; या दृष्टीनें विचार करतां एकाद्या कर्जदाराच्या सर्व जमिनी १ फेब्रूवारी १९४७ चे पूर्वी स्थापन झालेल्या बोर्डांचें हद्दींत असल्या व त्याचेकडून त्या वेळच्या कायद्यांतील कालमर्यादेंत अर्ज त्या बोर्डाकडे झाला नसेल व त्यांस जर आपले नेहमीचें राहण्याचें ठिकाण १ फेब्रूवारी १९४७ रोजीं अगर नंतर स्थापन झालेल्या

बोर्डाचे हद्दींत असल्याचें शाबीत करतां आलें तर त्याचा अर्ज दाखल करुन घेण्यास त्या कोर्टास हरकत करतां येणार नाहीं. उदाहरणार्थ, पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत शेतकरी कर्ज निवारण बोर्ड सर्वांत प्रथम सन १९४२ मध्यें झाले. त्याच प्रमाणें हवेली तालुक्यांत १ फेब्रुवारी १९४७ रोजीं सदर बोर्ड स्थापन झालें. १९४२च्या कायद्यांप्रमाणें १९४३ चे जून अखेर अर्ज दाखल करण्याची मुदत संपून गेली. आतां खेड तालुक्यांत जमीन असलेल्यास परंतु सर्वसाधारणपणें पुण्यांत राहणाऱ्यास या कलमाखालील अर्ज पुण्याचे कोर्टांत करतां येतील असें वाटतें.

## २. या कलमाप्रमाणें अर्ज कोणास करतां येईल.

या कलमाप्रमाणें कर्जदारास व त्याचे सावकारास अशा कोणासही आपले कर्जाबाबत कोर्टाकडे अर्ज करतां येईल. कलम १५ (१) प्रमाणें सावकारानें या कलमांत दिलेले मुदतीचे आंत म्हणजे १ ऑगस्ट १९४७ चे आंत जर अर्ज केला नाहीं तर त्याचे घेणें बुडणार आहे. म्हणून सावकारांनीं या मुदतीचे आंत अर्ज केलेच पाहिजेत. या कलमाप्रमाणें कर्जदारानेंही अर्ज करणें जरूर आहे; कारण कलम १५ (२) प्रमाणें त्याचे विरूद्ध सावकारानें अर्ज देण्याची मुदत संपल्यावर दिवाणी कोर्टांत दावा लावला तर त्यांत सावकाराला हा प्रतिवादी या कायद्यांप्रमाणें कर्जदार नाहीं अशी तक्रार करून दाव्याचें काम चालवितां येईल व त्यांस या प्रतिवादीनें कलम ४ प्रमाणें अर्ज दिला नाहीं या गोष्टीचा फायदा आपल्या बाजूनें करून घेतां येईल.

## ३. अर्जांत कोणत्या गोष्टी पाहिजेत.

सरकार ठरवील त्या नमुन्यांबरहुकूम सर्व गोष्टींचा तपशील अर्जदारानें दिला पाहिजे व शिवाय कलम ३ मध्यें दिलेली सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी मंडळ्या वगैरेंची कर्जेंहि त्यांत दाखवावयास पाहिजेत; अर्थात त्या कलमांत म्हटल्याप्रमाणें या कर्जांविषयीं कांहींहि तडजोड कोर्टास करतां येणार नाहीं. तसेंच अर्जदार सावकार असल्यास त्यानें अर्जामध्यें आपल्या कर्जाची माहिती तेवढी दिली व कर्जदाराच्या इतर कर्जांची मिळकतीची किंवा उत्पन्नाची जी माहिती द्यावयास पाहिजे ती दिली नाहीं तरी चालेल. पण त्याला कर्जदारास नोटीस देऊन ती माहिती

परस्पर कोर्टांत देण्यास भाग पाडतां येईल. त्याचप्रमाणें कर्जदार सावकारांची देणीं आठवत नसतील तर त्याला आठवतील तेवढी त्यानें द्यावी व सावकारांना कलम ५ (अ) प्रमाणें नोटीस करून त्यांचेकडून कोर्टास कळविण्याची व्यवस्था करतां येईल.

**४. जमीन एका ठिकाणीं परंतु सर्वसाधारण वस्ती दुसरीकडे असल्यास अर्ज कोठें करावा.**

कोणत्या कोर्टाकडे अर्ज करावा यासंबंधीं विचार करतांना या कलमांतील पोटकलम ३ मध्यें असें म्हटलें आहे कीं, कर्जदार सर्वसाधारणपणें ज्या ठिकाणीं रहात असेल त्या कोर्टाकडे कर्जदारानें अर्ज करावा. कर्जदाराची स्थावर मिळकत ज्या ठिकाणीं असते त्याच ठिकाणचे कोर्टास अर्ज दाखल करून घेण्याचा अधिकार अशी सर्वसाधारण समजूत दिसून येते. परंतु वर खुलासा केल प्रमाणें त्या समजुतीस कांहीं आधार दिसत नाहीं. त्यामुळें जमिनी एका कोर्टाचे स्थलसीमेंत असल्या व कर्जदाराचे व्याख्येंत बसणारा इसम जर भिन्न कोर्टाचे स्थलसीमेंत सर्वसाधारणपणें रहात असला तर त्याला अशा दुसऱ्या कोर्टाकडे अर्ज करतां येईल. उदाहरणार्थ एकाद्याच्या जमिनी खेड कोर्टाच्या हद्दींत असल्या व तो सर्वसाधारणपणें पुणें कोर्टाचे हद्दींत रहात असला तर त्यांस पुणें कोर्टाकडे अर्ज करतां येईल.

**५. कायदेशीर अर्ज कोणचा**

या कलमांतील पोटकलम (२) यांत असें म्हटलें आहे कीं, कर्जाच्या तडजोडीबाबत जो अर्ज कर्जदारानें अगर सावकारानें करावयाचा आहे तो लेखी असला पाहिजे; तो ठराविक नमुन्याबरहुकूम लिहिला गेला पाहिजे व त्याच्यावर सही आणि प्रतिज्ञा हीं कानूंत सांगितलेल्या पद्धतीनेंच केली पाहिजे व कानूंत सांगितलेल्या पद्धतीनेंच अर्ज दाखल केला पाहिजे. या पोटकलमांत 'शॅल' हा इंग्रजी शब्दप्रयोग केलेला असल्यामुळें सरकार कानूंत ठरवील त्याप्रमाणेंच अर्ज व्हावयास पाहिजे. न झाल्यास तसें अर्ज बेकायदेशीर ठरण्याचा संभव आहे. हल्लीं तां. २७

मे १९४७ रोजीं हा कायदा अमलांत आल्यापासून ज्या अर्जदारांनीं जुन्या नमुन्याप्रमाणें अर्ज केले असतील त्यांचे ते अर्ज बेकायदेशीर ठरतील व त्यांसंबंधांत या कायद्याप्रमाणें मिळण्याची सवलत त्यांना कदाचित मिळणार नाहीं, असें वाटतें. अर्थात् अशा प्रकारें जे अर्ज दिले गेले ते योग्य व कायदेशीर आहेत असें सरकारनें नवीन कायदा करून ठरविल्यास त्याबाबत् उणेपणा रहाणार नाहीं. कानूत लिहिल्याप्रमाणें सदरहू अर्ज हे जातीने दिले पाहिजेत अगर राजिस्टर पोस्टानें अर्जदारानें पाठविले पाहिजेत.

६. अर्जांची मुदत व अर्जास कोर्ट फी.

या कलमांतील पोटकलम (१) प्रमाणें ता. ३१ जुलै १९४७ पर्यंतच अर्ज मुदतींत रहातील. त्यानंतरचे अर्ज मुदतीबाहेर आले म्हणून फेटाळले जातील. त्यामुळें ज्या सावकारांनीं ता. ३१ जुलै १९४७ पर्यंत कोर्टांस आपलीं कर्जें कळविलीं नसतील त्या सावकारांचीं कर्जें बुडण्याचा संभव आहे. या कायद्यांतील कलम ४४ पोटकलम (१) प्रमाणें कोर्ट फी स्टँप रु. एकचा लागेल, व त्यावर वाढीचा २५ टक्के जादा स्टँप पडणार नाहीं. कारण हा स्टँम्प कोर्टफी ॲक्टान्वयेचा नाहीं. ( ४८ मुं. लॉ. रिपोर्टर १०८= ऑ. इं. रिपोर्टर १९४६ मुंबई ३३९ ).

७. सावकारानें कोणत्या कोर्टाकडे अर्ज करावा.

अर्जदार सर्वसाधारणपणें ज्या कोर्टाचे हद्दींत रहात असेल त्याच कोर्टाकडे सावकारानें आपला अर्ज करावयास पाहिजे.

## प्रत्येक सावकारानें व कर्जदारानें खरा व बरोबर असा माहितीचा तक्ता कोर्टांत दाखल केला पाहिजे

५. (१) कलम ४ प्रमाणें अर्ज दाखल केलेला नसला तरी.

(अ) कोणत्याही कर्जदारानें लेखी नोटीस देऊन सावकारास कोर्टामध्यें त्या कर्जदाराकडून घेणें असलेल्या रकमांचे खरें व बरोबर माहितीपत्रक दाखल करण्यास भाग पाडलें असतां प्रत्येक सावकारानें त्याप्रमाणें नोटीस पोहोंचल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांचे आंत केलें पाहिजे व त्याचवेळीं त्याची एक नक्कल कर्जदारास पाठविली पाहिजे आणि.

(ब) कोणत्याहि सावकारानें लेखी नोटीस देऊन तसें करण्यास भाग पाडलें असतां प्रत्येक कर्जदारानें तशी नोटीस पोहोंचल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांचे आंत. (१) कर्जदारास देणें असलेला सर्व कर्जें (२). शेतकीचे कारणाकरितां उपयोगांत आणलेली एखादी जमीन धारण करतो कीं काय आणि तो ती जमीन जातीनिशीं कसतो किंवा काय. (३) नोटीसचे तारखेपूर्वीच्या वर्षांत त्याचें शेतकीपासूनचें उत्पन्न व शेतकीखेरीज अन्य मार्गानें झालेलें उत्पन्न या सर्वांचें खरें व बरोबर असें माहितीपत्रक कोर्टामध्यें दाखल केलें पाहिजे; त्याच वेळीं कर्जदारानें त्या पत्रकाची एक प्रत अशा सावकारास पाठविली पाहिजे.

मात्र कर्जदारानें अगर सावकारानें कोणी असेल तो, ज्या मुदतींत असें पत्रक दाखल करावयास पाहिजे ती मुदत पुरेशा कारणांकरितां कोर्ट वेळोवेळीं वाढवील.

(२) पोटकलम १ प्रमाणें नोटीस देणाऱ्या प्रत्येक कर्जदारानें अगर सावकारानें त्याचवेळीं सदर नोटीसीची एक प्रत कोर्टाकडे पाठविली पाहिजे.

(३) कलम ४ अन्वयें केलेल्या कोणत्याही अर्जाच्या संबंधांतील कोणत्याही कामकाजाचा खर्च आकारतांना कोर्टास, पोटकलम

१ अन्वयें दाखल करणें जरुर असेलले पत्रक हें पुरेशा कारणा-वाचून त्यांत नमूद केलेल्या मुदतींत किंवा पोटकलम १ मधील अपवादान्वयें वाढविलेल्या मुदतींत दाखल केलें नसेल, अगर चुकीचें दाखल केलें असेल अशा पक्षकारास सबंध खर्च किंवा खर्चाचा कोणताही हिस्सा देण्यास फर्माविण्याचा कोर्टास अधिकार आहे.

## विषयवारी


१ कायद्यांतील फेरफार.
२ हेतू व उद्देश.
३ नोटीस कशी व केव्हां द्यावी.
४ कर्जदाराची नोटीस.
५ सावकाराची नोटीस.
६ 'त्याच वेळीं' या शब्द-प्रयोगाचे महत्त्व.
७ माहिती पत्रकें.
८ कोर्टाचा खर्च.


### १. कायद्यांतील फेरफार.

१९३९ सालच्या कायद्यांत कलम १९ मध्यें याच आशयाची योजना केलेली होती परंतु त्यांत दोन गोष्टी कमी होत्या; एक म्हणजें हल्लींच्या कलमांतील पोटकलम (१) यांतील पत्रक दाखल करण्याच्या मुदतींत वाढ करण्याचा कोर्टाचा अधिकार असलेला अपवाद व दुसरा म्हणजे पोटकलम (३) मध्यें याच अपवादास उद्देशून उपयोगांत आणलेला भाग व चुकीचें पत्रक दाखल केल्यास त्याचाहि उपयोग खर्चाचा विचार करतांना करावा असें सांगितलें आहे तो भाग. याप्रमाणें भाग जास्त घालण्यांत आले आहेत. बाकी सर्व मजकूर जसाच्या तसाच घेण्यांत आला आहे.

### २. हेतू व उद्देश.

प्रत्यक्ष कोर्टाकडे न जातां आपसांत सावकारांना आणि कर्जदारांना आपआपल्या देण्याघेण्याची नीट कल्पना यावी आणि तडजोडीचें काम

सुलभ व्हावें या दृष्टीनें या कलमाची योजना केलेली दिसते. या योजनेच्या सहाय्यानें सावकार व कर्जदार यांची आपसांत तडजोड झाल्यास ती त्यांना कलम ८ प्रमाणें कोर्टाकडे स्वतंत्र अर्ज देऊन नोंदवतां येईल व त्या कलमांत सांगितलेल्या योजनांनुसार त्यांस निवाड्याचें स्वरूप येईल. कलम ४ प्रमाणें अर्ज दिलेला असूनाहि अशा नोटीसा देण्यांस कांहीं हरकत नाहीं. याचें कारण असें दिसतें कीं, अशा नोटीसांनीं अर्जांतील कर्जाची तडजोड करण्याचें काम सुकर व्हावें.

### ३. नोटीस कशी व केव्हां द्यावी.

या कलमान्वयें द्यावयाची नोटीस ही लेखी पाहिजे. ही नोटीस अमुकच एका पद्धतीनें दिली पाहिजे अशाबद्दल कायद्यांत कांहीं योजना सांगितलेली नाहीं. त्यामुळें सर्वसाधारणतः रजिस्टर पोस्टानें अगर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग घेऊन ती नोटीस पाठवतां येईल. या नोटी-सींत या कलमांतील पोटकलम (१) (अ) व (ब) यामध्यें जी माहिती सावकारानें अगर कर्जदारानें द्यावी असें म्हटलें ती माहिती कोर्टांत दाखल करण्याची मागणी सदर नोटीसींत केली पाहिजे व त्या नोटीसीची एक नकल त्याचवेळीं कोर्टाकडे पाठविली पाहिजे. ही नोटीस ता. ३१ जुलै १९४७ चे आधीं, अर्जाबरोबर अगर त्यानंतर केव्हांहि देत येईल.

### ४. कर्जदाराची नोटीस.

कर्जदारानें सावकारास द्यावयाची नोटीस ही लेखी पाहिजे व तींत त्यानें त्या सावकाराकडून आपल्या बरोबरच्या त्याच्या सर्व व्यवहाराची खरी व बरोबर माहिती कोर्टांत दाखल करण्याविषयीं मागणी केली पाहिजे. या नोटीसीची एक नकल कोर्टाकडे पाठविली पाहिजे.

### ५. सावकाराची नोटीस.

सावकारानें कर्जदारास द्यावयाची नोटीस ही लेखी असावयास

पाहिजे व त्यांत खालील माहिती कर्जदारानें कोर्टांत दाखल करावी अशी मागणी केली पाहिजे.

(१) कर्जदारास देणें असलेलीं सर्व कर्जें.

(२) शेतकीचे उपयोगाची एखादी जमीन तो धारण करतो किंवा काय आणि तशी जमीन तो जातीनिशी कसतो किंवा कसें.

(३) नोटीसीच्या आदल्या वर्षांतील त्याचें शेतकीचें व बिगरशेतकीचें उत्पन्न.

या नोटीसीची एक नक्कल त्यानें कोर्टाकडे त्याच वेळीं पाठविली पाहिजे.

## ६. "त्याच वेळीं" या शब्दप्रयोगाचें महत्त्व.

कर्जदारानें अगर सावकारानें कोर्टांत दाखल करावयाच्या माहितीपत्रकाची एक नक्कल अनुक्रमें सावकारास किंवा कर्जदारास 'त्याच वेळीं' पाठवावी व नोटीसीची नक्कल कोर्टास 'त्याच वेळीं' पाठवावी असें म्हटलें आहे. 'त्याच वेळीं' या शब्दप्रयोगाचा अक्षरशः अर्थ करावयाचा कीं नक्कल पाठविण्यास एकदोन दिवस उशीर झाला असतां चालेल हा विवाद्य प्रश्न आहे. कोर्टांत माहितीपत्रक पाठवितांना शेवटीं याची एक नक्कल सावकारास किंवा कर्जदारांस पाठीवली आहे असा शेरा मारल्यास ठीक होईल.

## ७. माहितीपत्रकें.

कर्जदार अगर सावकार यांनीं नोटीसींत ज्या माहितीची मागणी केली असेल ती माहिती सावकारानें अगर कर्जदारानें नोटीस पोहोंचल्यापासून दोन महिन्यांचे आंत कोर्टांत दाखल केली पाहिजे. हीं माहितीपत्रकें कोर्टांत समक्ष नेऊन दिलीं पाहिजेत असें दिसत नाहीं. तीं पत्रकें कोर्टांत इतर कोणत्याहि इसमांकरवीं अगर पोस्टानें पाठवितां येतील. अशीं माहितीपत्रकें कोर्टांत दिल्याचा लेखी पुरावा म्हणून रजिस्टर पोस्टानें अगर सर्टीफिकेट ऑफ पोस्टिंग घेऊन पाठविणें इष्ट आहे.

८. कोर्टाचा खर्च.

कोर्टाचा खर्च कर्जदारावर बसविणेचा किंवा सावकारावर बसविणेचा या प्रश्नाचा विचार करताना त्यापैकीं कोणी या कलमांत सांगितलेल्या प्रमाणें माहितीपत्रकें पाठविण्यास अगर नोटीस देण्यास किंवा नकला पाठविण्यास चूक केली आहे कीं काय याचा विचार केला जाईल.

## समाईकपणें व व्यक्तिशः जबाबदार असलेल्या कर्जदाराचा अर्ज

६. (१) कर्जदारानें द्यावयाचें कर्ज देण्यास जामीन देऊन हमी दिली असेल तर, किंवा कर्जदार कोणत्याहि इतर इसमाबरोबर कोणत्याहि कर्जासाठीं अन्य रीतिनें समाईक अगर वैयक्तिक-रीत्या जबाबदार असून सदरहू जामीन किंवा इतर इसम कर्जदार नसेल तर कर्जदारास अशा कर्जाच्या संबंधांत दाद मिळविण्यासाठीं कलम ४ अन्वयें अर्ज करण्याचा अधिकार आहे. आणि कोर्टास सदरहू प्रकरणांतील वस्तुस्थिती व परिस्थिति विचारांत घेऊन अशा अर्जदाराचा संबंध असेल तेथवर या कायद्यान्वयें कर्जाची तडजोड करण्याच्या कामांस लागण्याचा अधिकार आहे.

(२) कर्जदारानें द्यावयाची जीं कर्जे जामीन देऊन हमी दिलेली असतील अशा कर्जांची पोटकलम (१) अन्वयें तडजोड करण्यांत आली असेल तेव्हां, कलम १५ चें पोटकलम (१), कलम १७ चे पोटकलम (३), कलम २६ चें पोटकलम (५), कलम ३४ किंवा कलम ३५ चें पोटकलम (२) या अन्वयें अशा कर्जदाराचीं जीं कर्जे असतील किंवा सदरहू कर्जाचा जो भाग फिटला असेल त्या कर्जाच्या किंवा सदरहू कर्जाच्या त्या भागाच्या

संबंधांतील पात्रतेतून जामीनाची मुक्तता करण्यांत आली आहे असें समजण्यांत येईल, आणि अशीं कर्जें किंवा असा भाग यासंबंधांत कर्जदाराविरुद्ध काम चालविण्याचा जामीनास हक्क असणार नाहीं.

## विषयवारी


१ कायद्यांतील फेरफार.
२ जामीन हा कर्जदार असेल तर
३ जामीन कर्जदार नसेल तर
४ कर्जदाराच्या जामीनाची जबाबदारी
५ संयुक्त व वैयक्तिक जबाबदारी
६ कलम १५ (१), १७ (३) २६ (५), ३४, ३५, (२)
७ जामीनदार, कर्जदाराकडून काय वसूल करूं शकेल.


### १. कायद्यांतील फेरफार

या कलमांतील पोटकलम २ हे नवीनच घालण्यांत आलेलें आहे. पूर्वीच्या कायद्यांत पोटकलम १ एवढेंच होतें. पूर्वीचे कायद्यात हें कलम २० वें होते.

### २. जामीन हा कर्जदार असेल तर

पुष्कळदां सावकार एकाच व्यक्तीस त्याचे एकट्याचे जबाबदारीवर कर्ज देत नाहींत तर त्याचे जोडीस आणखी कोणास तरी जबाबदार धरतात व त्यास जामीन असें म्हणतात. अशा जामीनाची जबाबदारी मूळ ऋणकोच्या बरोबरीनें असते. व सावकार दोघांकडूनही आपले पैसे वसूल करूं शकतो. अर्थात मूळ ऋणकोला संगनमतानें सोडून देऊन निव्वळ जामीनावर तो आपले पैसे वसूल करूं शकत नाहीं. ( कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट कलम १३४ ). व जामीनदार त्या जबाबदारींतून कायमचा सुटू शकतो. तसेंच या कायद्याखालीं जर असा जामीनदार

हा कर्जदार म्हणून ठरेल तर त्याच्या कर्जाचा निवाडा होईल व त्या निवाड्यानुसार त्याने कर्जाची फेड केली म्हणजे त्याची सर्व कर्जातून मोकळीक होणार आहे. परंतु जामीनाच्या अशा कर्जमुक्ततेमुळे मूळ ऋणको 'जो या कायद्याप्रमाणे कर्जदार नाही' तो पूर्णपणे ऋणमुक्त होणार नाही तर जामीनदाराच्या निवाड्यातील रकमेइतकीच जामीनदार जितकी रक्कम प्रत्यक्ष भरेल तितक्या रकमेपुरतीच त्याची जबाबदारी कमी होईल; कारण या कलमांतील पोटकलम २ मधील सवलतीचा फायदा हा मूळ ऋणको या कायद्याखालील कर्जदार असेल तर जामीनास मिळणार आहे; ती सवलत जामीन या कायद्याखाली कर्जदार असल्यास त्याचे मूळ ऋणकोस मिळणार नाही असे वाटते.

### ३. जामीन कर्जदार नसेल तर

मूळ ऋणको हा या कायद्याप्रमाणे कर्जदार असेल तर त्याला पोटकलम १ प्रमाणे आपल्या कर्जाकरिता कोर्टाकडे अर्ज करिता येतो व त्याच्या सावकारास त्या कर्जासाठीं अर्ज करणे जरूर आहे. एखाद्या सावकाराने असा अर्ज केला नाही तर कलम १५ प्रमाणे तें सर्व कर्ज बुडणार आहे. असें जें कर्ज बुडेल तें कर्जदाराच्या बाबतींतच बुडेल असें नाहीं तर जामीनाच्याबाबतीतही जरी तो या कायद्याप्रमाणें कर्जदार नसला तरी बुडणार आहे. व सावकारास त्याचे विरुद्ध नेहमीच्या दिवाणी कोर्टात दावा लावून त्याची वसूली करता येणार नाहीं. कायद्यामध्यें ही जी व्यवस्था या कलमाच्या पोटकलम २ मध्यें केलेली आहे ती कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट मधील तत्वानुसारच केलेली आहे. तसेच मूळ ऋणकोचे कर्जाबाबत कोर्टाकडून तडजोड झाल्यास तेवढ्या प्रमाणांत त्याचीही कर्ज मुक्तता होणार आहे. म्हणजे कर्ज ४००० रु. असेल व या कायद्यांत दिलेल्या प्रमाणानुसार ते जर २५०० रु. झाले तर जामीनाची जबाबदारी फक्त २५०० रु. पुरतीच राहील व १५०० रु. ची सूट मूळ ऋणकोबरोबर त्यास मिळेल. वर लिहिलेल्या कायद्याच्या परिस्थितीत ज्या कोणा सावकारास कर्जदाराबरोबरच जामीनाकडूनही पैसे वसूल करावयाचे असतील त्यानें कोणता उपाय योजावा हा प्रश्न

उपस्थित होतो. त्यासाठीं त्याला नेहमीच्या दिवाणी कोर्टात कर्जदार व जामीन या दोघानाही पक्षकार करुन दावा लावावा लागेल. व मग तो दावा या कायद्याच्या कलम १९ खालीं कर्जनिवारण कोर्टाकडे येईल व तेथें कर्जदाराविरुद्ध जो कांहीं निवाडा व्हावयाचा असेल तो होईल. व मग तें प्रकरण पुनः दिवाणी कोर्टाकडे पाठविलें जाईल व तेथें कायद्याप्रमाणें चालून योग्य तो निकाल होईल. यायोगें सावकार जामीनदार यास आपल्या कर्जाबद्दल जबाबदार धरूं शकेल. मात्र असा दावा कलम ४ प्रमाणें कर्जदारानें अगर सावकारानें अर्ज केलेला असेल तरच लावता येईल असें वाटतें.

## ४. कर्जदाराच्या जामीनाची जबाबदारी.

मूळ ऋणको व जामीनदार यांचे अन्योन्य संबंध व त्यांची सावकाराशी जबाबदारी यासंबंधीचा विचार इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट कलम १२८ ते १४७ यामध्यें केला आहे; त्या विचारान्वयें जामीनदाराची जबाबदारी ही दुसरा कोणता करार झालेला नसला तर मूळ ऋणकोच्या बरोबरीची असते व सावकारास ऋणकोकडून अगर जामीनदाराकडून अगर दोघांकडूनही आपले मनाप्रमाणे येणे वसूल करता येते; व मूळ ऋणकोची जर सावकाराकडून कर्जातून मुक्तता झाली तर जामीनदाराची मुक्तता त्या कायद्यातील कलम १३४ प्रमाणे होते. त्याच तत्वास अनुसरुन या कायद्यांतही या कलमातील पोटकलम २ मध्यें जामीनदाराची मुक्तता कशी व केव्हां होते किंवा त्याची जबाबदारी कोणत्या परिस्थितींत किती कमी होते याचा उहापोह केला आहे. उदाहरणार्थ या कायद्यांतील कलम १५ (१) प्रमाणे कर्जदारानें किंवा सावकारानें जर आपल्या कर्जाविषयी कलम ४ प्रमाणे अर्ज केला नाही तर तें कर्ज रद्दबादल व्हावयाचें आहे. एकाद्या कर्जदाराच्या सावकारानें कलम ४ प्रमाणे अर्ज केला नाही तर शेतकरी कर्जदाराचेच कर्ज बुडेल असें नव्हे तर बिगरशेतकरी जामीनदाराचीही त्याबाबतची जबाबदारी नाहींशी होईल.

## ५. संयुक्त व वैयक्तिक जबाबदारी.

जेव्हा ऋणकों पैकीं एकजण शेतकरी कर्जदार असतो व बाकीचे

बिगरशेतकरी असतात व अशा सर्व ऋणकोंनी वैयक्तिक व संयुक्त जबाबदारी पत्करून जर एकादे कर्ज काढले तर शेतकरी कर्जदाराला या कायद्याप्रमाणें अर्ज करुन आपले कर्जाची तडजोड करुन घेतां येईल; व अशा तडजोडीचा फायदा इतर ऋणकोंना मिळणार नाहीं. व त्यांचे कडून सावकारानें कर्ज वसूल केल्यास त्यांना तें कर्ज हिस्सेरशीनें या शेतकरी कर्जदाराकडून वसूल करता येण्याची शक्यता दिसत नाही. सावकाराने अर्ज न केल्यामुळे जर शेतकरी कर्जदाराचें देणें नष्ट झालें तर त्याचा फायदा इतर ऋणकोस मिळणार नाहीं.

## १५. कलम १५ (१), १७ (३), २६ (५), ३४, ३५, (२).

कलम १५ (१) हें पुढील प्रमाणें आहे:—

"कर्जदाराकडून येणें असलेल्या ज्या कर्जाच्या संबंधांत ३१ जुलै पर्यंत अर्ज दाखल झाला नसेल असें प्रत्येक कर्ज फिटून गेलें असें समजलें पाहिजे." या वरून असें दिसून येईल कीं, सावकारानें लवाद कोर्टाकडे तारीख १-८-४७ पूर्वी कर्ज दाखविलें नाहीं व कर्जदारानेंहि कर्ज दाखविलें नाहीं तर ते कर्ज नष्ट होणार आहे. कर्जदाराच्या बाबतींत जर असें कर्ज नष्ट झालें तर जामीनदाराचीही मुक्तता होणार आहे. परंतु सहभागीदारांची त्यांतून सुटका होणार नाहीं.

कलम १७ (३) हें कर्जदारास १५००० रुपयांहून जास्त कर्ज आहे कीं नाहीं व कर्जदार हा कायद्याप्रमाणें खरोखर कर्जदार आहे कीं नाहीं या संबंधीच्या मुद्यांचा निर्णय करण्यासाठीं घातलेलें आहे. त्यांत असें म्हटलेलें आहे कीं, रु. १५००० पेक्षां जर ज्यास्त कर्ज असेल तर कर्जदाराचा अर्ज रद्द करावा; पण सावकारांपैकीं कोणी जर १५००० वरील सूट कर्जदाराला दिली तर तो अर्ज चालवयाचा आहे. अशी जी सूट जो कोणी सावकार देईल ती सूट त्या कर्जापुरता कोणी जामीनदार असेल त्यासही मिळावयाची आहे.

कलम २६ (५) हें कलेक्टर, कोऑपरेटीव्ह सोसायटी, स्थानिक स्वराज्य संस्था व पोटगीचे हक्कदार यांच्या येणें असलेल्या रकमांचा

विचार करण्यासाठीं घातलेलें आहे. त्याकलमान्वयें जर सदरपैकीं हक्कदारांनीं कर्जदारास आपल्या कर्जांत कांहीं सूट दिली तर ती सूट जामीनदारासही मिळणार आहे. तसेंच कोर्टानें वरील हक्कदारांस त्यांच्या कर्जाचे माहितीपत्रक सादर करावयास सांगितलें असतां तें भरलें नाहीं तर तें कर्ज नष्ट होणार आहे. व त्याबरोबरच जामीनदाराची जबाबदारीही नष्ट होणार आहे.

कलम ३४ प्रमाणें कोर्टामार्फत कर्जाची जी तोड व्हावयाची आहे त्याचा विचार केलेला आहे. कलम ३१ व ३३ प्रमाणें जी कर्जतोड व्हावयाची आहे तिचा फायदा जामीनासही मिळणार आहे.

कलम ३५ (२) प्रमाणें एखाद्या कर्जदारानें व अनेक सावकारांपैकीं एखाद्यानें जर संगनमत करून दुसऱ्या सावकारांना फसविण्यासाठीं खोडसाळपणानें एखादी मागणी केली आहे असें जर कोर्टाच्या नजरेस आलें तर त्या सावकाराचें सर्व कर्ज नाहींसें होतें व त्याला तें पुनः वसूल करतां येत नाहीं व असें जें कर्ज नष्ट होईल त्यासंबंधीचा जामीनदारही जबाबदारीतून मुक्त होईल.

**७. कर्जदाराकडून जामीनदार काय वसूल करूं शकेल.**

एखादें कर्ज अगर त्यापैकीं कांही भाग सावकारानें अगोदरच जामीनदाराकडून वसूल केलेला असेल व त्या कर्जाची विल्हेवाट वर लिहिलेल्या कलमांप्रमाणें होऊन तो कर्जदार जर त्या कर्जांतून सुटला असेल अगर त्यास त्या कर्जांतून सूट मिळाली असेल तर जामीनदारास त्याचे स्वतःकडून वसूल केलेली रक्कम कर्जदाराकडून वसूल करतां येणार नाहीं.

## बिगर कर्जदाराचें बेचनदारास या कायद्याचा फायदा मिळणार नाहीं

७. तारीख एक माहे जानेवारी १९३८ नंतर ज्या कोणत्याही

कर्जदाराच्या नांवें बिगर कर्जदारानें कर्ज तबदील किंवा नांवें केलें असेल तर कलम चार प्रमाणें कर्जतोडीचा तबदील केलेल्या अशा कर्जदाराचा अर्ज चालणार नाहीं.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ कायद्यांतील फेरफार | २ उद्देश व व्याप्ती |

### १. कायद्यांतील फेरफार.

पूर्वीच्या कायद्यांत सदरहू कलम हें २१ क्रमांकाचें होतें व त्यांत 'असें कर्ज सुरवातीस ( बिगर कर्जदारानें ) काढलेलें असेल' हे शब्द जादा होते, या कायद्यांत ते शब्द काढून टाकण्यांत आलेले आहेत. त्यामुळें जें कर्ज या कायद्याखालील कर्जदारास बेचन झालें असेल तें मूळ ऋणकोनेंच बेचन दिलें असेल असें नाहीं तर मूळ ऋणकोच्या बेचनदारानेंही बेचन दिलेलें असेल.

### २. उद्देश आणि व्याप्ती.

या कायद्यानें शेतकरी कर्जदारास खास सवलती मिळणार असल्यामुळें आपलें कर्ज अशा शेतकऱ्याच्या माथीं मारलें म्हणजे तें कर्ज आपोआप फिटेल अशा समजुतीनें कोणी आपलें कर्ज शेतकरी कर्जदाराच्या नांवें करूं नये म्हणून या कलमाची खास योजना केलेली दिसते; अर्थात ज्या काळांत शेतकरी कर्जदारांची कल्पनाच अस्तित्वांत नव्हती त्यावेळीं ज्यांनीं हे व्यवहार केले असतील त्या व्यवहाराबाबत शेतकरी कर्जदारांना मिळणारें संरक्षण या कायद्यानें मिळणार आहे. म्हणजे १ जानेवारी १९३८ च्या पूर्वी अशीं कर्जें ज्या शेतकरी कर्जदारानें आपल्या माथीं मारून घेतलीं असतील त्या कर्जाबाबत कर्ज निवारण करून घेण्याचा शेतकरी कर्जदारास हक्क आहे. परंतु १ जानेवारी १९३८ नंतर जर असें कर्ज कोणी शेतकरी कर्जदारानें आपल्या नांवें करून घेतलेलें असेल तर त्याच्या जबाबदारींतून या कायद्यान्वयें त्याची मुक्तता होणार नाहीं.

अशी कर्जें आपल्या नावें करून घेण्याचें विशेष प्रचलित प्रकार म्हणजे खरेदी खतांत सावकाराचें बोजे आपल्या माथीं घेणें किंवा वाटणीच्या वेळीं एका वाटणीदारानें कर्ज व मिळकत दोन्हीं आपलेकडे घेणें होय.

## तडजोडीची नोंद करण्यासंबंधीं अर्ज.

८. (१) जर कोणताहि कर्जदार व त्याच्या सावकारांपैकीं कोणताहि सावकार किंवा सगळे सावकार यांच्या दरम्यान कर्जदारानें सावकारांस द्यावयाच्या कोणत्याहि कर्जाच्या संबंधानें तडतोड झाली असेल तर सदरहू कर्जदारांस किंवा सावकारांपैकीं कोणत्याहि सावकारांस तडजोडीच्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत अशी तडजोड नमूद करण्याबद्दल कोर्टाकडे अर्ज करतां येईल.

(२) असा प्रत्येक अर्ज ठरविलेल्या नमुन्यांत असला पाहिजे व त्यावर सही केलेली असून ठरविलेल्या रीतिनें त्याच्या खरेपणाबद्दल पडताळा दिलेला असला पाहिजे.

(३) असा अर्ज आल्यावर कोर्टानें, प्रसंगाप्रमाणें सावकारास किंवा कर्जदारास नोटीस देऊन व त्यांस योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर करण्यांत आलेली तडजोड खरीखुरी असून स्वखुषीनें केलेली आहे आणि कर्जदाराच्या सावकारापैकीं कोणत्याहि सावकाराचे देणें बुडविण्याच्या किंवा तें देण्यास विलंब लावण्याच्या हेतूनें करण्यांत आलेली नाहीं व ती कर्जदाराच्या हिताची आहे आणि कर्जदार हा कलम १७ चें पोटकलम (१) यांतील रक्कम पोटविभाग (अ) व (ब) यांत उल्लेख केलेल्या शर्ती ज्यानें पुऱ्या केल्या आहेत असा इसम आहे अशी सदरहू कोर्टाची खात्री झाल्यास अशी तडजोड सदर कोर्टानें

नमूद केली पाहिजे आणि त्याबद्दलचा तसा शेरा मारला पाहिजे अशा रितीनें नमूद केलेली व शेरा मारलेली अशी प्रत्येक तडजोड तडजोडीच्या उभयपक्षांस बंधनकारक असेल व या कायद्यांत पुढें अन्य रीतिनें ठरविण्यांत आलें आहे तें शिवाय करून तिच्या संबंधीचा प्रश्न पुन: उपस्थित करतां येणार नाहीं.

(४) कोर्टानें पोटकलम (३) अन्वयें तडजोड नमूद करून तसा शेरा मारल्यानंतर तडजोडींत दाखल न केलेली अशीं कर्जदारानें द्यावयाचीं कोणतीहि इतर कर्जे आहेत किंवा कसें याविषयीं प्रतिज्ञा करण्यास कर्जदारास कोर्टानें सांगितलें पाहिजे. अशी प्रतिज्ञा कर्जदार करील तर कोर्ट अशा तडजोडीच्या शब्दांत निवाडा देईल.

(५) तडजोडींत दाखल न केलेली कर्जदाराकडून द्यावयाची इतर कर्जे आहेत अशीं सदरहू तडजोड नमूद केल्यानंतर कोर्टाची खात्री होईल तर पोटकलम (१) अन्वयें कर्जाच्या तडजोडीसाठीं कलम ४ अन्वयें केलेला अर्ज म्हणून कोर्टाकडून समजण्यांत येईल.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ कायद्यांतील फेरफार. | ४ कोर्ट फी. |
| २ मुदत. | ५ अर्ज न केलेल्या कर्जदारास कसा फायदा घेतां येईल. |
| ३ ठराविक नमुना. | |

**१ कायद्यांतील फेरफार.**

१९३९ च्या कायद्यांत तडजोड नोंदीसंबंधीचे कलम २३ होते

त्या कलमांतच अर्जास एक रुपया कोर्टफी लागेल असें म्हटले होते; व इतर कांहीं किरकोळ स्वरुपाचे फेरबदल होते.

१. मुदत.

कर्जदार व सावकार यांच्या दरम्यान या कलमांत सांगितल्याप्रमाणें तडजोड झाल्यास तशी तडजोड कोर्टाकडे एक माहिन्याचे आंत नोंदविण्याकरतां अर्ज केला पाहिजे; असा अर्ज ठराविक नमुन्यांत करावयाचा असून तो नमुना नंबर ३ चा आहे. तडजोड झाल्यापासून एक माहिन्याचे आंत अर्ज करावयाचा असला तरी अशी तडजोड किती दिवसात करावी या संबंधी कांहीं मुदत सांगण्यांत आली नाहीं. ही तडजोड कोर्टात अर्ज केलेला असो अगर नसो केव्हांही करता येणार आहे.

३. ठराविक नमुना.

या कलमांत सांगितलेली तडजोडही नमुना नंबर ३ मध्यें दिलेल्या पद्धतीनेच कोर्टास कळविली पाहिजे. आणि तिच्यावर सही व पडताळा ही सांगितलेल्या पद्धतीनेच करावयास पाहिजे. याप्रमाणे जी तडजोड नोंदविली जाणार नाही तिची दखल कोर्ट घेणार नाहीं व कर्जदारास त्या तडजोडीचा फायदा कोर्टतर्फे मिळणार नाही.

४. कोर्ट फी.

अशा तडजोडीच्या अर्जास कलम ४४ पोटकलम १ (१) प्रमाणे एक रुपया कोर्टफीचे तिकीट लावावे लागणार आहे. सदर कोर्टफीबाबत पंचवीस टक्के वाढ करुन तिकीट लावण्याची जरुर नाही. कारण ही कोर्टफी, कोर्टफी ॲक्ट खालील नाही. ( पहा ४८ बॉम्बे लॉ रिपोर्टर १०८ = ऑ. इं. रि. १९४६ मुंबई ३९९ ).

५. अर्ज न केलेल्या कर्जदारास कसा फायदा घेतां येईल.

ज्या कर्जदारांनी ३१ जुलै १९४७ चे आंत अर्ज केले नाहींत. त्यांना या कलमाचा फायदा घेऊन आपल्या कर्जाची तडजोड आपल्या

सावकारांबरोबर आपसात करुन त्यावर कोर्टाचा शिक्का मोर्तब करुन घेता येईल. असा शिक्का मोर्तब करताना कोर्टानें कर्जदारास त्याच्या इतर कर्जासंबंधीची माहिती विचारावयाची असून त्या सावकारांची कर्जें जर त्या तडजोडीत नमूद नसतील तर त्यासंबंधीची तडजोड या कायद्याप्रमाणे पुनः करावयाची आहे. अशा प्रकारे ज्या कर्जदारांकडून आपल्या कर्जाबाबत अर्ज मुदतीत दिला गेला नसेल त्यांना या कायद्याचा फायदा मिळण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. अर्थात् अशी तडजोड योग्य, प्रामाणिकपणाची व कर्जदाराच्या हिताची आहे किंवा नाहीं व त्या योगे इतर कोणी सावकार बुडतात किंवा काय याचा विचार कोर्टानें करावयाचा आहे; व मगच अशी तडजोड नोंदून इतर सावकारांच्या कर्जासंबंधीची चौकशी व्हावयाची आहे.

## कोर्टापुढें काम चालू असता केलेली तडजोड.

९. पूर्वीच्या कलमांत कोणताही मजकूर असला तथापि जर कोर्टापुढें अगर अपील कोर्टांत काम चालू असताना कर्जदार व त्याचे सर्व धनको यांचे दरम्यान तडजोड करण्यांत आली असेल आणि जर कोर्टाची अशी खात्री होईल कीं कर्जदाराने तडजोड स्वखुषीने केली असून ती त्याचे फायद्याची आहे तर अशा तडजोडी प्रमाणें कोर्टास निवाडा देता येईल.

### विषयवारी

| | |
|---|---|
| १. कोणती तडजोड कोर्ट मान्य करील. | २. कोर्ट फी. |

### १. कोणती तडजोड कोर्ट मान्य करील.

कोर्टापुढें अगर अपीलकोर्टापुढें चालू असलेल्या कामांत कर्जदार व त्याचे सर्व सावकार यांच्यांत तडजोड झाल्यास व अशी तडजोड

कर्जदारानें राजीखुषीनें केलेली आहे आणि त्यापासून कर्जदाराचे हित होणार आहे अशी मे. कोर्टाची अगर अपील कोर्टाची खात्री पटल्यास तडजोडीनुसार कोर्ट निवाडा करील. म्हणजे तडजोडीस कोर्टानें कबुली द्यावी असें वाटत असल्यास पुढील गोष्टी तडजोडींत जरूर आहेत.

१. सर्व सावकारांची मान्यता.

२. कर्जदाराची राजीखुषी.

३. कर्जदाराचे हित.

२. कोर्ट फी.

या कायद्यांतील कलम ४४ पोटेकलम १ (१) प्रमाणे अशा तडजोडीनुसार झालेल्या निवाड्यास एक रुपाया कोर्ट फी स्टँप पडेल. सदर एक रुपयांवर कोर्टफी वाढ करून सव्वा रुपयाचे तिकीट लावण्याची जरुरी नाहीं.

## कांहीं तडजोडी रद्बातल होतील

१०. कलम ८ अन्वयें जी तडजोड कोर्टानें नोंदलेली नाहीं किंवा कलम ९ अन्वयें ज्या तडजोडीनुसार निवाडा देण्यांत आलेला नाहीं अशी कर्जदारानें कोणत्याही धनकोस द्यावयाच्या कर्जाबाबत करण्यांत आलेली प्रत्येक तडजोड रद्बातल समजण्यांत येईल आणि त्या तडजोडीला कोणत्याहि कोर्टाकडून कोणत्याहि कारणाकरितां मान्यता दिली जाणार नाहीं.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ कायद्यांतील फेरफार. | ३ तडजोडीबाबत घ्यावयाची खबरदारी. |
| २ उद्देश व व्याप्ति. | |

१. कायद्यांतील फेरफार.

सन १९३९ च्या कर्जनिवारण कायद्यांत सदरहू कलमाच्या

आशयाचे कलम नं. २५ चें कलम होतें व त्यांत पूर्वीच्या कायद्यांतील बोर्ड-स्थापनेस धरून शब्दरचना होती व अशा बोर्ड स्थापनेनंतर झालेली कोणतीहि तडजोड जर वर दिलेल्या दोन्ही कलमानुसार बोर्डानें मंजूर केलेली नसेल तर ती रद्दबातल ठरविलेली होती.

२. उद्देश व व्याप्ति

कर्जदारावर खाजगी रीत्या सावकाराकडून दडपण येऊन जर एखादी तडजोड अस्तित्वांत आली तर तिचा गैरफायदा सावकारास मिळूं नये म्हणून हें कलम मुद्दाम तयार करण्यांत आलेलें आहे.

३. तडजोडीबाबत घ्यावयाची खबरदारी.

कोर्टांत काम चालू नसतांना जर कर्जदार व त्यांचे सावकार यांचे दरम्यान तडजोड झाली तर अशी तडजोड तीस दिवसांचे आंत कोर्टापुढें दाखल करून नोंदवून घेण्याची काळजी घेतली पाहिजे. अन्यथा निव्वळ तडजोड घडून आली आहे एवढ्या सबबीवर कोणासहि त्या तडजोडीचा फायदा घेतां येणार नाहीं. असा तडजोडीचा लेख जणूं कांहीं अस्तित्वांतच आला नव्हता असें धरून कोर्ट त्या त्या व्यवहारांचे कायद्यानुसार स्वतंत्र रीतीनें विचार करील. या दृष्टीनें पूर्वीच्या कायद्यांतील 'सदर तडजोडीला कोणत्याहि बोर्डाकडून किंवा कोर्टाकडून कबुली म्हणून किंवा इतर रीतीनें' हे जे शब्द होते, ते अशा तडजोडीचें कायदेशीर स्वरूप जास्त स्पष्ट करणारे होते.

## रु. १५००० पेक्षां जास्त कर्ज नसलेल्या कर्जदारासच कलम ४ किंवा ८ अन्वयें अर्ज करतां येतील.

११. कलम ४ किंवा ८ अन्वयेंचा कोणताहि अर्ज कोणत्याहि कर्जदाराच्या वतीनें किंवा कर्जदाराच्या संबंधानें कोर्टानें अर्जाच्या तारखेस कर्जदाराकडून येणें म्हणून असलेल्या कर्जाची एकूण रक्कम पंधरा हजार रुपयांहून अधिक असल्यास स्वीकारूं नये.

## विषयवारी

१ कोणत्या कर्जदारांच्या कर्जाचा विचार होईल.
२ सरकारी देणीं वगैरे पंधरा हजारांत धरलीं जातील काय

### १. कोणत्या कर्जदाराच्या कर्जाचा विचार होईल.

या कायद्याच्या कलम २ (५) अन्वयें जरी एखादी व्यक्ती किंवा हिंदु कुटुंब कर्जदार असले तरी त्यांचे एकूण कर्ज जर पंधरा हजार रुपयांहून जास्त नसेल तरच या कायद्याप्रमाणें त्या कर्जाची तडजोड होणार आहे. म्हणजे कर्जदाराच्या व्याख्येंत त्यास जरूर असणाऱ्या चार बाबींत या एका गोष्टीची आणखी भर पडली आहे व या कायद्याप्रमाणें ज्या व्यक्तीस अगर हिंदु कुटुंबास आपल्या कर्जाची तडजोड करून घ्यावयाची असेल त्यांना व्याख्येंतील चार गोष्टी शाबीत कराव्या लागतील; शिवाय पंधरा हजाराहून जास्त कर्ज नसल्याची गोष्ट दाखवावी लागेल.

### २. सरकारी देणीं पंधरा हजार रुपयांत धरलीं जातील काय.

कलम ३ मध्यें कोणत्या कर्जास हा कायदा लागूं पडणार नाहीं त्या कर्जांचे प्रकार सांगितले आहेत. कर्जदाराच्या कर्जांच्या एकूण रकमेचा विचार करतांना हीं कायद्याच्या कक्षेंतून वगळलेलीं कर्जें त्यांत समाविष्ट करावयाचीं कीं काय हा प्रश्न आहे. कलम ४ प्रमाणें कर्ज तडजोडीबाबत जो अर्ज द्यावयाचा आहे त्यांत हीं कर्जें दाखविलीं पाहिजेत असें मुद्दाम म्हटलें आहे. यावरून कर्जदाराच्या एकूण कर्जाचा विचार करतांना तीं कर्जें लक्ष्यांत घेतलीं जावींत असा कायदे करणारांचा हेतू दिसतो. परंतु उलटपक्षीं असेंहि वाटतें कीं जर अशा कर्जाचा विचार तडजोडीचे कामीं व्हावयाचा नसेल तर एकूण कर्जांचा विचार करतांना हीं कर्जें लक्षांत घेतल्यांस अन्याय होणार आहे.

## अर्ज परत घेणें

१२ कोर्टाची परवानगी घेतल्याशिवाय कलम ४ अन्वयें

केलेला कर्जाचे तडजोडीचा अर्ज किंवा कलम ८ अन्वयेचा तडजोड नमूद करण्याबाबतचा अर्ज परत घेतां येणार नाहीं.

## अर्ज एकत्र करणें

१३. कलम ४ अन्वयें कर्जाची तडजोड करणेबद्दल दोन किंवा अधिक अर्ज एकाच कर्जदारानें किंवा कर्जदाराविरुद्ध केले असतील तेव्हां असे सर्व अर्ज एकत्रीत केले पाहिजेत. जेव्हां समाईक कर्जदाराविरुद्ध असे निरनिराळे अर्ज सादर केले असतील तेव्हां अशा सर्व अर्जांची एकत्र सुनावणी केली पाहिजे. ० ०

## विषयवारी

**१. कायद्यांतील फेरफार.**

१९३९ च्या कायद्यांत या विषयाचें कलम २८ हें होते व त्यांत वर उल्लेखिलेले सर्व अर्ज एकत्रित करावेत एवढेंच म्हटलें होते. या कलमांत अशा सर्व अर्जांचे एकत्रीकरण करुन त्याबाबतचा पुरावाही एकत्रित घेण्यात यावा असें म्हटले आहे.

## कर्जाचे पत्रक दाखल करण्याबाबत सावकार व कर्जदार यांचेवर नोटीसांची बजावणी

१४. कर्जाची तडजोड करण्याबद्दलचा अर्ज आल्यावर—

(अ) कोर्टानें ज्याचें नांव व पत्ता अर्जांत दिलेला असेल अशा कर्जदारास आणि दरेक धनकोस नोटीस दिली पाहिजे व एक सर्वसाधारण नोटीस जाहीर केली पाहिजे व अशा नोटीसीत ठराविक नमुन्यांत पत्रक सादर करणेबद्दल कर्जदारांस व सर्व

धनकोंना फर्माविलें पाहिजे. असें पत्रक नोटीस पोहोंचल्यापासून अगर जाहीर नोटीसीच्या प्रसिद्धीपासून, या पैकी नंतरची जी तारीख असेल अशा तारखेपासून एक महिन्याचे आंत दाखल केलें पाहिजे. अशी नोटीस जो कर्जदार अर्जदार असेल त्याला किंवा जो सावकार अर्जदार असेल त्याला देण्याची जरुरी नाहीं;

**मात्र** कर्जदार किंवा कोणताही सावकार नोटीशींत नमूद केलेल्या मुदतींत चांगले व पुरेसे कारणामुळें नोटीसीप्रमाणें वागण्यास असमर्थ आहे अशी कोर्टाची खात्री झाल्यास सदर पत्रक दाखल करण्याची मुदत कोर्ट वाढवील.

## विषयवारी

१ कायद्यांतील फेरफार.
२ ठराविक नमुना.
३ जाहीर नोटीस.
४ कलम ५ मधील नोटीस व पत्रक.
५ पत्रक सादर करण्यास मुदत केव्हां मिळेल.

**१. कायद्यांतील फेरफार.**

१९३९ च्या कायद्यांत या विषयाचा विचार कलम ३१ मध्यें केलेला होता व त्यांत नोटीस ठराविक नमुन्यांत दिली पाहिजे असें म्हटलें होतें; या कलमांत 'ठराविक नमुन्यांत' हे शब्द गाळण्यांत आले आहेत. त्यामुळें कोर्टाची नोटीस अमुक एक प्रकारांतच पाहिजे असें कायद्यानें बंधन नाहीं.

**२. ठराविक नमुना.**

सावकारानें अगर कर्जदारानें जें पत्रक कोर्टास सादर करावयाचे

आहे तें ठराविक नमुन्यांत द्यावयाचें आहे. असा ठराविक नमुना क्रमांक ४।५ चा आहे. त्याप्रमाणें फार्कें भरुन एक महिन्यांत दिलीं पाहिजेत. याप्रमाणें न दिल्यास ती पत्रकें विचारास अग्राह्य ठरतील असें वाटतें.

### ३. जाहीर नोटीस.

टीप नं. १ मध्यें लिहिल्याप्रमाणें अशी नोटीस ठराविक नमुन्यांतच पाहिजे असें नाहीं, असें जरी आहे तरी अशी जाहीर नोटीस कोणत्या नमुन्यांत द्यावी या संबंधींचा कानू करण्याचे अधिकार कलम ५५ (ड) प्रमाणें सरकारने आपल्याकडे घेतले आहेत; व त्या अधिकारांनुसार कानू नं. ५ मध्यें अशी जाहीर नोटीस कोणत्या पद्धतीने द्यावी यासंबंधीचा खुलासा केला आहे. त्या खुलाशाप्रमाणें सदरहू नोटीसांच्या प्रती कोर्टाच्या ऑफीसबोर्डांवर आणि मामलेदार व महालकरी यांचे ऑफीसबोर्डांवर लावावयाच्या आहेत. या नोटीसांमध्यें असें म्हटले पाहिजे कीं ज्या कर्जदारांनीं कर्जतोडीचे अर्ज केले किंवा ज्यांच्या विरुद्ध अर्ज झाले असतील अशा कर्जदारांची यादी कोर्टामध्यें योग्य व वाजवी वेळी पाहण्यास मिळतिल.

### ४. कलम ५ मधील नोटीस व पत्रक.

चालू कलमांत ज्याप्रमाणें पत्रक द्यावयाचें आहे त्याच प्रमाणें पत्रक देण्यास भाग पाडण्याची योजना कलम ५ मध्यें केलेली आहे. परंतु त्या व या योजनेंत फरक आहे. तो असा कीं चालू योजना ही अर्ज दाखल झाल्यानंतर व कोर्टाच्या नोटीशीवरुन करावयाची आहे. कलम ५ मधील जें पत्रक दाखल करावयाचें आहे तें खाजगी रीत्या दिलेल्या नोटीशीवरून, अर्ज दाखल केलेला असो अगर नसो, दाखल करावयाचें आहे. तसेंच चालू कलमातील पत्रक मुदतींत न दिल्यास सर्वच्या सर्व कर्ज माहिसे व्हावयाचे आहे. परंतु कलम ५ मधील पत्रक दिल्यास त्याचा विचार खर्चाचा हुकूम करण्याचें वेळीच फक्त करावयाचा आहे.

५. पत्रक सादर करण्यास मुदत केव्हां मिळेल.

कोर्टाकडून नोटीस आल्यावर साधारणपणें एक महिन्याचे आंत या कलमांत सांगितलेलें माहितीपत्रक भरून द्यावयाचें आहे. एक महिन्यांत जर आपल्यास माहीतीपत्रक भरतां येत नाहीं असें वाटलें तर मे. कोर्टाकडे अर्ज करून ती मुदत वेळोवेळी वाढवून घेता येईल. अशी मुदत मिळावयाची असल्यास कोर्टाला चांगलें व पुरेसें कारण दाखवणें जरूर आहे. कागदपत्रांच्या नकला व दस्त ऐवज व खाते उतारे वगैरे मिळाले नाहींत व त्यांची माहितीपत्रकासाठीं जरूरी आहे असें जर कोर्टास पटवून देता आले तर तें एक योग्य व पुरेसें कारण होऊं शकेल व अशी जी मुदत कोर्ट देईल त्या मुदतींत जर माहितीपत्रक दिलें नाही तर तें सर्व कर्ज कलम १५ प्रमाणें रद्द होणार आहे.

## ज्या कर्जाच्या संबंधांत कर्जतोडीचा अगर तडजोड नोंदणीचा अर्ज केलेला नसेल अशी कर्जें रद्दबातल होत.

१५. (१) कर्जदाराकडून येणें असलेल्या ज्या कर्जाच्या संबंधानें कलम ४ अन्वयें सदरहू कलम ४ मध्यें निर्दिष्ट केलेल्या मुदतींत कोणताही अर्ज केलेला नसेल किंवा ज्या कर्जाच्या संबंधानें कलम ८ अन्वयें तडजोड नमूद करण्याबद्दलचा कोणचाही अर्ज सदरहू कलम ८ मध्यें निर्दिष्ट केलेल्या मुदतींत केलेला नसेल किंवा ज्या कर्जाच्या संबंधानें कोर्टाकडे केलेला अर्ज कलम १२ अन्वयें परत घेण्यांत आला असून कलम ४ अन्वयें कोणताही नवीन अर्ज करण्यांत आलेला नाही असें प्रत्येक कर्ज आणि अशा कर्जदारांकडून येणें असलेल्या ज्या कर्जाच्या संबंधानें कलम १४ च्या ठरावास अनुसरून सावकारानें कोर्टास पत्रक सादर केलेलें नसेल असें प्रत्येक कर्ज फिटून जाईल.

(२) ज्यानें आपल्या इकरारानें, वर्तनानें किंवा वर्जनानें आपल्या

सावकारास बुद्धिपुरःसर असें वाटण्यास लावलें असेल किंवा वाटूं दिले असेल कीं तो या कायद्याप्रमाणें कर्जदार नाहीं आणि कलम ११ च्या ठरावामुळें अशा इसमाकडून अशा सावकारास येणें असलेल्या कोणच्याही कर्जाबाबत कलम ४ अन्वयें असा अर्ज कोणत्याही कोर्टास स्विकारतां येणार नाहीं, तर त्याजकडून येणें असलेल्या कोणत्याही कर्जास या कायद्यांतील कोणताही मजकूर लागूं असणार नाहीं.

## विषयवारी


१ उद्देश व व्याप्ति.
२ कोणती कर्जें आजिवात नष्ट होतील.
३ कोणती कर्जें नाहींशीं होणार नाहींत.
४ सावकारांना शेतकऱ्याविरुद्ध दावे लावतां येतील काय व ते चालतील काय.
इकरार, वर्तन, वर्जन.


### १. उद्देश व व्याप्ति.

शेतकरी कर्जदारांच्या कर्जाचे निवारण करण्याचे दृष्टीनें या कायद्याची आंखणी झाली आहे. त्या उद्देशानुसार सावकारांनीं आपलीं येणीं असलेलीं कर्जें कोर्टापुढें मुदतींत न मांडल्यास त्याबद्दल या कलमांत शासनाची योजना दिली आहे. सावकारानें ज्या अर्थी कोर्टाकडे अर्ज केला नाहीं त्याअर्थी त्याचें कर्ज फिटलें असलें पाहिजे असा या कलमाचा मथितार्थ आहे. अर्थात शेतकरी कर्जदारानें आपण या कायद्याप्रमाणें कर्जदार असल्याबद्दल सावकारास जाणीव देउनहि यांचे-कडून जर मुदतींत अर्ज झाला नाहीं तर त्या कर्जाची वसुली कायदेशीर रीत्या करतां येणार नाहीं.

### २. कोणती कर्जें आजिवात नष्ट होतील.

कलम ४ मध्यें म्हटलें आहे कीं, शेतकरी कर्जदाराच्या कर्जाबाबत

कर्जदारानें अगर त्याचे सावकारानें १ ऑगस्ट १९४७ पूर्वी अर्ज करावा. कलम ४ मध्ये याप्रमाणें जरी करावा असा शब्द असला तरी या कलमानें सावकारांनी असा अर्ज केलाच पाहिजे असें स्पष्ट होतें, कारण त्यांनी तसा अर्ज न केल्यास त्यांची कर्जे निरर्थक होणार आहेत. त्याच प्रमाणें कलम ८ प्रमाणें एखाद्या सावकारानें कर्जदाराशीं कोर्टाबाहेर तडजोड केली परंतु ती जर तीस दिवसांच्या मुदतींत कोर्टाकडे नोंदली नाहीं तर त्या सावकाराचे तडजोडींत समाविष्ट केलेले घेणें नष्ट होणार आहे. याचा अर्थ असा कीं, सावकारानेंच अशी तडजोड नोंदून घेण्याची दक्षता बाळगली पाहिजे. कलम १२ प्रमाणें सावकारानें एखादा अर्ज काढून घेतला असला व पुनः जर कोर्टाच्या परवानगीनुसार नवीन अर्ज दाखल केला नसेल तर सावकाराचे कर्ज नष्ट होणार आहे. तसेंच कलम १४ प्रमाणे कोर्टानें नोटीस देऊन कर्जाचा तपशील विचारला असतां जर ठराविक नमुन्यांत एक महिन्याचे मुदतींत कर्जाची माहिती पुरविली नाहीं तर त्या सावकाराचे तें कर्ज नष्ट होणार आहे.

## ३. कोणती कर्जे नाहींशीं होणार नाहींत.

रुपये पंधरा हजाराहून एकाद्या कर्जदाराची कर्जे असल्यास व त्यामुळें कलम ४ प्रमाणें ह्याविषयींचा अर्ज चालण्याजोगा नसल्यास त्यांचे कर्ज अर्ज न दिल्यामुळें नाहींसें होणार नाहीं व त्या सावकाराला अशा कर्जा-बाबत नेहमींच्या दिवाणी कोर्टामार्फत आपलें घेणें वसूल करतां येईल. तसेंच एखाद्या कर्जदारानें आपण कर्जदार नसल्याबद्दल एखाद्या दस्त-ऐवजांत वगैरे लिहून दिलें असलें तर व तशी ग्वाही देऊन कर्ज काढलें असेल तर किंवा या कायद्याप्रमाणें द्यावयाचा अर्ज दिला नसला तर किंवा कलम ५ प्रमाणें सावकारानें नोटीस देऊन कर्जांच्या माहितीचा तक्ता कोर्टास पाठविण्यास सांगितला असतां तो पाठविला नाहीं तर अशा कर्जदाराचें अर्ज सावकाराच्या अर्ज न देण्यामुळें नष्ट होणार नाहीं. म्हणजे अशा कर्जदाराविरुद्ध सावकारास नेहमींच्या दिवाणी कोर्टात दावा लावून आपलें कर्ज वसूल करतां येईल.

## ४. सावकारांना शेतकऱ्यांविरुद्ध दावे लावतां येतील काय व असे दावे चालतील काय.

सर्वसाधारण शेतकऱ्यांच्या सावकारांची अशी समजूत आहे कीं आपण जर तारीख १ माहे ऑगस्ट १९४७ पर्यंत अर्ज दिले नसतील तर आपलें कर्ज बुडलें; परंतु सावकारानें याप्रमाणें निराश होण्याचें कारण नाहीं. या कलमांतील पोटकलम (२) मध्यें सावकारांचें कर्ज तरतें कसें राहील याचा विचार केलेला आहे. त्याप्रमाणें शेतकरी कर्जदाराकडून आपण या कायद्याखालील कर्जदार नाहीं असें बुद्धिपुरःसर भासविण्यांत आलें असेल तर सावकारास ती गोष्ट शाबीत करून नेहमींच्या दिवाणी कोर्टांत दावा लावतां येईल. तसेंच रुपये पंधरा हजारावर ज्या कर्जदाराचें कर्ज असेल त्याचे विरुद्धहि नेहमीप्रमाणें कोर्टांत काम चालूं करता येईल.

## ५. इकरार, वर्तन. वर्जन.

इकरार, वर्तन, किंवा वर्जन या गोष्टी जर बुद्धिपुरःसर कर्जदाराकडून घडल्या व त्याजोगें जर सावकारास सदर कर्जदार या कायद्यांच्या कक्षेंत येत नाहीं असें वाटलें तर कर्जदाराविरुद्ध त्यांस साध्या कोर्टांत दावा लावतां येणार आहे. अशा वेळीं प्रतिवादी कर्जदारांस आपण या कायद्याखालील कर्जदारच आहोंत व आपल्याकडून जो कोणचा इकरा अथवा वर्तन किंवा वर्जन झालें तें बुद्धिपुरःसर झालेलें नसून फसवणुकीनें किंवा दडपणानें घडलेले आहे; कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें आपल्या हातून अर्ज किंवा माहितीपत्रक भरून देणें झाले नाहीं अशा तक्रारी कैफियतींत घेतां येतील व त्याची शाबिती झाल्यास सावकाराचें घेणें निरर्थक होईल. या कामीं कर्जदारानें जे कांहीं इकरार, वर्तन किंवा वर्जन केलें असेल तें त्यानें बुद्धिपुरःसर केलें आहे व त्यामुळें सावकाराची दिशाभूल झाली हें शाबीत करण्याचा बोजा सावकारावर पडेल. तो सावकाराकडून पार पडल्यास कर्जदारास म्हणजे प्रतिवादीस आपल्याकडून असें कोणत्या परीस्थितींत व कां घडले हें दाखवावें लागेल.

## सावकार व कर्जदार यांचीं कर्तव्यें.

**१६.** (१) ज्या कर्जदारानें किंवा कर्जदाराविरुद्ध कलम ४ अन्वयें अर्ज करण्यांत आला असेल किंवा जो कलम ८ अन्वय केलेल्या अर्जांतील पक्षकार असेल अशा प्रत्येक कर्जदारानें हिशेबाच्या सर्व वह्या कोर्टापुढें हजर केल्या पाहिजेत आणि कोर्टाकडून फर्माविण्यांत येतील अशा किंवा ठरविण्यांत येतील अशा आपल्या मिळकतीच्या याद्या व त्यांत येणें असलेल्या व त्यांजकडू असलेल्या कर्जाच्या याद्या दिल्या पाहिजेत व आपल्या सावकारांच्या संबंधानें जबानी देण्यास सादर झालें पाहिजे; कोर्टापुढें वरील प्रमाणें हुकूम होईल त्याप्रमाणें हजर राहिलें पाहिजे साधारणपणें आपल्या मिळकतीसंबंधानें तश सर्व गोष्टी केल्या पाहिजेत.

(२) तसेंच कोर्टाकडून फर्माविण्यांत येतील अशा किंवा ठरविण्यांत येतील अशा हिशेबांच्या वह्या हजर करणें अगर अशा जबानीस सादर होणें व कर्जदारानें सावकारांस द्यावयाच्या कर्जाच्या संबंधानें व त्यानें धारण केलेल्या तारणासंबंधानें माहिती पुरविणें हेंहि प्रत्येक सावकाराचें कर्तव्य असेल.

### विषयवारी

**१. कानूंत सांगितलेल्या ठराविक पद्धतीनें.**

वरील कलमांत ठरविण्यांत येतील अशा बाबींसंबंधानें आपली कर्तव्यें कर्जदार व सावकार यांनीं पार पाडावींत असें म्हटलें आहे परंतु कानूमध्यें या कलमांत लिहिलेल्या कर्तव्याहून निराळीं कर्तव्यें दर्शविणारा एकही कानू नाहीं. सबब या कलमांत सांगितलेलीं किंवा कोर्ट फर्मावेल तीं कर्तव्यें

या उभयतांसहि पार पाडावी लागतील.

## प्राथमिक मुद्दे.

**१७.** (१) कलम ४ अन्वयें केलेल्या अर्जाच्या सुनावणीसाठीं नेमलेल्या तारखेस कोर्टानें प्राथमिक मुद्दे म्हणून पुढील गोष्टींबावत निर्णय केला पाहिजे.

(अ) ज्या इसमाच्या कर्जाची तडजोड करण्यांसाठीं अर्ज करण्यांत आलेला असेल तो इसम कर्जदार आहे किंवा कसें;

(ब) अर्जाचे तारखेस अशा इसमांकडून येणें म्हणून सांगण्यांत आलेल्या कर्जांची एकूण रक्कम रु. पंधरा हजारांपेक्षां ज्यास्त आहे किंवा कसें.

(२) असा इसम कर्जदार नाहीं किंवा अशा इसमाकडून कर्जाच्या तारखेस मागणी केलेलें सव कर्ज हें पंधरा हजार रुपयांहून ज्यास्त नाहीं असें जर कोर्टास आढळून आले तर कोर्टानें असा अर्ज तावडतोब रद्द केला पाहिजे.

मात्र इतकेंच कीं, सदरहू अर्ज अशा रीतिनें काढून टाकण्यापूर्वी, अर्जाच्या तारखेस अशा इसमाकडून येणें म्हणून मागणी करण्यांत आलेली सर्व सावकारांकडून कर्जांची एकूण रक्कम कमी करून ती रु. पंधरा हजारापेक्षां ज्यास्त नाहीं इतकी करण्यासाठीं सावकाराना अगर त्यांच्यापैकीं कोणालाहि आपल्या येणें असलेल्या रकमेचा कोणताहि विशिष्ट भाग सोडून देण्याचा अधिकार आहे. अशा बाबतींत कोर्टानें अर्ज काढून न टाकतां त्याचें काम पुढें चालू ठेवलें पाहिजे.

(३) ज्या कर्जाच्या संबंधानें येणें असलेल्या रकमेचा असा भाग पोटकलम (२) अन्वयें सोडून देण्यांत आला असेल तो कर्जाचा भाग रद्द झाला असें समजलें पाहिजे.

## विषयवारी


१ प्राथमिक मुद्दे.
२ सावकारांस कर्जतोड नको असल्यास.
३ पंधरा हजाराहून जास्त कर्ज असणाऱ्या कर्जदारास कर्जतोड केव्हां मिळेल.
४ अपील व त्याची कोर्ट फी.


### १ प्राथमिक मुद्दे.

सिव्हिल प्रोसिजर कोडमध्यें कोणताहि दावा चालवितांना त्यासंबंधी मुद्दे ठरविण्यांत यावेत व त्या मुद्द्यांनुसार पुरावा घेण्यांत यावा असें ऑर्डर १४ मध्यें म्हटलेलें आहे. सदर ऑर्डरमधील रूल नं. २ मध्यें असें म्हटलें आहे कीं, कोणत्याहि दाव्याचा निर्णय जर केवळ कायद्याच्या मुद्द्याचा विचार करून लावतां येण्याजोगा असेल तर ते मुद्दे प्रथम हातांत घेऊन त्यावरील निर्णयानुसार पुढील व्यवस्था कोर्टानें करावी. अशा प्रकारें जे मुद्दे प्रथम ऐकण्यांत येतात त्यांस प्राथमिक मुद्दे असें म्हणण्याची चाल पडली आहे. अशा मुद्द्यांचा विचार केला असतां पुष्कळदा लांबलचक साक्षीपुरावे घेण्याची जरुरी पडत नाहीं व कामाचा उरक लवकर होतो. तीच पद्धत या कायद्यानें अमलांत आणलेली आहे. व त्यामुळें अर्जदार हा कर्जदार आहे कां नाहीं व त्याचें कर्ज पंधरा हजाराहून कमी आहे कीं काय या गोष्टींवर आरंभीच नकारात्मक निर्णय मिळाल्यास अर्ज निकालीं निघेल व कोर्टाचें तडजोडीचें पुढील काम आपोआप वांचेल.

### २. सावकारास कर्जतोड नको असल्यास.

ऋणको-अर्जदार हा या कायद्याप्रमाणें कर्जदार नाहीं म्हणजे कलम २ मधील पोटकलम (५) मध्यें दिलेल्या व्याख्येंत तो बसत नाहीं

असें सावकारास अर्जाच्या चौकशीचे दिवशीं दाखवितां आल्यास सावकाराची या कायद्याच्या कचाट्यांतून सुटका होणार आहे. म्हणून त्यानें नोटीस लागल्याबरोबर कर्जाचा तपशील देतानां 'शेरा' या सदराखालीं अर्जदार हा या कायद्याप्रमाणे कर्जदार असल्याचे कबूल नसल्याबद्दल लिहून ठेवावें व कर्जाची संपूर्ण माहिती मात्र एक महिन्याचे आंत द्यावी. आणि अर्जदार हा 'कर्जदार' नसल्याबद्दलचा पुरावा खातेउतारे, हुकूमनामे वगैरे काढून तयार ठेवावा. म्हणजे तेवढ्याच मुद्द्यावर त्यास अर्जाचा निकाल लावतां येईल. तसेंच अर्जदाराचे कर्ज पंधराहजाराहून जास्त आहे असें दाखविणारा पुरावा म्हणजे कर्जदारावर झालेलें निरनिराळे हुकूमनामे, गहाणखतें वगैरेच्या नकला व माहिती जमा करावी.

### ३. पंधराहजाराहून ज्यास्त कर्ज असणाऱ्या कर्जदारांस कर्ज-तोड केव्हां मिळेल.

कलम ११ प्रमाणें पंधरा हजाराहून ज्या कर्जदारांचे कर्ज ज्यास्त आहे त्यांचा अर्ज विचारांत घेऊ नये असें म्हटलें आहे. परंतु असें कर्ज पंधरा हजाराहून ज्यास्त असलें तरी कर्जदारास आपला अर्ज विचारांत कसा घ्यावयास लावतां येईल याची योजना या कलमांतील अपवादांत सांगितली आहे. त्याप्रमाणें एक किंवा अनेक सावकारांस गळ घालून कर्जदारांस आपले कर्ज रुपये पंधरा हजाराखालीं आणतां येईल व अशी कर्जाची सूट मिळाल्यास कोर्टास तो अर्ज विचारांत घ्यावा लागेल.

### ४. अपील व त्याची कोर्टफी.

या कायद्यांतील कोणकोणत्या हुकुमांवर अपील होईल याची माहिती कलम ४३ मध्यें दिलेली आहे. त्यामध्यें कलम १७ मधील प्रत्येक हुकुमाविरुद्ध अपील करतां येईल असें म्हटलें आहे. व अशा अपीलावर कलम ४४ मध्यें सांगितल्याप्रमाणें दोन रुपयांचा कोर्टफी स्टँप द्यावा लागेल.

## सावकारास कोर्टफी परत देणेंबाबत

**१८.** कलम ४ अन्वयें सावकारानें केलेला अर्ज, अर्जाच्या तारखेस कर्जदाराकडून येणें म्हणून सांगण्यांत आलेल्या कर्जाची एकूण रक्कम रुपये पंधरा हजारापेक्षां ज्यास्त आहे या कारणावरून कलम १७ अन्वयें काढून टाकण्यांत आला असेल तर अर्ज करणाऱ्या सावकारानें दिलेल्या कोर्टाच्या फीची रक्कम सावकारांस परत देण्यांत यावी असें कोर्टानें फर्माविलें पाहिजे.

### विषयवारी

१. कोर्टानें फर्माविलेंतरी.

कलम ४ प्रमाणें या कायद्यांतील कर्जदारांविरुद्ध आपलें कर्ज मागण्यांकरतां अर्ज करण्याचा अधिकार सावकारांस आहे. त्या अधिकारानुसार एखाद्या सावकारानें अर्ज केला व प्राथमिक चौकशीत कर्जदाराचे कर्ज पंधरा हजाराहून जास्त आहे असें आढळून आलें तर सावकारांनीं केलेले त्या कर्जदाराविरुद्धचे सर्व अर्ज निकालांत निघणार आहेत. असे अर्ज निकालांत काढताना कोर्टानें अर्जास लाविलेला एक रुपयाचा कोर्टफी स्टँम्प परत करावा असा हुकूम केला पाहिजे. असा हुकूम कोर्टानें केल्यावर सावकारांस एक रुपया प्रत्येकीं परत मिळेल असें जरी असलें तरी तो मिळविण्याकरितां त्यांस सरकारी तिजोरींत जावें लागेल व तेथें रिफंड व्हौचर दाखवून मगच रुपया परत मिळेल. मात्र कर्जदारानें केलेला अर्ज वरील कारणाकरितां रद्द झाल्यास कर्जदारांस कोर्टफी परत मिळणार नाहीं व सदर अर्जातील सावकारांस कोर्टाचे मर्जीप्रमाणें खर्च मिळेल असें वाटतें.

## चालूं असलेले दावे, अपीलें, अर्ज आणि प्रकरणें कोर्टाकडे वर्ग करणें

**१९.** (१) कोणत्याहि कर्जाबाबत कोणत्याहि दिवाणी किंवा मुलकी कोर्टांत चालूं असलेले सर्व दावे, अपीलें, दरखास्ती आणि तपासणीअर्जाखेरीजची प्रकरणें हीं त्यांत ज्याच्याकडून असें कर्ज येणें आहे असा इसम या कायद्याप्रमाणें कर्जदार आहे किंवा कसें व सदरहू अर्जाच्या तारखेस त्याजपासून येणें असलेल्या कर्जाची एकूण रक्कम रुपये पंधरा हज आधिक आहे किंवा कसें याविषयींचे प्रश्न त्यांत असतील, तर कोर्टाकडे वर्ग केले पाहिजेत.

(२) कलम ४ अन्वयें कोर्टाकडे केलेल्या कर्जाच्या तडजोडी-बाबतच्या अर्जांत किंवा कलम १४ अन्वयें कोर्टाकडे सादर केलेल्या पत्रकांत ज्याच्या संबंधांत दावा, अपील, दरखास्त किंवा तपासणीअर्जाखेरीजचें प्रकरण एखाद्या दिवाणी अथवा मुलकी कोर्टापुढें चालूं असेल तेव्हां कोर्टानें त्याबाबत दुसऱ्या कोर्टास नोटीस दिली पाहिजे. अशी नोटीस मिळाल्यावर त्या दुसऱ्या कोर्टानें आपल्यापुढील दावा, अपील, अर्ज, किंवा प्रकरण जें असेल तें कोर्टाकडे पाठविलें पाहिजे.

(३) जेव्हां पोटकलम (१) अगर पोटकलम (२) अन्वयें कोण-ताहि दावा, अर्ज अगर चालूं असलेलें काम कोर्टाकडे वर्ग कर-ण्यांत येईल तेव्हां कोर्टानें जणूं कलम ४ अन्वयें त्याजकडे अर्ज केला आहे असें समजून कामास सुरवात केली पाहिजे.

(४) ज्या कोर्टाकडे कोणताहि दावा, अर्ज किंवा चालूं अस-

लेलें काम पोटकलम (१) अन्वयें किंवा पोटकलम (२) अन्वयें वर्ग करण्यांत आले असेल तें कोर्ट कलम १७ चे पोटकलम (१) भाग (अ) मध्यें सांगितलेल्या प्राथमिक मुद्दयाच्या बाबतींत नकारार्थी निकाल देईल आणि सदरहू पोटकलम (१) भाग (ब) मध्यें उल्लेख केलेल्या मुद्दयाच्या बाबतींत होकारार्थी निकाल देईल तर ज्या कोर्टाकडून स्वतःकडे सदरहू दावा, अर्ज किंवा चालूं असलेलें काम वर्ग करण्यांत आलें त्या कोर्टाकडे, निकाल दिल्यानंतर व जेव्हां अपील केलें असेल तेव्हां अपीलाच्या निर्णयाप्रमाणें, आणि जेव्हां कोणतेहि अपील करण्यांत आलेलें नसेल तेव्हां अपीलासाठीं ठरविलेली मुदत संपल्यानंतर पुनः वर्ग केलें पाहिजे.

(५) पोटकलम (४) अन्वयें जेव्हां कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा चालूं असलेलें काम सदरहू कोर्टाकडे जेव्हां वर्ग करण्यांत येईल तेव्हां सदरहू कोर्ट सदर कामास सुरवात करतील.

## विषयवारी

| | |
|---|---|
| कायद्यांतील फेरफार | ५ १ ऑगस्ट १९४७ चें महत्त्व |
| २ गहाण स्वरुपीं खरेदीखताचे दावे वर्ग केले जातील काय. | ६ अनेक प्रतिवादींपैकीं एक या प्रमाणें कर्जदार असल्यास |
| ३ अर्जाचे तारखेचे दिवशीं पंधरा हजाराचें आंत कर्ज | ७ कर्जाची रक्कम अनिर्णित असल्यास |
| ४ या कायद्यानंतरचीं कामें वर्ग होतील काय | ८ अपील व रिव्हिजन |

१. कायद्यांतील फेरफार.

१९३९ च्या कायद्यांत या आशयाचें कलम क्रमांक ३७ चें होतें; व त्यांत दिवाणी कोर्टांनीं दाव्यांतील पक्षकार या कायद्याखालीं कर्जदार आहे

की नाहीं व त्याचें कर्ज पंधरा हजार रुपयांहून कमी आहे की नाहीं हें ठरवावयाचें होतें व त्याबाबतींत त्यांचेकडून जो निर्णय होईल तो अखेरचा समजला जात असे व त्यावर डिस्ट्रीक्ट कोर्टांत अपील न होता हायकोर्टाकडे रिव्हिजन केव्हां होतें यावाबत विचार ४६ बॉम्बेलॉरिपोर्टर पान ७११ या ठिकाणी केला होता. परंतु त्यानंतर १९४५ मध्यें ८ च्या कायद्यानें सर्व कलमच्याकलम दुरुस्त करण्यांत आलें व दिवाणी कोर्टाचा हा अधिकार तडजोड-मंडळाकडे देण्यांत आला. या १९४५ मधील कलमाचा फायदा फक्त जर क़र्जदारांविरुद्ध कांहीं काम चाललें असेल तरच कर्जदारास घेतां येत होता परंतु गहाणस्वरूपी खरेदीखताचे दाव्या-मध्यें कर्जदार वादी असलेमुळें त्यास तो फायदा मिळूं शकत नसे [ पहा ४८ बॉम्बे लॉ. रि. ६१५]त्यानंतर आतां हें कलम पुन्हां आजिबात बदलण्यांत आलें असून आतां कोणत्याहि कर्जाबाबत प्रश्न निघाल्यास व तें कर्ज पंधरा हजारांपेक्षां कमी आहे व पक्षकार या कायद्याखालील कर्जदार आहे अशा गोष्टी कोर्टास दिसून आल्यास कोर्टानें असें काम तडजोड कोर्टाकडे वर्ग केलेंच पाहिजे या दोन गोष्टीं खरोखर आहेत कां नाहींत यासंबंधीं सकृत् दर्शनी समाधान करून घेण्याचा अधिकार वर्ग करणाऱ्या कोर्टास आहे कीं नाहीं हा वादाचा प्रश्न आहे.

## २. गहाण स्वरुपी खरेदीखताचे दावे वर्ग केले जातील काय.

शेतकरी कायद्याप्रमाणें शेतकऱ्याबरोबर जे व्यवहार झाले त्याबाबत खुलासा करणारा तोंडी पुरावा देण्याची सवलत शेतकऱ्यांना त्या काय-द्यांतील कलम १० अ प्रमाणें देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष दस्तऐवज जरी खरेदीचा असला तरी तो गहाणस्वरूपाचा आहे असा तोंडी पुरावा करण्यास शेतकऱ्यास सवलत देण्यात आलेली होती, इतर बिगरशेतकरी पक्षकारांना पुराव्याच्या कायद्याच्या कलम ९२ अन्वयें असा लेखी दस्तऐवजाच्या विरुद्ध अगर त्यास विसंगत असा पुरावा करता येत नाहीं. शेतकऱ्यांचे बाबतीत ही जी सवलत देण्यात आली त्यामुळें त्यांनी करून दिलेली खरेदीखते ही गहाणस्वरूपी आहेत, अशा प्रकारचे दावे नेहमी लागू लागेल. अशा या दाव्यांत शेतकरी हा वादी असतो

व तो झालेलें खरेदीखत हें परतबोलीचें, व गहाणस्वरुपी आहे असें म्हणून गहाणाचे व्यवहाराचा हिशोब मागतो, व हे दावे शेतकरी कायद्यांतील कलम १५ ड प्रमाणें लावले जातात. या १५ (ड) कलमांत असें म्हटलें आहे कीं, " ज्या कोणा शेतकऱ्याची स्थावर मिळकत गहाण असेल त्यानें आपली देणें रक्कम समजून घेण्यासाठीं हिशोबाचा दावा लावावा व देणें रक्कम ठरवून घ्यावी, व अशी रक्कम ठरल्यावर त्या रकमेवर स्टॅंप भरून गहाण फेडीचा हुकूमनामा मिळवावा. तसेंच सावकारास अशी रक्कम वसूल करण्यांकरता विक्रीचा अगर देणें रकमेंत मिळकत मालक म्हणून ठेवण्याबद्दल अर्ज देता येईल. " .

असे जे हिशोबाचे दावे गहाणस्वरूपी खरेदीखतावरून शेतकऱ्यांनीं लावलेले असतील ते दावे कर्जनिवारण कोर्टाकडे वर्ग होतील कीं काय असा प्रश्न मुंबई हायकोर्टांत दोनदां निर्णयाकरितां आला. एकदां १९३९ च्या कायद्यांतील ३७ कलमाखालीं व दुसऱ्यांदा सदर कलम १९४५ च्या कायद्यानें दुरुस्त झाल्यावर. पाहिला निर्णय ४५ मुंबई लॉ रिपोर्टर ४४९=ऑ. इं. रिपोर्टर १९४३ मुंबई २५० या ठिकाणीं आलेला आहे. तो निर्णय डिव्हिजन बेंचचा असून त्यावेळचे सरन्यायाधीश श्री. बोमंट यांनीं दिलेला आहे. यांत ते म्हणतात. " ज्यावेळीं शेतकरी कायद्यांतील कलम १५ ड खालीं हिशेबाचा दावा केलेला असेल व त्या कर्जासंबंधीं रकमेव्यतिरिक्त वादी-प्रतिवादींत दुसरा तंटा नसेल तर असे दावे तडजोड कोर्टाकडे वर्ग केलेच पाहिजेत. परंतु जर एका पक्षाचे म्हणण्याप्रमाणें दाव्यांतील व्यवहार हा पूर्ण खुष खरेदीचा आहे व दुसऱ्याच्या म्हणण्याप्रमाणें तो व्यवहार गहाणाचा आहे असें असेल, तर या प्रश्नाचा निकाल दिवाणी कोर्टांतच लागला पाहिजे व त्यांत सदर व्यवहार गहाणाचा ठरल्यास तो वर्ग होईल. "

या निर्णयानंतर दुसरा यासंबंधीचा निर्णय जो ऑ. इं. रि. १९४७ मुंबई ३२० या ठिकाणीं प्रसिद्ध झाला आहे, त्यांत १९४५ च्या कायद्यान्वयें आलेल्या कलम ३७ प्रमाणें या प्रश्नाचा विचार डिव्हिजन बेंचने केला, त्यांतील

मुख्य निकालपत्र न्यायमूर्ती श्री. गजेंद्रगडकर यांनीं लिहिले असून त्यांत असें म्हटलें आहे कीं, "गहाणस्वरूपी खरेदीखताचे दाव्यांत कोर्टानें दाव्यांतील व्यवहार गहाण स्वरूपी आहे असा निर्णय दिल्याखेरीज तो दावा तडजोड मंडळीकडे वर्ग होता कामा नये" सदरहू निर्णय देतांना १९४५ च्या दुरुस्त कायद्यानें कलम ३७ मध्यें 'कर्ज वसुली' असे जे शब्द वापरण्यांत आले होते त्याचा बराच उहापोह न्यायमूर्तींनी केलेला आहे. परंतु आतां नवीन कायद्यांत 'कर्ज-वसुली' हे शब्द गाळण्यांत आलेले असून 'कोणत्याही कर्जाबाबत' असे शब्द वापरण्यांत आलेलें आहेत. त्यामुळें दाव्यांतील व्यवहार हा गहाणस्वरूपी आहे असे ठरल्याबरोबर तो दावा तडजोडकोर्टाकडे वर्ग करावा लागेल. यावरून एक गोष्ट उघड होतें कीं शेतकऱ्यानें गहाण-स्वरूपी खरेदीखत आहे असें म्हटल्याबरोबर दावा हल्लींचे कायद्याप्रमाणेंही वर्ग होणार नाहीं; परंतु असा आपला दावा दिवाणी कोर्टांत न चालतां तो तडजोडकोर्टापुढें यावा असें जर एकाद्यास वाटत असेल तर त्यानें जर १ ऑगस्ट १९४७ चे आंत याबाबत तडजोडकोर्टाकडे अर्ज केला असेल तर त्यानें तडजोडकोर्टाकडे जाऊन असा दिवाणी कोर्टांतील दावा आपलेकडे वर्ग करून घ्यावा अशी मागणी करावी व त्या कोर्टाकडून दिवाणी कोर्टाकडे यादी पाठविण्याची व्यवस्था या कलमांतील पोट कलम २ प्रमाणें करावी. (पहा. ४८ मुं. लॉ. रि. ६१५)

### ३. अर्जाचे तारखेदिवशीं पंधरा हजाराचे आंत कर्ज.

दिवाणी कोर्टांतून तडजोडकोर्टाकडे कोणताही दावा, दरखास्त किंवा प्रकरण वर्ग करावयाचा किंवा नाहीं हे ठरवितांना दिवाणी कोर्टाकडे केलेल्या अर्जाचे तारखेस त्यास रुपये पंधरा हजाराहून जास्त कर्ज नाहीं असा प्रश्न त्यात गुंतला आहे किंवा नाहीं हें पाहावयाचे आहे. कलमांतील या शब्द-योजनेवरून एकाद्यानें जर तडजोड कोर्टाकडे अर्जच केलेला नसेल तर पंधरा हजाराचे अर्जाचे मर्यादेचा प्रश्न दिवाणी कोर्टाला विचारातच घेता येणार नाहीं असें वाटते. या संबंधात न्यायमूर्ती लोकूर यांनी १९३९ या कायद्यांतील या आशयाचे कलमाचा म्हणजे कलम ३७ चा विचार

करताना १५००० हें कर्ज १ जानेवारी १९३९ रोजी असलें पाहिजे असें म्हटलें आहे. व ही तारीख ठरवितांना त्यांनीं त्यावेळच्या कायद्यातील कलम २६ चा म्हणजे या कायद्यांतील कलम ११ चा आधार घेतला आहे. त्यांचे युक्तिवादाचा अनुवाद करून या कलमांतील पोटकलम १ मधील " अर्जाची तारीख " ही कर्ज निवारण कोर्टाकडील अर्जाचीच तारीख होय असें म्हणणे भाग आहे; व त्यावरून जर दावा वगैरे वर्ग करावा असें ज्याचें म्हणणे असेल त्यानें जर अगर त्याचे विरुद्ध जर तडजोड कोर्टाकडे अर्ज केलेला अगर झालेला नसेल तर पंधरा हजाराचे कर्जाचा विचार करण्यास साधनच राहणार नसलेमुळें व तो विचार केल्याशिवाय वर्ग करावा किंवा नाहीं हे ठरविता येणार नसल्यामुळें असा दावा वगैरे वर्ग केला जाणार नाहीं. नवीन कायद्यांत ' अर्जाची तारीख ' हे शब्द वापरल्यामुळें वरील अर्थ लावावा लागत आहे. पण याच कलमांतील पोटकलम २ मध्यें कर्जनिवारण कोर्टाकडे अर्ज स्वतंत्र झाला असल्यास त्या कोर्टास प्रकरण अगर दावा दरखास्त त्या कोर्टाकडे मागवून घेण्याचा हक्क असल्यामुळें हे शब्द द्विरुक्तीचे वाटतात. पूर्वीच्या कायद्यांत ते नव्हते व व ते नसणेंच जास्त युक्त दिसतें.

## ४. या कायद्यानंतरचीं कामें वर्ग होतील काय.

या कलमांत "कोर्टापुढील चालू कामें" असा जो शब्दप्रयोग करण्यांत आला आहे, तो कायदा अंमलांत आला त्यावेळीं चालू असलेली कामें यांना अनुलक्षून करण्यांत आलेला आहे कीं, कायद्यानंतरही जी कामें कोर्टांत चालू असतील त्यांना अनुलक्षून आहे असा एक मतभेदाचा प्रश्न उपस्थित होण्याजोगा आहे. आपण तिसऱ्या टिपेंत असें पाहिलें आहे कीं, तडजोड कोर्टापुढें अर्ज केलेला असल्याशिवाय दिवाणी कोर्टापुढील चालू कामें वर्ग होणार नाहीत. त्यामुळें कायदा चालू झाल्यानंतर जी कामें दिवाणी कोर्टांत नवीन चालू होतील तीं कामें तडजोड कोर्टाकडे वर्ग करावयाची कीं, नाहीं हें ठरवितांना तडजोड कोर्टाकडे अर्ज झालेला आहे कीं, नाहीं हे प्रथम पहावे लागेल, व अर्ज झालेला असल्यास

प्रकरणें वर्ग होतील व अर्ज झालेला नसल्यास वर्ग होणार नाहीत. जीं प्रकरणें दिवाणी कोर्टापुढें वर्ग न होतां चालतील त्यामध्यें इतर मुद्यांत प्रतिवादी हा या कायद्याप्रमाणें कर्जदार आहे कीं काय व त्याचें कर्ज कलम १९ ( १ ) प्रमाणें बुडलें की काय, हे मुद्दे निघतील व त्यांचा निर्णय या कायद्यांतील योजनेनुसार होईल.

## ५. १ ऑगस्ट १९४७ चें महत्त्व.

कलम ४ प्रमाणें कर्जदारांनीं जे अर्ज करावयाचें आहेत ते १ ऑगस्ट १९४७ पूर्वी करावयाचे आहेत. आतां १ ऑगस्ट १९४७ नंतर दिवाणी कोर्टांत अशा कर्जदाराविरुद्ध जे दावे अगर दरम्यानच्या उत्पन्नासारखीं इतर प्रकरणें दाखल झालीं तर ती वर्ग होतील कीं काय, असा प्रश्न येतो. अर्थात् जर त्या कर्जाबाबत पूर्वी अर्ज दाखल झाले असतील तर ती वर्ग होऊं शकतील पण जर असे अर्ज झालेले नसतील तर असली कामें वर्ग होतील कीं काय हा मतभेदाचा प्रश्न आहे. त्यांचे बाबतींत वर टीप नं. ४ मध्यें सांगितल्याप्रमाणें दिवाणी कोर्टांत इतर मुद्द्यांबरोबर याही मुद्यांचा उहापोह होईल.

## ६. प्रतिवादी पैकीं एक या कायद्याप्रमाणें कर्जदार असल्यास.

कोणत्याही दाव्यांत अनेक प्रतिवादी पैकीं कोणाही एका प्रतिवादीनें आपण या कायद्याखालीं कर्जदार आहोत व आपले कर्ज १५००० हून जास्त नाहीं असें जर कोर्टास कळविण्यांत आले तर तो दावा अगर दरखास्त अगर प्रकरण तावडतोब तडजोड कोर्टाकडे पाठविलेच पाहिजेत. त्यामुळें प्रथम दावा तिकडे जाईल व त्यांतील निर्णयानुसार तो पुनः इतर प्रतिवादींच्या विरुद्ध चालण्याकरितां दिवाणी कोर्टांत परत येईल (पहा ४८ मुं. लॉ. रि. ६१३. )

## ७. कर्जाची रक्कम अनिर्णीत असल्यास.

एकाद्या शेतकरी कर्जदाराविरुद्ध कोणी नुकसानीचा दावा लावला किंवा त्याचे विरुद्ध दरम्यानचे उत्पन्नाबाबत प्रकरण चालू असलें तर अशा नुक-

सानीची किंवा उपन्नाची रक्कम कोर्टानें ठरविल्याखेरीज तें प्रकरण चालूं असलें तर अशा नुकसानीची किंवा उत्पन्नाची रक्कम कोर्टानें ठरावील्याखेरीज तें प्रकरण तडजोड-कोर्टाकडे वर्ग होणार नाहीं असें वाटतें. मात्र असा आंकडा निश्चित झाल्यावर व तडजोड कोर्टाकडे अशा शेतकऱ्याने ता. १ ऑगस्ट १९४७ चे आंत अर्ज केलेला असला तर असें प्रकरण वर्ग होईल.

८. अपील व रिव्हिजन.

एखादें प्रकरण दिवाणी कोर्टांत चालूं असलें व त्या कामीं दिवाणी कोर्टानें सदर प्रकरणांतील पक्षकाराच्या म्हणण्याप्रमाणें काम जर वर्ग केलें नाहीं तर अशा हुकुमावर अपील चालूं शकणार नाहीं. कारण सिव्हिल प्रोसीजर कोडमधील ऑर्डर ४३ मध्यें ज्या हुकुमांवर अपील होतें असें म्हटलेलें आहे त्या हुकुमांत वर्ग करण्याचा हुकुम आढळत नाहीं. त्यांत फक्त योग्य कोर्टाकडे फिर्याद दाखल करण्याबाबतच्या हुकुमांवर अपील सांगितलेले आहे. सबब दिवाणी कोर्टाच्या अशा हुकुमांवर वरिष्ठ कोर्टाकडे दाद मागावयाची असल्यास ती सिव्हिल प्रोसिजर कोडच्या कलम ११५ मध्यें सांगितल्याप्रमाणें मुंबई हायकोर्टात रिव्हीजनचा अर्ज करून मागतां येईल. १९३९ च्या कायद्यांतलि या आशयाचें कलम ३७ यामधील हुकुमांविरुद्ध अशी दाद हायकोर्टाकडे रिव्हीजन अर्ज करून मिळवितां येतें असा निर्णय ४६ मुंबई लॉ रिपोर्टर ७११ = ऑ. इं. रिपोर्टर १९४५ मुंबई ६० या ठिकाणीं छापला आहे.

## हिशोब घेणें.

२०. कलम ४ अन्वयें अर्ज करणारा इसम किंवा सदर कलम ४ अन्वयें ज्याचे विरुद्ध अर्ज करण्यांत आला असा इसम—

(अ) कर्जदार असल्याचें, आणि

(ब) अर्जाच्या तारखेस त्याच्याकडून येणें असलेल्या कर्जाची एकूण रक्कम रुपये पंधरा हजारपेक्षां अधिक नसल्याचें कोर्टास आढळून येईल तर यापुढें सांगितलेल्या पद्धतीनें हिशोब घेण्याच्या कामास कोर्टानें लागले पाहिजे.

## विषयवारी

**१. कोणत्या परिस्थितींत हिशोब घेतले जातील.**

कलम १७ प्रमाणें अर्जाच्या सुनावणीच्या वेळीं तडजोड कोर्टानें दोन प्राथमिक मुद्दे काढून अर्जदार हा या कायद्याप्रमाणें कर्जदार आहे कां नाहीं व अर्जाचे तारखेस त्याचें कर्ज पंधरा हजाराहून जास्त आहे किंवा काय यासंबंधीं निर्णय द्यावयाचा आहे. तसा तो निर्णय अर्जदारास प्रतिकूल लागल्यास अर्ज रद्द होईल असें त्या ठिकाणीं म्हटलें आहे व अर्जदारास अनुकूल लागल्यास कोर्टानें अर्जातील कर्जांचा हिशेब घेण्यास सुरवात केली पाहिजे, असें या कलमांत म्हटलें आहे. हिशोब घेण्याची पद्धत कलम २२ मध्यें सांगितलेली आहे.

## सावकार व कर्जदार यांची तपासणी.

**२१.** कर्जाची तडजोड करण्याबाबतच्या अर्जांत सावकाराचें देणें किती आहे याबद्दल वाद असल्यास कोर्टानें हिशोब घेतेवेळीं सावकार व कर्जदार या दोघांची साक्षीदार म्हणून तपासणी केली पाहिजे. तसें करणें जरूर नाहीं असे कोर्टास वाटेल तर गोष्ट निराळी.

## विषयवारी

**१. अर्जाचे चौकशीचे कामीं पुराव्याची पद्धत.**

सावकार व कर्जदार यांचे दरम्यान देणें रकमेविषयीं वाद पडल्यास व

त्याकामीं तोंडी पुरावा घ्यावा असें कोर्टास वाटल्यास कोर्टानें सावकार व कर्जदार या उभयतांची जबानी घेतली पाहिजे. आतां सदर चौकशीचें कामीं इतर साक्षीदारांच्या साक्षी घेतां येतील कीं काय यासंबंधीं कायद्यांत खुलासा दिसत नाहीं. परंतु पुढील कलमांत एकंदर हिशेब घेण्यासंबंधीं जे नियम दिले आहेत त्यांत व्यवहाराची प्रथमपासून चौकशी करावी असें म्हटलें आहे. त्यामुळें असा साक्षीपुरावा कोर्टास घेतां येईल.

## हिशोब घेण्याची पद्धत

२२. पक्षकारांचे दरम्यान अगर ज्या कोणा इसमाकडून पक्षकारांना हक्कसंबंध प्राप्त झाले असतील त्यांचे दरम्यान कोणतेही करार चक्रवाढ व्याजानें हिशोब करण्यासंबंधीं किंवा गहाण मिळकतीचें उत्पन्न व्याजाऐवजी व्याजाचा हिशोब न करतां घेण्यासंबंधीं किंवा हिशोब घेण्याची पद्धती अन्यतऱ्हेने ठरविली असेल तरी, आणि एखाद्या यादीनें किंवा तडजोडीने मागील हिशोब एकाद्या करारानें बंद करण्याचे ठरविण्यांत आल्याने जर मागील व्यवहाराचे हिशोब बंद करण्यांत आले असतील व नवीन जबाबदारी (कर्जाची) निर्माण केली असेल तरी कोर्ट त्या कर्जाचा मागील इतिहास व गुणदोष यांची चौकशी करील व पक्षकार किंवा ज्यापासून ते आपले हितसंबंध धारण करतात त्यापासून पक्षकारांचे दरम्यान मुळारंभापासूनचे व्यवहाराचा हिशोब होईल व अर्जाचे वेळीं प्रत्येक कर्जदाराचा अर्ज कलम ४ प्रमाणें करते समयी किती बाकी आहे याचा निवाडा खालील नियमानुसार करील.:—

(१) (अ) मुद्दलाचा व व्याजाचा हिशोब निरनिराळा घेतला जाईल.

( ब ) मुद्दलाचे हिशोबांत ज्या रकमा मिळाल्या असतील त्या रकमा किंवा सावकाराकडून त्याचे खात्यावर नेल्या असतील त्या रकमा आणि माल सावकारानें कर्जदाराला विकला असेल त्या मालाची किंमत फक्त कर्जदाराचे नांवे मांडण्यांत येईल.

( क ) मुदलाच्या आणि व्याजाच्या हिशोबांत कोणत्याही कर्जाबाबत हुकुमान्वयें अगर योग्य अधिकार असलेल्या कोर्टानें— हुकूमनाम्यान्वयें देणें असलेल्या मुद्दलांची रक्कम (खर्चासहित) व्याज अनुक्रमें कर्जदाराच्या नांवे मांडण्यात येतील; मात्र, सदरचा हुकूमनामा अगर हुकूम यामध्यें मुद्दलाचे व व्याजाचे रकमेचा खुलासा केला नसेल तर सदरचे हुकूमनाम्याचे अगर हुकमाचे रकमेपैकीं या कलमान्वये दोन तृतीयांश व एक तृतियांश अशी विभागणी अनुक्रमें मुद्दलाचे रकमेची कोर्टाचे खर्चासहित आणि व्याजाचे रकमेची विभागणी केली जाईल.

(२) जे व्यवहार सन १९३१ चे जानेवारी महिन्याचे १ तारखेपूर्वीचे असतील त्या व्यवहाराबाबत अर्ज दाखल झाले तारखेपर्यंतचा हिशोब कोर्ट घेईल, आणि व्याजाचे हिशोबांत कर्ज़दाराचे खात्यावर जी मुद्दल रक्कम असेल त्या रकमेवर पक्षकारांचे दरम्यान ठरलेल्या व्याजाचे दरानें सरळव्याजानें निघेल तें व्याज अगर पक्षकारांचे दरम्यान कोर्टाचा हुकनामा झाला असेल त्या हुकूमनाम्यांत दिलेल्या व्याजाचे दरानें निघालेलें व्याज अगर दरसाल दर शेंकडा बारा टक्के प्रमाणें हिशोबानें होणारें व्याज यापैकीं जी रक्कम कमी असेल ती रक्कम कर्जदाराचें नांवें मांडावी. या रकमेबाबत अगर तिचे भागाबाबत कोर्टाचा हुकूमनामा अगर हुकूम पूर्वीच झाला असला तरी मुद्दल व व्याज यांची हिशोबानें जी रक्कम निघेल त्यांत प्रत्येकीं

निरनिराळी चाळीस टक्के कपात करावी. अशा रीतीनें जी रक्कम कमी केली असेल ती रक्कम अर्ज दाखल करण्याचे तारखेस मुद्दल व व्याज म्हणून धरली जाईल.

(३) जे व्यवहार ता. १ जानेवारी १९३१ रोजीं अगर त्यानंतर परंतु ता. १ जानेवारी १९४० पूर्वी झाले असतील अशा व्यवहाराबाबत व्याजाचा हिशोब करतांना कर्जदाराचे खात्यावर जी मुद्दल रक्कम असेल त्या रकमेवर सरळ रीतीनें पक्षकारांचे दरम्यान ठरले असेल त्या व्याजाचे दरानें निघेल तें व्याज अगर पक्षकारांचे कोर्टाचा हुकूमनामा झाला असेल त्या हुकूमनाम्यांत दिलेल्या व्याजाच्या दरानें निघालेलें व्याज अगर दरसाल दर शेंकडा ९ टक्के प्रमाणें होणारें व्याज या रकमेपैकीं जी व्याजाची कमी असेल ती रक्कम कर्जदाराचे नांवे मांडावी. अर्ज दाखल झाला त्या तारखेस जी रक्कम मुद्दल व व्याज म्हणून निघेल त्या रकमेंत प्रत्येकीं निरनिराळी ३० टक्के कपात करावी. या रकमेबाबत अगर तिचे कांहीं भागाबाबत कोर्टाचा हुकूमनामा अगर हुकूम पूर्वी झाला असला तरीहि कपात व्हावयाची आहे. अशा रीतीनें जी रक्कम कमी झाली असेल ती रक्कम अर्ज दाखल करण्याचे तारखेस मुद्दल व व्याज म्हणून धरली जाईल.

(४)जे व्यवहार ता. १ जानेवारी १९४० रोजीं अगर त्यानंतर झाले असतील त्या व्यवहारांचे व्याजाचा हिशेब करतांना कर्जदाराचे खात्यावर जी मुद्दल रक्कम असेल त्या रकमेवर सरळ रीतीनें पक्षकारांचे दरम्यान ठरले त्या व्याजाचे दरानें निघेल तें व्याज अगर पक्षकारांचे दरम्यान हुकूमनामा झाला असेल त्या हुकूमनाम्यांत दिलेला व्याजाच्या दरानें निघालेले व्याज अगर दरसाल दरशेंकडा ६ टक्केप्रमाणें

होणारें व्याज या रकमेपैकीं जी व्याजाची रक्कम कमी असेल ती रक्कम कर्जदाराचे नांवें मांडावी.

(५) कर्जदारानें अगर कर्जदाराचे खात्यावर जे पैसे सावकाराला दिले असतील अगर त्याचें खात्यावर आले असतलि तें आणि व्यवहार चालू असतांना सावकारास कर्जदाराकडून झालेला नफा, कर्जदारानें केलेली नोकरी, किंवा सावकारास मिळालेले सर्व स्वरूपाचे फायदे (ज्याची किंमत कोर्ट जरूर वाटल्यास स्वतःच्या न्यायबुद्धी-प्रमाणें पैश्याचें रूपान्तर करील) ते सर्व प्रथमतः व्याजांत जमा धरावें व पोटकलम २, ३ व ४ यांत सांगितलेल्या दराप्रमाणें द्यावयाचे व्याज भागवून जे पैसे शिल्लक राहतील ते कर्जदाराच्या खात्यांत मुद्दलांत जमा धरावेत.

(६) अर्ज दाखल झाल्याचे तारखेपावेतों व्याजाचा व मुद्दलाचा हिशोब करण्यांत येईल. आणि व्याज मुद्दलाची एकंदर रक्कम त्या तारखेस कर्जदाराकडे येणें आहे असे ठरेल. मात्र ज्यावेळीं व्याजाची बाकी मुद्दलाचें बाकीपेक्षां जास्त असेल त्यावेळीं मुद्दलाच्या बाकीच्या दुपटी इतकी रक्कम कर्जदाराकडून येणें आहे असें समजण्यांत येईल.

मात्र पक्षकारांमधील व्यवहार ता. ३० जानेवारी १९४० पूर्वीच्या तीस वर्षांपेक्षां जास्त आधीं सुरू झाले असतील तर सदरहू तीस वर्षांचें आधीं पक्षकारांचे दरम्यान शेवटी घडून आलेली हिशोबा-संबंधीची कर्जदाराच्या अगर ज्याच्या मार्फत कर्जाची जबाबदारी आली असेल अशा इसमाच्या सहीची लेखी तडजोड ही पक्षकारावर बंधनकारक आहे असें मानलें जाईल, आणि अशा तडजोडीच्या तारखेपूर्वीचा दाव्याचा इतिहास व गणदोष यांची चौकशी केली जाणार नाहीं.

## विषयवारी


१ कायद्यांतील फेरफार.
२ गहाण मिळकतीचें उत्पन्न व्याजांत खातां येईल काय.
३ पूर्वींचा व्यवहार मिटवून नवीन दस्तैवज झाल्यास.
४ हिशोबाची रुजुरुजवात केव्हां बंधनकारक होईल.
५ हिशोब घेण्याची पध्दति.
६ उक्त्या रकमेचा हुकूमनामा झाल्यास.
७ दामदुप्पट.


### १. कायद्यांतील फेरफार.

या कलमांतील नियम (१) (क) पर्यंतचा मजकुर पूर्वींतल्या कलमांतीलच आहे. त्यानंतर पूर्वीं विभाग (ड)असा एक विभाग होता. व त्यांत जें वाढत गेलेले व्याज मुद्दलादाखल गणले गेलें असेल तें व्याज कर्जदाराच्या नांवें खर्चे लिहूं नये असें म्हटलेलें होते. परंतु आता त्याऐवजी पोटविभाग (क) ला एक अपवाद जोडलेला आहे व त्यामुळें ज्यावेळीं हुकूमनाम्यांत उक्ती रकम दिली असल्यास तिच्यातील मुद्दल व व्याजाची विभागणी कशी करावी यासंबंधीं रीत सांगितली आहे. हल्लीच्या कायद्यांतील नियम ( ३ ) मध्यें १९३१ नंतरच्या परंतु १९४० पूर्वींच्या व्यवहारासंबंधीं विचार केलेला आहे पूर्वींच्या नियम (२) मध्ये १९४० पर्यंतची मर्यादा घातलेली नव्हती. नियम (४) मध्यें १९४० नंतरच्या व्यवहारांच्या हिशोबाची रीत दिलेली आहे. पूर्वींचा कायदा हा १९३९ चा असल्यामुळें त्यांत हा नियम मुळींच नव्हता. पूर्वीं नियम (४) हा सगळे हिशोब सरळव्याजानें करण्याकरीतां होता. आतां असा स्वतंत्र नियम न घालतां ठिकठिकाणीं सरळव्याजानें आकारणी करण्याबद्दल लिहिलेलें आहे. हल्लीच्या कायद्यांत सर्व नियमांच्या शेवटी जो अपवाद दिलेला आहे तो पूर्वींच्या नियमांत नव्हता.

### २. गहाण मिळकतीचें उत्पन्न व्याजांत खातां येईल काय.

एखादी मिळकत ताबेगहाण टाकली म्हणजे पुष्कळदां व्याजासंबंधीचा

करार करतांना असे ठरविण्यांत येते कीं, रकमेस व्याज नाहीं व जमिनीस उत्पन्न नाहीं. गहाणाची रक्कम नेऊन दिली कीं, जमीन परत मिळावयाची परंतु आतां या कलमांत सांगितलेल्या नियमाप्रमाणें जरी असा करार झाला असला तरी जमीनीस उपन्न नाहीं असे होणार नाहीं; तर जें कांहीं उत्पन्न होत असेल त्याचा हिशोब सावकारास द्यावा लागणार आहे व या कायद्यांत सांगितलेल्या दराप्रमाणें व्याजाची आकारणी करून जर उत्पन्नाची रक्कम जास्त आली तर ती मुद्दलांत फेड करून घ्यावयाची आहे.

## ३. पूर्वीचा व्यवहार मिटवून नवीन दस्त ऐवज झाल्यास.

पुष्कळवेळां सावकार व कर्जदार यांचें दरम्यान पूर्वीच्या हिशोबांची रुजुरुजवांत होऊन कर्जदारास जर त्या रुजवातीप्रमाणें पैसे रोख देतां येत नसतील तर त्याबद्दल प्रॉमीसरी नोट अगर दुसरा एखादा दस्तऐवज करून घेण्याची पद्धत आहे. अशी रुजवात होऊन प्रामीसरी झाल्यास तिचे मागें जाऊन सर्वसाधारण कायद्याप्रमाणें मागील हिशोब घेतां येत नाहींत. ही कायद्याची अडचण दूर करण्याकरितां विशेषतः या योजनेची या कायद्यांत तरतूद केलेली आहे. त्यामुळें रुजुरुजुवांत झालेली असली तरी पूर्वीपासूनचे सर्व हिशोब घ्यावे लागणार आहेत.

याबाबत नियम (६) मधील अपवाद ध्यानांत घेण्यासारखा आहे. तो म्हणजे अशी रुजवांत जर १९४० च्या पूर्वी ३० वर्षे झाली असेल तर त्या रुजवातीच्या मागें जाऊन अगदीं आरंभींपासूनचा हिशोब घेण्याची जरूर राहाणार नाहीं.

## ४. हिशोबाची रुजुरुजवात केव्हां बंधनकारक होईल.

नियम ६ मधील अपवादांत म्हटल्याप्रमाणें ३० जानेवारी १९४० च्या पूर्वी ३० वर्षांपासून जे व्यवहार सुरू झाले असतील त्या व्यवहारांच्या बाबत जी कोणती अखेरची रुजवांत ३० वर्षांपूर्वी झाली असेल व जी लेखी असेल व ज्यावर प्रत्यक्ष कर्जदाराची अगर त्याचे पूर्वहक्कदाराची सही असेल तर अशी तडजोड अगर रुजवात ही दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक मानली जातील.

## ५. हिशेब घेण्याची पध्दती.

हिशेब घेण्याच्या पद्धतीकरीतां या कायद्यांत एकंदर कर्जाचे तीन भाग पाडण्यांत आलेले आहेत. पहिल्या भागांत १९३१ साला पूर्वीचे व्यवहार येतात. व त्यांत शेकडा ४० टक्के रक्कम कमी होणार असून, व्याजाचा दर जास्तीत जास्त १२ टक्के असावयाचा आहे. परंतु कबूल केलेला दर त्याहून कमी असल्यास त्या दरानें हिशेब होणेचा आहे.

जे व्यवहार १ जाने. १९३१ नंतर परंतु १ जाने. १९४० चे अलीकडे झालेले असतील त्यांचे बाबत २० टक्के कपात व्हावयाची आहे व जास्तीत जास्त व्याज ९ टक्के आकारावयाचें आहे.

तिसऱ्या विभागांत १ जाने. १९४० नंतरचे व्यवहार आलेले असून त्याबाबत व्याजाचा हिशेब सरळव्याजानें जास्तीत जास्त शे. ६ टक्के व्हावयाचा आहे पण या सर्व व्यवहारांत कपात व्हावयाची नाही.

या सर्व व्यवहारांत व्याजाची आकारणी सरळव्याजाने व्हावयाची असून व्याजाचा दर जास्तीत जास्त १२, ९ अगर ६ असा राहणार आहे. परंतु जर ठरलेला दर या दराहून कमी असेल तर व्याजाची आकारणी ठरलेल्या दरानेच व्हावयाची आहे.

## ६. उक्त्या रकमेचा हुकूमनामा.

या कायद्याप्रमाणें हिशेब घेतांना तो व्याजाचा व मुद्दलाचा हिशेब निरनिराळा घ्यावा असें सांगण्यांत आलेलें आहे. परंतु पुष्कळ वेळां हुकुमनामे होताना ते असे व्याज मुद्दलाची फोड करून होत नाहींत तर एकदम उक्त्या रकमेचे होतात. अशा वेळीं सदर उक्त्या रकमेचा २/३ भाग मुद्दल म्हणून समजावा व उरलेला १।३ व्याज म्हणून समजावा.

## ७. दामदुप्पट

हिंदु कायद्याप्रामाणें मुद्दलाच्या रकमेच्या इतकीच रक्कम जास्तीत जास्त व्याज म्हणून घ्यावी असे म्हटलेलें आहे व त्यास दामदुप्पट असें

म्हणण्याचा प्रघात आहे. जेव्हां कोणा एखाद्यास कर्जाची मागणी सव्याज करावयाची असेल तेव्हां त्याला ती त्यावेळीं असलेल्या मुदलाच्या दुपटीहून जास्त रकमेची मागणी करतां येत नाहीं. जरी व्याज जास्त झाले असले तरी त्या व्याजाच्या रकमेतील मुदलाच्या रकमेहून जास्त असणारी रक्कम सूट घालावी लागते. तेच दामदुपटीचें तत्व या कायद्यांतही स्वीकारलेलें आहे. पूर्वी दामदुपटीच्या तत्वाचा फायदा फक्त हिंदूनाच मिळत होता तो आतां सर्व जमातींतल्या लोकांना मिळणार आहे.

## विवक्षित प्रसंगीं फायद्याच्या बदला खंड आकारण्याचा अखत्यार

**२३.** गहाण दिलेली मिळकत गहाण घेणाराच्या कबजांत किंवा गहाण देणारा व्यतिरिक्त गहाण घेणाराच्या इतर कुळांच्या कबजांत असेल आणि फायदा खरोखर किती मिळाला तो काढण्यास कोर्ट असमर्थ असेल तर कोर्टाला त्या मिळकतीबद्दल वाजवी खंड, कलम २२ च्या कारणासाठीं फायदा म्हणून गहाण घेणाराच्या खातीं जमा धरण्याचा अखत्यार आहे. मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसूलाचा कायदा याच्या ८४ ( अ ) कलमान्वयें अशा जमीनीचा खंड किंवा जमीन महसूल याची कोणतीहि तहकूबी किंवा माफी कोणत्याही वर्षी देण्यांत आली होती असे शाबीत करण्यांत आलें तर त्या वर्षाबद्दलची सदरहू रक्कम मुळीच जमा न धरण्याचा किंवा अंशतः जमा धरण्याचा अखत्यार आहे.

### विषयवारी

| | |
|---|---|
| १ तावेगहाणाच्या मिळकतींचें उत्पन्न | २ फायदा कसा आकारावा |

**१. ताबेगहाणाच्या मिळकतीचें उत्पन्न-**

सावकाराकडे एखादी मिळकत ताबेगहाण असली तरी पुष्कळदां ती मिळकत गहाणदाराकडेच भाडेचिठ्ठी घेऊन गहाण घेणारा ठेवतो. पण कांहींवेळा असा ताबेगहाणदार ती मिळकत स्वतःच ताब्यांत घेतो किंवा आपल्यातर्फे खंडकरी ठेवतो. जेव्हां असा प्रत्यक्ष ताबा सावकाराकडे गेलेला असतो त्यावेळीं मिळकतीचें प्रत्यक्ष उत्पन्न किती आलें हें ठरविणे कठिण जाते. अशा वेळीं वाजवी खंड ठरविण्याचा अधिकार या कलमान्वयें देण्यांत आला आहे. अर्थात् असा खंड ठरवितांना जर एखाद्या वर्षी खंडांत सूट किंवा तहकूबी देण्यांत आली असली तर त्याचा विचार करुन त्या सालचा वाजवी खंड सोडून द्यावा लागेल.

**२. फायदा कसा आकारावा.**

फायदा कसा आकारावा या संबंधी या कायद्यांत कोठेही खुलासा दिसत नाही. तथापि मुंबई कूळ कायद्याच्या दुसऱ्या कलमांत शेतकीचा नफा या शब्दप्रयोगाची व्याख्या करण्यांत आलेली आहे. तेथें असें म्हटलें आहे कीं शेतकीचा नफा ठरवितांना मालाची बाजारी किंमत, लागवडीस लागलेला खर्च, शेतकऱ्याची प्रत्यक्ष किती माणसे खपली व त्याबद्दल त्यांस मजुरी द्यावी लागली असती आणि मोलानें मजूर लावले असल्यास त्यांची प्रत्यक्ष मजुरी या बाबीसंबंधी विचार करावा लागेल. याही कायद्यामध्यें याच तत्वांचा अवलंब करून जमीनीचा वाजवी नफा कोर्टास ठरवितां येईल. हा कायदा विशेषतः शेतकऱ्यांच्या जमीनी सावकारांकडे न जाता शेतकऱ्यांना त्या कसावयास मिळाव्या या उद्देशानें केलेला असल्यामुळे जमीनींच्या उत्पन्नाबद्दलचा विचार करणें युक्त आहे.

## खरेदीचे व्यवहार हे गहाणस्वरुपी ठरविण्याचा कोर्टाचा अधिकार

२४ (१)कोणत्याही कायद्यांत, रूढींत किंवा करारांत कोणताही विरुद्ध मजकूर असला तरी कलम ४ अन्वयें केलेल्या कोणत्याही

अर्जाच्या सुनावणीच्या वेळीं, या कायद्यान्वयें ज्या इसमाच्या कर्जाची तडजोड चालूं असेल त्या इसमानें किंवा ज्याच्या मार्फत त्या इसमाला जमीनीचा वारसा मिळाला त्या इसमानें केलेला जमीनीच्या विक्रीच्या अर्थाचा दिसत असणारा कोणताही व्यवहार गहाणाच्या स्वरूपाचा आहे असें सांगण्यांत येईल व जर त्या व्यवहाराच्या संबंधांतील परिस्थितीवरून तो गहाणाच्या स्वरूपांत असल्याचे दिसून आल्याबद्दल कोर्टाची खात्री होईल तर तो तसा असल्याचे कोर्टानें जाहीर केलें पाहिजे.

(२) कोणाही शेत मजूरास १ ऑगस्ट १९४७ पूर्वी कोर्टाकडे जमीनींच्या विक्रीचा व्यवहार स्वतः केलेला किंवा ज्याच्या मार्फत त्या इसमाला जमीनीच्या विक्रीचा व्यवहार हा गहाण स्वरुपी आहे म्हणून अर्ज करण्याचा अधिकार आहे. सदर अर्जाची चौकशी करून कोणत्याही कायद्यांत, रूढींत. किंवा करारांत कोणताही मजकूर असला तरी त्या व्यवहाराच्या संबंधांतील परिस्थितीवरून तो गहाण स्वरूपाचा आहे अशी कोर्टाची खात्री होईल तर तो तसा असल्याबद्दल कोर्टानें जाहीर केले पाहिजे. जेव्हां कोर्ट असें जाहीर करील तेव्हां अर्जदार हा या कायद्याच्या कलम दोन मधील पोटकलम (५) मधील व्याख्येमध्यें "कर्जदार" शब्दाच्या व्याख्येंत कांहींही सांगितलें असले तरी या कायद्याच्या कारणाकरिता तो कर्जदार समजला जाईल; आणि कलम (४) प्रमाणें कोर्टाकडे अर्ज केला आहे असें समजून कोर्ट काम पुढें चालवील.

## विषयवारी


| | |
|---|---|
| १ कायद्यांतील फेरफार. | ५ वकीलांची मदत. |
| २ गहाण केव्हां ठरेल. | ६ शेतमजूर. |
| ३ अर्ज मुदतीत झाले नसल्यास. | ७ पूर्वीचे निर्णय झाले असल्यास |
| ४ कोर्टाचे व्यापक अधिकार. | ८ अपील व त्याचा स्टँप. |


### १. कायद्यांतील फेरफार.

सन १९३९ च्या कायद्यांत या स्वरुपाच्या कलमाचा क्रमांक ४५ हा होता; परंतु त्यांत १९२७ च्या जानेवारीच्या १ ले तारखेपूर्वी केलेल्या कोणत्याही व्यवहारास गहाणस्वरुपी म्हणणे मान्य केलेले नव्हते. तो भाग हल्लीच्या कलमांतील पोटकलम १ मधून काढून टाकण्यात आला आहे. त्यामुळे खरेदीखताचे कोणतेही व्यवहार गहाणस्वरुपी ठरविण्यास प्रत्यवाय राहिला नाही. तसेच पोटकलम २ हे सर्वच्यासर्व सिलेक्ट कमेटीच्या सूचनेनुसार दाखल केलेले आहे. त्यामुळे या कायद्यांतील कर्जदार या व्याख्येत जरी अर्जदार बसत नसला तरी तो शेतमजूर असल्यास त्यास खरेदीचे व्यवहार गहाणस्वरुपी असल्याचे ठरवून मागता येईल.

### २. गहाण केव्हां ठरेल.

शेतकरी कायद्यानुसार खरेदीखते गहाणस्वरुपी ठरविण्याचा उपक्रम प्रथम सुरु झाला; व त्यावेळीं निरनिराळ्या दाव्यांतून उत्पन्न झालेल्या परिस्थितींतून कोणत्या परिस्थतींत खरेदीचा व्यवहार गहाण ठरविला जावा यासंबंधी कांही गमके आपोआप ठरलीं गेलीं, परंतु या कायद्यांत त्या गमकांपैकीं प्रत्यक्ष अशी कांहीं गमके स्पष्ट केलेली नाहींत. मोघमरीत्या नुसतीच 'परिस्थती तशी असल्यास गहाण ठरवावे' असें म्हटलेले आहे; त्यामुळें कोर्टास या बाबत अनिर्बंध असा फार मोठा वाव देण्यात आला आहे. तथापी शेतकरी कायद्यांतील द्राव्यांमधील हायकोर्टातील निकालानुसार जीं गमकें ठरलीं गेलीं आहेत तीं गमकें साधारणतः मार्गदर्शक अशी धरावी लागतील. अशीं गमकें खालील प्रमाणें सर्वसाधा-

रणपणें मान्य झालेलीं आहेत.:—

(१) ताबा कर्जदाराचा आहे काय ?

(२) जमीनीची खरेदीखतांत लिहिलेली किंमत वास्तविक किंमतीपेक्षां फार कमी आहे काय ?

(३) अर्जदार व खरेदीदार यांचे दरम्यान सावकारी आहे काय ?

(४) अर्जदार व खरेदीदार यांचे दरम्यान नात्याचा संबंध आहे काय ?

(५) खाते बदलले गेले काय ?

(६) सारा कोण भरतो ?

(७) खरेदीचा व्यवहार झालेवर जमीन अर्जदाराचे ताब्यात कूळ म्हणून राहिली काय ?

(८) अशा खंडचिठ्ठींतील खंडाची रक्कम व्याजाचे रकमेशी जुळते काय ?

(९) अर्जदारास तेवढीच जमीन होती काय ?

(१०) तोंडी करार परत बोलीचा झाला काय ?

## ३. अर्ज मुदतींत झाले नसल्यास.

कलम ४ प्रमाणें कर्जदारानें अगर शेत-मजुरानें कायद्यांखालीं अर्ज करून खरेदीचा व्यवहार गहाणस्वरुपी असल्याची तक्रार १ ऑगस्ट १९४७ पूर्वी केलेली नसेल तर त्याला अशी तक्रार या कायद्याप्रमाणें पुढें करता येईल किंवा नाहीं अशी शंका येणें सहाजीक आहे, परंतु या कायद्यांतील कलम ५६ पोटकलम १ मधील पहिल्या परिच्छेदाप्रमाणें शेतकरी कायदा २६ मे १९५० पर्यंत अंमलांत असलेमुळें त्या कायद्याप्रमाणें दिवाणी कोर्टात दावे लावून ठरवून घेता येईल. त्यानंतर मात्र खरेदीखतें हीं खरेदीखतेंच राहतील.

## ४. कोर्टाचे व्यापक अधिकार.

या कायद्यांत कोणत्या परिस्थितींत खरेदीखतांचे व्यवहार गहाण ठरवावयाचे

हें स्पष्ट केलें नसल्यामुळें कोर्टास त्याबावत फार मोठा अधिकार दिलेला आहे; त्यामुळें त्या विरुद्ध अपीलांत फारसा वाव राहिलेला नाहीं.

५. वकीलांची मदत.

बाम्बे प्लीडर्स ॲक्ट १९२० मधील कलम ८ प्रमाणें कोणत्याही कायद्यांत लिहिलें असेल तें खेरीज करून कोणत्याही दिवाणी अगर फौजदारी कोर्टांत हक्कानें वकील म्हणून पक्षकारांतर्फे काम करतां येते. वास्तवीक या कायद्यानें सर्व कामें दिवाणी कोर्टांत चालणार असल्यामुळें वकीलांना या कायद्यांखालील सर्व कामांत हजर राहण्यास अडचण पडण्यास नको होती. परंतु या कायद्यांतील कलम ४२ मध्यें या विषया विषयी विचार केलेला असल्यामुळें त्यानुसार तेवढ्याच बाबतींत वकीलांना हक्कानें वकीलपत्र दाखल करतां येईल. अशीं वकीलपत्रें या कायद्याच्या कलम २४ व २८ खालील प्रकरणांत हक्कानें दाखल करतां येतील; मात्र त्यासंबंधीचा खर्च विरुद्ध बाजूकडून वसूल करतां येणार नाही.

६. शेतमजूर.

"शेतमजूर" या शब्दाची व्याख्या या कायद्यांत कोठेही केलेली नाहीं. शेतकरी या शब्दाची या कायद्यास लागूं होणारी व्याख्या स्वतंत्र रितीनें केलेली नाहीं. शेतीमध्यें कोणकोणत्या गोष्टी येतात त्यासंबंधीचा खुलासा कलम २ पोटकलम ५ मध्यें शेवटी करण्यांत आलेला आहे. तो सुद्धां "कर्जदार" या शब्दाच्या व्याख्येपुरताच आहे. अशा परिस्थितींत शेतमजूर या शब्दाचा सामान्य अर्थ घ्यावा लागेल. जो कोणी शेतकी विषयक कामांत मजूरी करून आपला चरितार्थ चालवेल तो शेतमजूर म्हणून धरला जाईल.

७. पूर्वीचे निर्णय झाले असल्यास.

या कलमाप्रमाणें कर्जदारास कोणतेंही खरेदीखत गहाणखत म्हणण्याचा अधिकार असला तरी जर त्याबावत पूर्वी दिवाणी कोर्टाचा किंवा

तडजोड लवादाचा निर्णय झालेला असल्यास त्या बाबत पुनः कर्जदारास तक्रार करता येणार नाहीं. म्हणजे सावकारानें असा निकाल पूर्वी झाल्याची सही शिक्क्यानिशी नक्कल हजर केल्यास त्याच्या खरेदीखताची चौकशी कोर्टास करतां येणार नाही. तसेंच सावकारानें जर असें दाखवून दिलें कीं त्याचें खरेदीखत १५ फेब्रुवारी १९३९ चे पूर्वीचें असून त्यांस गहाणाच्या व्यवहाराची कांही माहिती नाहीं तर त्याचे खरेदीखत कायम होऊं शकेल. याचा सविस्तर विचार कलम २५ मध्यें केलेला आहे.

**८. अपील व त्याचा स्टँप.**

या कलमान्वयें जे निकाल दिले जातील त्यांच्यावर कलम ४३ प्रमाणें अपील करण्याची सोय आहे. सदर अपिलाला कोर्टफी किती लागेल या संबंधीचा खुलासा कलम ४४ पोटकलम १ (४) यांत केलेला आहे. पण तो खुलासा जर कोर्टानें खरेदीखताचा व्यवहार गहाण ठरवून रक्कम ठरविली तरच लागूं होणार आहे. पण अशी जर रक्कम न ठरवितां नुसताच अर्ज रद्द केला व खरेदीखताचा व्यवहार खुषखरेदीचा ठरविला तर त्यावर अपील सांगितलेले आहे परंतु त्यावर त्याबाबतचा कोर्टफी स्टँप मात्र सांगितलेला नाहीं. त्यामुळें अपील मेमोस कोर्टफी ॲक्टमधील शेडयूल २ ( ११ ) प्रमाणें १० आण्याचा कोर्टफी स्टँप लावावा लागेल असें वाटतें. किती मुदतींत असें करावें याचा खुलासा या कायद्यांत कोठेंहि आढळून येत नाहीं. नेहमींच्या रिवाजाप्रमाणें तीस दिवसांचे आंत अपील दाखल केलें पाहिजे कारण या कायद्याखालील सर्व कामास सि. प्रो. कोड लागावयाचें आहे. सविस्तर चर्चा कलम ४३ वरील टीपांमध्यें पाहा.

## कलम २४ मधील ठराव कांहीं व्यवहारास व व्यवहार करणारास लागूं नसणे.

**२५.** २४ व्या कलमांतील कोणताही मजकूर— (१) योग्य हुकमतीच्या कोर्टाच्या हुकूमनाम्यावरून किंवा रद्दकेलेल्या कायद्याच्या चवथ्या कलमान्वयें स्थापन करण्यात आलेल्या बोर्डाकडून जो

व्यवहार गहाण स्वरुपाचा न ठरविता इतर स्वरूपाचा आहे असें ठरविले असेल, तर, अशा कोणत्याही व्यवहारास, आणि ( २ ) ता. १५ फेब्रुवारी १९३९ रोजीं अगर त्या पूर्वी केलेल्या रजिस्टर्ड दस्तऐवजाने जर एकाद्यानें पैसे देऊन व खऱ्या व्यवहाराची माहिती नसल्यामुळें व्यवहार केला तर त्यास लागूं होणार नाहीं. मूळ व्यवहार करणाऱ्याच्या वारसासही सदर परिस्थितींत तो व्यवहार लागूं होणार नाहीं.

## विषयवारी

1. कायद्यांतील फेरफार.
2. गहाण ठरूनही कोणत्या व्यवहारास बाध येणार नाहीं.
3. पूर्वीचा खरेदीखत असलेचा हुकूमनामा झाला असल्यास.
4. रद्द कायद्याखालील बोर्डांचा निकाल.
5. गहाण ठरविणेबद्दलचे अर्जांत खरेदीदारास अगर त्याचे वारसास कोणत्या तक्रारी घेता येतील.

### १. कायद्यांतील फेरफार.

सदरहू कलम हें या कायद्यांत नव्यानेंच घालण्यांत आलेलें आहे. त्यामुळें पूर्व निर्णयाचे (Res–Judicata ) तत्त्व मान्य करण्यात आलें असून माहिती नसता किंमत देऊन प्रामाणिकपणें खरेदी घेणारास संरक्षण देण्यांत आलेलें आहे. अशाच आशयाचें पण कलम शेतकरी कायद्यांत १० अ मध्यें आहे; व ट्रॅन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टचे कलम ४१ हे त्याच स्वरुपाचें थोड्याशा फरकाचे आहे.

### २. गहाण ठरूनही कोणत्या व्यवहारास बाध येणार नाहीं.

कलम २४ प्रमाणें एकाद्या अर्जाचे कामीं कोर्टानें दाव्यांतील व्यवहार हा गहाणस्वरुपी खरेदीखताचा आहे असें ठरविले तरी या कलमांतील पोटकलम २ चा आधार घेउन खरेदीदारास अगर त्याचे वारसास

गहाणाची रक्कम कोर्टानें ठरवू नये असें म्हणता येईल व तो व्यवहार शेवटीं, खरेदीखतच ठरू शकेल व गहाणखतासंबंधीचा निर्णय त्यास बाधणार नाहीं; पण त्यासाठीं त्याला चार गोष्टी शाबीत कराव्या लागतील त्या म्हणजे— (अ) त्याचे खरेदीखत रजिस्टर्ड झालेले असून ते १५ फेब्रुवारी १९३९ चे पूर्वीचे आहे;

(ब) त्याला मूळ व्यवहाराची कांहीही माहिती नव्हती;

(क) त्यानें भरपूर किंमत दिलेली आहे.

(ड) त्याचा व्यवहार प्रामाणिकपणाचा आहे;

येणेप्रमाणे चार गोष्टी त्यानें शाबीत केल्यास व त्या हक्कानें तो जमीन धारण करीत असल्यास कर्जदार अर्जदार व त्याचा प्रथम सावकार यांच्यातील व्यवहार गहाणाचा ठरला तरी याचे ताब्यांतील मिळकत अबाधित राहील.

३. पूर्वीचा खरेदीखत असलेचा हुकूमनामा झाला असल्यास.

कलम २४ प्रमाणें कर्जदार अर्जदारास आपला सकृद्दर्शनी खरेदीखताचा असलेला व्यवहार गहाणाचा आहे असें केव्हांही म्हणण्याची मुभा दिली असली तरी तैर त्या व्यवहाराबाबत पूर्वीचा एकादा हुकूमनामा झालेला असेल किंवा कर्ज निवारण कायद्याखालील बोर्डाचा तसा निवाडा झाला असेल तर असा त्याचा अर्ज या कलमांतील पोटविभाग १ प्रमाणें चालूं शकणार नाही. या पोटकलमानें दिवाणी कायद्यांतील पूर्व निर्णयाचे तत्व मान्य केलेले आहे व एकाच प्रश्नाबाबत पुन्हा कोर्टनिर्णय होऊं नये याची खबरदारी घेण्यात आली आहे.

४. रद्द कायद्यांखालील बोर्डाचा निकाल.

या कायद्यांत कलम २४ मध्ये जे अधिकार या कायद्यांखालील कोर्टास गहाण ठरविणेबाबत दिलेले आहेत तेच अधिकार १९३९ च्या कायद्यानें त्या वेळेच्या बोर्डास दिलेले होते; व अशी बोर्डे १९४२ पासून निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं या प्रांतांत स्थापन झाली.

त्यांना मिळालेल्या अधिकारानुसार जर त्यांनी अशा दाव्यांतून खरेदीखत असलेबद्दलचा निकाल दिलेला असेल तर तोही पक्षकारावर बंधन कारक राहणार असून त्या निकालाबाबत पुन्हा अर्ज चालणार नाही.

**५. गहाण ठरविणेबद्दलचे अर्जांत, खरेदीदार अगर त्याचे वारसास कोणत्या तक्रारी घेता येतील.**

कलम २४ प्रमाणें अर्जदाराने गहाणाबाबत प्रश्न उपस्थित केल्यास खरेदीदारांस अगर त्याचे वारसास त्या बाबत पुढील तक्रारी मांडून खरेदीखत हे गहाणखत नाहीं असा निकाल कोर्टाकडून घेता येईल. त्या तक्रारी अशा--

(अ) याबाबत पूर्वी निर्णय झाला असून व्यवहार खरेदी असल्याचे ठरले आहे.

(ब) त्याचे खरेदीखत १५ फेब्रुवारी १९३९ चे आधीचे असून त्यांस त्याने योग्य किंमत दिली असून त्यास पूर्वीचे व्यवहाराची काही एक माहिती नव्हती व त्याचा व्यवहार प्रामाणिकपणाचा आहे.

## कलेक्टर, सहकारी मंडळ्या, रजिस्ट्रा व स्थानिक अधिकारी यांना व इतरांना नोटीस.

२६. (१) कर्जाची तडजोड करण्याबद्दलचा अर्ज आल्यावर कोर्टानें कलेक्टरांस नोटीस देऊन सरकारास कर्जदाराकडून येणें असलेली कर्जाची रक्कम कोर्टाकडून ठरविण्यांत येईल अशा मुदतींत कोर्टास कळविण्याबद्दल फर्मावलें पाहिजे.

(२) तसेंच कोर्टानें, कर्जदाराकडून ज्या कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्यास, सहकारी मंडळीस किंवा शेडयूल्ड बँकेस कोणतेंहि कर्ज येणें असेल अशा व तसेंच लायक कोर्टानें केलेल्या हुकुमनाम्याअन्वयें किंवा हुकुमान्वयें कर्जदारापासून पोटगी मिळण्यास

हक्कदार असलेल्या कोणत्याहि इसमास तशाच प्रकारची नोटीस दिली पाहिजे. जेव्हां सहकारी मंडळीस कोणतेंहि कर्ज येणें असेल तेव्हां कोर्टानें सहकारी मंडळ्यांच्या रजिस्ट्रारला किंवा रजिस्ट्रार या बाबतींत नेमील अशा अधिकाऱ्यांस सुद्धां नोटीस दिली पाहिजे.

(३) अशी नोटीस मिळाल्यावर कलेक्टरनें, स्थानिक अधिकाऱ्यानें, सहकारी मंडळीनें, किंवा शेडयूल्ड बँकेनें किंवा पोटगी मिळण्याचा हक्क असलेल्या इसमानें यापैकीं कोणीहि वेळोवेळीं कोर्टाकडून ठरविण्यांत येईल अशा मुदतीच्या आंत कर्जदारानें देणें असलेल्या अर्जाची एकूण रक्कम त्याचप्रमाणें हुकुमनामा अगर हुकूम यान्वयेंच्या पोटगीच्या जबाबदारीबाबतची अशा कर्जदारावरील कोणतीहि नित्याची जबाबदारी दाखविणारें पत्रक कोर्टास सादर केलें पाहिजे.

(४) कर्जाबाबत किती रकमेची सूट देतां येईल या संबंधीचें पत्रक प्रांतिक सरकारतर्फे कलेक्टरनें व सहकारी मंडळी आणि शेडयूल्ड बँक यानीं कोर्टास सादर केलें पाहिजे.

(५) पोटकलम (४) अन्वयें सूट देण्यांत आलेला कोणत्याहि कर्जाचा भाग, आणि ज्याच्या संबंधांत पोटकलम (३) अन्वयें कोणतेंहि पत्रक सादर केले नाहीं असें कर्ज जर कोर्टानें इतर हुकूम फर्माविला नाहीं तर, रद्द होईल.

## विषवारी

१ कायद्यांतील फेरफार.
२ अपवादात्मक कर्जाची विल्हेवाट.
३ कलम १४ शीं साम्य व फरक.
४ कलम ३ मध्यें सांगितलेली कर्जे केव्हां रद्द होतील.
५ कोर्टाचे अधिकार

### १. कायद्यांतील फेरफार.

हें कलम १९३९ च्या कायद्याच्या कलम ४७ शीं जुळणारें आहे. परंतु पूर्वीच्या कलमांतील पोटकलम (५) मध्यें एकदां दिलेली सूट सरकारला अगर सहकारी मंडळीला अगर कलम ३ मधील इतर घेणेकऱ्याना कमी करण्याचा अधिकार नव्हता. त्या कलमांतील तो भाग सर्व रद्द करून आतां त्याऐवजीं इतर सावकारांप्रमाणें कोर्टाच्या नोटीसीप्रमाणें पत्रक सादर केले नाहीं तर त्यांची कर्जें रद्द ठरण्याबाबत तरतूद केली आहे. परंतु कोर्टाला वाटल्यास अशीं कर्जें रद्द होणार नाहींत.

### २. अपवादात्मक कर्जांची विल्हेवाट.

या कायद्यांतील कलम ३ मध्यें हा कायदा कोणत्या कर्जांना लागणार नाहीं त्यांची यादी दिली आहे. त्या यादींतील कर्जास या कायद्यांत '. अन्य तऱ्हेनें स्पष्टपणें ठरविलें असेल तें खेरीज करून—' कांहींहि बाध यावयाचा नाहीं. या कलमांतलि पोटकलम (५) मध्यें असा बाध केव्हां येईल ते सांगण्यांत आले आहे. त्याप्रमाणें जर कोर्टानें कर्जासंबंधी माहिती हजर करण्यास सांगितलें असतां त्याप्रमाणें माहिती पुरविली गेली नाहीं तर अशीं कर्जेंहि रद्द होणार आहेत.

### ३. कलम १४ शीं साम्य व फरक.

या कलमाप्रमाणें कोर्टाकडून नोटीस जाऊन माहितीपत्रक भरून न दिल्यास सर्वसाधारण सावकारांप्रमाणें या विशिष्ट सावकारांची कर्जें रद्द होणार आहेत. सर्व साधारण सावकारांच्या कर्जासंबंधी विचार कलम १४ व १५ मध्यें केलेला आहे. त्यामध्यें एक महिन्याची मुदतही पत्रक भरून पाठविण्यासाठीं कायद्यांतच लिहिलेली आहे. तशी ती मुदत या कलमांत लिहिलेली नाही; ती कोर्ट ठरवील त्याप्रमाणें राहील. तसेंच सर्वसाधारण सावकारानें कर्जपत्रक मुदतींत भरून न दिल्यास त्याचे कर्ज आपोआपच रद्द होणार आहे; परंतु या कलमाप्रमाणें कोर्टास वाटल्यास या विशिष्ट सावकारांची कर्जें रद्द होणार नाहींत.

**४. कलम ३ मधील सांगितलेली कर्जें केव्हां रद्द होतील.**

या कलमांत वर्णन केलेली बहुतेक सर्व कर्जेंही कलम ३ मध्यें वर्णन केलेली अपवादात्मक कर्जें होत. व त्या कलमांत त्या कर्जासंबंधी विचार करताना असें म्हटलें आहे कीं त्या कर्जाच्या संबधांत या कायद्यांतील कर्ज तोडीची योजना लागू होणार नाहीं. या कलमाप्रमाणें ती सर्वस्वी रद्द होण्याची शक्यता कशी आहे हे दाखविण्यांत आले आहे.

**५. कोर्टाचे अधिकार.**

या कलमांत वर्णन केल्याप्रमाणें एकाद्या विशिष्ट सावकारानें मुदतींत माहितीपत्रक भरून पाठविलें नाहीं तर त्याचे कर्ज रद्द व्हावयाचे आहे. परंतु अशा विशिष्ट सावकारास त्यासंबंधांत अर्ज देऊन कोर्टाची समजूत काढता आली तर ते कर्ज रद्द झाले नाहीं असे ठरविण्याचा खास जादा अधिकार या कलमातील पोटकलम ५ प्रमाणें कोर्टास देण्यांत आला आहे. सर्वसाधारण सावकारांच्या बाबतींत मात्र असें अधिकार कोर्टास नाहींत.

## मिळकतीचा तपशील, किंमत वगैरे ठरविण्याबाबत कोर्टाचे कर्तव्य.

**२७.** कलम २२ अन्वयें हिशोब घेतल्यानंतर कोर्टानें यांत यापुढें दिलेल्या रीतीनें पुढील गोष्टी निश्चित केल्या पाहिजेत:—

(१) कर्जदाराच्या मालकीच्या मिळकतीचा तपशील,

(२) सदरहू मिळकतीची किंमत,

(३) सदरहू मिळकतविरील बोजांचा तपशील,

(४) कर्जदाराचे कर्जफेडीचें सामर्थ्य.

## विषयवारी

**१ उद्देश व व्याप्ती.**

या कायद्यांप्रमाणें कर्जदारांची सर्व कर्जें लक्षांत घेउन त्या कर्जांत

कलम २२ प्रमाणें किती व कशी सूट देता येईल याचा विचार करून ती कर्जदाराकडून कशी फेडली जातील याचाही विचार करावयाचा आहे. तशी ती फेडताना कोर्टाने कोणत्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत त्या गोष्टी या कलमांत सांगितल्या आहेत व त्यांचे तपशीलवार विवेचन कलम २९ व ३० यांत केलेले आहे.

## मिळकतीची लबाडीनें केलली तबदिली अगर बोजे रद्द असणें

२८ (१) जर कलम ४ प्रमाणें केलेल्या अर्जाचे सुनावणींत कोर्टास असें आढळून येईल कीं, कर्जदारानें, आपल्या सावकारा-पैकीं कोणत्याही सावकाराचा दावा निष्फळ करण्याचा किंवा त्याचे देणें देण्यास विलंब लागण्याच्या हेतूनें, मिळकत दुसऱ्याचे नांवें लिहून दिली आहे किंवा तिजवर कोणताही बोजा निर्माण केला आहे तर, कोर्टानें नोटीस बजावून सदरहू कर्जदारास व मिळकत ज्याच्या नांवें करण्यांत आली असेल किंवा ज्याचे वतीनें मिळकतीवर बोजा निर्माण करण्यांत आला असेल त्या इसमास नोटीसीत निर्दिष्ट केलेल्या तारखेस कोर्टापुढें हजर राहण्यासाठीं बोलाविले पाहिजे.

(२) नोटीसींत निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा ज्या तारखेपर्यंत सुनावणी पुढें ढकलण्यांत येईल त्या तारखेस कोर्ट पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेईल आणि सावकारांपैकीं कोणत्याही सावकाराचा दावा निष्फळ करण्याचा किंवा त्याची कर्जे फेडण्यास विलंब लावण्याच्या हेतूनें कर्जदाराने मिळकत दुसऱ्याचे नावानें लिहून दिली होती किंवा तिजवर बोजा निर्माण करण्यात आला होता अशी कोर्टाची खात्री झाल्यास, कोर्ट सदरहू व्यवहार अगर बोजा रद्द म्हणून जाहीर

करील.

(३) या कलमांतील कोणत्याही मजकुरावरुन ज्याच्या नांवें मिळकत शुद्धबुद्धीनें व मोबदला घेऊन लिहून देण्यांत आली असेल त्या इसमाच्या किंवा शुद्धी बुद्धीनें व मोबदला घेऊन बोजा धारण करणाऱ्या इसमाच्या हक्कास बाध येणार नाहीं.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ कायद्यांतील फेरफार. | ४ कोणते व्यवहार 'लबाडीचे ठरणार नाहींत. |
| २ अर्जाचे चौकशीचे वेळीं. | ५ वकीलास परवानगी. |
| ३ लबाडीचे व्यवहार. | ६ अपील स्टँप व मुदत. |

### १. कायद्यांतील फेरफार.

१९३९ च्या कायद्यांत या कलमांतील आशयाचे कलम ४९ क्रमांकाचे होतें. त्या कलमांत हल्लीचे कलमांतील चौकशीबाबतची पद्धत दिलेली असल्यामुळें खरेदीदारास किंवा गहाणदारांस कोर्टाकडून चौकशीकरितां हजर रहाण्यास भाग पडतां येईल.

### २ अर्जाचे चौकशीचे वेळीं.

एकाद्या सावकारानें कलम ४ प्रमाणें अर्ज देतांना किंवा कर्जाचा तक्ता भरून देतांना कर्जदाराच्या मिळकतीबाबात त्याला जरी पूर्ण माहिती देतां आली नाहीं व मध्यंतरी त्यास कर्जदारानें एकादी मिळकत लबाडीनें सावकाराना बुडविण्याकरितां दुसऱ्यांस दिल्याचे अगर मिळकतीवर बोजा केल्याचे आढळून आलें तर त्याला त्यासंबंधींची तक्रार कर्जाचे चौकशीचे वेळीं करतां येईल व त्याबाबतींत कोर्टाचा निर्णय लागून मग पुढें काम चालेल. अशी तक्रार सावकारानें अर्जाचे चौकशीचे वेळीं स्वतंत्र अर्ज देऊन व्यवस्थितपणें मांडावी व त्यांत कर्जदारानें उल्लेख केलेले कोणते गहाणाचे अगर बोजाचे व्यवहार पोकळ आहेत त्यांचाहि निर्देश करावा.

### ३. लबाडीचे व्यवहार

या कायद्याचा उद्देश कर्जदाराची कर्जफेड करण्याचा असला तरी त्याचे मिळकतीतूनच ती फेड व्हावयाची आहे. व त्याचा फायदा सर्व सावकारांना मिळावयाचा आहे. त्यामुळें एकाद्या कर्जदारानें जर आपली मिळकत दुसऱ्यास विकली अगर पोकळ बोजे निर्माण केलें तर त्या प्रमाणांत खऱ्या व प्रामाणिक सावकारांचा तोटा होणार आहे. तो तसा होऊं नये म्हणून हें कलम मुद्दाम घालण्यांत आलेलें आहे.

लबाडीचे व्यवहार हा शब्दप्रयोग या कलमाला दिलेल्या मथळ्यांत जरी दिलेला असला तरी प्रत्यक्ष कलमांत केलेला नाहीं. त्यामुळें, प्रत्यक्ष कलमाचा अर्थ लावताना ' लबाडी ' बाबत आपणांस विचार करता येणार नाहीं. तर प्रत्यक्ष कलमांत त्याअर्थी जे शब्द वापरण्यांत आले आहेत ते म्हणजे " कोणत्याहि सावकाराचा दावा निष्फळ करण्याच्या किंवा त्याचे कर्ज फेडण्यांस विलंब लावण्याच्या हेतूनें ", त्यांचाच विचार कोर्टास करावा लागेल. ' लबाडी ' या शब्दाचा अर्थ इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट कलम १७ मध्यें जो लावण्यांत आलेला आहे तोच या कलमाचे अर्थाचें वेळीं लावतां येणार नाहीं. या कलमाप्रमाणें लबाडीचे व्यवहारांचे विचार करताना कर्जदारानें असें व्यवहार करतान, कोणत्याहि सावकाराना बुडविण्याचे हेतूनें अगर त्याची रक्कम देण्यास विलंब लावावा या बुद्धीनें त्यानें तो व्यवहार केला आहे कीं काय एवढेंच पहावयाचें आहे. याहून जास्त अर्थ ' लबाडी ' या शब्दाचा या कलमापुरतां अभिप्रेत नाहीं.

### ४. कोणते व्यवहार लबाडीचे ठरणार नाहींत.

या कलमांतील पोटकलम (३) मध्यें कोणते व्यवहार लबाडीचे ठरणार नाहींत यासंबंधीची माहिती दिली आहे. कर्जदाराच्या खरेदीदारास अगर गहाणदारांस असें दाखवितां आले कीं त्यानें कर्जदाराशीं केलेला व्यवहार हा सरळ बुद्धीनें केलेला आहे व तो पैशाच्या भरण्याचा आहे तर त्याचे हक्कावर काहीं गदा येणार नाहीं. या कलमांत पैशाचा भरणा असा शब्द प्रयोग

केलेला असल्यामुळें दान किंवा बक्षिस अशा स्वरूपाचें व्यवहार झालेलें असतील तर ते लबाडीच्या व्यवहारांत येतील. लबाडीचे व्यवहाराविरुद्ध तक्रार करण्याऱ्या सावकारास जर असे दाखवितां आलें कीं, कर्जदारानें व खरेदीदारानें हे व्यवहार संगनमतानें सावकारास बुडविण्याचे हेतूनें केले तर व्यवहार लबाडीचे ठरून रद्द होतील. या कलमांतील आशयाची व्यवस्था ट्रॅन्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट कलम ५३ मध्यें केलेली आहे. पण त्यांत व या कलमांत फरक येवढाच आहे कीं, तेथील कलम ५३ मध्यें लबाडीचे व्यवहार सर्व सावकारांना बुडविण्याचे हेतूनें केले असें शाबीत करावें लागेल परंतु या कलमांत कोणाहि एका सावकाराचे कर्ज बुडविण्याकरितां व्यवहार झाला असें शाबीत झालें तरी भागणार आहे. या कलमांत वापरलेल्या ' सरळ बुद्धीने ' या शब्दाचा अर्थ बॉम्बे जनरल क्लाजेस ॲक्ट १९०४ कलम ३ पोटकलम (२०) यध्यें करण्यांत आला असून त्यांत असें म्हणण्यांत आलें आहे कीं, "जेव्हां कोणतेहि कृत्य प्रामाणिकपणे केलेलें असेल तर तें सरळ बुद्धीने केलें आहे असें समजावें मग, तें निष्काळजीपणें केलेले असो अगर नसो "

## ५. वकीलास परवानगी.

या कायद्याच्या कलम ४२ मध्यें ज्या कलमाखालील कामांत वकिलांना हक्कानें पक्षकारांचे वतीनें हजर रहातां येईल असें म्हटलेलें त्या कलमांपैकीं २८ हें कलम आहे. सबब या कलमाखालील कमांत वकीलांना हजर होऊन काम चालवितां येईल.

## ६. अपील, स्टॅम्प व मुदत

या कायद्यांतील कलम ४२ मध्यें ज्या हुकुमाविरुद्ध अपीलें चालतील असें म्हटलें आहे त्या हुकुमामध्यें कलम २८ खालील प्रत्येक हुकूम येतो. सबब अशा हुकुमाविरुद्ध दाद मागावयाची असल्यास डिस्ट्रिक्ट जज्ज यांचे कोर्टांत अपील करून मागतां येतील. अशा अपीलांस किती स्टॅम्प लागेल याचा खुलासा या कायद्यांच्या कलम ४४ मध्यें असावयास पाहिजे होता. परंतु तसा तो आढळून येत नाहीं. सबब कोर्टफी ॲक्टाच्या

शेडयुल २ (११) प्रमाणें दहा आण्याचा कोर्टफी स्टँप अपीलमेमोस लावावा लागेल असें वाटतें. तसेंच किती मुदतींत असें अपील दाखल करावें याचाहि खुलासा या कायद्यांत आढळत नाहीं. सबब रिवाजाप्रमाणें तीस दिवसांत अपील लावणें श्रेयस्कर होईल.

## कर्जदाराच्या मिळकतीची किंमत कोर्टानें ठराविक पद्धतीनें निश्चित करणें

**२९.** ( १ ) पोटकलम ( २ ), ( ३ ), व ( ४ ) यांचा विचार करून कोर्टानें कलम २७ अन्वयें कर्जदाराचे कर्ज देण्याचे सामर्थ्य ठरविण्याच्या कारणासाठीं कर्जदाराच्या मिळकतीची व इतर मालमत्तेची किंमत ठरविलेल्या रीतिनें ठरविली पाहिजे.

(२) सिव्हिल प्रोसिजर कोड १९०८ या कायद्याप्रमाणें दिवाणी कोर्टाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जी मिळकत अगर मालमत्ता जप्ती पासून माफ असेल ती हिशेबांत घेतां कामा नये.

[३] कलम ३ मध्यें निर्दिष्ट केलेल्या कर्जाच्या रकमा वजा कराव्या.

[४] कोणत्याहि विद्यमान कायद्यामुळें ज्या जमिनी कलेक्टरच्या किंवा प्रांतिकसरकारच्या आगाऊ मंजुरीवांचून तबदील किंवा दुसऱ्याचे नांवे लिहून देतां येत नाहींत त्या जमिनींची बाजार किंमत ठरविलेल्या पद्धतिनें करावी.

### विषयवारी

१ ठराविक पद्धतीनें मिळकतीची किंमत.
२ जप्तीस पात्र नसलेली मिळकत.
३ सरकारी परवानगीशिवाय तबदील न होणाऱ्या मिळकतीची किंमत.

१. ठराविक पद्धतीने मिळकतीची किंमत.

या कायद्याखालील केलेल्या कानूपैकी कानू नंबर ७ मध्यें कर्जदाराच्या मिळकतीची किंमत कशी निश्चित करावी यासंबंधीची माहिती दिलेली आहे. ती माहिती देताना मिळकतीचे स्थावर व जंगम असे दोन विभाग करण्यात आलेले असून त्यांची निरनिराळी माहिती दिलेली आहे. स्थावर मिळकतीबाबत पुढील नियम करण्यात आले आहेतः—

(अ) अर्जापूर्वी बारा वर्षांचे मुदतीत झालेले प्रामाणिक खरेदीचे व खंडाचें व्यवहार.

(ब) त्याप्रमाणे जवळच्या त्याच प्रकारच्या जमिनींचे खरेदीचे व खंडाचें व्यवहार.

(क) सरकाराने नेमलेल्या जमिनींची किंमत ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांनी केलेली किंमत. येणे प्रमाणे गोष्टी ध्यानात घेऊन कर्जदाराच्या स्थावर मिळकतीची किंमत कोर्टाने ठरवावयाची आहे.

जंगम मिळकतीची किंमत ठरविताना खालील गोष्टी विचारांत घ्यावयाच्या आहेतः—

(अ) जमीनींची किंमत ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांनी ठरविलेली किंमत.

(ब) पक्षकारांना प्रश्न विचारून मिळविलेली माहिती.

(क) अन्यतऱ्हेने चौकशी करून.

२. जप्तीस पात्र नसलेली मिळकत

सिव्हिल प्रोसिजर कोड कलम ६० मध्यें कोणत्या वस्तु जप्तीस पात्र आहेत व नाहींत याचा विचार केलेला आहे. त्या प्रमाणें जप्तीस पात्र नसलेल्या वस्तूमध्यें खाली वस्तूंची गणना केलेली आहेः—

(अ) जरूरीचे अंगावर घालण्याचे कपडे,

(ब) स्वयंपाकाची भांडी.

(क) अंथरुण, पांघरूण.

(ड) मंगळसूत्रासारखे धार्मिक महत्त्वाचे अलंकार.

(ई) शेतकीची हत्यारें व त्यास चरितार्थ चालविण्यास पुरेशी होतील इतकीं जनावरें व बी बियाणें; तसेंच त्याच्या कुटुंबाला वर्षभर निर्वाहाला लागेल इतके धान्य; शेतकऱ्याचे रहाते घर व इतर गोठ्यासारख्या जागा व त्यास लागून असलेल्या मोकळ्या जागा.

(फ) मजुरी.

**३. सरकारी परवानगीशिवाय तबदील न होणाऱ्या मिळकतीची किंमत.**

लँड रेव्हिन्यू कोडमधील कलम ७३ अ मध्यें कलेक्टरचे परवानगीशिवाय कोणत्या जमिनी विकता येत नाहीत याचा खुलासा केला आहे. अशा जमिनीतच वतनदार जमिनींचा समावेश होईल. अशा जमिनीची किंमत ठरविण्या-साठीं कानू नंबर ८ चा करण्यांत आलेला आहे. त्याप्रमाणें किंमत ठरवितांना पुढील गोष्टी घ्यानांत घेतल्या पाहिजेत.

(अ) अर्जापूर्वी बारा वर्षांत तंट्यातील जमिनींचे झालेले खरेदीचे व खंडाचे व्यवहार.

(ब) आजूबाजूच्या अशाच प्रकारचे जमिनींचे बारा वर्षांच्या मुदतींतील खरेदीचे व खंडाचे व्यवहार.

(क) मामलेदार किंवा महालकरी यांनी ठरविलेली जमिनींची किंमत.

## कर्जफेडीचें सामर्थ्य.

**३०.** कर्जदाराच्या सर्व मिळकतीच्या किंमतीच्या शेंकडा साठ टक्के इतके कर्जफेडीचें सामर्थ्य या कायद्यापुरते आहे असें समजण्यांत येईल; मात्र असें ठरविण्यात येत आहे कीं, जेव्हां अशा मिळ-कतीच्या कोणत्याही भागापासून उत्पन्न मिळत असेल परंतु अशा भागाची बाजार किंमत ठरवितां येत नसेल तेव्हां अशा भागाची किंमत दरसाल दर शेकडा ६ प्रमाणें उत्पन्नावरून होत असलेल्या

भांडवलाच्या रकमेइतकी असेल.

## विषयवारी


१. कर्जदाराच्या मिळकतीची किंमत
२ उत्पन्न देणाऱ्या मिळकतीची किंमत कशी ठरवावी.


### १. कर्जदाराच्या मिळकतीची किंमत.

कर्जदाराच्या मिळकतीची किंमत म्हणजे बाजारांत येणारी किंमत नसून या कायद्याच्या कलम २९ मध्यें सांगितलेल्या पद्धतीनें करावयाची किंमत होय. उदाहरणार्थ, एकाद्या कर्जदारापाशीं जंगम मिळकत रुपये दोनशे किंमतीची आहे. पण त्यांतील जप्तीस अपात्र अशी मिळकत रु. पन्नास किंमतीची आहे. अशा परिस्थितींत कर्जदाराच्या जंगम मिळकतीची किंमत रुपये दोनशे न समजतां फक्त रु. दीडशेंच समजली पाहिजे. त्याचप्रमाणें स्थावर मिळकतीची किंमत कलम २९ पोटकलम (१) मध्यें सांगितल्याप्रमाणें केली पाहिजे. कलम २९ (१) व (२) प्रमाणें स्थावर जंगम मिळकतीची किंमत केल्यावर त्यांतून या कायद्याच्या कलम ३ मध्यें निर्दिष्ट केलेली अपवादात्मक कर्जें वजा घालावयाची आहेत. असें केल्यावर जी रक्कम उरेल ती कर्जदाराच्या मिळकतीची किंमत समजावी. अशा रीतीनें ठरलेल्या किंमतीच्या शेंकडा साठ टक्के होणारी रक्कम ही कर्जदाराच्या कर्जफेडीचें सामर्थ्य समजण्यांत येईल.

### २. उत्पन्न येणाऱ्या मिळकतीची किंमत कशी ठरवावी.

एकादी मिळकत उत्पन्न देणारी आहे परंतु तिची बाजारभावानें किंमत ठरवितां येत नाहीं, अशी जर परिस्थिती असेल तर जे वार्षिक उत्पन्न येते तें सहा टक्के दरानें ठेवलेल्या रुपयांचे व्याज आहे असें समजून सदर मिळकतीची किंमत करावयाची आहे. म्हणजे उदाहरणार्थ, आंब्याचे झाडाचे उत्पन्न वार्षिक साठ रुपये आले तर त्या झाडाची किंमत एक हजार रुपये वरील हिशोबानें होईल. तसेंच मोसंबी डाळींबी वगैरेचे बाग व मिठागरासारख्या मिळकतीच्या किंमती या पद्धतीनें काढाव्या लाग-

तील असें वाटतें.

## कर्जदारांनीं द्यावयाचीं कर्जें प्रमाणशीर कमी करणें.

३१ (१) कोणताही कायदा, रूढी, करार, निवाडा अगर कोर्टाचा हुकूमनामा विरुद्ध असला तरी कलम २३ अन्वयें कर्जदाराकडून येणें असलेल्या रकमा पुढें सांगितलेल्या पद्धतीनुसार आणखी कमी करण्यात आल्या पाहिजेत.

(२) कलम २२ प्रमाणें हिशोब घेतल्यावर जर कर्जदाराकडून येणें असलेली कर्जें बिनतारणी असतील तर कर्जदाराच्या कर्ज फेडीची ऐपत लक्षांत घेऊन ती कर्जें प्रमाणशीरपणें आणखी कमी करण्यांत आली पाहिजेत.

(३) कलम २२ प्रमाणें हिशोब घेतल्यावर जर कर्जदाराकडून येणें असलेली कर्जें तारणावरची असतील आणि अशा कर्जांची एकूण रकम कर्जदाराच्या मिळकतीच्या शेंकडा ६० टक्याहून अधिक असेल तर अशी कर्जें कर्जदारांच्या कर्जफेडीची ऐपत लक्षांत घेऊन प्रमाणशीरपणें आणखीं कमी करण्यांत आली पाहिजेत.

(४) कलम २२ प्रमाणें हिशोब घेतल्यावर जर कर्जदाराकडून येणें असलेली कर्जें तारणावरची व बिनतारणावरची अशा दोन्ही प्रकारची असतील आणि जर तारणावरचे कर्जांची एकूण रकम तारण मिळकतीच्या शेंकडा ६० टक्याहून जास्त असेल तर तारणानें सुरक्षित केलेली कर्जें तारण मिळकतीच्या किंमतीच्या शेंकडा ६० टक्यापावेतों आणखी प्रमाणशीरपणें कमी करण्यांत आली पाहिजेत; व बिनतारणी कर्जें कर्जदाराच्या इतर बिनबोजाच्या मालमत्तेच्या किंमतीच्या शेंकडा ६० टक्यापावेतों

आणखी प्रमाणशीरपणें कमी करण्यांत आली पाहिजे.

## विषयवारी


१ कर्जफेडीच्या ऐपतीनुसार.
२ तारणावरच्या कर्जाबाबत.
३ तारणाची व बिनतारणाची कर्जें कशी कमी होतील.


### १. कर्ज फेडीच्या ऐपतीनुसार.

या कलमांतील पोटकलम २ मध्यें असें म्हटलें आहे कीं कर्जदाराचें बिनतारणी कर्ज कलम २२ प्रमाणें विचार करून एकदां निश्चित ठरल्यावर त्यांत कर्जदाराच्या कर्जफेडीच्या ऐपतीनुसार आणखी काट मारण्यांत येईल. ही जी कपात करण्यांत येणार आहे ती कर्जफेडीच्या ऐपतीनुसार करण्यांत येणार आहे. म्हणजे कलम २२ प्रमाणें कर्जाची हिशोबानें ठरलेली रक्कम रु. १००० असली व कलम ३० प्रमाणें कर्जदाराची कर्जफेडीची ऐपत फक्त ५०० रु. च ठरली तर १००० रु. कर्जाची रक्कम ५०० रु. च आहे असें समजण्यांत येईल. १००० रु. चें कर्ज दोन निरनिराळ्या सावकारांचे मिळून झालेलें असेल व त्यांतील एकाचे ६०० रु. व दुसऱ्याचें ४०० असें त्याचें भाग पडले असले तर या कलमाप्रमाणें पहिल्याचे देणे ३०० रु. होईल व दुसऱ्याचे २०० रु. होईल.

कर्ज फेडीची ऐपत कर्जाच्या रकमेच्या अधिक असल्यास कर्जाची रक्कम कमी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

### २. तारणावरच्या कर्जाबाबत.

तारणावरील कर्जाच्या कपातीबाबत पोटकलम ३ मध्यें असें सांगण्यांत आलेलें आहे कीं, कर्जदाराच्या मिळकतीच्या किंमतीच्या शेंकडा साठ टक्यांहून जर कर्ज जास्त असेल तर तें कर्जदाराच्या कर्ज फेडीच्या ऐपतीनुसार आणखी कमी करावयाचें आहे. व कर्जदाराची ऐपत कलम ३० मध्यें मिळकतीच्या किंमतीच्या शेंकडा साठ टके असल्याबद्दल

लिहीलेलें आहे. म्हणजे कलम २९ प्रमाणें जंगम अगर स्थावर मिळकतीची किंमत जी ठरेल तिच्या शेकडा साठ टकयापर्यंत कर्ज उतरविलें जाईल. उदाहरणार्थ, एकंदर कर्जांची कलम २२ प्रमाणें हिशेबानें ठरलेली रक्कम रु. १००० आहे व कर्जदाराच्या मालकीच्या मिळकतीची व मालमत्तेची किंमत कलम २९ प्रमाणें रुपये ६०० आहे व वरील सर्व मिळकत तारण लावलेली आहे. अशा परिस्थितींत किंमतीच्या साठ टक्के म्हणजे रुपये ३६० पर्यंत कर्जांची रक्कम कमी करण्यांत येईल. वरील रुपये एकहजार कर्जांमध्यें जर अनेक सावकार असतील तर रुपये ३६० ची विभागणी कलम २२ प्रमाणें हिशोब केलेल्या प्रत्येक कर्जांचे प्रमाणांत होईल. म्हणजे रु. १००० मध्यें एका सावकाराचे रुपये ६०० व दुसऱ्याचे रुपये ४०० असलें तर त्यांस अनुक्रमें रु. २१६ व १४४ मिळतील.

३. तारणाची व बिनतारणाची कर्जें कशी कमी होतील.

पोटकलम (४) प्रमाणें तारणावरील व बिनतारणाच्या कर्जांची कपात कशी करावी याची व्यवस्था सांगण्यांत आली आहे. त्याप्रमाणें कर्जांचे दोन प्रकार केले असून मिळकतीचेही दोन भाग करण्यांत आलेले आहेत. तारणावरील कर्ज तारण-मिळकतींतून फेडावयाचें असून बिनतारणी कर्ज इतर मिळकतींतून फेडावयाचें आहे. व अशी फेड कर्जफेडीच्या ऐपतीच्या प्रमाणांत करावयाची आहे.

## निवाडा.

३२. (१) कलम ३३ मध्यें सांगितलेल्या तजविजीखेरीज करून इतर बाबतींत कलम ३१ अन्वयें प्रमाणशीर कमी केलेल्या कर्जाची रक्कम निश्चित करण्यांत आल्यानंतर कोर्टानें निवाडा दिला पाहिजे.

(२) निवाडा ठरविलेल्या नमुन्यांत असला पाहिजे व त्यांत पुढील तपशील असला पाहिजे.

(१) तारणांनीं सुरक्षित केलेल्या कर्जांची प्रमाणशीरपणें कमी केलेली रक्कम ही ज्या मिळतीच्या तारणावर तीं सुरक्षित केली असतील त्या मिळकतीवर आकारली पाहिजे.

(२) वरील विभाग (१) यांस बाध न आणतां तारणांनीं सुरक्षित न केलेल्या कर्जांची रक्कम, कर्जदाराच्या सर्व मिळकतीवर आकारली पाहिजे.

(३) ज्या अग्रतेस अनुसरून कर्जांची फेड करण्यांत आली पाहिजे ती अग्रता ठरविताना पुढील अनुक्रम अनुसरला पाहिजे.

(अ) कर्जदाराच्या स्थावर मिळकतीवर बोजा असलेलीं अथवा चालूं सालच्या जमीन महसुलाप्रमाणें वसूल करता येण्याजोगी सावकारास देणें असलेलीं कर्जे.

(ब) जीं कर्जदाराच्या स्थावर मिळकतीवर बोजा केलेली असतात अगर जी चालूं सालची देणीं म्हणून वसूल करतां येण्याजोगी असतात अशी स्थानिक अधिकाऱ्यास देणें असलेली कर्जें.

(क) रिसोर्स सोसायट्यांनीं दिलेलीं किंवा रद्द केलेल्या कायद्याच्या ७८ व्या कलमान्वयें किंवा या कायद्याच्या ५४ व्या कलमान्वयें पिकें करण्यांसाठीं आणि तारीख ३० माहे जानेवारी सन १९४० नंतर या कायद्याप्रमाणें हंगामापुरती पैशांची मदत म्हणून दिलेलीं कर्जें आणि पिकें करण्यांसाठीं आर्थिक मदत म्हणून तारीख १ माहे जानेवारी सन १९३९ नंतर आणि ता. ३० जानेवारी सन १९४० पूर्वी दिलेलीं कर्जें.

(ड) अग्रतेच्या क्रमानें तारणानें सुरक्षित केलेली कर्जें.

(इ) सावकाराला, स्थानिक अधिकाऱ्यांना व सहकारी मंडळ्या

धरून इतर मंडळ्यांना देणें असलेली व जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करतां येण्याजोगीं कर्जें.

(फ) सहकारी मंडळयांना देणें असलेली इतर कर्जें.

(ग) तारणानें सुरक्षित न केलेली कर्जे. मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, तारणांनीं सुरक्षित न केलेल्या कर्जांच्या बाबतींत तीं कर्जें प्रमाणशीरपणें घेण्यांत आली पाहिजेत.

(४) एकूण वार्षिक हप्ते बारापेक्षां अधिक असतां कामा नये. मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं कर्जाची फेड किती हप्त्यांनीं केली पाहिजे हें ठरवितांना कोर्टानें कर्जदाराचें निव्वळ वार्षिक हप्त्यांनीं उत्पन्न नक्की केलें पाहिजे. आणि कर्जदारानें द्यावयाची रक्कम हीं त्याच्या निव्वळ वार्षिक उत्पन्नांपेक्षां अधिक असतां कामा नये.

खुलासाः—

कर्जदाराचे वार्षिक निव्वळ उत्पन्न या शब्दांचा अर्थ या कलमापुरता असा आहे कीं, (१) योग्य हुकमत असलेल्या कोर्टानें पोटगीबाबत केलेल्या हुकूमनाम्यान्वयें अगर हुकुमान्वयें कर्जदारानें द्यावयाची अवश्यक असलेली एकादी रक्कम, (२) कर्जदार व त्याच्यावर अवलंबून असलेल्या इसमांच्या उदरनिर्वाहासाठीं जरून असलेली रक्कम आणि (३) कर्जदारानें चालू वर्षाबद्दल सरकारला व स्थानिक अधिकाऱ्यांना देणें असलेलें आकार व कर भरण्यासाठीं व पिकें करण्यासाठीं भांडवलादाखल रद्द केलेल्या कायद्यान्वयें काढलेल्या कर्जांच्या फेडीसाठीं किंवा या कायद्यान्वयें हंगामी खर्चासाठीं काढलेल्या कर्जांच्या फेडीकरितां जरूर असणारी रक्कम या वजा करून उरणारा त्याच्या वार्षिक उत्पन्नाचा भाग असें समजावें.

(५) कोणताही कायदा किंवा करार विरुद्ध असला तरीहि कोर्टानें कोणत्याहि मिळकतीचा कबजा देण्याबद्दल हुकूम करावा.

(६) व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा सहा किंवा प्रांतिक सरकारकडून याबाबत जाहीर करण्यांत येईल असा कमी दर किंवा प्रथम कर्ज काढलें त्यावेळीं पक्षकारांच्या दरम्यान मान्य झालेला दर किंवा अशा कर्जाच्या संबंधांतील हुकूमनाम्यांत परवानगी दिलेला दर या सर्वांत जो कमी असेल त्याहून अधिक असतां कामा नये.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १. कलम ३३ मधील तजवीज. | ६. निव्वळ उत्पन्न म्हणजे काय. |
| २. निवाड्याचा ठराविक नमुना. | ७. ताबा देवविण्याचा हुकूम. |
| ३. कर्जाचा कर्जदाराच्या मिळतीवर बोजा. | ८. व्याजाचा दर. |
| | ९. अपील व कोर्ट फी. |
| ४. अग्रहक्क. | १० निवाड्यांतील कोणत्याही भागावर अपील. |
| ५. हप्त्यांनीं फेड. | |

### १. कलम ३३ मधील तजवीज.

कलम ३३ मध्यें कर्जाची कपात आणखी जास्त करण्यासंबंधीची तजवीज सांगितली आहे. त्या प्रमाणें जर कर्जदाराचे कमी केलेले कर्ज त्याच्या मिळतीच्या किंमतीच्या निम्याहून अधिक असेल तर कोर्ट सावकारांस आपलें कर्ज सदर मिळकतीच्या निम्याकिंमतीइतकें आणखी कमी करण्याबद्दल विचारील व सर्व सावकारांची संमति मिळाल्यास त्याप्रमाणें कर्ज कमी करून ती सर्व रक्कम एक महिन्याचे आंत सावकारांना देण्याबद्दल कर्जदारास हुकूम करील. त्याप्रमाणें कर्जदारानें न केल्यास कोर्ट त्यासंबंधीचा निवाडा करील व त्यामध्यें सदरहू कर्जे लँड मार्टगेज बँकेमार्फत फेडण्याची योजना ठरविली जाईल. अशी जी योजना होईल ती लक्ष्यांत घेऊन या कलमांतील निवाडा करण्यांत येईल.

**२. निवाड्याचा ठराविक नमुना.**

या कलमाखालील जो निवाडा घ्यावयाचा आहे, तो कोणत्या स्वरूपाचा असावा याची माहीती कानू क्रमांक ९ मध्यें दिलेली आहे. त्यामध्यें असें म्हटलें आहे कीं तो या कलमाखालील नमुना ६ नंबर प्रमाणें राहील.

**३. कर्जाचा कर्जदाराच्या मिळकतीवर बोजा.**

या कायद्याप्रमाणें शेतकऱ्याचें कर्जांत कपात होणार आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि त्याची फेड निश्चितपणें व्हावी अशीही त्यांत सोय करण्यांत आली आहे. ही सोय म्हणजे कर्जदाराच्या मिळकतीवर या सर्व कर्जांचा बोजा आपोआप तयार होणार आहे. व कर्जदारानें परस्पर खाजगीरीत्या जर एखादा बोजा केला तर त्यास कर्जदाराची कोणतीही मिळकत वसूल करण्याकरितां मिळणार नाहीं. परंतु अर्ज दिल्यानंतर किंवा निवाडा दिल्यानंतर एखाद्या कर्जदारानें जर एखादी मिळकत नवीन घेतली तर ती सावकारांच्या देण्यासाठीं अर्जांत सामील केली पाहिजे अशा आशयाचें कलम या कायद्यांत आढळून येत नाहीं. त्यामुळें अर्जानंतर अगर निवाड्यानंतर जें कर्ज कर्जदार घेईल त्याला ही पुढील मिळकत तारण म्हणून कर्ज वसुलीकरीतां मिळूं शकेल असें वाटतें. या योजनेमुळें शेतकरी कायद्याखालीं शेतकऱ्यांची स्थावर मिळकत हातावरच्या कर्जांना जबाबदार नव्हती. ती सावकारास जप्त अगर विक्रीकरतां येत नव्हती. तो जो एक त्यांचा फायदा होता तो या कायद्यानें नाहींसा केलेला आहे.

**४. अग्रहक्क.**

कर्जदाराचे कर्ज जें फेडलें जावयाचे आहे तें सर्व ठिकाणीं हिस्से राशीनें फेडले जावयाचें नाहीं. तर तगाईसारखी सरकारी कर्जे व इतर स्थानिक अधिकाऱ्यांची जी कर्जें असतील तीं प्रथम कांहींही कपात न होता दिली जाणार आहेत. व अशी सर्व कर्जे देऊन झाल्यावर इतर कर्जें हिस्सेरशीनें फेडली जावयाची आहेत. ही कर्जे कोणत्याक्रमानें व कशी कशी घ्यावीत याची माहिती या कलमांतील पोटकलम २ मधील विभाग ३ मध्यें सांगितलेली आहे.

### ५. हप्त्यांनी फेड

शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा जरी त्याच्या मिळकतीवर ठेवण्यांत आलेला असला तरी कर्जफेड मिळकत विकून व्हावयाची नाहीं तर मिळकतीच्या उत्पन्नांतून व्हावयाची आहे व ती बारा वार्षीक हप्त्यांत वाटून घ्यावयाची आहे. असे हप्ते ठरवितांना कर्जदाराचे वार्षिक निव्वळ उत्पन्नाहून कोणताही हप्ता जास्त असता उपयोगी नाहीं. हें निव्वळ उत्पन्न ठरवितांना कर्जदाराचे उपजीविकेचा खर्च, पोटगीदाखल द्यावयाच्या रकमा व सरकारी कर-किंवा पट्टया यांना लागणाऱ्या रकमा किंवा बी बीयाण्यासाठीं अगर हंगामातील पिकांसाठी जी रक्कम लागेल ती या सर्व रकमा वगळून जे उत्पन्न राहील ते निव्वळ उत्पन्न म्हणून धरण्यांत येईल व त्याहून कोणताही वार्षिक हप्ता जास्त आकारला जाणार नाहीं व अशा उरलेल्या उत्पन्नांतून जर कर्जफेड बारा हप्त्यांत होऊं शकली नाहीं तर कलम ४७ मध्यें सांगितल्याप्रमाणे कोर्ट त्यास नादार ठरवील.

### ६. निव्वळ उत्पन्न म्हणजे काय.

या कलमापुरतें निव्वळ उत्पन्न कशाला म्हणावे हें या कलमाच्या पोटकलम २ मधील चवथ्या विभागाच्या खुलाशांत सांगितलें आहे, त्या प्रमाणें निव्वळ उत्पन्न काढावयाचें झाल्यास प्रथमतः शेतकऱ्याचें एकंदर वार्षिक उत्पन्न किती हें पाहावयाचें; त्यानंतर कोणाच्या पोटगीदाखल जर एकाद्या हुकूमनाम्यापोटीं रक्कम द्यावयाची असेल तर ती वजा टाकावयाची; नंतर कर्जदारास व त्याच्यावर अवलंबून असणाऱ्यास जो उपजीविकेचा खर्च लागेल तो वजा करावयाचा; नंतर चालू सालचा सरकारी अगर लोकलफंड अगर स्थानिक अधिकाऱ्यांनी बसविलेला कर जो द्यावा लागेल तो वजा करावयाचा व बीबियाणासाठीं अगर हंगामी पिकांसाठीं घेतलेलें कर्ज असल्यास तें वजा करावयाचें व मग जी एकंदर उत्पन्नांतून रक्कम उरेल ती निव्वळ उत्पन्न अशी समजावयाची आहे. अशाप्रकारें वर वर्णन केलेल्या ह्या चार बाबी या उत्पन्नावर एक प्रकारें कायद्यानें निर्माण केलेला बोजाच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

### ७. ताबा देवविण्याचा हुकूम.

पोटकलम २ मधील विभाग ५ अन्वयें कोर्टास कोणत्याही कायद्याची अगर कराराची हरकत असली तरी जमीनीचा कबजा देण्याबाबत हुकूम करण्याचा अधिकार आहे. हा कबजा सावकारांस अगर कर्जदारांस दुसऱ्याकडून काढून देण्याची सोय या कायद्यांत केलेली आहे. १९३९ च्या कायद्यांत अशा प्रकारची सोय जी सांगण्यांत आली होती ती कलम ५४ पोटकलम २ विभाग (आय) यामध्यें होती. त्यानुसार सावकाराच्या ताब्यांतील जमीनी कर्जदाराच्या ताब्यांत कोणत्या अटीवर जावयाच्या तें सांगितलें होतें. परंतु या कायद्यांत कोणाच्या ताब्यांतून काढून कोणास द्याव्यात हें स्पष्ट म्हटलेलें नाहीं. तसेंच कोणासही करार अगर कायदा यात कांहीं असलें तरी असा ताबा द्यावा असें जे या कलमांत म्हटलें आहे तेंहीं पूर्वींच्या कायद्यांत आढळून येत नव्हते. या फरकामुळें ताबा देण्यासंबंधीं कोर्टाचें अधिकार क्षेत्र वाढलें आहे.

### ८. व्याजाचा दर

कर्जाच्या रकमेवर द. सा. द. शें. सहा टक्याहून जास्त व्याज देऊं नये असें पोटविभाग ६ मध्यें म्हटलें आहे. याहून जर दुसरा कोणताही दर कोर्टमार्फत अगर सरकारमार्फत दिला गेला असेल किंवा आपसांत ठरला असेल तर असा कमी दरच जर तो सहा टक्याहून कमी असेल तर दिला पाहिजे. सरकारमार्फत १ जुलै १९४७ ते ३० जून १९४८ पर्यंतचा व्याजाचा दर दरसाल दरशेकडा चार टक्के ठरविण्यांत आला आहे. व तो मुंबई सरकारच्या गॅझेटमध्यें भाग ४ ब मध्यें पृष्ठ ४५२ वर प्रसिद्ध झालेला आहे. हा व्याजाचा दर निवाड्यांत जी रकम ठरेल त्यावरील पुढील व्याजाचे आकारणीसाठीं असावा असें वाटतें.

### ९. अपील व कोर्टफी.

या कायद्याच्या कलम ४ मध्यें अपीलांची सोय ज्या हुकूमाविरुद्ध सांगण्यांत आली आहे त्या हुकूमात या निवाड्यासंबंधीच्या हुकमाचा समावेश आहे, म्हणून या निवाड्यावर अपील होणार आहे व तें डिस्ट्रीक्ट

जज्जकडे करावयाचें आहे. असें अपील किती मुदतींत करावयाचें या संबंधीचा खुलासा या कायद्यांत केलेला नाही. तथापि सि. प्रो. कोडप्रमाणें अपील दाखल करण्याच्या शिरस्त्याप्रमाणें तीस दिवसांत अपील दाखल करावें लागेल. अर्थात् नकला तयार करण्यास लागणारे दिवस जास्त मिळतील.

कलम ४४ मध्यें अपीलांस जो कोर्टफी स्टँप लागण्यांत आला आहे तो प्रत्येक शंभर रुपयावर एक रुपाया प्रमाणें असून जास्तीत जास्त पन्नास रुपये द्यावा लागणार आहे.

## १०. निवाड्यांतील कोणत्याही भागावर अपील.

एखाद्या निवाड्यांतील कांहीं भागच एखाद्या पक्षकारास कबूल नसल्यास त्याला तेवढ्या पुरतेंच अपील करतां येईल कीं काय अगर त्यानें सर्व निवाड्यावर अपील केले पाहिजे याची थोडीशी चर्चा ऑ. इं. रिपोर्टर १९४७ मुंबई ३८९ या ठिकाणीं न्यायमूर्ती राजाध्यक्ष यांनीं केलेली आहे. त्यांत असा प्रश्न उपस्थित झाला होता कीं, कर्जदारानें एक खरेदीचा व्यवहार गहाणाचा आहे असें म्हणून इतर कर्जांबरोबर ते कर्ज आपल्या अर्जांत दाखविलें होते. लवाद कोर्टानें सदर बाबीचा निर्णय ५–७–४४ रोजी देऊन सदर व्यवहार खुषखरेदीचा ठरविला व निवाड्यांत त्या सावकाराचें कर्ज शून्य असें दाखविलें. सदर निवाडा २०–७–४४ रोजी तयार झाला. पुढें कर्जदारानें सदर खुषखरेदीच्या निर्णयावर म्हणून अपील दाखल केलें व तें करतांना निवाड्याची नकल सोबत हजर केली. अपील कोर्टानें असें धरलें कीं, सदरचें अपील खुषखरेदीच्या मुद्यावरचें असल्यामुळें तें चालूं शकत नाही. त्यावर हायकोर्टाकडे रिव्हिजन केली असतां त्यांत असें धरण्यांत आले कीं, सदरहु अपील हें निवाड्यावरीलच अपील धरावें व त्यांतच खुषखरेदीच्या मुद्याचाही विचार करण्यांत यावा. यावरून असें दिसतें कीं, जरी एखाद्या हुकुमाविरुद्ध प्रत्यक्ष अपीलाची सोय नसली तरी निवाड्याचे विरुद्ध अपील करतांना त्या मुद्यापुरतेंच अपील होऊ शकेल. १९४७ च्या चालूं कायद्यांत खुषखरेदीच्या बाबतींत स्वतंत्र अपील सांगितलेलें आहे त्यामुळें

वरील हायकोर्टाच्या निर्णयाचे तात्विक दृष्टीपेक्षां जास्त महत्व राहीलेले नाहीं, शिवाय सि. प्रो. कोडप्रमाणें असें अपील करतां येतेंच.

## प्रांतिक लँडमॉर्टगेज बँकेच्या मार्फत कर्जाच्या तडजोडीची योजना कोर्टानें तयार करणें.

३३ (१) जेव्हां ३१ व्या कलमान्वयें कोर्टानें प्रमाणशीरपणें कमी केलेल्या कर्जदाराच्या कर्जाची रक्कम ही कोर्टानें निश्चित केलेल्या कर्जदाराच्या स्थावर मिळकतीच्या किंमतीच्या निम्म्यापेक्षां अधिक असेल तेव्हां कोर्टानें कर्जदाराच्या सदरहू कर्जाची रक्कम व स्थावर मिळकतीची सदरहू किंमत सावकारास कळविली पाहिजे, आणि कर्जदाराच्या स्थावर मिळकतीच्या सदरहू किंमतीच्या निम्म्याहून अधिक नाहीं अशा रकमेपर्यंत सदरहू कर्जे प्रमाणशीरपणें कमी करण्यास तें कबूल आहेत किंवा नाहींत हे एक महिन्यापेक्षां अधिक नाहीं अशा नमूद केलेल्या मुदतीत लेखी कळविण्याबद्दल सावकारांस फर्माविण्याचा कोर्टास अधिकार आहे. जर कर्जे आणखी प्रमाणशीरपणें कमी करण्यास सर्व सावकार कबूल असतील तर अशा रीतीनें मान्य झालेली अशी कर्जाची रक्कम हुकूमाच्या तारखेपासून महिन्याचेंआंत भरण्याबद्दल कर्जदारास फर्माविण्यास हुकूम कोर्टानें केला पाहिजे.

[२] हुकुमाच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत किंवा कोर्टाकडून परवानगी मिळालेल्या एक महिन्यापेक्षां अधिक नाहीं अशा वाढविलेल्या मुदतींत अशा कर्जाची रक्कम कर्जदार भरील व त्याबद्दल सावकारांची पावती हजर करील तें खेरीज करून कोर्ट ठरविलेल्या नमुन्यांत निवाडा होईल व त्या निवाड्यांत असें फर्मावील कीं अखेरीस प्रमाणशीरपणें कमी करून आलेली कर्जाची रक्कम त्या स्थानिक

प्रदेशांत असलेल्या प्रायमरी लँड मॉर्टगेज बँकेनें अगर सदरहू स्थानिक प्रदेशांत अशी प्रायमरी लँड मॉर्टगेज बँक नसल्यास सन १९२५ चा मुंबईचा सहकारी मंडळ्याबाबतचा अॅक्ट ह्या अन्वयें नोंदलेल्या बॉंबे प्रॉव्हिन्शियल लँड मॉर्गेज बँकेनें सावकारास रोख अगर सावकाराची तशी इच्छा असल्यास बॉंबे प्रॉव्हिन्शियल लँड-मॉर्गेज बँकेनें काढलेल्या बॉंड्सच्या रुपांत दिली पाहिजे. असें बॉंड प्रांतिक सरकारनें हमी दिलेले असतील आणि कर्जदारां-कडून सावकारांस येणें असलेल्या सर्व कर्जांच्या पूर्ण फेडीच्या रक-मेइतकी त्यांची किंमत असेल. कोर्टानें आणखी असें फर्मावलें पाहिजें कीं, अशा रकमेचा कर्जदाराच्या सर्व स्थावर मिळकतीवर बोजा राहील.

(३) कर्जदाराकडून येणें असलेली रक्कम प्रांतिक सरकार या बाबतींत, सरकारी गॅझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून वेळोवेळीं जाहीर करील. अशा वार्षिक हप्त्यांत व द. द. शेंकडा ६ पेक्षां कमी नाहीं अशा व्याजाच्या दरानें वसूल करण्याचा बँकेचा हक्क असेल.

(४) ह्या कलमान्वयें बँकेच्या बाजूनें दिलेल्या निवाड्यान्वयें देणें असलेल्या सर्व रकमा जमीन महसुलाच्या यकबाकीप्रमाणें वसूल करतां येण्याजोग्या असतील.

## विषयवारी

१ कर्जांत आणखी कपात केव्हां होईल.
२ लॅन्ड मॉर्टगेज बँकेमार्फत कर्जतोड कोणच्या परिस्थि-तींत होईल.
३ सर्व सावकार.
४ हप्ते व व्याजाचा दर.
५ वसुलीची सोय.

**१. कर्जांत आणखी कपात केव्हां होईल.**

या कलमांत कर्जाची उतरण आणखी किती होऊं शकेल याचा विचार केला आहे. सदरहू कपात व्हावयाची असल्यास पुढील वस्तुस्थिती अस्तित्वांत असली पाहिजे.

(अ) कलम ३१ प्रमाणें कपात केलेली कर्जाची रकम कलम २९ प्रमाणें कर्जदाराच्या ठरविलेल्या स्थावर मिळकतीपेक्षा निम्म्यांहून अधिक असली पाहिजे.

(ब) कोर्टानें सर्व सावकारांस एक महिन्याची नोटीस काढून वरील दोन्ही आंकड्यांची माहिती करून दिली पाहिजे व त्यांना सदर कर्जदाराच्या स्थावर मिळकतीच्या किंमतीच्या निम्म्याहून अधिक नाहीं इतक्या किमतीपर्यंत आपलें कर्ज आणखी कमी करण्यांस तयार आहां कीं नाहीं हें विचारिलें पाहिजे.

(क) सर्व सावकारांनीं वरीलप्रमाणें कर्जांत कपात करून घेण्याची कबुली दर्शविली पाहिजे. येणेंप्रमाणें सर्व गोष्टी जुळून आल्यास कोर्ट कर्जदारांस एक महिन्याचे आंत वरीलप्रमाणें जादा कपात झालेली कर्जाची रकम सावकारास देऊन टाकण्यास फर्मावील. या योजनेचा उद्देश सावकारांनीं बारा वार्षीक हप्त्यांनीं आपलें घेणें वसूल करण्यापेक्षां थोडें कमी पण एकदम घेण्याची तयारी दर्शविल्यास त्यांना तशी रकम मिळावी असा आहे. कर्जदाराचा या योजनेनें फायदाच होणार आहे कारण हप्तेबंदीचा निवाडा झाल्यास सर्व कर्ज फिटेपर्यंत कर्जदाराची मिळकत गुंतून पडण्यापेक्षां या योजनेनें त्यांची मिळकत निर्वेध होणार आहे. म्हणून कर्जदारानें एक महिन्याचे आंत सावकारांस रकम पटवून या सवलतीचा उपयोग करून घेणें त्याचे हिताचे आहे.

**२. लँड मार्टगेज बँकेमार्फत कर्जतोड कोणच्या परिस्थितींत होईल.**

सर्व सावकारांनीं कमी रकम घेण्याची कबुली दिली, परंतु कर्जदारानें एक

महिन्याचे आंत किंवा कोर्टानें वाढविलेल्या मुदतींत अशी रकम सावकारांस दिली नाहीं तर कोर्टानें ठराविक नमुन्यांत निवाडा दिला पाहिजे व त्या निवाड्यांत लँड मॉर्टगेज बँकांनीं सावकारांची रकम कशी फेडावी यासंबंधीं हुकूम दिले पाहिजेत. असा निवाडा कानूमधील नमुना नंबर ७ प्रमाणें असेल व ह्याची एक नकल लँड मॉर्टगेज बँकेकडे पाठविण्यांत आली पाहिजे. सदरहू बँकेनें सावकारास रकम रोख द्यावी किंवा सावकाराची तशी इच्छा असल्यास कर्जरोख्यांचे ( बॉन्डस् ) रूपानें द्यावी. कर्जरोखे सावकारानें स्वीकारल्यास त्यांची हमी प्रांतिक सरकार घेणार आहे.

### ३. ' सर्व ' सावकार

या कलमांत सांगितलेली जादा कपात व्हावयाची असल्यास त्यांस ' सर्व ' सावकारांची कबुली मिळाल्यास पाहिजे. तशी न मिळाल्यास या कलमांतील योजना अंमलांत येणार नाहीं.

### ४. हप्ते व व्याजाचा दर.

बँकेकडून जरी सावकारांस रोख पैसे किंवा कर्जरोखे मिळाले तरी ती रकम कर्जदाराकडून बँकेस हप्त्यांनीं सव्याज मिळणेंची आहे. असे हप्ते व व्याजाचा दर ठरविण्याचा प्रांतिक सरकारांस अधिकार आहे. त्या अधिकारानुसार प्रांतिक सरकार गॅझेटमध्यें भाग ४ बी यामध्यें जाहीरनामा काढून असे दर व हप्ते वेळोवेळीं जाहीर करील. मात्र व्याजाचा दर केव्हांहि शेकडा सहा टक्यांपेक्षां अधिक असणार नाहीं. व्याजासंबंधींची घोषणा सन १९४७, ४८ या कोऑपरेटिव्ह-सालापुरती म्हणजे १ जुलै १९४७ ते ३० जून १९४८ पर्यंतचीं, ता. १७ जुलै १९४७ च्या गॅझेटमध्यें आली असून व्याजाचा दर दरसाल दरशेकडा ६ प्रमाणें ठरविला आहे.

### ५. वसुलीची सोय.

बँकेस मिळावयाच्या सर्व रकमा शेतसारा ज्या पद्धतीनें वसूल करतां येतो त्यांच पद्धतिनें वसूल करतां येतील. लॅन्ड रेव्हेन्यु कोडच्या कलम

१५० मध्यें शेतसारा वसूल करण्याची रीत दिली आहे. त्याप्रमाणें मागणीची नोटीस काढून किंवा जंगम मालाची जप्ती व विक्री करून किंवा स्थावर मिळकतीची विक्री करून किंवा थकबाकीदारांस अटक करून व कैदेंत टाकून वसूली केली जाते.

## कर्जें प्रमाणशीरपणें कमी करून आलेल्या रकमेपेक्षां अधिक रकमा वसूल करता येणार नाहींत.

**३४.** कलम ३१ अन्वयें कर्जें प्रमाणशीरपणें कमी करून आलेली किंवा कलम ३३ अन्वयें आणखी प्रमाणशीरपणें कमी करून आलेली रक्कम ही या कायद्यापुरती सदरहू कर्जाच्या संबंधांत कर्जदारानें देणें असलेली रक्कम असेल आणि या रकमेहून अधिक असलेला भाग रद्द होईल.

## विषयवारी

१. उद्देश व व्याप्ति.

हें कलम या कायद्यांत नव्यानेंच घालण्यांत आलें आहे. या कलमामुळें कर्जदाराचे जे कोणी जामीनदार असतील त्यांची कर्जदाराच्या कर्जाच्या कपातीइतकी सावकाराच्या कर्जातून मुक्तता होणार आहे. व त्यांचेवर जर दिवाणी कोर्टांत स्वतंत्र रीतिनें सावकारानें काम चालविलें तर त्यांना त्या कपातीइतकी सूट मगण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होईल. म्हणजे कर्जदाराचे मूळ कर्ज रुपये एक हजार असून त्यांत कलम ३१ व ३३ प्रमाणें कपात होऊन त्याचे देणें फक्त रुपये तीनशें ठरलें, तर कर्जदाराच्या जामीनदाराकडून फक्त तीनशेंच सावकारास वसूल करतां येतील. कारण बाकीचे पैसे या कलमान्वयें रद्द होतील. तसेंच एखादे वेळीं सावकारानें अगोदरच हुकूमनामा मिळवून सर्वच्या सर्व हजार रुपये जामीनदाराकडून वसूल केले व जामीनदारानें ते वसूल करण्याकरितां कर्जदारावर

फिर्याद लाविली असेल तर त्यांस या कायद्याच्या कलम ६ (२) प्रमाणें फक्त रुपये तीनशेंच वसूल करतां येतील.

## संगनमताच्या बाबतींत कर्जें कमी करावयाचीं नाहींत.

**३५.** जर कलम ३२ अन्वयें निवाडा देणाऱ्या कोर्टाची काम चालू असताना केव्हांहि अशी खात्री होईल कीं,

(१) कर्जदारानें एकाद्या सावकाराशीं संगनमत करून इतर कोणत्याहि सावकाराचे कायदेशीर घेणें बुडविण्याच्या हेतूनें त्यांस असलेल्या कर्जाच्या संबंधांत चुकीची माहिती अशा कामांत पुरविली होती; तर कलम ३१ मध्यें ठरविलेल्या रीतिनें अशा कर्जदाराची कोणतेंही कर्जें प्रमाणशीरपणें कमी करण्याचें नाकारण्याचा कोर्टास अधिकार असेल आणि कर्जदाराकडून येणें असलेल्या कर्जाच्या पूर्ण रकमेबद्दल निवाडा करण्यास कोर्ट मुखत्यार असेल;

(२) अशा कामांत सावकारानें केलेली कोणतीहि मागणी ही दुसऱ्या एकाद्या सावकाराचें कोणतेंहीं कायदेशीर घेणें बुडविण्याच्या हेतूनें कर्जदार व सावकार यांच्या संगनमतानें करण्यांत आली होती; तर कोर्ट असा हुकूम करील कीं, अशा सावकाराचें कर्जदाराकडून येणें असलेलें कर्ज रद्द होईल व तें वसूल करतां येणार नाहीं.

### विषयवारी

१ कायद्यांतील फेरफार.
२ कर्जदाराच्या माहितींत संगनमत आढळून आल्यास.
३ सावकाराच्या मागणींत संगनमत आढळल्यास.
४ कर्जदाराचें काय नुकसान होईल.

**१. कायद्यांतील फेरफार.**

१९३९ च्या कायद्यांत या आशयाचें कलम २६ हें होतें. परंतु या कलमांतील पोटकलम (२) मध्यें जी व्यवस्था सांगण्यांत आली आहे ती त्यांत नव्हती. या कलमांत आतां कर्जदार व सावकार यांच्या स्वतःच्या अर्जातील संगनमताचा निरनिराळा विचार केला असून त्यांत निरनिराळी शिक्षा सांगण्यांत आली आहे.

**२. कर्जदाराच्या माहितींत संगनमत आढळून आल्यास.**

या कायद्याप्रमाणें कर्जदारानें आपल्या कर्जाबाबत माहिती जरूरीप्रमाणें कलम ४, ८ व १४ अन्वयें कोर्टास द्यावयाची आहे. ती देताना जर एखाद्या सावकाराशीं संगनमत करून त्यानें सदर सावकाराच्या घेण्याची माहिती इतर सावकारांस बुडविण्याच्या हेतूनें चुकीची दिली असें कोर्टाच्या निदर्शनास आलें तर कोर्ट कलम ३१ प्रमाणें कर्जांत जी कपात करणार असेल ती करणार नाहीं आणि पूर्ण रकमेचा निवाडा देईल. या ठिकाणीं पूर्ण रकम हा जो शब्द वापरण्यांत आलेला आहे तो सावकारानीं मागितलेली सर्व रकम या अर्थी नसून कलम २२ प्रमाणें हिशेब घेऊन जी रकम ठरेल त्या अर्थी वापरला आहे असें दिसते.

**३. सावकाराच्या मागणींत संगनमत आढळल्यास.**

या कायद्याप्रमाणें सावकाराला आपली मागणी कलम ४, ८ व १४ अन्वयें कोर्टापुढें मांडतां येईल. अशा मागणीबाबत कोर्टास जर असें आढळून आलें कीं सदर मागणी ही इतर सावकारांस बुडविण्याच्या हेतूनें कर्जदाराशीं संगनमत करून केली आहे तर कोर्ट त्या सावकाराची सर्वच्या सर्व मागणी रद्द करील व ती त्याला केव्हांहि वसूल करतां येणार नाहीं.

**४. कर्जदाराचें काय नुकसान होईल.**

कर्जदारानें जर या कलमांतील पोटकलम (१) प्रमाणें खोटी माहिती कोर्टास दिली तर या कायद्याचा कर्जांत जो खराखुरा फायदा कलम ३१ व ३३ प्रमाणें कपात होऊन त्यास व्हावयास पाहिजे तो होणार नाहीं व त्याच्या

कर्जाचे हिशेब कलम २२ प्रमाणें होऊन त्यांस त्या हिशेबाअंती ठरेल त्याप्रमाणें पूर्ण रक्कम द्यावी लागेल. सदरहू कलम ३५ ची योजना ही न्यायनीतिच्या एका महान् तत्वास धरून करण्यांत आली आहे. ज्या कोणास न्याय पाहिजे असेल त्याने तो दुसऱ्यांसहि दिला पाहिजे. म्हणजे त्याचे हात कोणत्याहि अपकृत्यानें कलंकित झालेले नसले पाहिजेत. या कायद्यांत कर्जदाराला न्याय देण्याचे तत्व अवलंबिण्यांत आलेले असल्यामुळें त्यानें आपली बाजू शुद्ध रीतिनें कोर्टापुढें मांडावयास पाहिजे. तसें त्यानें न केलें तर त्यांस त्याबद्दल नुकसानीचा फटका बसणें न्याय्य होय.

## कोणताहि पक्षकार हजर झाला नाहीं तर एकतर्फी काम चालविणें.

**३६.** (१) ज्या इसमाच्या कर्जतोडीबाबत कलम ४ अन्वयें अर्ज करण्यांत आला असेल तो इसम किंवा त्याचा कोणताहि सावकार अर्जाच्या सुनावणीसाठीं ठरविलेल्या तारखेस अगर सुनावणी ज्या तारखेपर्यंत लांबणीवर गेली असेल त्या तारखेस हजर झाला नाहीं तरीहि कोर्टानें अर्जाच्या सुनावणीचे काम पक्षकारांचे गैरहजेरींत पुढें चालवून प्राथमिक मुद्यांवर निर्णय दिला पाहिजे आणि जरूर तर उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या आधारावर निवाडा दिला पाहिजे.

(२) जेव्हां कलम ४ अन्वय केलेल्या अर्जाची सुनावणी होऊन पोटकलम ( १ ) अन्वयें पक्षकारांच्या गैरहजेरींत सदर अर्जाचा निकाल देण्यांत येईल तेव्हां प्राथमिक मुद्यांसंबंधीचा निर्णय किंवा निवाडा याबाबतचें काम पुरेशा कारणांवाचून, केवळ सदरहू प्रकरणांतील कोणताहि पक्ष सुनावणीच्या वेळीं हजर नव्हता एवढ्या सबबीवर, पुनः सुरू करण्यांत येणार नाहीं.

## विषयवारी

१. एक्स पार्टी या शब्दाचा उपयोग.
२. पक्षकाराच्या गैरहजेरीमुळें काम रद्द होणार नाहीं.
३. निकालीं गेलेला अर्ज पुनः फैलावर केव्हां घेतला जाईल.
४. अपील.

### १. ' एक्स पार्टी ' या शब्दाचा उपयोग

' एक्स पार्टी ' या इंग्रजी शब्दाचा अर्थ दुसऱ्या पक्षाच्या गैरहजेरींत एका पक्षानें चालविलेलें काम असा आहे. परंतु या कलमांत हा शब्द जो वापरण्यांत आलेला आहे तो दोन्ही पक्षांच्या गैरहजेरींताहि चाललेलें काम अशा अर्थी वापरलेला दिसतो. म्हणून वरील भाषांतरांत ' एक्स पार्टी ' या शब्दाचे एकतर्फी हें सामान्य भाषांतर न घेतां ' पक्षकारांच्या गैरहजेरींत हें समर्पक भाषांतर करण्यांत आलें आहे.

### २. पक्षकारांच्या गैरहजेरीमुळें काम रद्द होणार नाहीं.

सामान्यतः कोर्टांतील नियम व पद्धति अशी आहे कीं, ज्यानें काम दाखल केलें असेल तो गैरहजर आल्यास तें काम त्यांस चालविणें नाहीं असें त्याच्या गैरहजेरीमुळें समजून काढून टाकण्यांत येतें. परंतु या कायद्यान्वयें जो अर्ज दाखल केला असेल तो अर्ज सदर अर्जदार गैरहजर आहे या सबबीवर रद्द होणार नाहीं. तर कोर्टानें उपलब्ध पुराव्याचे आधारें अर्जाच्या गुणदोषांवर या कायद्याप्रमाणें काम चालवून निकाल दिला पाहिजे. यामुळें एखाद्या पक्षकारास या कायद्याप्रमाणें आपण दिलेला अर्ज गैरसोयीचा आहे असें वाटल्यास त्याला तो अर्ज सुनावणीचे वेळीं गैरहजर राहून रद्द करून टाकतां येणार नाहीं. कोर्ट त्याच्या अर्जाची योग्य ती चिकित्सा करील व निर्णय देईल.

### ३. निकालीं गेलेला अर्ज पुनः फैलावर केव्हां घेतला जाईल.

कोणत्याहि पक्षाच्या गैरहजेरींत अर्ज रद्द होणार नसल्यामुळें तो

पक्षकार योग्य कारणासाठीं गैरहजर होता एवढ्याच कारणासाठीं कोर्टानें प्राथमिक मुद्द्यावर दिलेला निर्णय किंवा अखेरचा निवाडा हा फेरविचारांत घेतला जाणार नाहीं. तो तसा फेरविचाराकरितां घ्यावयाचा असल्यास त्याकरिता निराळीं कारणें कोर्टाला पटतील अशीं किंवा कलम ३७ मध्यें वर्णन केलेली परिस्थिती कोर्टास दाखवावी लागेल.

४. अपील.

या कायद्यांच्या कलम ४३ मध्यें या कलमांतील पोटकलम मधील हुकुमाविरूद्ध अपील सांगितलें आहे.

## निवाड्याचा प्रश्न पुनः उपस्थित करणें व कर्जाची पुनः तडजोड करणें.

३७ जर कलम ३२ अन्वयें निवाडा दिल्यानंतर एकाद्या पक्षकारानें कोर्टाकडें केलेल्या अर्जावरून अगर दुसऱ्या तऱ्हेनें कोर्टाला असें आढळून येईल कीं, निवाडा दिला तेव्हां कोर्टाला जिच्याबद्दल माहिती देण्यांत आली नव्हती अशीं कर्जदाराची दुसरी मालमत्ता आहे, अगर निवाड्यांत जिचा समावेश केला होता अशीं एकादी मालमत्ता कर्जदाराची नाहीं तर या कायद्यांत कोणताही मजकूर असला तरी कोर्टाला निवाड्याचा प्रश्न पुन्हां उपस्थित करण्याचा व या कायद्याच्या ठरावास अनुसरून कर्जाची पुनः तडजोड करण्याचा अधिकार आहे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जर कोर्टाची अशी खात्री होईल कीं अशा मालमत्तेविषयीं माहिती प्रकट करणें हा कर्जदाराच्या लबाडीचा परिणाम आहे तर निवाडयाची फेरतपासणी करतांना कोर्टानें कर्जदारास कलम ३१ चा फायदा देतां कामा नये.

## विषयवारी

१ उद्देश व व्याप्ती.
२ निवाड्याचा फेरविचार.
३ अर्जास मुदत.
४ कर्जदाराच्या लबाडीचे प्रायश्चित्त.

### १. उद्देश व व्याप्ती.

या कलमांतील फेरविचाराची योजना ही सिव्हिल प्रोसीजर कोडमधील रिव्ह्यूचे स्वरूपाची आहे. व ती निवाड्याचे बाबतींतच लागूं पडणारी आहे. प्राथमिक मुद्यावर कलम १७ अन्वयें दिलेल्या निर्णयाबाबत या कलमान्वयें विचार करतां येणार नाहीं. ज्या निवाड्याचा फेरविचार व्हावयाचा आहे तो एकतर्फी असूं शकेल किंवा दुतर्फा असूं शकेल. असा फेरविचार फक्त एका कारणाकरतांच होणार आहे व तें कारण म्हणजे कर्जदाराचे मालमत्ते विषयींची माहिती.

### २. निवाड्याचा फेरविचार.

कलम ४ अन्वयें जो अर्ज कर्जदारानें करावयाचा आहे त्यांत त्याला आपल्या सर्व मालमत्तेची माहिती द्यावयाची आहे. अशा माहितीवर आधारून कोर्टानें कर्जदाराच्या मिळकतीची किंमत या कायद्यांतील कलम २९ प्रमाणें केली व त्यावर आधारून कर्जांत कपात कलम ३१ प्रमाणें केली व त्यानंतर अर्जावरून अगर अन्यरीतीनें असें आढळून आलें कीं कर्जदाराची आणखी मिळकत आहे किंवा निवाड्यांत समाविष्ट केलेली एखादी मालमत्ता कर्जदाराची नव्हती तर कोर्ट या गोष्टीचा विचार करून पुनः नवीन निवाडा करील. पण कर्जदाराच्या लबाडीमुळें ही माहिती आगाऊ मिळाली नाहीं असें जर कोर्टास वाटलें तर कर्जदारास प्रायश्चित म्हणून क. ३१ प्रमाणें त्याचे जें कर्ज कपात व्हावयाचे होते तें होणार नाहीं व नवीन निवाड्यांत त्यास फक्त कलम २२ प्रमाणें हिशोबी देणें तेवढेंच दर्शविलें जाईल.

### ३. अर्जाची मुदत.

निवाड्याचा फेरविचार व्हावा म्हणून जो अर्ज द्यावयाचा तो किती

मुदतींत दिला पाहिजे याचा खुलासा या कायद्यांत आढळून येत नाहीं; सबब अर्ज केव्हांही करतां येईल असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु आपण सुरवातीस पाहिल्याप्रमाणें असा अर्ज रिव्हयूचें स्वरूपाचा असलेमुळें या कायद्यांतील कलम ४६ प्रमाणें सिव्हिल प्रोसीजर कोड मधील तरतुदी लागू असल्यामुळें हा अर्ज मुदतीचें कायद्यांत सांगितले प्रमाणें निवाड्याचें तारखेपासून ९० दिवसाचे आंत द्यावा लागेल असें वाटतें.

**४ कर्जदाराच्या लबाडीचें प्रायश्चित्त.**

एकाद्या कर्जदारानें आपल्या मालमत्तेची माहिती लबाडीनें छपवून ठेवली तर त्यांस प्रायश्चित म्हणून ही गोष्ट कोर्टाचे निदर्शनास आले बरोबर कलम ३१ प्रमाणें त्यांस मिळणारी कर्जातील कपात कोर्ट त्यास देणार नाहीं. हें जें प्रायश्चित त्यांस सांगितलें आहे तें यथायोग्य असेंच आहे. कारण, त्याच्या लबाडीमुळें त्याचे मालमत्तेची किंमत व कर्जफेडण्याची ऐपत ही कमी होते व त्या प्रमाणांत कर्जात कपात जास्त होते. अशी लबाडीनें मिळविलेली कपात त्यांस मिळूं नये म्हणून पुन्हां निवाडा करतांना पूर्वी केलेली सर्व कपात नाहींशी होईल.

## निवाडा नोंदला पाहिजेः बजावणी कशी करण्यांत येईल.

३८. (१) या कायद्याखालील प्रत्येक निवाडा कलम ४४ अन्वयें देण्याजोगी कोर्टफी देण्यांत आल्यावर, अपील करण्यास परवानगी असतांही अपील करण्यांत आलें नसेल तर अपीलासाठीं ठरविण्यांत आलेली मुदत संपल्यावर आणि अपील करण्यांत आलें असेल तर अपीलाचा निकाल झाल्यावर सन १९०८ च्या इंडियन रजिस्ट्रेशन ॲक्टाअन्वयें नोंदण्यांत येईल.

(२) निवाड्याबाबतची कोर्ट-फी ही कोर्टानें ज्या पक्षकाराला खर्च सोसण्याला फर्माविलें असेल त्यानें भरली पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, ज्याला खर्च सोसण्याबद्दल फर्माविण्यांत आलेलें नसेल त्याला अशी कोर्ट-फी भरण्याचा अधिकार आहे. अशा सावकाराला त्यांस निवाडयाअन्वयें कर्जदाराकडून पहिलें हप्त्याबरोबर मिळण्याजोग्या पहिल्या हप्त्याबरोबर स्वतः भरलेली कोर्ट-फीची रक्कम वसूल करण्याचा अधिकार असेल: आणखी असेंही ठरविण्यांत येत आहे कीं, एखाद्या सहकारी मंडळीनें कोणतीही कोर्टफी देण्याची नाहीं.

(३) अशा रीतीनें नोंदलेल्या निवाड्याची बजावणी पुढील प्रमाणें करण्यांत येईल:—

(१) जर कर्जदारानें निवाड्याअन्वयें देण्याजोगा कोणताही हप्ता सावकारांस देण्यांत कसूर केली तर सदरहू सावकाराला निवाड्याच्या बजावणीसाठीं ठरविलेल्या नमुन्यांत कोर्टाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) जर असा अर्ज मिळाल्यावर कर्जदारानें हप्ता भरण्यामध्यें कसूर केली आहे अशी कोर्टाची खात्री झाली तर कोर्ट सदरहू निवाडा बजावणीसाठीं कलेक्टरकडे पाठवील आणि त्यानंतर कलेक्टर सदरहू कर्जदाराकडून हप्त्याची रक्कम जमीनमहसूलाच्या बाकी प्रमाणें वसूल करील.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, या कलमांतील कोणत्याही मजकुरामुळें सरकारच्या किंवा स्थानिक अधिकाऱ्याच्या किंवा सहकारी मंडळीच्या त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वयें परवानगी असलेल्या वसुलीच्या कोणत्याही उपायाचा अवलंब करण्याचें हक्कास बाध येणार नाहीं.

## विषयवारी

१. कायद्यांतील फेरफार.
२. निवाड्याची कोर्ट फी.
३. रजिस्ट्रेशनची पद्धती मुदत.
४. सहकारी मंडळ्याचे विशेष अधिकार.
५. निवाड्याची अंमल बजावणी.

### १. कायद्यांतील फेरफार.

१९३९ च्या कायद्यांतील कलम ६१, ६२ व ६३ या तीन कलमामध्यें निवाडा नोंदणें व निवाड्यान्वयें येणें असलेल्या रकमेची वसुली करणें या दोन्ही बाबींचा विचार केलेला होता. त्यांतील कलम ६२ अन्वयें हा निवाडा अपील कोर्टाकडें नोंदला जात असे व तेथून तो कलेक्टरकडे बजावणीसाठीं पाठविला जात असे. या कायद्यान्वयें आतां सदरहू चे सर्व निवाडे सबरजिस्ट्रारकडे इतर दस्तऐवजाप्रमाणें नोंदलें जावयाचे आहेत. पूर्वीचें कायद्याखालीं जे निवाडे झाले परंतु जे अजून नोंद-केले नव्हते त्याची नोंद अपील कोर्टाकडें करावयाची किंवा रजिस्ट्रारकडे करावयाची हा वादाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. या कायद्याच्या कलम ५६ (२) प्रमाणें पूर्वीच्या तडजोड मंडळापुढें जे अर्ज होते ते या नवीन कायद्याप्रमाणें नवीन कोर्टाकडें झाले आहेत असें समजून काम चालवावयाचे आहे; परंतु ज्या अर्जांत निवाडा होऊन तो निवाडा पूर्वीच्या कायद्याप्रमाणें डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे नोंदावयास म्हणून गेला आहे परंतु जो प्रत्यक्ष नोंदला गेला नाहीं, असा निवाडा डिस्ट्रिक्ट कोर्टांतच नोंदावयाचा किंवा कोर्टानें तो सबरजिस्ट्रार कचेरींत नोंदून घ्यावयाचा हा मतभेदाचा प्रश्न आहे तडजोड मंडळापुढील अर्जांना नवीन कायदा लागू आहे असें म्हटलें आहे खरें. पण अशा निवाडयांच्या संबंधांत कांहीं स्पष्ट निर्देश नसल्यामुळें नवीन कायदा अमलांत आल्यानंतर असे जे निवाडे बिगरनोंदीचे असतील ते नवीन कायद्याप्रमाणें रजिस्ट्रारकडे नोंदवावे लागतील असें वाटते.

### २ निवाड्याची कोर्ट फी.

लवाद–निवाड्यांवरील कोर्ट–फी कोणी द्यावयाची यासंबंधींचा हुकूम

कोर्ट करील व त्या हुकुमानुसार त्या पक्षकारानें ती दिली पाहिजे. परंतु अशी फी कर्जदारांस भरावयास सांगितली असून त्यानें तशी भरली नाहीं तर कोणाहि सावकारास ती भरतां येईल व अशी सावकारानें भरलेली कोर्ट-फी त्यांस कर्जदाराकडून येणें असलेल्या पहिल्या हप्त्याच्या रकमेंत वाढावा करून वसूल करतां येईल. अशा कोर्ट-फीचे दर कलम ४४ पोटकलम (२) यामध्यें सांगितले आहेत. त्याप्रमाणें प्रत्येक शंभर रुपयांस किंवा त्याचे भागास एक रुपया व जास्तींत जास्त पन्नास रुपये अशी कोर्ट-फी सांगण्यांत आली आहे.

## ३. रजिस्ट्रेशनची पद्धति व मुदत.

अखेरच्या लवाद निवाड्यावर कोर्ट-फी स्टॅम्प मिळाल्यानंतर तो निवाडा इंडियन रजिस्ट्रेशन ॲक्ट १९०८ प्रमाणें नोंदविला जावयाचा आहे. परंतु तसा तो निवाडा रजिस्ट्रारकडे कोणी पाठवावयाचा यासंबंधींचा स्पष्ट खुलासा १९३९ च्या कायद्याच्या कलम ६१ सारखा या कायद्यांत आढळून येत नाहीं. तथापि सर्वसाधारण रिवाजास अनुसरून असा निवाडा कोर्टाकडून परस्पर रजिस्ट्रार कचेरींत नोंदणीकरितां पाठविला जाईल असें वाटतें. असा निवाडा किती दिवसांनीं नोंदविला जावा याबाबत जो खुलासा करण्यांत आलेला आहे तो 'अपीलाच्या मुदतीनंतर किंवा अपिल झालें असल्यास अपिलाच्या निकालानंतर' अशा प्रकारें करण्यांत आलेला आहे. परंतु अपीलाची मुदत या कायद्यांत सांगितली नसल्यामुळें व कलम ४६ प्रमाणें सिव्हिल प्रोसीजर कोडमधील सर्व बाबी या कायद्याखालील कामकाजास लागू असल्यामुळें मुदतीच्या कायद्यांतील ( इंडियन लिमिटेशन ॲक्ट ) आर्टिकल १५२ मध्यें सांगितलेली मुदत म्हणजे तीस दिवस ही किमानपक्षी पुरी व्हावी लागेल.

## ४. सहकारी मंडळ्यांचे विशेष अधिकार.

कोणत्या पक्षकारांनीं कोर्ट फी भरावयाची यासंबंधीं हुकूम करण्याचा कोर्टास अधिकार आहे. योग्य प्रसंगीं सदर कोर्टफी विशिष्ट सावकारानें भरावी असाही कोर्टास हुकूम करतां येईल, परंतु सहकारी मंडळीस कोण-

त्याही परिस्थितींत कोर्ट-फी भरण्यास सांगण्याचा कोर्टास अधिकार नाहीं. निवाड्याप्रमाणें कर्जदारानें हप्ता न भरल्यास कोर्ट सदर निवाडा बजावणी-साठीं कलेक्टरकडे पाठवील व कलेक्टर चुकलेल्या हप्त्याची रकम जमीनमह-सुलाचे वसुलीचें पद्धतीप्रमाणें वसूल करील. तथापि सरकार स्थानिक अधिकारी अगर सहकारी मंडळ्या यांना त्यांचे घेणें वसूल करण्याकरतां कोणत्याही कायद्यानें जे विशिष्ट हक्क मिळाले असतील त्या हक्कानुसार ते आपले घेणें रकमेची वसुली करू शकतील. त्यांचे बाबतींत असा निवाडा हप्त्याचे वसुली करतां कलेक्टरकडे न पाठविता तो वरील प्रमाणें सरकार स्थानिक अधिकारी व सहकारी मंडळ्या यांनीं आपले पद्धतीप्रमाणें वसूल केल्यास त्या गोष्टीस या कायद्याचा बाध येणार नाही.

५. निवाड्याची अंमलबजावणी.

कर्जदारानें कोणताही हप्ता चुकाविल्यास ज्या सावकारास तो घेणें असेल त्यानें ठराविक नमुन्यांत निवाड्याचे अंमलबजावणीचा अर्ज कोर्टाकडे करावयाचा आहे. असा अर्ज निवाडा राजिस्टर झाला असेल तरच करतां येणार आहे. निवाडा राजिस्टर होण्यापूर्वी अपील झालें नसले पाहिजे किंवा झालें असल्यास त्याचा निकाल व्हावयास पाहिजे. म्हणजे ज्या निवाड्याची अंमलबजावणी करावयाची त्या निवाड्याविरुद्ध जर अपील झालें असेल तर अपीलाचा निकाल झालेखेरीज निवाडा नोंदला जाणार नाहीं व त्याची अमलबजावणी होणार नाहीं. आपल्या नेहमींच्या कायद्याप्रमाणें हुकूमनामा झाल्याबरोबर जरी त्या विरुद्ध अपील झालें तरी अपील कोर्टांतून मनाई आणली नाहीं तर केवळ अपील केलें यासबबीवर हुकूमनाम्याची अंमलबजावणी थांबू शकत नाहीं. परंतु या कायद्यांतील या योजनेमुळें निव्वळ अपील दाखल झालें तर आपोआपच बजावणीचे काम थांबणार आहे. अम्मलबजावणीचे अर्जाचा नमुना कानू नंबर १० मध्यें सांगितला असून तो नमुना नंबर ८ चा आहे.

## सूट वगैरे बाबतींत हप्ता भरण्याची तहकुबी.

३९. जेव्हां जेव्हां प्रांतिक सरकारास द्यावयाच्या जमीन महसुला-

पैकीं अर्धा अगर अधिक महसूल भरण्यास कोणत्याही कारणावरून तहकुबी मिळालीं असेल अगर त्यांत सूट मिळाली असेल तेव्हां तेव्हां कलम ८, ९, ३२ अगर ३३ अन्वयें दिलेल्या निवाड्या अन्वयें त्यावर्षीं देणें असलेला संपूर्ण हप्ता व त्यानंतरच्या प्रत्येक वर्षीं देणे असलेल्या हप्त्यांची संपूर्ण रकम भरण्यास एक वर्ष तहकबी दिली पाहिजे.

(२) जेव्हां जेव्हां प्रांतिक सरकारांस द्यावयाच्या जमीन महसुलाच्या अर्ध्यापेक्षां कमी असा कोणताही भाग भरण्यास कोणत्याही कारणामुळें तहकुबी मिळाली असेल तेव्हां तेव्हां कलम ८, ९, ३२ अगर ३३ अन्वयें दिलेल्या निवाड्याअन्वयें त्या वर्षासाठींच्या हप्त्यांच्या अर्ध्या रकमेस व त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी देणें असलेल्या संपूर्ण रकमेस एक वर्ष तहकुबी दिली पाहिजे.

## विषयवारी

१ उद्देश व व्याप्ती.

### १. उद्देश व व्याप्ती.

कर्जदारानें करावयाची कर्जफेड ही त्यांच्या जमिनीच्या वार्षिक उत्पन्नांतून व्हावयाची असल्यामुळें एखादे वर्षी आजिबात पीक आलें नाहीं व त्यामुळें जर सरकारकडून सारामाफी किंवा सारा तहकुबी ही निम्मी किंवा त्याहून जास्त जाहीर करण्यांत आली तर कर्जदाराकडून येणें असलेला सदर सालचा हप्ता वसूल केला जाणार नाहीं. तसेंच जर एखाद्या वर्षी निम्याहून कमी सूट अगर तहकुबी सारावसुलींत मिळाली तर सदर सालीं हप्त्याची फक्त निम्मी रकम कर्जदाराकडून वसूल केली जाईल. परंतु एखादें वर्षी कर्जदारास हप्त्याची संपूर्ण माफी अगर निम्मी माफी मिळाली तर तो हप्ता चुकणार नाहीं. तो पुढील वर्षी वसूल केला जाईल व त्यापुढील हप्ते एकेक वर्ष पुढें ढकललें जातील.

## कर्जदारानें कर्जफेडीपूर्वी मालमत्ता दुसऱ्याचें नांवें करून देणें व्यवहारोपयोगी होणार नाहीं.

**४०.** कोणताहि कायदा अगर करार विरुद्ध असला तरी ४१ व्या कलमांतील ठराव लक्ष्यांत घेऊन या कायद्यान्वयेंच्या कोणत्याहि कामांत किंवा दिलेल्या निवाड्यांत पक्षकार असलेल्या कर्जदारानें आपल्या मालकीची कोणतीहि मालमत्ता त्याच्या सर्व कर्जांची फेड केली जाण्यापूर्वी दुसऱ्याच्या नांवें करून दिल्यास ती गोष्ट व्यवहारोपयोगी समजण्यांत येणार नाहीं; पण प्रांतिक सरकारची आगाऊ मंजुरी मिळविली असल्यास अशा व्यवहारास बाध येणार नाहीं.

### विषयवारी

| | |
|---|---|
| १ उद्देश व व्याप्ती. | २ शेतकऱ्यांना कर्ज द्यावयाचें झाल्यास. |

**१. उद्देश व व्याप्ति**

शेतकरी कर्जदाराना कर्जातून मुक्त करण्यासाठीं या कायद्याची योजना आहे. परंतु तें कर्ज त्याच्या मिळकतीच्या उत्पन्नातून फेडावयाचें आहे. म्हणून ती मिळकत त्याच कर्जदाराच्या नांवावर असणें हें अत्यंत जरूरीचे आहे. त्यामुळें या कलमाची योजना करणें भाग पडलें आहे. हें कलम जर घालण्यांत आलें नसतें तर सावकारांची कर्जतोड झाली असती परंतु रक्कम वसुलीस मात्र साधन उरलें नसतें. अशा रीतीनें त्यांची दोन्ही बाजूंनीं कुचंबणा झाली असती त्याच दृष्टीनें कलम ५३ ची ही मांडणी करण्यांत आली आहे.

**२. शेतकऱ्यांना कर्ज द्यावयाचें झाल्यास.**

या कलमांअन्वयें शेतकऱ्यांनीं आपली मिळकत दुसऱ्यांचे नांवें करणें निरुपयोगी असल्यामुळें व यापुढें शेतकऱ्यांनीं कर्जे काढूं नयेत असें कोठें लिहिलेलें नसल्यामुळें एकाद्या सावकारास शेतकऱ्यास कर्ज द्यावयाचे

झाल्यास त्यानें प्रथम अशा शेतकऱ्यानें या कायद्याखाली अर्ज केला आहे कां नाहीं याची खात्री करून घेणें जरूर आहे. अर्ज केला असल्यास त्याची जी कर्जतोड होईल तिचा बोजा मिळकतीवर पडणार आहे. त्यामुळें असें कर्जदेणारांस कर्जदाराकडून कांहीं तारण मिळूं शकणार नाहीं. बारा हत्ते पुरे होईपर्यंत त्यास त्या मिळकतीचा फायदा कांहींही होऊं शकणार नाहीं. मात्र जर मिळकतीची किंमत पुष्कळ असेल तर कर्जतोड करून जें कर्ज ठरलें असेल ती रक्कम कोर्टाच्या परवानगीनें कोर्टांत भरून त्यांस कर्जदाराबरोबर व्यवहार करतां येईल.

## कोर्टास कर्जफेडीसाठीं कर्जदाराच्या मालमत्तेची विक्री करण्याबद्दल हुकूम देण्याचा अधिकार.

**४१.** कोर्टाची किंवा निवाड्याविरुद्ध अपिलाची सुनावणी करणाऱ्या कोर्टाची कोणत्याहि वेळीं कर्जदाराच्या मालमत्तेचा कोणताही भाग त्याच्या कर्जाच्या किंवा कांहीं भागांच्या फेडीकरितां विकला पाहिजे अशी खात्री झाल्यास अशा कोर्टास निर्दिष्ट केलेल्या मुदतींत अशा कारणासाठीं मालमत्तेच्या अशा भागाची विक्री करण्याची कर्जदारास परवानगी देण्याचा अधिकार आहे. जर सदरहू कर्जदार तो भाग तशा रीतीनें विकण्यास चुकेल तर अशा कोर्टास तो भाग विकण्याबद्दल कोर्टाच्या अंमलदारास हुकूम करण्याचा अधिकार आहे. या कलमान्वयें विक्री करण्याबद्दल हुकूम झालेली मालमत्ता अशा अंमलदारानें ठरविलेल्या रीतिनें विकली पाहिजे.

मात्र इतकेंच कीं या कलमान्वयें विकण्याचा हुकूम केलेल्या मिळकतीचा भाग कलम ४७ च्या पोटकलम (२) अन्वयें विकण्यास पात्र असलेल्या भागापेक्षां अधिक असतां कामा नये.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ उद्देश व व्याप्ती. | ४ कलम ४७ (२) मधील योजना. |
| २ कर्जदाराच्या हिताकरितां. | ५ विक्रीच्या रकमेची विल्हेवाट. |
| ३ ठराविक रीतीनें विक्री. | ६ अपील. |

### १. उद्देश व व्याप्ती.

शेतकऱ्याचे कर्जनिवारण करण्याची या कायद्यात जी सर्वसाधारण व्यवस्था केली आहे त्यांत शेतकऱ्याची मिळकत शाबूत ठेवून मिळकतीचे उत्पन्नांतून हप्तेबंदीनें कर्जफेड व्हावी अशी योजना आहे तथापि कांहीं विशिष्ट परिस्थितींत कोर्टास असें दिसून आले कीं एकाद्या जमीनीचे उत्पन्न फार येत नाहीं परंतु कारखानदारीसाठीं अगर इतर बिगरशेतीचे कामासाठीं सदर जमीन विकल्यास भरपूर किंमत येत असून त्यामुळें शेतकऱ्याच्या कर्जाची फेड होण्याजोगी आहे तर कोर्ट किंवा अपील कोर्ट अशा परिस्थितींत मिळकत शाबूत ठेवण्याची योजना बाजूला सारूनहि मिळकत विकून कर्जदारास आपलें कर्ज फेडून टाकण्याची सवलत देईल.

### २. कर्जदाराच्या हिताकरितां.

जमीन विकण्याची जी परवानगी या कलमांअन्वयें मिळणार आहे ती कर्जदाराचें अशा विक्रीनें कल्याण होणार असेल तरच मिळावयाची आहे. असें हित साधारणः एखादी शेतीची जमीन बिगरशेतीच्या म्हणजे इमारत बांधणी, कारखानदारी वगैरे जास्त किंमत येणाऱ्या धंद्याचें कामीं लावून होणारें आहे.

### ३. ठराविक रीतीनें विक्री.

विक्रीची परवानगी देताना विशिष्ट मुदतींत विक्री घडून आली पाहिजे अशी अट कोर्ट घालील. त्या मुदतींत कर्जदारानें मिळकत विकली नाहीं तर कोर्ट आपल्या अधिकाऱ्यामार्फत विक्रीची व्यवस्था करील. अशी विक्री सदर अधिकाऱ्यानें कानू ११ मध्यें सांगितलेल्या पद्धतीनें केली

पाहिजे. कानू ११ मध्यें सांगितलेली ही पद्धत सिव्हिल प्रोसीजर कोड-प्रमाणें असेल असें म्हटलें आहे. म्हणजे पंचनामा, जाहीरनामा, लिलांव, या विषयीं सदर कोडमधील ऑर्डर २१ मध्यें सांगितलेल्या पद्धतीनें होईल.

## ४. कलम ४७ (२) मधील योजना.

कर्जदाराच्या मिळकतीच्या विक्रीची योजना ही मुख्यत्वेंकरून कर्जदार नादार ठरल्यास करावयाची आहे व त्या संबंधांत या कायद्यांतील प्रकरण ३ मध्यें सविस्तर विचार केला आहे. त्यामध्यें कलम ४७ ( २ ) मध्यें असें म्हटलें आहे कीं, कर्जदारांचें कर्ज फेडून टाकण्यासाठीं सिव्हिल प्रोसीजर कोड कलम ६० प्रमाणें जी मिळकत जप्तीस व विक्रीस पात्र असेल ती विक्रीला काढून कर्जदारांची कर्जफेड करावी. अशी मिळकत विक्रीस काढताना कर्जदारांस त्याच्या चरितार्थास लागणारी किमान जमीन मिळकत त्याचेसाठीं राखून ठेवून मगच बाकीचे मिळकतीची विक्री करावी असें म्हटलें आहे. अशी किमान मिळकत किती पर्यंत यावी यासंबंधांत जाहीरनामा काढण्याचा सरकारास अधिकार देण्यांत आलेला आहे. त्या अधिकारानुसार कर्जदारांचे जीवनाकरितां लागणारी मिळकत वगळून बाकीची कायद्याप्रमाणें जप्तीस व विक्रीस पात्र असणारी मिळकत विकली जाईल.

## ५. विक्रीच्या रकमेची विल्हेवाट.

सावकारानें कर्जफेडीसाठीं मिळकत विकण्याची परवानगी कोर्टानें द्यावी असें या कलमांत म्हटलें आहे. परंतु कर्जदारानें अशी परवानगी मिळवून जर एखादी मिळकत विकली तर त्या विक्रीचे पैसे त्या कामासाठींच लावलें जातील अशाबद्दल कांहींच योजना दिसत नाहीं. म्हणून कोर्टानें परवानगी देताना विक्रीचा पैसा कोर्टांत भरावा अशी अट घालणें अवश्यक आहे. मिळकत खरेदीकरणारानें पैसा कोर्टांत भरल्यावर त्याला जी पावती मिळेल ती खरेदीचा दस्तऐवज नोंदण्याचे वेळीं भरणा म्हणून उल्लेखिली जाईल.

६. अपील.

या कलमांतील कोर्टाचें कोणत्याही हुकुमावर रिव्हिजनमध्यें हायकोर्टांत जाता येईल असें वाटतें.

## वकील वगैरेस हजर रहाण्यास मनाई.

४२. कलम २४ व २८ खालील कामांत असेल तें शिवाय करून या कायद्यान्वयें कोर्टापुढें किंवा अपील कोर्टापुढें असलेल्या कोणत्याहि कामांत पक्षकारातर्फे हजर राहण्याचा कोणत्याही वकीलास हक्क असणार नाहीं.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं आपल्या पुढील कोणत्याहि कामातील पक्षकारांची तपासणी केल्यानंतर जर कोर्टाचें किंवा अपील कोर्टाचें असें मत होईल कीं, पक्षकारांपैकीं एखादा पक्षकार आपली बाजू मांडण्यास पुरेसा समर्थ नाहीं व न्याय रक्षणाच्या दृष्टीनें अशा पक्षकाराला वकीलाची मदत देणें जरूर आहे तर सदरहू पक्षकारास स्वखर्चानें आपला प्रतिनिधी म्हणून नेमण्यास परवानगी देण्याचा त्यास अधिकार आहे.

आणखी असेंहि ठरविण्यांत येत आहे कीं, या कायद्याच्या कोणत्याही कामांत वकीलांची फी ही खर्चाचा भाग म्हणून मंजूर करण्यांत येणार नाहीं

### विषयवारी

| | |
|---|---|
| १ उद्देश आणि व्याप्ती. | ३ कोर्टाची मर्जी. |
| २ वकीलांना हक्कानें कोणत्या कामांत हजर होता येईल. | ४ वकील फीचा खर्च. |

१. उद्देश आणि व्याप्ती.

मुंबईच्या वकीलांच्या कायद्यांत असें म्हटलें आहे कीं, दिवाणी अगर

फौजदारी कोर्टापुढें चालणाऱ्या कोणत्याही कामांत हजर राहण्याचा वकीलांना हक्क आहे. त्यांतच पुढें असें म्हटले आहे. की, इतर कायद्यांत जर अशा हक्कांबद्दल कांही सांगितलें असेल तर त्याबाबतींत वकीलांना हजर राहतां येणार नाहीं. हें कलम जर या कायद्यांत घालण्यांत आलें नसतें तर या कायद्यांतील सर्व प्रकरणें दिवाणी कोर्टापुढें चालणार असल्यामुळें वकीलांना बॉम्बे प्लीडर्स ॲक्ट १९२० च्या कलम ८ प्रमाणें सर्व बाबतींत हजर राहतां आलें असतें. परंतु या कलमांत त्या हक्कावर नियंत्रण घालण्यांत आलें असल्यामुळें या कलमांत सांगितलेल्या कलमापुरतेंच हक्कानी हजर वकिलांना राहतां येईल.

## २. वकीलांना हक्कानें कोणत्या कामांत हजर होता येईल.

१९३९ च्या कायद्यांत वकीलांना कोणत्याच कामांत हजर राहतां येत नसे. या कलमानें त्यांना गहाणस्वरुपी खरेदीच्या अर्जाचें कामीं व फसवणूकीनें किंवा लबाडीनें सावकाराचें कर्ज बुडविण्यासाठीं केलेले व्यवहार रद्द करण्याचे अर्जाचे कामीं हक्कानें हजर राहता येईल.

या संबंधांत या कायद्याचे हेतू व कारणें सांगतांना असें सांगण्यांत आले होते कीं, गहाणस्वरुपी खरेदी खताचे अर्जाचे कामीं फक्त वकीलांना परवानगी देण्यांत आलेली आहे. सिलेक्ट कमीटीनें या संबंधांत असें म्हटले आहे कीं, " कलम २४ प्रमाणें चालणाऱ्या गहाणस्वरुपी खरेदी खताचेंकामीं अगर कलम २८ प्रमाणें स्थावर मिळकतीच्या हक्कांचे बाबत म्हणजे लबाडीनें केलेली खरेदी, विक्री व गहाण यांचे व्यवहार या बाबी वगळून बाकीच्या कोणत्याही कामांत साधारणपणें कोर्टापुढें अगर अपील कोर्टापुढें वकीलांना परवानगी देण्यांत येऊ नये. त्या दृष्टीनें आम्ही कलमांत दुरुस्ती केलेली आहे. "

## ३. कोर्टाची मर्जी.

सामान्यतः या कायद्याखालील प्रकरणांत वकीलांना परवानगी देण्यांत येणार नाहीं तथापी पक्षकारांची तपासणी करून असें मत झालें कीं एखाद्या पक्षकारास आपली बाजू मांडता येत नाहीं व त्यामुळें त्याचेवर अन्याय

होण्याचा संभव आहे, तर कोर्टाला तशी परवानगी वकीलास देता येईल. अशी परवागी मागण्याकरितां पक्षकारानें अर्ज केला असतां कोर्ट त्यावर हुकूम करील व मग पक्षकारास वकील आणतां येतील. अशा वकीलाचा खर्च या पक्षकारास स्वतःच करावा लागेल,

४. वकील फीचा खर्च.

दिवाणी कोर्टाचा सामान्य शिरस्ता असा आहे कीं, जिंकणाऱ्या पक्षकारनें आपल्या वकील फी सुद्धां सर्व खर्च विरूध्द बाजूकडून वसूल करावा. परंतु या कायद्यांत कोणत्याही परिस्थितींत वकील फी स्वतंत्र रितीनें कामाचा खर्च म्हणून देता येणार नाहीं. ती ज्याची त्यानें सोसली पाहिजे.

## अपीलें

४३. दुसऱ्या कोणत्याही कायद्यांत कोणताही मजकूर असला तरी आणि कलम ५१ मध्यें अन्य तऱ्हेनें तरतूद करण्यांत आली असेल ते खेरीज करून.

(१) कलम ८ चें पोटकलम ( ३ ) याअन्वयें केलेल्या प्रत्येक हुकुमावर.

(२) कलम १७ अन्वयें केलेल्या प्रत्येक हुकुमावर.

(३) कलम २४ अन्वयें केलेल्या प्रत्येक हुकुमावर.

(४) कलम २८ अन्वयें केलेल्या प्रत्येक हुकुमावर.

(५) कलम ३६ च्या पोटकलम २ अन्वयें केलेल्या प्रत्येक हुकुमावर

(६) कलम ८ चे पोटकलम ४ अन्वयें किंवा कलम ९ अन्वयें केलेल्या तडजोडीच्या स्वरुपांतील निवाडा किंवा जो निवाडा करकरण्यापूर्वी कलम ३३ च्या पोटकलम १ अन्वयें केलेल्या सावकाराची त्यासंबंधीची कबूली मिळविण्यांत आलेली असेल असा सदर कलमान्वयें केलेला निवाडा किंवा जो निवाडा करण्यापूर्वी कर्जदारानें किंवा सावकारापैकीं कोणीही कर्जदारकडून येणें अस-

लेल्या कर्जाचा रकम ठरावर्णे कोर्टास शक्य होण्यासाठीं पुरावा हजर केलेला नसेल असा निवाडा सोडून या कायद्यान्वयेंच्या प्रत्येक निवाड्यावर अपील करतां येईल.

(२) कोर्टाच्या निकालावर डिस्ट्रिक्ट जज्जाच्या कोर्टाकडे अपील करतां येइल;

(३) या कायद्यान्वयें कोर्टाचा कोणताही निर्णय, हुकूम किंवा निवाडा यावर कोणतेंही दुसरें अपील करता येणार नाहीं.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ कोर्टफी. | ४ कोणत्या निवाड्यावर अपील नाहीं. |
| २ मुदत. | ५ डिस्ट्रिक्ट कोर्ट |
| ३ रिव्हीजन. | |

### १. कोर्टफी.

कोणत्या अपीलांस किती कोर्टफी स्टँम्प लावावा याचा खुलासा पुढील कलमांत ( कलम ४४ ) पोटकलम (१) (३) व ( ४ ) मध्यें करण्यांत आला आहे. त्यानुसार कोर्टाबाहेरील तडजोडीबाबतच्या हुकमावरील अपीलास व ऋणको हा कायद्याप्रमाणें 'कर्जदार' आहे कां नाहीं व त्याचे कर्ज पंधरा हजार रुपयाहून जास्त आहे कीं, नाहीं याबाबतच्या हुकुमांवरील अपीलांस दोन रुपये कोर्टफी लावावी लागेल. याखेरीजच्या इतर निवाड्यावरील अपीलांस प्रत्येक शंभर रुपयांस एक रुपया या दरानें जास्तीतजास्त पन्नास रुपये कोर्टफी लागेल. कलम २४ व २८ अन्वयें करण्यांत आलेल्या हुकुमाविरुद्धच्या अपीलांस लागणारी कोर्टफी या कायद्यांत अढळून येत नाहीं. तथापि या कायद्यांस कलम ४६ प्रमाणें सिव्हिल प्रोसिजर कोडमधील बाबी लागूं व्हावयाच्या असल्यामुळें कलम २४ व २८ यामधील हुकूम हे हुकूमनाम्याच्या स्वरूपाचे नसल्यामुळें त्यांचे वरील अपीलांस कोर्टफी ॲक्टच्या शेडयूल २ मधील आर्टिकल ११ मध्यें

सांगितल्या प्रमाणें आठ आण्याचे (हल्ली १० आण्याचें) कोर्टफी टिकीट लावावें लागेल.

## २. मुदत.

या कायद्यांत अपिलासाठीं मुदत सांगितलेली नाहीं. १९३९ सालच्या कायद्यांत अपीलाच्या मुदतीसंबंधीं एक स्वतंत्र कलम नं. १० चें होतें व त्यांत साठ दिवसांत अपील दाखल करावें असें म्हटलें होते.

या कायद्यांत तसा स्पष्ट निर्देश नसल्यामुळें ती मुदत ठरविण्यांकरितां या कायद्यांतील कलम ४६ पहावें लागणार आहे. सदर ४६ व्या कलमांत असें म्हटलें आहे कीं, या कायद्यांत प्रत्यक्ष रीतिनें वेगळे सांगितलें असेल तें खेरीज करून इतर सर्व बाबतींत सिव्हिल प्रोसीजर कोडमधील बाबी या कायद्यांतील प्रकरणांस लागूं पडतील. म्हणून त्या कोडमधील डिस्ट्रिक्ट कोर्टांत दाखल करावयाच्या अपिलांना जी मुदत इंडियन लिमिटेशन ॲक्टच्या आर्टिकल १५२ मध्यें सांगितली आहे तीच मुदत म्हणजे निकाल तारखेपासून तीस दिवस ही या कायद्यांखालील अपीलांना लागली पाहिजे. [ पहा ४३ मद्रास ५१, ३४ अलाहाबाद ४९६, १३ कलकत्ता २२१, ऑ. इं. रि. १९२८ लाहोर ४८८ ].

## ३. रिव्हिजन.

या कायद्यांत रिव्हिजनची प्रत्यक्ष अशी सोय करण्यांत आलेली नाहीं. परंतु या कायद्यांतील प्रकरणास सिव्हिल प्रोसिजर कोडमधील कार्यपद्धती लागणार असल्यामुळें त्यांतील कलम ११५ प्रमाणें या कलमांत ज्या हुकूमाविद्ध अपीलें सांगण्यात आलेली नाहींत त्या हुकूमावर रिव्हिजनचा अर्ज करतां येईल.

## ४. कोणत्या निवाड्यावर अपील नाहीं.

सर्व साधारणपणें या कायद्याखालील निवाड्यावर अपील सांगितलेले आहे. परंतु कलम ८ पोटकलम ४ आणि कलम ९ अन्वयें झालेल्या तडजोडीच्या निवाड्यावर अपील होणार नाहीं. तसेंच सर्व सावकारांच्या कबूली

कलम ३३ अन्वयें जो निवाडा होईल त्या विरुद्धही अपील चालणार नाहीं. त्याच प्रमाणें कर्जदाराचें देणे ठरविणाऱ्या दृष्टीनें कर्जदारानें अगर त्याच्या सावकारानें कोर्टापुढें पुरावा हजर केला नाहीं एवढ्या सबबीवरही कोर्टानें केलेल्या निवाड्याविरुद्ध अपील होणार नाही.

५. डिस्ट्रिक्ट कोर्ट.

या कायद्याखालील अपीलें ही डि. जज्जाच्या कोर्टांत दाखल करावयाची असल्यामुळें तीं अपीलें ऐकण्याकरतां डि. जज्जाला आपल्या असि. जज्जांकडे तीं पाठविता येतील. तीं त्यानें स्वतःच ऐकलीं पाहिजे असें नाहीं.

## कोर्ट फी

४४ (१) सन १८७० च्या कोर्ट फी कायद्यांत कोणताहि मजकूर असला तरी, या कायद्यान्वयें चालावयाच्या कामकाजांसंबंधात द्यावयाच्या कोर्ट–फी पुढील दरांनीं आकारण्यांत येतील.

(१) कलम ४ पोटकलम (१) किंवा कलम ८ पोटकलम (४) अन्वयें किंवा कलम ९ अन्वयें निवाड्यास—एक रुपया.

(२) भाग (१) मध्यें निर्दिष्ट केलेल्या निवाड्याव्यतिरिक्त निवाड्यास—निवाड्याच्या रकमेच्या दर शंभर रुपयांस किंवा त्याचे भागास एक रुपया अशी फी जास्तीतजास्त रुपये पन्नास इतकी असेल.

(३) कलम ८ पोटकलम (३) अन्वयें किंवा १७ पोटकलम (२) अन्वयें कोर्टाच्या निकालाविरुद्ध अपीलास—दोन रुपये.

(४) भाग (३) मध्यें निर्दिष्ट केलेल्या अपिलाव्यतिरिक्त अपीलास—निवाड्याचा रकमेच्या दर शंभर रुपयास किंवा त्याच्या भागांस एक रुपया इतकी असेल.

[२] कोणत्याहि कायद्यांत कोणताहि मजकूर असला तरी या कायद्याअन्वयें चालावयाच्या कामकाजासंबंधातील कोर्टफी ही, ज्या पक्षकारांस खर्च भरण्याचा हुकूम करण्यांत आला असेल त्या पक्षकाराच्या मिळकतीवरील प्रथमचा बोजा असेल आणि ती ठरविण्यांत येईल त्या रीतिनें वसूल करतां येण्याजोगी असेल.

## विषयवारी


१. कोर्टफी वाढीचा कायदा लागू होईल काय ?
२ कोर्टफी न सांगितलेल्या अपीलास किती स्टॅंप द्यावा
३ कोर्टफीचा बोजा व वसूल करण्याची पध्दत


### १. कोर्टफी वाढीचा कायदा लागू होईल काय ?

या कायद्याखालील कोर्ट-फी ही कोर्ट-फी ॲक्टमधील कोर्ट-फी नसल्यामुळें त्या कोर्ट-फीमध्यें १९४३ च्या कोर्ट-फी वाढीच्या कायद्यानें होणारी सवापटीची वाढ होणार नाही. त्यामुळें या कलमामध्यें जे कोर्ट-फी स्टॅंप सांगितलें असतील तेवढ्याच रकमेची तिकीटे लावली असतां कायदेशीर होणार आहे. (पहा ४८ बॉम्बे लॉ. रिपोर्टर १०८= ऑल इंडिया रिपोर्टर १९४६ मुंबई ३९९.) परंतु या कायद्याखालील ज्या अपीलांना कोर्ट-फी स्पष्ट सांगण्यांत आलेली नाही व जी फी कोर्ट-फी ॲक्ट खाली लावावी लागणार आहे त्यावर कोर्ट-फी वाढवून स्टॅंप लावावा लागेल.

### २ कोर्ट फी न सांगितलेल्या अपीलांस किती स्टॅंप द्यावा.

कलम ४३ विषयावारी ४ मध्यें या बाबतींत विस्तृत खुलासा केलेला आहे. त्याप्रमाणें अशा अपीलांना ८ आण्याचा ( कोर्ट फी वाढीसह १० आणे) स्टॅंप लावावा लागेल.

### ३ कोर्ट फीचा बोजा व वसूल करण्याची पद्धत.

इतर कोणत्याही कायद्यांत कांहीही सांगितलें असलें तरी ज्या पक्षकारावि-

रूध्द खर्चाचा हुकूम झाला असेल त्या पक्षकाराच्या मिळकतीवर त्या खर्चाचा बोजा प्रथमचा धरण्यांत येणार आहे व ही खर्चाची रकम वसूल करण्याची पध्दती कानू नं १२ मध्यें सांगण्यांत आलेली आहे. त्याप्रमाणें थकलेला जमीनसारा वसूल करण्याची जी पध्दत लँडरेव्हिन्यू कोडमध्यें सांगण्यांत आली आहे ती पध्दत कोर्ट फी वसूलीमध्यें अनुसरली जावयाची आहे .

## नोटीस कशी बजवावी

४५ या कायद्याप्रमाणें बजावणें जरूर असेल अशी कोणतीही नोटीस, सिव्हिल प्रोसीजर कोड १९०८ च्या कायद्यांत तरतूद केली आहे त्यारीतीनें बजावण्यांत आली पाहिजे; आणि जेव्हां त्या बाबतींत कानू करण्यांत आलेले असतील तेव्हां ठरविण्यांत येइल अशारीतीनें बजावण्यांत आली पाहिजे.

## सिव्हिल प्रोसीजर कोड मधील पद्धती कामकाजाला लागूं असणें.

४६. या कायद्यांत अन्य तऱ्हेनें ऊघडपणें तरतूद करण्यांत आली असेल तें खेरीज खरून सन १९०८ च्या सिव्हिल प्रोसीजर कोड-प्रमाणें या कायद्याखालील सर्व कामकाजें चालतील.

---

# प्रकरण ३ रें

## नादारी बाबतची कामें

## कोर्टानें कर्जदारांस कांहीं विशिष्ट परिस्थितींत नादार म्हणून जाहीर करणें.

४७. [१] प्रकरण २ अन्वयें च्या कामांत कोणत्याही वेळीं जर

कोर्टास असें आढळून येईल कीं, कर्जदाराची प्राप्ती व जगम मालमत्ता ह्या कर्जदारांस देणे असलेल्या कर्जाची फेड बारा वार्षीक हप्त्यांतही करण्यांस पुरेशीं नाहीं. तर कर्जदार नादार असल्याचें ठरविणारा हुकूम कोर्टानें केला पाहिजे.

[२] कर्जदार नादार असल्याचा ठराव केल्यानंतर कोर्टानें सिव्हिल प्रोसीजर कोड १९०८ मधील कलम ६० अन्वय जप्तीस व विक्रीस पात्र असलेल्या त्या कर्जदाराच्या मिळकतीपैकीं जो भाग प्रांतिक सरकार वेळोवेळीं सरकारी गॅझेटांत कर्जदार व त्याचेवर अवलंबून असणारे यांस कमीतकमी त्यांच्या उपजीविकेकरतां जरूर आहे असें जाहीर करील तो सोडून अशा कर्जदाराला असलेल्या सर्व कर्जाची फेड करण्यास लागणारा मिळकतीचा भाग अशा कर्जदाराला असलेल्या सर्व कर्जाच्या फेडीदाखल सर्व बोजापासून मुक्त म्हणून तावडतोब विकला पाहिजे असा हुकूम दिला पाहिजे.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १. कर्जदार नादार केव्हां ठरवला जाईल | ३ कोणती मिळकत विकली जाईल. |
| २. कर्जदाराच्या उपजीविकेची सोय | ४ " अॅड्ज्यूडीकेट " या शब्दाचा उपयोग |

### १. कर्जदार नादार केव्हां ठरविला जाईल.

निवाडा करतांना कोर्टानें सावकारांच्या कर्जाची रकम कर्जदारानें किती वार्षिक हप्त्यांत फेडावी हें त्याचें निव्वळ वार्षिक उत्पन्न ध्यानांत घेऊन ठरवावयाचे आहे. असें ठरवितांना बारा वार्षिक हप्त्याहून जास्त हप्त्यांत कर्जाची फेड करावयाची नाही. व अशी फेड उत्पन्नातुन व त्याच्या जंगम मिळकतीतून बारा वर्षांत होत नाहीं असें आढळून आल्यास कोर्टानें

सदर कर्जदारास नादार ठरविलेंच पाहिजे.

२ कर्जदाराच्या उपजीविकेची सोय.

कर्जदार नादार ठरल्यानंतर त्याचीं देणीं फेडण्याकरितां कोर्टानें कर्जदाराच्या मिळकतीचा पुरेसा भाग विकावयाचा आहे. मात्र असें करताना कर्जदाराच्या उपजिवीकेस आवश्यक असा जो भाग सरकार वेळोवेळीं ठरविल तो भाग मात्र विकला जावयाचा नाहीं. असा भाग किती हें ठरविण्याचा अधिकार पोटकलम २ अन्वयें प्रांतिक सरकारनें स्वतःकडे घेतला आहे व त्यानुसार मुंबई सरकारनें ता. २३ जून १९४७ रोजी सरकारी गॅझेट भाग चार ब पान ३६८ या ठिकाणीं नं. ४४६०/४५ चा जाहीरनामा काढून ठरविलें आहे कीं, सुपारी व मसाल्याच्या बागाईत चार एकर जमिनी किंवा पाटाच्या पाण्याखालीं भिजत असलेल्या, तांदूळाच्या अगर नारळाच्या ६ एकर जमिनी किंवा कोरड वाहू अगर ३०. रु. सान्याच्या १८ एकर जमिनी या क्षेत्रफळानें ज्या जमिनीचा अधिक विस्तार आहे अशा कमींतकमी उपजीकेस आवश्यक अशा ठरविल्या आहेत. म्हणजे वर वर्णन केलेल्या जमिनी कर्जदाराकडे निर्वेध राहावयाच्या आहेत.

३ कोणती मिळकत विकली जाईल.

सिव्हिल प्रोसिजर कोडमधील कलम ६० मध्यें कर्जदाराच्या कोणत्या मिळकती जप्तीस व विक्रीस पात्र आहेत याचा खुलासा केलेला आहे. त्या खुलाशानुसार ज्या मिळकती जप्तीस व विक्रीस पात्र असतील तेवढ्याच कर्जांच्या फेडीसाठीं जसजशा व जेवढ्या लागतील तेवढ्याच कोर्टानें विक्रीस काढावयाच्या आहेत. त्यांतही कर्जदाराच्या उपजीविकेस लागणारी मिळकत बाजूस काढून ठेवावयाची आहे. त्यामुळें कर्जदाराची स्वयंपाकाचीं भांडी, शेतीचीं अवजारें, वापरते कपडेलत्ते, आंथरूण पांघरुण, जनावरें, पडळी या वस्तू विकल्या जाणार नाहींत. त्याखेरीज ज्या चैनीच्या व शोकाच्या वस्तू असतील त्या विक्रीच्या वेळीं कोर्ट लक्षांत घेईल.

४ 'ॲड्‌ज्यूडिकेट' या शब्दाचा उपयोग.

या कलमांत नादार ठरविण्यासाठीं जो शब्दप्रयोग करण्यांत आला

आहे. तो अडॅज्यूडिकेट हा आहे. नादारी कायद्यांत ॲडज्यूडिकेट या शब्दानें कच्चा नादार हा अभिप्रेत होतो. परंतु या प्रकरणाची एकंदर रचना पाहिली असतां शेतकरी कर्जदारांस ऋणमुक्त करून टाकण्याची असल्यामुळें ॲडज्यू-डिकेट या शब्दाबरोबरच डिस्चार्ज असा शब्दप्रयोग केला असता तर जास्त समर्पक झाला असें वाटते. असतां

## नादारी बाबतचीं कामें चालविण्याची रीति.

४८. कलम ४७ अन्वयें केलेला नादार ठरविणारा हुकूम हा सन १९२० चा प्रॉव्हिन्शियल इन्सॉल्व्हन्सी ॲक्ट याच्या २७ व्या कलमान्वयें आपले अधिकार चालवून अधिकारी कोर्टानें केलेला हुकूम म्हणून समजण्यांत आला पाहिजे.

### विषयवारी

**१. प्रॉ.इन्सॉलव्हन्सी ॲक्ट कलम २७.**

नादारी कायद्यांतील कलम २७ हें कच्चा नादार ठरविण्याबाबतचे आहे व त्या कलमांत असें म्हटलें आहे कीं अशा हुकुमामध्यें कर्जदारानें पक्का नादार ठरविण्याचा अर्ज केला पाहिजे ती मुदत कोर्टानें लिहावी असें म्हटले आहे-

## नादाराच्या मिळकतीची वाटणी

४९. कलम ४७ अन्वयें नादाराच्या मिळकतीची विक्री करून आलेली किंमत कलम ३२ च्या पोटकलम २ मधील भाग ३ मध्यें निर्दिष्ट केलेल्या अग्रतेच्या क्रमानें वाटली पाहिजे.

### विषयवारी

**१. सावकारांची कर्जें कोणत्या क्रमानें फिटतील.**

या कायद्याच्या कलम ३२ मधील पोटकलम २ (३) प्रमाणें कोणत्या

क्रमानें कर्जें फेडली पाहिजेत तो क्रम असाः सरकारी कर्जें, स्थानिक अधिकाऱ्यांचीं कर्जें, रिसोर्स सोसायटयांची कर्जें, बी बियाणासाठी दिलेली कर्जें, तारणावरील कर्जें; सरकारी स्थानिक अधिकारी सहकारी मंडळ्या वगैरेचीं, बिनतारणी कर्जें; सहकारी मंडळ्यांची इतर कर्जें व इतर बिनतारणी कर्जें.

## इतर कोर्टांत नादारीत अर्ज करण्यास मनाई

५०. कर्जदाराच्या नादारी संबधाचा कोणताही अर्ज किंवा कामकाज दुसऱ्या कोणत्याही कोर्टांत चालणार नाही अगर अशा कोर्टानें त्याची विल्हेवाट लावता कामा नये.

## अपीलास मनाई

५१. नादार इसमानें आपल्या मिळकतीसंबंधी व कर्जासंबंधी महत्वाची माहीती दिली नाहीं. या मुद्दयाखेरीज करून या प्रकरणान्वयें केलेल्या कोणत्याही हुकूमावर कोणतेही अपील चालणार नाहीं.

## विषयवारी

### १. अपील कोणत्या मुद्यांवर होईल.

या प्रकरणांत कर्जदाराच्या नादारी बाबत कोर्टास एकंदर तीन ठिकाणीं हुकूम करतां येतील. एक नादार ठरविण्याबाबत; दोन किती मिळकत विक्रीस काढावी याबाबत; तीन-वाटणीबाबत. यांपैकीं कर्जदारास नादार ठरविण्यात कोर्टानें चुक केली आहे असें म्हणताना अपेलंटला कर्जदारानें आपले कर्जासंबंधी व मिळकती संबंधी माहीती छपनवुन ठेवुन ती त्यानें दिली नाहीं व म्हणून तो नादार ठरला या मुद्यावर त्यास अपील करतां येईल. असाच मुद्दा इतर दोन्ही हुकूमांच्या वरील अपीलांत घेतां येईल. हें अपील हुकूम झाल्यापासून एक महिन्यांत केलें पाहीजे व त्यास दहा आण्याचा स्टँप लावला पाहीजे.

# प्रकरण ४ थें

## किरकोळ

### कोर्टापुढे या कायद्याप्रमाणें काम चालूं असतानाची मुदत वगळणें

**५२.** कोणत्याहि इसमाकडून येणें असलेल्या कर्जाच्या संबंधांत कोणताहि दावा अगर काम दाखल करणेंसाठीं मुदत मोजताना अशा कर्जाच्या संबधांत जर तो इसम कोर्टाकडून किंवा अपील-कोर्टाकडून कर्जदार नाहीं असें ठरविण्यांत आलें तर कोर्टापुढें ज्या मुदतींत काम चालूं होते ती मुदत वगळण्यांत आली पाहिजे.

### विपयवारी

**१ उद्देश व व्याप्ति.**

इंडियन लिमिटेशन अ‍ॅक्ट १९०८ च्या १४ व्या कलमाशीं हें कलम जुळतें आहे. एखाद्या दाव्यास मुदतीची हरकत येत असेल व तोच दावा त्याच कारणांकरितां दुसऱ्या एखाद्या कोर्टात वादीनें दक्षतेनें चालविला असेल व अशा दुसऱ्या कोर्टांत तो दावा काढून घेऊन त्यांस त्यास पुनः योग्य कोर्टांत लावावयाचा असेल तर त्या दुसऱ्या कोर्टांत गेलेला काळ कायद्यामध्यें जरूर असणाऱ्या मुदतींत मिळवुन तो दावा मुदतींत आहे असें त्यांस दाखवितां येईल असें इंडियन लिमिटेशन अ‍ॅक्टाच्या वरील कलमांत म्हटलें आहे. तेंच तत्त्व या कलमांत प्रत्यक्षपणें अनुसरलें आहे. व त्यामुळें इंडियन लिमिटेशन अ‍ॅक्टमधील कलम १४ या कायद्याखालील कामांस लागू होते कां नाही या प्रश्नाचा आतां विचार करण्याची जरूर राहिलेली नाहीं. एखाद्या सावकारानें १९४५ सालीं प्रॉमिसरी नोट लिहुन एकाद्या शेतकऱ्यास कर्ज दिलें व असा शेतकरी या कायद्याप्रमाणें कर्जदार आहे असें कबूल न करतां तडजोड कोर्टाकडे

अर्ज केला. त्या अर्जात प्राथमिक मुद्दयाचा विचार होताना सदर शेतकरी कर्जदार ठरला नाही व असा अखेरचा निर्णय १९४९ मध्ये झाला व आतां सावकारांस आपलें घेणें वसूल करण्यांकरितां नेहमींच्या दिवाणी कोर्टात दावा लावणें भाग पडलें, तर प्रॉमिसरीनोट झाल्यापासून दावा आठ वर्षांनी दाखल होत असल्यामुळें तो दावा सामान्यतः मुदतीबाहेर ठरला असता परंतु १९४७ ते १९४९ या दोन सालांत या कायद्याखालील अर्जाचे काम चालू असलेमुळें ती दोन वर्षे नेहमींच्या आठ वर्षांतून वगळून जर दावा मुदतीच्या कायद्याप्रमाणें मुदतींत येत असेल तर तो चालेल. या उदाहरणांत एकंदर आठवर्षांतुन दोन वर्षे वगळली असतां सहा वर्षे राहतात व शेतकरी कायद्याप्रमाणें सहा वर्षां ही मुदत दिलेली असल्यामुळें तो दावा मुदतींत आहे असे समजावें लागले.

## कर्जाची फेड होईपर्यंत उभीं पिकें वगैरे दुसऱ्याचें नांवे करून देणेंची नाहींत

**५३.** (१) या कायद्याअन्वयेंच्या कोणत्याहि कामकाजांस किंवा निवाड्यांस पक्षकार असलेल्या, आणि एखाद्या रिसोर्स सोसायटीच्या किंवा रद्द केलेल्या कायद्याच्या कलम ७८ अन्वयें किंवा या कायद्याच्या कलम ५४ अन्वयें कर्ज देण्यास अखत्यार असलेल्या कोणत्याहि इसमाचा रद्द केलेल्या कायद्याअन्वयें पिकांचा खर्च चालविणेंसाठीं त्याला दिलेल्या किंवा या कायद्याअन्वयें हंगामी खर्चासाठीं त्याला दिलेल्या कर्जामुळें कर्जदार असलल्या कोणत्याहि कर्जदारानें प्रसंगाप्रमाणें सदरहू सोसायटीच्या किंवा इसमाच्या आगाऊ परवानगीखेरीज उभीं पिकें किंवा आपल्या जमिनींत झालेला माल, असें कर्ज संपूर्ण फिटेपर्यंत दुसऱ्याचें नांवें करतां किंवा विकतां कामा नये.

(२) पोटकलम (१) चें उल्लंघन करून जो कोणी इसम उभें पकि किंवा आपल्या जमिनींत झालेले माल दुसऱ्याचे नांवें करून

देईल किंवा दुसऱ्यांस विकील तो, अपराधाची शाबिती झाल्यावर, सहा महिने मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा ५०० रुपये-पर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(३) ज्या कोर्टापुढें काम चाललें अगर ज्या कोर्टानें निवाडा केला अशा कोर्टाच्या लेखी तक्रारीशिवाय कोणत्याहि फौजदारी कोर्टाला या कलमाअन्वयें कोणत्याहि अपराधाची चौकशी करण्याचा अधिकार असणार नाहीं.

## विषयवारी


१ उद्देश व व्याप्ति
२ रद्द कायद्याचे ७८ वें कलम
३ गुन्ह्याचें स्वरूप


### १. उद्देश व व्याप्ति.

कर्जदाराचें १ ऑगस्ट १९४७ पूर्वीचें कर्ज जरी या कायद्यानें निवारण होणार असलें तरी शेतकऱ्याला सालोसाल पीक काढण्यांसाठीं पैशाची जरुरी लागत असते व त्यामुळे त्याच्या कर्जाचें चक्र एकसारखें फिरत रहातें आणि त्याची सावकारी पाशांतून कधींहि सुटका होत नाहीं. ही गोष्ट ध्यानांत घेऊन सरकारनें असें अर्ज माफक दरांत शेतकऱ्याना मिळावें म्हणून कांहीं खास अधिकृत सावकारांची नेमणूकी योजना या कायद्यांतील कलम ५४ प्रमाणें व १९३९ सालच्या कायद्याच्या कलम ७८ प्रमाणें केली आहे व होती. त्याबरोबरच असे जे पैसे सावकाराकडून मिळतील त्यांची व्यवस्थित रीतीनें त्वरित फेड होण्यासाठीं या कलमाची योजना करण्यांत आली आहे.

### २. रद्द कायद्याचें ७८ वें कलम.

रद्द कायद्याच्या म्हणजे १९३९ च्या कायद्याच्या कलम ७८ मध्यें कर्जदार शेतकऱ्यास पैसा पुरविण्यासंबंधीची व्यवस्था सांगितली होती. व त्यानुसार अधिकृत सावकारांची नेमणूकहि केलेली होती अशा सावकारांनीं

जे पैसे दिले असतील ते फिटले जावेत म्हणून त्यांचा उल्लेख या कलमांत आलेला आहे.

३. गुन्ह्याचें स्वरूप.

हें कलम या कायद्यांतील शिक्षा सांगणारे एकुलते एक आहे. उभे पीक किंवा शेतांत झालेला माल कर्जदारानें सावकाराच्या किंवा रिसोर्स सोसायटीच्या पूर्व परवानगीशिवाय विकल्यास किंवा नजरगहाण दिल्यास कर्जदाराविरुद्ध फौजदारी काम चालणार आहे. या गुन्ह्याची चौकशी 'समन्स' पद्धतीनें चालेल. व या गुन्ह्याबद्दलची फिर्याद तडजोड–कोर्टा-कडून लेखी आल्याखेरीज कोणतेही फौजदारी कोर्ट या गुन्ह्याची दखल घेऊं शकणार नाहीं. असें असल्यामुळें ज्या कोणास या कलमाखालील गुन्हा झाला म्हणून फिर्याद करावयाची असेल त्यानें प्रथम तडजोड कोर्टा-कडे अर्ज करुन सदर कोर्टाच्या निदर्शनास ती गोष्ट आणावी व सदर कोर्टानें जरूर ती चौकशी करून खात्री झाल्यास स्वतःच लेखी फिर्याद दाखल करावयाची आहे.

## कोणत्याही इसमास कर्जदारास कर्ज देण्याबाबत अखत्यार देण्याचा प्रांतिक सरकारचा अधिकार.

५४ (१) प्रांतिक सरकारास, सरकारी गॅझेटमध्यें जाहीरनामा प्रसिद्ध करून, या कायद्यान्वयेंच्या कोणत्याहि कामकाजांत पक्षकार असलेल्या अगर या कायद्यान्वयें ज्यांच्या कर्जाच्या बाबतींत तड-जोड करण्यांत आली आहे अशा कर्जदारास कर्ज देण्याचा अख-त्यार कोणत्याही स्थानिक प्रदेशांत कोणाहि इसमास देण्याचा अधि-कार आहे.

### विषयवारी

१. अधिकृत सावकार व ठरविलेल्या अटी. | २. कशासाठीं कर्ज मिळेल.

### १. अधिकृत सावकार.

कानू नं १४ मध्यें असें म्हटलेलें आहे कीं, ज्या सावकारास अधिकृत रीत्या नेमण्यांत येणार आहे त्यास नमुना नं. १० प्रमाणें परवाना दिला जाणार आहे. त्या परवान्यावर कोणत्या कारणासाठीं व कशा पद्धतीनें किती रकमा द्यावयाच्या आणि कोणच्या क्षेत्रांत सावकारानें व्यवहार करावा ती भौगोलिक मर्यादा व अटी असतील.

### २. कशासाठीं कर्ज मिळेल.

कानू नं. १४ मध्यें असें कर्ज कोणत्या कारणासाठीं द्यावयाचें याचा उल्लेख करतांना असें म्हटलें आहे कीं, हीं कर्जे फक्त हंगामी असलीं पाहिजेत व ती जास्तीत जास्त किती द्यावयाची याची मर्यादा जिल्ह्याच्या कलेक्टरनें कानू नं. १५ प्रमाणें ठरवावयाची आहे. हंगामी कर्ज म्हणजे कलम २ भाग १४ या ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें पुढील मे महिन्याच्या १५ व्या तारखेस किंवा त्यापूर्वी फेड करण्याजोगे कर्ज होय.

## कानू

५५. (१) सरकारी गॅझेटमध्यें जाहीरनामा प्रसिद्ध करून, आणि वेळोवेळीं पूर्वप्रसिद्धीच्या अटींस मात्र राहून, या कायद्याचे हेतू पार पाडण्याचे कारणासाठीं कानू करण्याचा प्रांतिक सरकारास अधिकार आहे.

(२) विशेषतः व वरील योजनेच्या सामान्यतेस बाध न येतां असे कानू पुढील सर्व किंवा कोणत्याहि गोष्टीबाबत असतील. त्या गोष्टी अशाः—

(अ) कलम २ भाग १३ अन्वयें ज्या कारणांसाठीं कर्जे देण्यांत येतील तीं कारणें;

(ब) कलम ४ पोटकलम (२) अन्वयेंच्या अर्जाचा नमुना आणि

त्यावर सही करण्याची, खरेपणाबद्दल दाखला देण्याची व तो दाखल करण्याची रीति;

(क) कलम ८ पोटकलम ( २ ) अन्वयेंच्या अर्जाचा नमुना व त्यावर सही करण्याची व खरेपणाबद्दल दाखला देण्याची रीति; तसेंच सदर कलमाच्या पोटकलम ( ३ ) प्रमाणें नोटीस देण्याची रीति;

(ड) कलम १४ अन्वयें नोटीस देण्याची व सर्वसामान्य नोटीस जाहीर करण्याची रीति आणि सदर कलमान्वयें दाखल करावयाच्या पत्रकाचा नमुना;

[इ] मिळकतीच्या याद्या, सावकारांच्या, कर्जदारांच्या, कर्जदारांस देणें व घेणें असलेल्या कर्जांच्या याद्या, मिळकतीबाबत किंवा सावकाराबाबत तपासणी, ज्यांवळीं कर्जदारानें कोर्टापुढें हजर राहिलें पाहिजे व कलम १६ पोटकलम (१) अन्वयें मिळकतीसंबंधी इतर गोष्टी केल्या पाहिजेत ती वेळ, हिशोबाची पुस्तकें हजर करणें करूं द्यावयाची तपासणी आणि कलम १६ पोटकलम (२) अन्वयें कर्जदारानें सावकारांस देणें असलेल्या कर्जांच्या संबंधांत सावकारानें द्यावयाची माहिती;

(फ) कलम २९ पोटकलम (१) अन्वयें मिळकतीची व इतर मालमत्तेची किंमत ठरविण्याची रीति आणि कलम २९ पोटकलम (४) अन्वयें जमिनींची बाजारी किंमत ठरविण्याची रीति,

(ग) कलम ३२ पोटकलम (२) आणि कलम ३३ पोटकलम (२) या अन्वयेंच्या निवाडयाचा नमुना,

(ह) कलम ३८ पोटकलम (१) अन्वयेंच्या अर्जाचा नमुना;

[आय] कलम ४१ अन्वय ज्या रीतिनें मिळकतीची विक्री करण्यांत येईल ती रीति;

[जे] कलम ४४ पोटकलम (२) अन्वयें कोर्टफी वसल करण्याची रीति;

(के) कलम ४५ अन्वयें नोटीस बजावण्याची रीति;

(ल) कलम ५४ पोटकलम (२) अन्वयें ज्या अटींवर कर्जे देण्याचा अखत्यार दिला जाईल त्या अटी.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ उद्देश व व्याप्ति | २ सरकारी गॅझेटमधील प्रसिद्धि |

**१. उद्देश व व्याप्ति**

कायद्याचे उद्देश सिद्धीस नेण्याकरितां व त्याच्या अंमलबजावणीची पद्धति तपशीलवार ठरवून घेण्याकरितां कानू करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास देण्यांस आलेला आहे. असे कानू जर मूळ कायद्यांतील बाबींविरुद्ध किंवा तत्वांविरुद्ध करण्यांत आले तर ते बेकायदा ठरतात.

**२. सरकारी गॅझेटमधील प्रसिध्दि.**

या कलमाप्रमाणें करण्याचे कानू सरकारी गॅझेटमध्यें जाहीर न झाल्यास त्यांना कायदेशीर स्वरूप येणार नाहीं. साधारणतः सरकारास जे कानू करावयाचे असतात ते मसुद्याच्या रूपानें प्रथमतः गॅझेट भाग ४ ब मध्यें लोकमतासाठीं प्रसिद्ध करण्यांत येतात व लोकांच्या सूचना व हरकती लक्ष्यांत घेऊन पक्के कानू सदर गॅझेटमध्यें सदरील भागांत जाहीर होतात. या कायद्याखालील पक्के कानू ता. १९ जुलई १९४७ रोजीं गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाले आहेत.

## १८७९ चा कायदा नं. १७ व सन १९३९ चा मुंबई कायदा नंबर २८ हे रद्द करणें.

**५६** (१) हा कायदा अंमलांत येण्याच्या तारखेपासून ( हिचा

यापुढें या पोट-कलमांत सदरहू तारीख असा उल्लेख केला आहे) तीन वर्षांची मुदत संपल्यावर सन १८७९ चा डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ ॲक्ट अंमलांत असण्याचे बंद होईल.

मात्र या पोट-कलमांतील कोणत्याहि मजकुरानें, कर्जदार असलेल्या व ज्यांच्या कर्जाबाबत या कायद्याच्या कलम ४ अन्वयें अर्ज करतां येण्यासारखा आहे अशा इसमांच्या बाबतींतील सदरहू तारखेस कोणत्याहि कोर्टांत चालू असलेल्या कामकाजांत आलेल्या कोणत्याहि गोष्टीस बाध येतो असें समजण्यांत येणार नाहीं; आणि असें कोणतेंहि कामकाज जेथपर्यंत तें चालू ठेवणें हें या कायद्याच्या ठरावांशी विसंगत नसेल तेथपर्यंत चालू ठेवतां येईल.

आणखी असेंहि ठरविण्यांत येत आहे कीं, ज्यांत असा कर्जदार पक्षकार होता असा कोणताहि दावा अगर कामकाज या कायद्याच्या कलम १९ अन्वयें वर्ग होण्यास या पोटकलमांतील कोणत्याहि मजकुरानें कोणत्याहि प्रकारें बाध येणार नाहीं.

(२) सन १९३९ चा मुंबईचा शेतकरी कर्जनिवारण कायदा रद्द करण्यांत येत आहे.

रद्द करण्यांत आलेल्या कायद्याचें कलम ४ अन्वयें स्थापिलेलीं सर्व बोर्डें बरखास्त होतील.

मात्र, अशा कोणत्याहि बोर्डापुढें चालू असलेलीं सर्व कामें हीं जणूं कोर्टाला या कायद्याच्या कलम ४ अन्वयें अर्ज करण्यांत आला होता अशा रीतीनें कोर्टापुढें पुढें चालू ठेवण्यांत येतील.

आणखी असेंहि ठरविण्यांत येत आहे कीं, रद्द झालेल्या कायद्याअन्वयें कोणत्याहि कोर्टापुढें चालू असलेलीं अपीलें हीं, तीं जणूं या

कायद्याअन्वयेंचीं अपीलें आहेत असें समजून, पुढें चालविलीं जातील व त्यांचा निकाल करण्यांत येईल.

तसेंच आणखी असेंहि ठरविण्यांत येत आहे कीं, रद्द झालेल्या कायद्याअन्वयें स्थापन केलेल्या कोणत्याहि बोर्डाच्या निकालावरील, हुकुमांवरील किंवा निवाडयावरील सर्व अपीलें, जीं हा कायदा करण्यांत आला नसता तर कोर्टाकडे करता आली असतीं, तीं अपीलें कोर्टाकडे दाखल करण्यांत आल्यावर, तीं जणूं या कायद्यान्वयें कोर्टानें दिलेल्या निकालावर, हुकुमावर अथवा निवाडयावर करण्यांत आलेली अपील होत असें समजण्यांत येईल आणि त्याप्रमाणें त्यांचा निकाल लावण्यांत येईल.

## विषयवारी

| | |
|---|---|
| १ शेतकरी कायदा किती दिवस राहील. | ३ पूर्वीची कामें व अपीलें नवीन कायद्याखालीं चालणें. |
| २ चालू कामकाजावर परिणाम | |

### १ शेतकरी कायदा किती दिवस राहील.

हा कायदा अंमलांत आल्यापासून म्हणजे ता. २७ माहे मे १९४७ पासून तीन वर्षे शेतकरी कायदा अंमलात रहावयाचा आहे. त्यामुळें गहाण स्वरूपी खरेदीखतासंबंधी ज्यांनीं या ता. १-८-१९४७ पर्यंत या कायद्याप्रमाणें अर्ज करून तक्रारी केल्या नसतील त्यांना शेतकरी कायद्याप्रमाणें आणखी तीन वर्षे तशा स्वरूपाचे दावे लावतां येतील. प्रांताच्या ज्या भागांत सन १९३९ चा शेतकरी कर्जनिवारण कायदा अंमलांत आला होता, त्या ठिकाणीं हा शेतकरी कायदा तावडतोब रद्द करण्यांत आला होता. परंतु आंताच्या कायद्यानें त्या शेतकरी कायद्याचें तीन वर्षेपर्यंत पुनरुज्जीवन झालेलें असल्यामुळें त्या त्या भागांतील लोकांस पुनः शेतकरी कायद्याचा फायदा मिळणार आहे.

**२. चालू कामकाजावर परिणाम.**

शेतकरी कायदा तीन वर्षांनंतर रद्द होणार असल्यामुळें ती मुदत संपल्या-वरसुद्धां ता. २७-५-१९४७ रोजीं चालू असलेलीं कामें तोपर्यंत संपलीं नाहींत तर तीं कामें शेतकरी कायद्याप्रमाणें चालतील.

**३. पूर्वीचीं कामें व अपीलें नवीन कायद्याप्रमाणें चालणें.**

१९३९ चा शेतकरी कर्जनिवारण कायदा या कलमांतील पोट-कलम (२) प्रमाणें रद्द झाला आहे. तथापि त्या कायद्याप्रमाणें जे अर्ज किंवा अपीलें चालू आहेत असें समजून पुढें चालावयाचीं आहेत- त्यांचा निकालहि चालू कायद्याप्रमाणें व्हावयाचा आहे. अशीं जीं अपीलें पूर्वीच्या कायद्याखालीं लावलेलीं असतील नवीन कायद्याप्रमाणें चालावयाचीं आहेत हल्लीच्या कायद्यांतील कर्जदार वगैरे विषयींच्या कल्पना पूर्वीच्या कायद्याहून ज्यास्त व्यापक व विस्तृत आहेत. तसेंच पूर्वीच्या कायद्यांतील कांहीं कलमें या कायद्यांत अजिबात गाळून टाकलेलीं आहेत व कांहीं नव्यानें घातलीं आहेत. उदा. पुर्वीच्या कायद्यांतील नेहमींच्या कोर्टांतील कामें तहकूब करण्यासंबंधीं जें कलम नं ७३ चें होतें तें आतां नवीन कायद्यांत गाळलें आहे. त्या कलमान्वयेंच्या हुकुमांविरूद्ध जें अपील केलेलें असेल त्याचा निकाल करण्यास नवीन कायद्यांत कांहींच सोय केलेली नाहीं. तसेंच एखादा अर्जदार हा कर्जदार नाहीं असा निकाल पूर्वीच्या कायद्याप्रमाणें दिलेला असला व त्याविरूद्ध अपील लागलेलें असलें तर त्याचा नवीन कायद्याप्रमाणें करावयाचा म्हटल्यास नवीन कायद्यांतील 'कर्जदार' ठरविण्यास लागणारा पुरावा त्यांत सांपडणार नाहीं. अशीं अपीलें नवीन कायद्याप्रमाणें चालवावयाचीं म्हटल्यास तीं परत पाठविण्याशिवाय ( रिमांड ) गत्यंतर दिसत नाहीं.

## शेतकरी कर्जनिवारणाचे कानू.

नं. ४६८४।४५—सन १९४७ च्या मुंबई शेतकरी कर्ज-निवारण कायद्याच्या ( मुंबई १९४७ चा २८ वा) ५५ व्या कल-मान्वयें मिळालेले अधिकार चालवून आणि सन १९४१ च्या मुंबई

शेतकरी कर्ज निवारण कानू रद्द करून मुंबई सरकार पुढील कानू करीत आहे.

१ लहान सरनामा—या कानूस सन १९४७ च्या मुंबईच्या शेतकरी कर्जनिवारणाच्या बाबतच्या कानू असें म्हणावें.

२ व्याख्या—या कानूंत, विषयांस अगर संदर्भास बाघ येत नसेल तर–

(१) कायदा या शब्दाचा अर्थ सन १९४७ चा मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायदा असा समजावा.

(२) 'कोड' या शब्दाचा अर्थ सन १९०८ चें सिव्हिल प्रोसिजर असा समजावा.

(३) 'नमुना' या शब्दाचा अर्थ या कानूस जोडलेला नमुना असा समजावा.

(४) 'सरकार' या शब्दाचा अर्थ मुंबई सरकार असा समजावा.

(५) 'कलम' या शब्दाचा अर्थ या कायद्याचे कलम असा समजावा.

(६) या कायद्यांत वापरलेले परंतु व्याख्या न दिलेले शब्द व संज्ञा यांचा सदरहू कायद्यांत जो अर्थ दिलेला आहे तोच अर्थ असेल.

३ **हंगामी पैसा पुरविणें**—ज्या कारणांसाठीं कर्ज देणें म्हणजे कलम २ भाग (१३) च्या अर्थाप्रमाणें 'हंगामी पैसा पुरविणें' असें असेल तीं कारणें पुढीलप्रमाणें असलीं पाहिजेत:—

(१) नांगरणीच्या हंगामांत किंवा नंतर पीक काढणें, नांगरणें,

पेरणी, कुळवणें, बेणणें, पीक गोळा करणें, बियाणें व खतें विकत घेणें.

(२) मजुरीचा खर्च

(३) वाहतुकीचा खर्च

(४) बैरणखरेदी

(५) अंतर्लागवड

(६) मळणी

(७) नांगरणीसाठीं गुरें व शेतीची अवजारें भाड्यानें घेणें किंवा विकत घेणें.

(८) कर्जदार व त्याच्यावर अवलंबून असलेली माणसें व त्याची गुरें यांचें पोषण व शेतीच्या अवजारांची दुरुस्ती.

(९) शेतकीचीं यंत्रे उदा. पंप अथवा एंजिनें, त्यांस लागणाऱ्या जळणाचा खर्च धरून, चालूं ठेवण्यांत होणारा चालूं खर्च.

## ४. कलम ४ पोटकलम (१) अन्वयें आणि कलम ८ पोटकलम (१) अन्वयें अर्ज

—कलम ४ पोट कलम (१) अन्वयेचा अज नमुन नं. १ व २ प्रमाणें असले पाहिजेत. आणि कलम ८ पोट-कलम [ १ ) अन्वयेचें अर्ज नमुना नं ३ प्रमाणें असले पाहिजेत. ते अर्ज अर्जदारांनीं जातीनें कोर्टाच्या कामाच्या वेळीं कोर्टास सादर केले पाहिजेत अथवा कोर्टाच्या पत्यावर रजिस्टर पोस्टानें पाठविले पाहिजेत आणि ते सिव्हिल जज्ज किंवा ते स्वीकारण्यासाठीं तो ज्यास अधिकार देईल असा इसम स्वीकारील.

### विषयवारी

**कोणतें अर्ज कायदेशीर ठरतील**—कलम ४ प्रमाणें किंवा ८ प्रमाणें

जे अर्ज कोर्टाकडे करावयाचे आहेत ते या कानूंत सांगितलेल्या नमुन्याबर-हुकूम असलेच पाहिजेत १९३९ च्या कायद्यानुसार जे नमुने सांगितलेले होते त्याबरहुकूम जे अर्ज लिहिले गेले असतील ते अर्ज जर २७-५-१९४७ नंतर दाखल झाले असतील तर कायद्याप्रमाणें रीतसर होणार नाहींत असें वाटतें,

**५. कलम १४ अन्वयेंची सर्वसामान्य नोटीस प्रसिद्ध करण्याची रीत**—कलम १४ भाग (ब) अन्वयेची सर्व-सामान्य नोटीस संबध असलेल्या कोर्टाच्या आणि संबंध असलेल्या तालुक्याच्या किंवा महालाच्या मामलेदाराच्या किंवा महालकऱ्याच्या ऑफिसांत तिच्या प्रती डकवून प्रसिद्ध केली पाहिजे. अशा नोटी-शींत, कर्जाची तडजोड करण्यासाठीं ज्यांनीं अर्ज केले असतील किंवा ज्यांच्याविरुद्ध अर्ज करण्यांत आले असतील, अशा कर्ज-दारांची यादी कोर्टांत तपासणीसाठीं सर्व योग्य वेळीं मिळूं शकेल असा खुलासा असला पाहिजे.

**६. कलम १४ अन्वयें पत्रकाचा नमुना**—कलम १४ अन्वयें कोणत्याहि कर्जदारानें किंवा सावकारानें द्यावयाचें पत्रक जरूरीप्रमाणें नमुना नं ४ किंवा ५ मध्ये असलें पाहिजे.

**७. कलम २९ पोट-कलम (१) अन्वयें कर्जदाराच्या मिळकतीची किंमत ठरविण्याची रीति**—

(१) कलम २९ पोट-कलम (१) चे कारणांसाठीं कर्जदाराच्या जंगम व स्थावर मिळकतीची किंमत पोट कानू (२) व (३) मध्यें सांगितलेल्या रीतिप्रमाणें कोर्टानें टरविली पाहिजे.

(२) स्थावर मिळकत--कोणत्याहि स्थावर मिळकतीची किंमत कोर्टानें पुढील गोष्टी विचारांत घेऊन ठरविली पाहिजे.:--

( अ ) संबंध असलेल्या मिळकतीच्या, पूर्वीच्या बारा वर्षांतील खऱ्याखुऱ्या विक्रया व भाडेपट्टे, आणि

( ब ) आसपास असलेल्या तसल्याच मिळकतीच्या पूर्वीच्या बारा वर्षांतील खऱ्याखुऱ्या विक्रया व भाडेपट्टे, आणि

( क ) संबंध असलेल्या मिळकतींचा याबाबत सरकारनें नेमलेल्या लॅन्ड व्हॅल्यूएशन ऑफिसरांनीं ठरविलेली किंमत.

( ३ ) जंगम मिळकत—कोर्टानें, संबंध असलेल्या मिळकतीची सरकारनें याबाबत नेमलेल्या लॅन्ड व्हॅल्यूएशन ऑफिसरांनीं ठरविलेली किंमत लक्षांत घेऊन, आणि तसेच संबंध असलेल्या पक्षकारांस प्रश्न विचारून व त्यास योग्य वाटेल अशी इतर चौकशी करून, जंगम मिळकतीची किंमत ठरविला पाहिजे.

**८. कलम २९ पोट-कलम ( ४ ) अन्वयें कर्जदाराच्या मिळकतीची बाजारी किंमत ठरविण्याची रीति**—कलम २९ पोट-कलम ( ४ ) चे कारणांसाठीं त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यान्वयें, कलेक्टरच्या किंवा प्रांतिक सरकारच्या आगाऊ मंजुरीशिवाय ज्या जमिनी तबदील करण्याजोग्या किंवा दुसऱ्याचें नांवें करतां येण्याजोग्या नाहींत अशा जमिनींची बाजारी किंमत पुढील गोष्टी म्हणजे;

( अ ) संबंध असलेल्या जमिनींच्या पूर्वीच्या बारा वर्षांच्या दरम्यानच्या खऱ्याखुऱ्या विक्रया व भाडेपट्टे, कांहीं असल्यास, आणि;

( ब ) आसपासच्या तसल्या जमिनीच्या पूर्वीच्या बारा वर्षांतील खऱ्याखुऱ्या विक्रया व भाडेपट्टे, लक्षांत घेऊन आणि संबंध असलेल्या तालुक्यांच्या मामलेदाराकडून किंवा पेठ्याच्या महालकऱ्यांकडून संबंध

असलेल्या जमिनींच्या किंमतींची खात्री करून घेतल्यावर, कोर्टानें ठरविली पाहिजे.

## ९. निवाड्याचे नमुनें

(१) कलम ३२ अन्वयेंचा निवाडा नमुना नं. ६ प्रमाणें असला पाहिजे आणि कलम ३३ पोट-कलम (२) अन्वयेंचा निवाडा नमुना नं. ७ अन्वयें असला पाहिजे.

(२) कलम ३३ पोट-कलम (२) अन्वयें दिलेला निवाड्याची एक नक्कल कोर्टानें प्रसंगाप्रमाणें संबंध असलेल्या प्रायमरी लॅन्ड मॉर्गेज बँकेकडे, अथवा बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह लॅन्ड मॉर्गेज बँकेकडे पाठविली पाहिजे.

## १०. कलम ३८ पोट-कलम (३) भाग (१) अन्वयेंचा अर्ज

कलम ३८ पोट-कलम (३) भाग (१) अन्वयेंचा अर्ज नमुना नं. ८ मध्यें असला पाहिजे.

## विषयवारी

**अर्जास कोर्ट फीः—**

मागणी रक्कम पन्नास रुपयापेक्षां कमी असल्यास तीन आणे कोर्ट-फी स्टँप अंमलबजावणीच्या अर्जास लागेल. इतर वेळीं दहा आण्याचा स्टँप लावावा. अर्जासोबत निवाड्याची सहीशिक्याची नक्कल जोडावी लागेल.

## कलम ४१ अन्वयें अगर कलम ४७ पोट-कलम (२) अन्वयें कर्जदाराची मिळकत विकणेंबद्दल हुकूम आला असतां काम चालविणेंचा रीत

कलम ४१ किंवा कलम ४७ पोट-कलम (२) अन्वयेंची जंगम अगर स्थावर मिळकतीची प्रत्येक विक्री, सदरहू कोडमध्यें अशा

मिळकतीच्या विक्रीसाठीं दिलेल्या रीतीनें कोर्टाच्या अंमलदारानें केली पाहिजे.

(३) या कानूअन्वयें विक्रीचें काम चालविणाऱ्या अंमलदारानें मिळकत खरेदी करणारास नमुना नं. ९ प्रमाणें दाखला दिला पाहिजे.

**१२. कोर्ट फीची वसुली**—कलम ४४ पोट-कलम (१) अन्वयें द्यावयाची कोर्टफी ही जमीनसाऱ्याच्या थकबाकीप्रमाणें वसूल करण्यांत येईल.

**१३. सामान्यतः कोडमध्यें दिलेली काम चालविण्याची रीत पाहिजेः**—जिच्यासंबंधीं सदरहू कायद्यांत अथवा या कानूंत कोणताही ठराव केलेला नाहीं अशा कोणत्याहि बाबींच्या संबंधांत सदरहू कोडमध्यें दिलेली काम चालविण्याची रीत, शक्यतोंवर कोर्टानें आपल्यापुढें चालू असलेल्या कामांत अनुसरली पाहिजे.

**१४. अखत्यार दिलेल्या इसमांना कोणत्या शर्तींवर कर्जें देण्याचा अधिकार असेल त्या शर्तीः**—सदर कायद्याअन्वयेंच्या कोणत्याहि कामांत पक्षकार असलेल्या कर्जदाराना किंवा ज्यांच्या कर्जांबाबत सदर कायद्याप्रमाणें तडजोड करण्यांत आली असेल अशा कर्जदारांना कर्जें देण्याचा कलम ५४ अन्वयें कोणत्याहि इसमांस द्यावयाचा अधिकार (ज्यांस या कानूंत यापुढें अखत्यार दिलेला इसम असें म्हटलें आहे,) नमुना नं. १० प्रमाणें असला पाहिजे. तो (अधिकार) पुढील शर्तींखेरीज इतर शर्तींवर देतां कामा नये.

(१) कोणत्या कारणासाठीं कर्जें देता येईल तीं कारणें व अशा कर्जांची कमाल मर्यादा—अखत्यार मिळालेल्या इसमानें कोणत्याहि

कर्जदारांस हंगामी पैसा पुरविण्याच्या कारणाखेरीज करून, इतर कारणांकरितां तसेंच कलेक्टरनें कानू नं. १५ अन्वयें ठरविलेल्या कमाल मर्यादेपेक्षां ज्यास्त कर्ज देतां कामा नये.

अखत्यार मिळालेल्या इसमानें, ज्या कर्जदारानें पूर्वी दुसऱ्या कोणा अखत्यार मिळालेल्या इसमांकडून कर्ज काढले असेल अशा कोणत्याहि कर्जदाराला, असें पूर्वीचें कर्ज पूर्णपणें फेडलेलें असल्याशिवाय किंवा तो [ अखत्यार मिळालेला इसम ] अशा पूर्वीच्या कर्जाबाबत कर्जदाराची पात्रता दूर करण्याचे कबूल करीत असल्याशिवाय, जाणूनबुजून कोणतेंहि कर्ज देतां कामा नये.

(२) अखत्यार मिळालेल्या इसमानें पिकें किंवा माल विकण्यास परवानगी नाकारतां कामा नये.--कलम ५३ पोट-कलम (१) अन्वयें कर्जदारानें उभीं पिकें किंवा त्याच्या जमिनींतील माल विकण्यास मागितलेली परवानगी अखत्यार मिळालेल्या इसमानें गैरवाजवी रीतीनें नाकारतां कामा नये, व जर अखत्यार मिळालेला इसम स्वतःच सदरहू पिकें किंवा माल खरेदी करील तर त्यानें बाजारभावाप्रमाणें कर्जदारास त्याची किंमत दिली पाहिजे.

(३) हिशेब ठेवण्याचे व पुरविण्याचे अखत्यार मिळालेल्या इसमाचें कर्तव्य--[अ] अखत्यार मिळालेल्या इसमानें कर्जदारास दिलेल्या प्रत्येक कर्जाचा स्वतंत्र हिशेब नियमितपणें ठेवला पाहिजे.

मात्र, कोणत्याहि कर्जदारास चालू खात्यावर कर्जे देण्यांत आलेली असतील तेव्हां अशा कर्जांच्या संबंधातील सर्व देवघेवींचा एकच हिशेब ठेवण्याचा अधिकार अखत्यार मिळालेल्या इसमास आहे.

खुलासा—या भागाच्या कारणांसाठीं 'चालू खातें' ह्या संज्ञेत, बँकांच्या बाबतींत चालू खात्याच्या स्वरूपांत ठेवण्यांत देणाऱ्या

ओव्हरड्राफ्टस, कॅश क्रेडिट ह्यासंबंधी हिशेबांचा व प्रॉमिसरी नोट-संबंधी हिशेबांचा समावेश होतो.

[ब] अखत्यार मिळालेल्या इसमानें, एक वर्ष संपल्यावर एक महिन्याच्या आंत, त्यानें किंवा त्याच्या एजंटानें सही केलेलें एक संपूर्ण व बिनचूक हिशेबाचें पत्रक प्रत्येक कर्जदारास पुरविलें पाहिजे. अशा हिशेबाच्या पत्रकांत सदरहू वर्षांत केलेल्या सर्व व्यवहारांची नोंद व सरकार सामान्यतः किंवा कोणत्याहि विशिष्ट क्षेत्रासाठीं जी तारीख ठरवील त्या तारखेस प्रत्येक कर्जाच्या खात्यावर निघणारी बाकी ही दर्शविली पाहिजे व त्यांत नमुना नं. १२ प्रमाणें तपशील असला पाहिजे.

मात्र, कर्जे चालू खात्यावर देण्यांत आलीं असतील तेव्हां, ठरविलेल्या तारखेस अशा सर्व हिशोबाबरोबर येणें निघणाऱ्या बाकीचा तपशील पुरविल्यास पुरे होईल. बँकांच्या बाबतींत कर्जदारास पास-बुकाच्या साधनानें किंवा इतर प्रकारें सबंध वर्षभर वेळोवेळीं हिशेबाचे संपूर्ण पत्रक पुरविण्यांत आल्यास आणि वर्ष संपल्यावर एक महिन्याचे आंत ठरविलेल्या तारखेस देणें राहिलेल्या शिलकेच्या रकमेची माहिती दिल्यास, या भागांतील शर्तींचे पालन झालें असें समजलें पाहिजे.

(क) सदरहू हिशेबाचें पत्रक अखत्यार मिळालेल्या इसमाच्या खर्चानें कर्जदारास रजिस्टर पोस्टानें पाठविण्यांत आलें पाहिजे व त्याबाबत पावती मिळविली पाहिजे.

(४) व्याजाचा दर व हिशोब—(अ) अखत्यार मिळालेल्या इसमानें, १६ व्या कानू अन्वयें सरकारनें जाहीर केलेल्या दराहून ज्यास्त दरानें व्याज आकारतां किंवा वसूल करतां कामा नये.

(ब) कर्जाच्या बाबतींत कोणतीहि परतफेड केली असल्यास अशा कर्जावरील हें अशा परतफेडीच्या तारखेपर्यंत आकारले पाहिजे आणि जर कर्ज अगर कर्जाचा कोणाचाहि भाग अजूनहि देणें निघेल तर, त्यानंतर व्याजाची आकारणी त्यावेळीं बाकी असलेल्या मुद्दलावर झाली पाहिजे.

(५) हिशेबाची तपासणी करूं दिली पाहिजे—अखत्यार मिळालेल्या इसमानें, सरकारनें खास माफी दिल्याखेरीज, सरकार याबाबत नेमील अशा अंमलदारास त्यानें ठेविलेले हिशेब तपासूं दिले पाहिजेत.

(६) या कानूंत सांगितलेल्या शर्ती पुऱ्या न करण्यांबद्दल शिक्षा--सरकारास मर्जीप्रमाणें सदरील शर्तींपैकीं कोणत्याहि शर्तीच्या भंगाबद्दल किंवा इतर कारणांवरून त्यांनीं दिलेला अखत्यार रद्द करण्याचा अधिकार आहे.

क. ५४ अन्वयें अखत्यार मिळालेल्या इसमांनीं या कायद्याखाली कामकाजास पक्षकार असलेल्या कर्जदारांस किंवा या कायद्यान्वयें ज्यांचें कर्ज तोडमोड करण्यांत आलें अशा कर्जदारांस हंगामी पैसा देण्याच्या कारणांसाठीं द्यावयाची कर्जाची कमाल मर्यादा वर्षांतून एकदां ठरविली पाहिजे.

**१५. कर्ज देण्याच्या कमाल मर्यादा कलेक्टरनें ठरविणें—**

कलेक्टरनें, सरकारी गॅझेटमध्यें जाहीरनामा प्रसिद्ध करून, कलम ५४ अन्वयें अखत्यार मिळालेल्या इसमांनीं या कायद्यान्वयेंच्या कामकाजास पक्षकार असलेल्या कर्जदारास किंवा या कायद्यान्वयें ज्यांच्या कर्जाबाबत तडजोड करण्यांत आली आहे अशा कर्जदारास हंगामी पैसा देण्याच्या कारणांसाठीं द्यावयाची कर्जाची कमाल मर्यादा

वर्षांतून एकदां ठरविल्या पाहिजेत. अशा मर्यादा, ज्या महिन्यांत कलेक्टरनें जाहिरनामा प्रसिद्ध केला असेल त्या महिन्याच्या लगत पुढील महिन्याच्या पहिल्या तारखेस अंमलांत येतील आणि त्या लगत पुढील वर्षी ज्या महिन्यांत कलेक्टर नवा जाहिरनामा प्रसिद्ध करील त्या महिन्याच्या अखेरपर्यंत अंमलांत राहातील. अशा मर्यादा निरनिराळ्या पिकांसाठीं व निरनिराळ्या प्रदेशासाठीं, हंगाम व पिकांचें स्वरूप आणि पैदास लक्षांत घेऊन वेगवेगळ्या ठरविण्याचा अधिकार आहे.

**१६. सरकारनें व्याजाचे कमाल दर ठरविणें**—सरकारनें, सरकारी गॅझेटमध्यें जाहिरनामा प्रसिद्ध करून, कलम ५४ अन्वयें अखत्यार मिळालेल्या इसमानें हंगामी पैका देण्याच्या कारणांसाठीं द्यावयाच्या कर्जावर आकारणेंच्या व्याजाचा दर ठरविला पाहिजे. असा दर दरसाल दरशेंकडा सहा टक्क्याहून अधिक असणार नाहीं

## नमुना नंबर १
(कानू ४ पहा)

..................येथील सिनिअर / ज्युनिअर डिव्हिजनच्या सिव्हिल जजाचें कोर्ट यांस—

सन १९४७ मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा आक्ट याचें कलम ४ (१) अन्वयें, मी बापाचें नांव , जात , राहणार , तालुका , वय , चा धंदा करणार यावरून सदरहू आक्टान्वयें माझ्या कर्जांची तोडजोड करण्यासाठीं अर्ज करीत आहे.

२. माझ्याकडून येणें असलेल्या ( ३ ऱ्या कलमांत सांगितलेलीं कर्जें धरून ) सर्व कर्जांची रक्कम व तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

| १ | २ | ३ | | | | ४ | ५ | | | | ६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जाचा अनुक्रम नंबर | धनकोचें संपूर्ण नांव, राहण्याचें ठिकाण व पूर्ण पत्ता | कर्जाची रक्कम | | | | *मूळ मुद्दल व आकारण्याजोगा व्याजाचा दर ह्यांच्या तपशिलासह प्रत्येक कर्जाविषयीं हकीकत | जामीन, समाईक जामीन किंवा समाईक कर्जदार म्हणून ज्यांसाठीं कर्जदार जबाबदार असेल अशा कर्जांचा तपशील | | | | शेरा |
| | | मुद्दल | व्याज | धनको मागत असलेली एकूण रक्कम | कर्जदारानें कबूल केलेली ( जर अशी कांहीं असेल तर ) रक्कम | | कर्जाची रक्कम | जबाबदारीचें | स्वरूप | कर्जदार, समाईक जामीन किंवा समाईक कर्जदार यांची संपूर्ण नांवें व पत्ते | |
| | | | | | | | | | | | |

३. मला येणें असलेल्या रकमा धरून माझ्या मिळकतीचा तपशील पुढीलप्रमाणें आहेः—

[अ] स्थावर मिळकत [ मुंबई प्रांताच्या बाहेर असलेली मिळकत धरून )—

| १ | २ | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जरूर तेथें चतुःसीमासह मिळकतीविषयींची तपशीलवार माहिती | गांवाचें नांव व सर्व्हे नंबर | | | | मिळणारें वार्षिक उत्पन्न | (मिळकतीची) बाजारांतील किंमत | सदरहू मिळकतीवर असलेली कोणतीहि जसी, गहाण, लीन किंवा चार्ज याविषयीं तपशील | कर्जदाराचे कोणी सहहिस्सेदार असल्यास त्यांची संपूर्ण नांवें व पत्ते | शेरे |
| | सर्व्हे नंबर | एकरांत क्षेत्रफळ | सरकारी सारा | सत्ताप्रकाराचें स्वरूप | | | | | |
| जमिनी ... | | | | | | | | | |
| घरें ... | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

[ ब ] जंगम मिळकत [ रोकड घरून ] --

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्रम नंबर | वर्णन | अंदाजी किंमत | ज्या ठिकाणीं ती आढळेल ती जागा | तिच्यावरील कोणतेंहि गहाण, चार्ज किंवा लीन असल्यास त्याविषयीं तपशील | शेरे |
| | | | | | |

( क ) येणें असलेल्या रकमा—

| १ | २ | | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| ज्याच्याकडून रक्कम येणें असेल त्या मनुष्याचें संपूर्ण नांव व पत्ता | येणें असलेली रकम | | येणें असलेल्या रकमेचा, [तीबाबत हक्क] सुरू होण्याची तारीख व व्याजाचा दर धरून तपशील, तीस कांहीं तारण आहे किंवा कसें, असल्यास कशा रितीचें, इत्यादि | हक्क शाबीत करणाऱ्या दस्तऐवजाचें स्वरूप व तें कोणाच्या ताब्यांत आहेत तें | शेरे |
| | मुद्दल | व्याज | | | |
| | | | | | |

४. तबदील केलेल्या किंवा बोजा असलेल्या, पॅरीग्राफ ३ मध्यें सांगितलेल्या स्वरूपाच्या मिळकतीचा तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| मिळकतीचें वर्णन | तबदिलीचें किंवाबोजाचें स्वरूप | कोणाकडे तबदील करण्यांत अगर गहाण टाकण्यांत आली। इत्यादि ( अशा इसमाचें संपूर्ण नांव व पत्ता ) | तबदिलीची किंवा बोजाची तारीख | शेरा |
| | | | | |

५. मी यावरून असें जाहीर करतों कीं, माझ्याकडून येणें असलेली, किंवा माझ्या माहितीप्रमाणें कोणताहि इसम माझ्याकडून येणें आहेत म्हणून हक्क सांगत असलेलीं सर्व कर्जें व माझ्या सर्व मिळकती वरील पत्रकांत समाविष्ट करण्यांत आलेल्या आहेत.

आज तारीख माहे सन १९ . अर्जदाराची सही.

पडताळापूर्वक सांगण्यांत येतें कीं, अर्जांतील पॅराग्रॅफमधील मजकूर खाली सही करणार याच्या स्वतःच्या माहितीप्रमाणें खरा आहे आणि पॅरीग्रॅफमधील मजकूर त्यास मिळालेल्या व जी खरी आहे असा त्याचा विश्वास आहे अशा माहितीप्रमाणें खरा आहे.

आज तारीख माहे सन १९ . अर्जदाराची सही.

*टीप.--२ र्‍या पॅराग्रॅफमधील पत्रकाच्या ३ र्‍या आसनांत दर्शविलेल्या कर्जांपैकी कोणत्याहि कर्जाच्या मुद्दलांत जर, एखादा कर्जरोखा नव्यानें करण्यांत आल्यावर किंवा एखादें जादा कर्ज काढल्यावर, मिळविण्यांत आलेली व्याजाची कोणतीहि बाकी समाविष्ट केली असेल, तर ( कर्जदाराला माहीत असेल तेथवर ) पुढील माहिती ३ र्‍या आसनांतील कर्जांच्या अनुक्रम नंबरांचे मार्जिनमध्ये उल्लेख करून वेगळी देण्यांत यावीः--

ज्या तारखेस कर्ज प्रथम घेण्यांत आलें ती तारीख, मूळच्या मुद्दलाची रक्कम, ज्या तारखेस व शर्तीवर कर्जरोखा नव्यानें करण्यांत आला किंवा जादा कर्ज काढण्यांत आलें त्या अंदाजी तारखा व शर्ती, प्रत्येक कर्जरोख्यामध्ये ठरविण्यांत आलेला व्याजाचा दर, वेळोवेळीं फेडण्यांत आलेली रक्कम आणि इतर कोणत्याहि गोष्टी.

## नमुना नंबर २

(कानू ४ पहा)

......येथील सीनियर / ज्युनियर डिव्हिजनचे सिव्हिल जज्जाचें कोर्ट यांस—

सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याचें कलम ४ (१) याअन्वयें, मी , बापाचें नांव , जात , राहणार , तालुका , माझा कर्जदार याच्याविरुद्ध माझ्या येणें असलेल्या रकमाच्या तोडजोडीबाबत यावरून अर्ज करीतो आहे:—

२. माझ्या येणें असलेल्या रकमाचा तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदाराचें नांव व संपूर्ण पत्ता | हक्क सांगण्यांत आलेल्या कर्जाची रक्कम | | कर्ज तारणानें सुरक्षित करण्यांत आलें किंवा कसें; आलें असल्यास कशा प्रकारें | *मूळ मुद्दल व आकारण्यांत आलेल्या व्याजाचा दर ह्यांच्या तपशिलासह प्रत्येक कर्जासंबंधीं हकीकत | अर्जदारास माहीत असतील तेथवर इतर धनकोंची नांवें व पत्ते | शेरे |
| | मुद्दल | व्याज | | | | |
| | | | | | | |

३. कर्जदाराच्या मिळकतीसंबंधींचा, यांत मुंबई प्रांताच्या बाहेर असलेली मिळकत धरून मला ठाऊक असलेला तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

(अ) स्थावर मिळकत—

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| वर्णन | हिश्शाचें क्षेत्रफळ किंवा त्याची व्याप्ति | सारा | किंमत | कोणतेंहि गहाण, लीन किंवा चार्ज असेल तर त्याविषयीं तपशील. | शेरे |
| | | | | | |

[ ब ] जंगम मिळकत—

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वर्णन | किंमत | अर्जदाराचा त्यावर कोणताहि बोजा असल्यास तो | शेरे |
| | | | |

(क) इतर कांहीं उसन्न असल्यास त्याविषयींचा तपशील.

आज तारीख माहे सन १९ . अर्जदाराची सही

पडताळापूर्वक सांगण्यांत येतें कीं, पॅराग्रफमधील मजकूर खालीं सही करणार याच्या स्वतःच्या माहितीप्रमाणें खरा आहे आणि पॅराग्राफमधील मजकूर त्यास मिळालेल्या व जी खरी आहे असा त्याचा विश्वास आहे अशा माहितीप्रमाणें खरा आहे.

आज तारीख माहे सन १९ . अर्जदाराची सही

* टीप—२ न्या पॅराग्रॅफमधील पत्रकाच्या २ न्या आसनांत दर्शविलेल्या कर्जांपैकी कोणत्याहि कर्जाच्या मुद्दलांत जर, एखादा कर्जरोखा नव्यानें करण्यांत आल्यावर किंवा एखादे जादा कर्ज काढल्यावर, मिळविण्यांत आलेली व्याजाची कोणती बाकी समाविष्ट केली असेल, तर ( धनकोला माहीत असेल तेथवर ) पुढील माहिती २ न्या आसनांतील कर्जाचे मार्जिनमध्यें उल्लेख करून वेगळी देण्यांत यावीः—

ज्या तारखेस कर्ज प्रथम घेण्यांत आलें ती तारीख, मूळच्या मुद्दलाची रक्कम, ज्या तारखेस व शर्तींवर कर्जरोखा नव्यानें करण्यांत आला किंवा कर्ज काढण्यांत आलें त्या अंदाजी तारखा व शर्ती, प्रत्येक कर्जरोख्यामध्यें ठरविण्यांत आलेला व्याजाचा दर, वेळोवेळीं फेडण्यात आलेली रक्कम आणि इतर कोणत्याहि गोष्टी.

---

## नमुना नंबर ३

(कानू ४ पहा)

तडजोड नमूद करण्यासाठीं $\frac{\text{कर्जदारानें}}{\text{धनकोनें}}$ कलम ८ (१) अन्वयें करावयाच्या

अर्जाचा नमुना.

......येथील $\frac{\text{सीनिअर}}{\text{ज्युनियर}}$ डिव्हिजनचे सिव्हिल जज यांचें कोर्ट यांसः—

सन १९४७ चा मुंबईतील कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याचें कलम ८ (१) अन्वयें, मी, , बापाचें नांव , जात

रहाणार , तालुका , यावरून असा अर्ज करितों की, माझ्या कर्जाच्या / येणें रकमांच्या संबंधांत रोजीं पुढें सांगितलेल्या पक्षामध्यें जी तडजोड करण्यांत आली ती सदरहू आक्टाचें कलम ८ (३) याअन्वयें नमूद करण्यांत यावी व तीबद्दल दाखला देण्यांत यावा.

२. सदरहू तडजोडीसंबंधीं तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

| तडजोडींतील पक्ष | | धनकोनें आपलें येणें म्हणून मागितलेल्या कर्जाची रक्कम | ज्या रकमेवर तडजोड करण्यांत आली ती रक्कम | ज्या इसमांनी रक्कम फेडावयाची असेल ते इसम व धनकोमध्यें असता कोणतीहि असल्यास ती | सदरहू तडजोडीसंबंधींच्या कर्जदारा-ज्या मिळकतीचा तपशील, तिच्यावर कांहीं बोजा, लीन किंवा गहाण असेल तर त्याच्या तपशिलासह | शेरे |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदाराचे नांव व पत्ता | धनकोचीं नावें व पत्ते | | | | | |
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | | |

आज तारीख माहे सन १९४ .

अर्जदार (कर्जदार) / (धनको) यांची सही.

पडताळापूर्वक सांगण्यांत येतें कीं, २ ऱ्या पॅरिग्रॅफच्या आसनांतील मजकूर, खाली सही करणाऱ्याच्या स्वतःच्या माहितीप्रमाणें खरा आहे व २ ऱ्या पॅरिग्रॅफच्या आसनांतील मजकूर, खाली सही करणारास मिळालेल्या व जी खरी आहे असा त्याचा विश्वास आहे अशा माहितीप्रमाणें बरोबर आहे.

आज तारीख माहे सन १९४.

अर्जदार (कर्जदार) / (धनको) यांची सही.

# नमुना नं. ४

( कानू ६ पहा. )

## सन १९४७ चा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याचें कलम १४ अन्वयें कर्जदारानें सादर करणें भाग असलेलें पत्रक

१. सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा आक्ट याचें कलम १४ या अन्वयें, कर्जदारानें सादर करावयाची ( सदरहू आक्टाचें कलम ३ यांत सांगितलेलीं कर्जें धरून ) कर्जाची रक्कम व तपशील——

| १ | २ | ३ | | | | ४ | ५ | | | ६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जाचा अनुक्रम नंबर | धनकोचें संपूर्ण नांव, राहण्याचें ठिकाण व पूर्ण पत्ता | कर्जाची रक्कम | | | | मूळ मुद्दल व आकारण्याजोगा व्याजाचा दर ह्यांच्या तपशिलासह प्रत्येक कर्जाविषयींची हकीकत | जामीन, समाईक जामीन किंवा समाईक कर्जदार म्हणून ज्यांसाठीं कर्जदार जबाबदार असेल अशा कर्जाचा तपशील | | | शेरा |
| | | मुद्दल | व्याज | धनको मागत असलेली एकूण ( रक्कम ) | धनकोनें कबूल केलेली ( जर अशी कांहीं असेल तर ) रक्कम | | कर्जाची रक्कम | जबाबदारीचें स्वरूप | कर्जदार, समाईक जामीन किंवा समाईक कर्जदार यांची संपूर्ण नांवें व पत्ते | |
| | | | | | | | | | | |

२. कर्जदारास येणें असलेल्या रकमा धरून कर्जदाराच्या मिळकतीचा तपशीलः—

( अ ) स्थावर मिळकत ( मुंबई प्रांतांच्या बाहेर असलेली मिळकत धरून )—

| १ | २ | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जरूर तेथें चतुःसीमासह मिळकतीविषयीची तपशीलवार माहिती। | गांवाचें नांव व सर्व्हे नंबर | | | सत्ताप्रकाराचें स्वरूप | मिळणारें वार्षिक उत्पन्न | (मिळकतीची) बाजारांतील किंमत | सदरहू मिळकतीवर असलेलीं कोणतीहि जसीं, गहाण, लीन किंवा चार्ज यांविषयीं तपशील | कर्जदाराचे कोणी सहहिस्सेदार असल्यास त्यांची संपूर्ण नांवें व पत्ते | शेरे |
| | सर्व्हे नंबर | एकरांत क्षेत्रफळ | सरकारी सारा | | | | | | |
| जामिनी ... | | | | | | | | | |
| घरें ... | | | | | | | | | |

नमुना

[ ब ] जंगम मिळकत ( रोख पैसे धरून )

| १ अनुक्रम नंबर | २ वर्णन | ४ अंदाजी किंमत | ४ ज्या ठिकाणीं ती आढळेल ती जागा | ५ तिच्यावरील कोणतेहि गहाण, चार्ज किंवा लीन असल्यास त्याविषयीं तपशील | ६ शेरे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

[ क ] येणें असलेल्या रकमा—

| १ ज्याच्याकडून रकम येणें असलेल्या मनुष्याचें संपूर्ण नांव व पत्ता | २ येणें असलेली रकम | | ४ येणें असलेल्या रकमेचा [ तीबाबत हक्क ] सुरू होण्याची तारीख व व्याजाचा दर धरून तपशील, तीस कांहीं तारण आहे किंवा असल्यास कशा रितीचें, इत्यादि | ५ हक्क शाबीत करणाऱ्या दस्तऐवजाचें स्वरूप व ते कोणाच्या ताब्यांत आहेत ते | ६ शेरे |
|---|---|---|---|---|---|
| | मुद्दल | व्याज | | | |
| | | | | | |

तबदील केलेल्या किंवा बोजा असलेल्या, पॅराग्रॅफ २ मध्यें सांगितलेल्या स्वरूपाच्या मिळकतीचा तपशील पुढीलप्रमाणें आहेः—

| १ मिळकतीचें वर्णन | २ तबदिलीचें किंवा बोजाचें स्वरूप | ३ कोणाकडे तबदील करण्यांत अगर गहाण वगैरे टाकण्यांत आली (संपूर्ण नांव व पत्ता) | ४ तबदिलीची किंवा बोजाची तारीख | ५ शेरे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

*टीप.—१ ल्या पॅराग्रॅफमधील पत्रकांच्या ३ ऱ्या आसनांत दर्शविलेल्या कर्जांपैकीं कोणत्याहि कर्जाच्या मुद्दलांत जर, एखादा कर्जरोखा नव्यानें करण्यांत आल्यावर किंवा एखादें कर्ज काढल्यावर, मिळविण्यांत आलेली व्याजाची कोणतीहि बाकी समाविष्ट केली असेल, तर ( कर्जदाराला माहित असेल तेथवर ) पुढील माहिती ३ ऱ्या आसनांतील कर्जाच्या अनुक्रम नंबरांच्या मार्जिनमध्यें उल्लेख करून वेगळी देण्यांत यावी—

ज्या तारखेस कर्ज प्रथम घेण्यांत आलें ती तारीख, मूळच्या मुद्दलाची रक्कम, ज्या तारखेस व शर्तीवर कर्जरोखा नव्यानें करण्यांत आला किंवा जादा कर्ज काढण्यांत आलें त्या अंदाजी तारखा व शर्ती, प्रत्येक कर्जरोख्यामध्यें ठरविण्यांत आलेला व्याजाचा दर, वेळोवेळीं फेडण्यांत आलेली रक्कम आणि इतर कोणत्याहि गोष्टी.

## नमुना नंबर ५

(कानू ६ पहा)

### सन १९४७चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा आक्ट याचें कलम १४ याअन्वयें कर्जदारानें सादर करणें आवश्यक असलेलें पत्रक

१. धनको हक्क सांगत असलेल्या रकमा—

| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदाराचें नांव व पूर्ण पत्ता | हक्क सांगण्यांत आलेल्या कर्जाची रक्कम | | कर्ज (तारणानें) सुरक्षित करण्यात आलें किंवा कसें, आलें असल्यास कशाप्रकारें | * मूळ मुद्दल व आकारण्यांत आलेल्या व्याजाचा दर ह्यांच्या तपशीलासह प्रत्येक कर्जासंबंधी हकिकत | अर्जदारास माहीत असतील तेथवर इतर धनकोंची नांवें व पत्ते | शेरे |
| | मुद्दल | व्याज | | | | |
| | | | | | | |

२. मुंबई प्रांताच्या बाहेर असलेली मिळकत धरून कर्जदाराच्या मिळकतीसंबंधीचा धनकोस ठाऊक आहे तेथवर तपशील पुढीलप्रमाणें आहेः

(अ) स्थावर मिळकत—

| १<br>वर्णन | २<br>हिश्शाचें क्षेत्रफळ किंवा त्याची व्याप्ति | ३<br>सारा | ४<br>किंमत | ५<br>कोणतेंहि गहाण लीन किंवा चार्ज याविषयीं तपशील. | ६<br>शेरे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(ब) जंगम मिळकत—

| १<br>वर्णन | २<br>किंमत | ३<br>अर्जदाराचा त्यावर कोणताहि बोजा असल्यास तो | ४<br>शेरे |
|---|---|---|---|
| | | | |

(क) इतर कांहीं उत्पन्न असल्यास त्या विषयींचा तपशील.

धनकोची सही.

* टीप—१ ल्या पॅराग्रॅफमधील पत्रकाच्या २ ऱ्या आसनांत दर्शविलेल्या कर्जांपैकीं कोणत्याहि कर्जाच्या मुद्दलांत जर एखादा कर्जरोखा नव्यानें करण्यांत आल्यावर किंवा एखादें जादा कर्ज काढल्यावर, मिळविण्यांत आलेली व्याजाची कोणतीहि बाकी समाविष्ट केली असेल तर [ धनकोला माहीत असेल तेथवर ] पुढील माहिती २ ऱ्या आसनांतील कर्जाचे मार्जिनमध्यें लेख करून वेगळी देण्यांत यावी.

ज्या तारखेस कर्ज प्रथम घेण्यांत आलें ती तारीख, मूळच्या मुद्दलाची रक्कम, ज्या तारखेस व शर्तींवर कर्जरोखा नव्यानें करण्यांत आला किंवा जादा कर्ज काढण्यांत आलें त्या अंदाजी तारखा व शर्ती, कर्जरोख्यामध्यें ठरविण्यांत आलेला व्याजाचा दर, वेळोवेळीं फेडण्यांत आलेली रक्कम आणि इतर कोणत्याहि गोष्टी.

## नमुना नंबर ६

[ कानू ९ [१] पहा ]

### सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याच्या ३२ व्या कलमाअन्वयेंचा निवाडा

चालविलेलें कामकाज नंबर सन १९४ .

## कोर्टाचा हुकूम

ज्याअर्थी, परिशिष्ट अ मध्यें वर्णन केलेल्या कर्जदाराच्या कर्जांची तोडजोड करण्याबाबत सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याअन्वयें अर्ज आल्यावरून सदरहू आक्टाच्या ठरावाअन्वयें सदरहू परिशिष्ट अमध्यें वर्णन केलेल्या धनकोस द्यावयाच्या रकमा ह्या कोर्टानें ठरविल्या आहेत.

२. त्याअर्थी, यावरून सदरहू आक्टाच्या ३२ व्या कलमाअन्वयें खालीलप्रमाणें हुकूम करण्यांत येत आहे:—

(१) सदरहू कर्जदारानें संबंध असलेल्या प्रत्येक धनकोस परिशिष्ट अ मधील ४ थ्या आसनांत त्याच्या नांवासमोर सांगितलेली रकम त्या परिशिष्टाच्या ७ व्या आसनांत सांगितलेल्या रीतीनें दिली पाहिजे.

(२) परिशिष्ट ब मध्ये सांगितलेल्या व अनुक्रम नंबर असलेल्या कर्जदाराच्या मिळकतीवर यावरून परिशिष्ट अ मध्यें वर्णन केलेले ( अनुक्रम नंबर असलेला ) धनको याच्या कर्जफेडीसाठी बोजा ठेवण्यांत येत आहे.

(३) परिशिष्ट ब मधील अनुक्रम नंबर असलेल्या आतां धनकोच्या ताब्यांत असलेल्या मिळकती शेवटी नमूद केलेल्या शर्तीस पात्र राहून कर्जदारांच्या हवालीं करण्यात आल्या पाहिजेत.

(४) परिशिष्ट ब मधील अनुक्रम नंबर असलेल्या मिळकती परिशिष्ट अ मधील अनुक्रमें नंबराच्या धनकोंच्या कर्जाची फेड करण्याकरितां विकल्या जाण्यास पात्र असतील. ज्या शर्तीस पात्र राहून ह्या विकल्या पाहिजेत त्या शर्ती शेवटीं नमूद करण्यांत आल्या आहेत.

(५) परिशिष्ट अ मधील ४ थ्या आसनांत सांगितलेल्या दरानें त्याच आसनांत सांगितलेल्या रकमेवर सरळ व्याजाची आकारणी करूं देण्यांत आली पाहिजे; सदरहू परिशिष्ट अ मधील ५ व्या आसनांत सांगितलेला खर्च आणि ६ व्या आसनांत सांगितलेली कोर्ट फी ह्यांच्या रकमा त्या देऊन आसनांत सांगितलेल्या पक्षकाराकडून देण्यांत आल्या पाहिजेत

( ६ ) परिशिष्ट अ मधील २ ऱ्या आसनामध्यें धनकोंची नांवें ज्या क्रमानें दाखल करण्यांत आलीं असतील त्या क्रमास अनुसरून त्या त्या धनकोस अग्रता कर्जे फेडण्यांत आली पाहिजेत.

३. अॅक्टाच्या २८ (२) या कलमाअन्वयें यावरून कोर्टाकडून असें जाहीर करण्यांत येत आहे कीं, परिशिष्ट ब मधील अनुक्रम नंबर

असलेल्या मिळकती दुसऱ्याकडे लावून देणें आणि सदरहू परिशिष्ट ब मधील अनुक्रम नंबर असलेल्या मिळकतीवर बोजे ठेवणें ह्या गोष्टी निरर्थक ठरतील

सिव्हिल जज्ज $\frac{\text{सीनियर}}{\text{ज्युनिअर}}$ डिव्हिजन

शिक्का

आज तारीख माहे सन १९४ .

टीपः—परिशिष्ट अ मधील ८ व्या आसनांत ज्यांच्याबद्दल बोजा ठेवण्यांत आला आहे अशा रकमा परिशिष्ट ब मध्यें वर्णन केलेल्या मिळकतीच्या दरेक अनुक्रम नंबराप्रमाणें निरनिराळया दाखल केल्या पाहिजेत. परिशिष्ट ब मध्यें, ज्यांच्यावर बोजे ठेवण्यांत आलेले आहेत अशा मिळकती, ज्यांचा कबजा देण्याबद्दल हुकूम करण्यांत आला आहे अशा मिळकती, ज्या विकल्या जाण्यास पात्र आहेत अशा मिळकती व ज्या दुसऱ्याकडे लावून देणें व ज्यावरील बोजे ह्या गोष्टी निरर्थक ठरविण्यांत आल्या आहेत अशा मिळकती ह्यांचे निरनिराळ्या अनुक्रम नंबरांत वर्णन करण्यांत आलें पाहिजे.

## परिशिष्ट अ

| १ | २ | | ३ | ४ | | ५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदारांचें नांव व पत्ता | कलम ३ मध्यें सांगितलेले धनको धरून कलम ३२[२][३] यांत सांगितलेल्या अग्रतेच्या क्रमानें लाविलेली धनकोंची नांवें व पत्ते | | धनकोनें मूळ घेणें असलेली म्हणून मागणी केलेली तारणानें सुरक्षित केलेली किंवा असुरक्षित कर्जाची रक्कम | कोर्टानें ३१ व्या कलमाअन्वयें प्रमाणशीर रीतीनें कमी केल्याप्रमाणेंच्या कर्जाची किंवा सदरहू आक्टाच्या ठरावाअन्वयें इतर रीतीनें देण्याजोगी केलेली रक्कम | | खर्च | |
| | अनुक्रम नंबर | धनकोचें नांव व पत्ता | | रकम | पुढील व्याज ज्या दरानें द्यावयाचें तो व्याजाचा दर | रकम | ज्यांनीं द्यावयाचा त्या पक्षकारांचीं नांवें |
| | | | | | | | |

| ६ | | ७ | | | | | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोर्ट फी | | ४ थ्या आसनांतील रकमा कशा भरावयाच्या | | | | | ज्या रकमेसंबंधांत चार्ज (बोजा) ठेवण्यांत आला असेल ती रकम | शेरे |
| रकम | ज्यांनीं न्यायाची त्या पक्षकारांचीं नांवें व देण्याची रीत | किती हप्त्यांनीं | दरेक हप्त्याची रकम | केव्हां भरावयाच्या: वर्ष | केव्हां भरावयाच्या: महिना | अक्षरीं आणि आकड्यांत एकूण | | |
| | | | | | | | | |

## परिशिष्ट ब

### [ अ ] स्थावर मिळकती

| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्व्हे नंबर वगैरेसह गांवाचीं नांवें | | | | | |
| अनुक्रम नंबर | जरूर तेथे चतुःसीमासह मिळकतीचा तपशील (जमिनी किंवा घरें) | सर्व्हे नंबर आणि पोट-हिस्स | एकरांत क्षेत्रफळ | सारा | कर्जदाराच्या हक्काचे स्वरूप | त्यावर अगोदरच असलेल्या कोणत्याहि बोजाचा, लीनचा, गहाणाचा किंवा चार्जचा तपशील | शेरे |
| | | | | | | | |

### [ ब ] जंगम मिळकती

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| अनुक्रम नंबर | वर्णन | कोठें आढळून येतील त्या जागा | त्यावर अगोदरच असलेल्या कोणत्याहि गहाणाचा, बोजाचा किंवा लीनचा तपशील | शेरे |
| | | | | |

## नमुना नं. ७

[ कानू९ (१) पहा ]

### सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याच्या ३३ (२) कलमान्वयें निवाडा.

चालविलेलें कामकाज सन १९४ . ·········नंबर.

ज्याअर्थी·········राहणार मौजे············(ज्यांचा यांत यापुढें सदरहू कर्जदार असा उल्लेख केला आहे ) यांच्या कर्जाची तोडजोड करण्यासाठीं सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबत आक्ट याअन्वयें अर्ज करण्यांत आल्यावरून ह्या कोर्टानें सदरहू आक्टाच्या ठरावाअन्वयें त्याच्या कर्जांची सदरहू आक्टाच्या ३१ व्या कलमान्वयें कमी केल्याप्रमाणेंची एकूण रकम ठरविली आहे;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या परिशिष्टांत नमूद केलेल्या धनकोनें/सर्व धनकोंनीं सदरहू आक्टाच्या ३३ व्या कलमाचें पोट–कलम ( १ ) अन्वयें कर्जे प्रमाणशीर रीतीने आणखी कमी करण्यास कबुली दिली आहे;

आणि ज्याअर्थी, सदरहू कर्जदारानें, प्रमाणशीर रीतीनें अखेर कमी करण्यांत आलेली कर्जाची रकम कोर्टानें कायम केलेल्या मुदतींत दिलेली नाहीं आणि त्या रकमेचा भरणा केल्याबद्दलची धनकोची पावती हजर केलेली नाहीं;

त्याअर्थी, यावरून सदरहू आक्टाच्या ३३ व्या कलमाचा (२) व्या पोट-कलमान्वयें पुढीलप्रमाणें फर्माविण्यांत येत आहे:—

(अ)*.......................................................येथील

×........प्रायमरी लँड मॉर्टगेज बँकेनें

——————————————————————————————सदरहू

+बाँबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्टगेज बँक लिमिटेड हिनें धनकोला। धनकोनां, प्रसंगाप्रमाणें कलम ३१ किंवा ३३ (१) अन्वयें अखेर प्रमाणशीर रीतीनें कमी करण्यांत आलेली कर्जाची रक्कम दिली पाहिजे किंवा धनकोची। धनकोंची जर तशी इच्छा असेल तर सदरहू कर्जदारांकडून त्याला त्यांना येणें असलेल्या सर्व कर्जाची पूर्ण फेडीखातर, बाँबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्टगेज बँक लि. हिचे व प्रांतिक सरकारनें हमी दिलेले बाँड दिले पाहिजेत.

(ब) सदरहू कर्जदारानें सदरहू बँकेस, सदरहू आक्टाच्या ३३ व्या कलमाच्या (३) ऱ्या पोट–कलमान्वयें, रुपयांची रक्कम सदरहू रकमेच्या त्याबाबतींत सरकारकडून वेळोवेळीं जाहीर करण्यांत येईल त्या दरानें येणाऱ्या व्याजासहित, प्रसंगाप्रमाणें ज्या तारखेस सदरहू बँक धनकोला/धनकोंना येणें असलेली कर्जाची रक्कम त्याला। त्यांना देईल त्या तारखेपासून अगर ज्या तारखेस एक। अनेक बाँड दिला असेल। दिले असतील त्या तारखेपासून प्रत्येकीं.........रुपयांच्या*..........वार्षिक हप्त्यांनीं कर्जाच्या रकमेची पूर्ण फेड होईल तोंपर्यंत दिली पाहिजे; पहिला हप्ता............ रोजीं भरण्याजोगा असेल;

(क) कोर्ट फी म्हणून.........इतके रुपये......................... यांनीं दिले पाहिजेत आणि इतके रुपये

यांनीं

यांना खर्चादाखल दिले पाहिजेत; आणि

---

* ज्या ठिकाणीं बँक असेल त्या ठिकाणचें नांव द्यावें.

×बँकेचें नांव कांहीं असेल तर तें येथें द्यावें.

+ज्या प्रदेशांत प्रायमरी लँड मार्टगेज बँक नसेल तरच हें नांव राहूं द्यावें.

(ड) सदरहू कर्जदाराच्या या सोबतच्या परिशिष्टाच्या ४ थ्या आसनांत वर्णन केलेल्या सर्व स्थावर मिळकतीवर, पॅराग्राफ (ब) मध्यें सांगितलेले सर्व हप्ते पूर्णपणें भरण्यांत येईपर्यंत, सदरहू बँकेच्या वतीनें यावरून चार्ज ठेवण्यांत येत आहे.

सीनियर
शिक्का सिव्हिल जज, ——— डिव्हिजन.
ज्यूनियर

## परिशिष्ट

| १<br>अनुक्रम नंबर | २<br>धनकोचें नांव व पत्ता | ३<br>कोर्टानें अखेर ठरविल्याप्रमाणें प्रत्येक धनकोला द्यावयाजोगी असलेली कर्जाची रक्कम | ४<br>कर्जदाराच्या सर्व स्थावर मालमिळकतीचें वर्णन व संपूर्ण तपशील | ५<br>शेरे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

*येथें वार्षिक हप्त्यांची संख्या नमूद करावी.

## नमुना नंबर ८

( कानू १० पहा. )

सिव्हिल जडजाचें कोर्ट, सीनियर/ज्युनियर डिव्हिजन............यांस,

सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याच्या ३८ व्या कलमाचें पोट–कलम (३) ची रकम (१) अन्वयें मी........ बापाचें नांव................, जात.........राहणार मौजे.......... तालुका......................वर्षाच्या.........महिन्यांत भरावयाची असलेली हप्त्यांची रकम भरण्यांत कर्जदारानें कसूर केली असल्यामुळें कोर्टानें दिलेला तारीख......माहे.......सन.........रोजींचा निवाडा नंबर......हा अंमलांत आणण्यासाठीं, यावरून अर्ज करीत आहे.

ता माहे सन १९४ .

धनकोची सही.

## नमुना नंबर ९

[ कानू ११ (२) पहा ]

विक्रीच्या दाखल्याचा नमुना

यावरून दाखला देण्यांत येतो कीं, सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट याच्या ४१ व्या कलमास अगर ४७ व्या कलमाच्या (२) व्या पोट-कलमास अनुसरून...............यांनीं चालविलेल्या विक्रीच्या कामांत.................हा तारीख...... माहे.........सन १९४७ रोजीं जाहीर लिलावानें झालेल्या विक्रीत ..........रुपयांस.............चा खरेदी करणार म्हणून जाहीर करण्यांत येत आहे.

विक्रीचें काम चालविणारा अंमलदार.

# नमुना नंबर १०

## ( कानू १४ पहा )

## कर्जदार इसमांना कर्जे देण्याबाबत अधिकारपत्र

सन १९४७ चा मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत आक्ट (सन १९४७ चा मुंबईचा आक्ट २८ वा) याच्या ५४ व्या कलमाचें पोट-कलम (१) याअन्वयें मिळालेले अधिकार चालवून, * यांना ( ज्यांचा यांत यापुढें अधिकार दिलेला इसम म्हणून उल्लेख केला आहे) सदरहू आक्टाअन्वयेंच्या कोणत्याहि कामकाजांत जे पक्षकार आहेत किंवा ज्यांच्या कर्जाच्या संबंधांत सदरहू आक्टाअन्वयें तोडजोड करण्यांत आली आहे अशा कर्जदार इसमांना कर्जे देण्याबाबत अधिकार देत आहे.

२. हें अधिकारपत्र पुढील स्थानिक प्रदेशांत अंमलांत राहील:—

३. हें अधिकारपत्र तारीख माहे सन पासून तारीख माहे सन पर्यंत (दोन्ही दिवस धरून) अंमलांत राहील:—

४. हें अधिकारपत्र पुढील शर्तींस पात्र ठेवून दिलें आहे:—

(१) कोणत्या कारणासाठीं कर्ज देता येईल तें व अशा कर्जाची कमाल मर्यादा—अधिकार दिलेल्या इसमानें कोणत्याहि कर्जदारास हंगामी पैका पुरविण्याच्या कारणासाठीं असेल तें खेरीज करून, तसेंच याबाबत कलेक्टरानें १५ व्या कानूअन्वयें ठरविलेल्या कमाल मर्यादेपेक्षां जास्त कर्ज देतां कामा नये.

अधिकार दिलेल्या इसमानें, ज्या कर्जदारानें पूर्वी दुसऱ्या कोणा अधिकार दिलेल्या इसमाकडून कर्ज काढलें असेल अशा कोणत्याहि कर्जदाराला असें पूर्वीचें कर्ज पूर्णपणें फेडलेलें असल्याशिवाय, किंवा तो ( अधिकार दिलेला इसम ) अशा पूर्वीच्या कर्जाबाबत कर्जदाराची पात्रता दूर करण्याचें कबूल करीत असल्याशिवाय, जाणूनबुजून कोणतेंहि कर्ज देता कामा नये.

(२) अधिकार दिलेल्या इसमानें पिकें किंवा माल विकण्यास परवानगी नाकारतां कामा नये. कलम ५३, पोट-कलम (१) अन्वयें कर्जदारानें उभी

पिकें किंवा त्याच्या जमिनींतील माल विकण्यास मागितलेली परवानगी अधिकार दिलेल्या इसमानें गैरवाजवी रीतीनें नाकारतां कामा नये व जर अधिकार दिलेला इसम स्वतःच सदरहू पिकें किंवा माल खरेदी करील त्यानें बाजारभावाप्रमाणें कर्जदारास त्याची किंमत दिली पाहिजे.

(३) हिशेब ठेवणें व पुरविणें हें अधिकार दिलेल्या इसमाचें कर्तव्य असेल.—(अ) अधिकार दिलेल्या इसमानें कर्जदारास दिलेल्या प्रत्येक कर्जाचा नमुना नं. ११ मध्यें एक स्वतंत्र हिशोब नियमितपणें ठेवला पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणत्याहि कर्जदारास दिलेलीं कर्जे चालू खात्यावर देण्यांत आलेलीं असतील तेव्हां अधिकार दिलेल्या इसमास अशा कर्जाच्या संबंधांतील सर्व देवघेवीचा एकच हिशोब ठेवण्याचा अधिकार आहे.

खुलासाः—ह्या रकमेच्या कारणासाठीं "चालू खातें" ह्या संज्ञेत, बँकाच्या बाबतींत चालू खात्याच्या स्वरूपांत ठेवण्यांत येणाऱ्या ओव्हर-ड्राफ्टस, कॅशक्रेडिट ह्यासंबंधीं हिशोबांचा व प्रो-नोटसंबंधीं हिशोबांचा समावेश होतो.

(ब) अधिकार दिलेल्या इसमानें, प्रत्येक वर्ष संपल्यावर एक महिन्याच्या आंत, त्यानें किंवा त्याच्या एजंटानें सही केलेलें एक संपूर्ण व बिनचूक हिशोबाचें पत्रक प्रत्येक कर्जदाराला पुरविलें पाहिजे. अशा हिशोबाच्या पत्र-कांत सदरहू वर्षांत केलेल्या सर्व व्यवहाराची नोंद व सरकार सामान्यतः किंवा कोणत्याहि विशिष्ट क्षेत्रासाठीं जी तारीख ठरवील त्या तारखेस प्रत्येक कर्जाच्या खात्यावर निघणारी बाकी ही दर्शविली पाहिजेत, व त्यांत नमुना नं. १२ यांतल्याप्रमाणें तपशील असला पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, कर्जे चालू खात्यावर देण्यांत आलीं असतील अशा बाबतींत, ठरविलेल्या तारखेस अशा सर्व हिशोबांवर येणें

*येथें ज्यास अधिकार द्यावयाचा त्या व्यक्तीचें, जॉइंट स्टॉक कंपनीचें अगर इतर संस्थेचें नांव व पत्ता लिहा.

निघणाऱ्या बाकीचा तपशील पुरविल्यास, पुरें होईल. बँकांच्या बाबतींत कर्जदारास पासबुकाच्या साधनानें किंवा इतर प्रकारें सबंध वर्षभर वेळोवेळीं हिशोबाचें संपूर्ण पत्रक पुरविण्यात आल्यास आणि वर्ष संपल्यावर एक महिन्याचे आंत ठरविलेल्या तारखेस येणें राहिलेल्या शिलकेच्या रकमेची माहिती दिल्यास, ह्या रकमेच्या शर्तीचें पालन झाल्याचें समजलें पाहिजे.

(क) सदरहू हिशोबाचें पत्रक कर्जदारास अधिकार दिलेल्या इसमाच्या खर्चानें रजिस्टर पोस्टानें पाठविण्यांत आलें पाहिजे व त्याबाबत पावती मिळविण्यांत आली पाहिजे.

(४) व्याजाचा दर व हिशोब—(अ) अधिकार दिलेल्या इसमानें १६ व्या कानूअन्वयें सरकारनें जाहीर केलेल्या दरांहून जास्त दरानें व्याज आकारतां किंवा वसूल करतां कामा नये.

(ब) कर्जाच्या बाबतींत कोणतीहि परतफेड केली असल्यास, अशा कर्जावरील व्याज हें अशा परतफेडीच्या तारखेपर्यंत आकारलें पाहिजे; आणि तरीहि जर सहरहू कर्ज किंवा त्याचा कोणताहि भाग अजूनहि देणें निघेल तर, त्यानंतर व्याज अजूनहि देणें असलेल्या मुद्दलाच्या बाकीवरच फक्त आकारलें पाहिजे.

(५) हिशोबांची तपासणी करूं देणें—अधिकार दिलेल्या इसमानें सरकारनें खास माफी दिली असेल तो प्रसंग खेरीजकरून, सरकार याबाबत नेमील अशा अंमलदारास त्यानें ठेवलेले हिशोब तपासूं दिले पाहिजेत.

(६) या कानूंत सांगितलेल्या शर्ती न पाळण्याबद्दल शिक्षा——सरकारास त्यांच्या मर्जीस येईल तर, त्यांनीं दिलेला अधिकार सदरील शर्तींपैकीं कोणत्याहि शर्तीच्या भंगाबद्दल किंवा इतर कोणत्याहि कारणावरून, रद्द करण्याचा अधिकार आहे.

तारीख माहे सन १९४ .

मुंबईचे गव्हर्नर यांचे हुकुमावरून,

सेक्रेटरी निसबत सरकार.

## नमुना नंबर ११

(कानू १४ व नमुना १० पहा)

नांव बापाचें नांव जात

राहणार ह्याचे कर्जाचा हिशोब.

ज्या तारखेपर्यंत असा हिशोब पुरा केला ती तारीख—

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुक्रम नंबर | कर्ज दिल्याची तारीख | मुद्दल किंवा मुद्दलाची बाकी-मागील वर्षांवरून पुढें ओढून आणिली असेल तर— | व्याजाचा दर | परत फेडीची तारीख | दिलेला पैसा कोणत्या खातीं जमा तें | | शेरे |
| | | | | | मुद्दलाच्या खातीं | व्याजाच्या खातीं | |
| | | | | | | | |
| | | | | वर्षांत कर्जाच्या खातीं फेडलेली एकूण रक्कम | | | |
| | | | | वर्षअखेर बाकी कोणतीही असल्यास. | | | |

## नमुना नंबर १२

(कानू १४ व नमुना १० पहा)

नांव बापाचें नांव जात

राहणार ह्याचा तारीख माहे सन १९ रोजीं संपणाऱ्या वर्षाबद्दलचा कर्जाचा हिशोब.

व्याजाचा दर—

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जाचा अनुक्रम नंबर | कर्जाची तारीख | कर्जाची मुद्दल रक्कम अगर मुद्दलाची बाकी मागील वर्षापासून पुढें ओढून आणिली असेल तर | पुढें ओढून आणलेली व्याजाची रक्कम कोणतीहि असल्यास | वर्षांत खालील खातीं जमा केलेल्या रकमा | | वर्षअखेर येणें असलेली बाकी | |
| | | | | मुद्दलाच्या खातीं | व्याजाच्या खातीं | मुद्दल | व्याज |
| | | | | | | | |

कर्जदारानें देणें असलेल्या सर्व कर्जाची एकूण...

आज तारीख माहे सन १९४

धनकोची किंवा एजंटाची सही

# सूचि

(आकडे पानांचे आहेत)


अग्रहक—१०४,१०५.

अपवाद—२५.

कर्ज—८९.

अपील—५९.६०,६३,६९,८१,
८४,९२,९४,१०४,
१०७,१०८.

—निवाडे ६

—मुदत १३४

—कोर्ट फी स्टँप ५९,८१,
९४,१०७

—कोर्ट १३५

—वर्ग करणें ६२

—अमलबजावणीस मनाई
१२४

—अपीलास मनाई १४१

अमलबजावणी—१२४

अर्ज—२८,२९,३०,३१

—कोर्ट फी स्टँप ३१,४५
१३५,१३६

—मुदत ३१,४५,११९

इकरार—१०६

उत्पन्न—१०६

—शेतीचें १२

—बिगर शेतीचे १५

—वार्षिक १०३

—तावेगहाण मिळकतीचें
७९

ऐपत—१००

कर्ज—९,१६०

—फेड १००

—तडजोड २७

—वेचनदार ४१

कर्जदार—४८,९१,९४

—नादार १३७.१३८

—कानू २२,१४६,१४७
१४८,१५१

कायदा—

—रद्द २१,१४९,१५०

किंमत—९०

कोर्ट—७,८

—अपील १३५

—रिव्हिजन

—खर्च ३३,३६

—फी ३१,४५,४७,१२५

गहाण ठरविणें—७९,८०,८१, ८२

गुन्हा—१४५

जप्ती—९६,१२९

जमीन—

—जातीनें कसणें १२

—धारण करणें १४,१५

जामीन—३७,३८,३९,४१

तडजोड—४५,४६,४७

तारण—१००,१०१

—कर्ज १०१

तावा—१०४,१०७

नमुने—१७२ पासून पुढें

नादार—१३७,१४०,१४१

निवाडा—५,१०१

—नमुना १०५

—अंमलबजावणी १२०

—नोंद १२०

—कोर्ट फी १२२,१३५,

नोटिस—३३,३४

—जाहीर नोटिस ५१,५२

पत्रक—५०,५१,५३

पिकें—

—पैसा पुरविणें १७,१८, १५१

बोजा—१०५

मुदत—२८,३१,४५,१३४, १४२

रिव्हिजन—६,६९

लँड मॉर्गेज बँक—१०९,१११

लँड रेव्हेन्यू कोड—१९,२४,२५

वकील—८१,८३

वारस—८७

व्याज—१०७

—कमाल दर १०७,१६१

—ड्रामदुप्पट ७७
व्याख्या—४
शेतकरी—१
शेतकी—१२,१७
—मजूर ८३
शेड्यूल्ड बँक—२२
सहकारी मंडळी—६,७
—रिसोर्स सोसा-
यटी २१
सावकार—११२
—अखत्यार मिळालेले
१४५,१५७,१५८,
१५९,१६०
सिव्हिल प्रोसीजर कोड-११७
सिव्हिल जज्ज्—७,८
हिशेब घेणें—६९,७० ते ७८
हुकूमनामा—९,१०
हिंदू एकत्र कुटुंब—१२,१७

परिशिष्ट

# The Bombay Agricultural Debtors Relief Act.
## BOMBAY ACT NO. XXVIII OF 1947.

*First published, after having received the assent of the Governor General, in the "Bombay Government Gazette" on the 27th May 1947.*

An Act to consolidate and amend the law for the Relief of Agricultural Debtors in the Province of Bombay.

WHEREAS it is expedient to consolidate and amend the law for the relief of agricultural debtors in the Province of Bombay and for certain other purposes specified herein; It is hereby enacted as follows:—

### CHAPTER I.

*Preliminary.*

*Short title and extent.*

1. (1) This Act may be called the Bombay Agricultural Debtors Relief Act, 1947.

(2) It extends to the whole of the Province of Bombay except the City of Bombay.

*Definitions.*

2. In this Act, unless there is anything repugnant in the subject or context—

(1) "award" means an award made under sub-section (4) of section 8 or section 9, 32 or 33 or as confirmed or modified by the Court in appeal;

(2) "co-operative society" means a society registered under the provisions of the Bombay Co-operative societies Act, 1925; (Bom. VII of 1925.)

(3) "Court" means the court of the Civil Judge (Senior Division) having ordinary jurisdiction in the area where the debtor ordinarily resides and if there is no such Civil Judge, the court of the Civil Judge (Junior Division) having such jurisdiction;

(4) "debt" means any liability in cash or kind, whether secured or unsecured, due from a debtor whether payable under a decree or order of any civil court or otherwise but does not include arrears of wages payable in respect of agricultural or manual labour;

(5) "debtor" means—

(a) an individual—

(i) who is indebted;

